१८६९
प्र. ग्रं. मं. ठाणे
म्ह- प्रवास
३०८



रा. चिं. ढेरे



REFBK-0012211

मराठा ... ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम 39607 वि:
... नों. दि.
308

REFBK-0012211

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
क्र. 92277

# खंडोबा

रा. चिं. ढेरे

किंमत पांच रुपये

प्रकाशक
रा. ज. देशमुख,
देशमुख आणि कंपनी,
७३९ बुधवार, पुणें २

सर्व हक्क लेखकाकडे

प्रथम आवृत्ति १९६१

चित्र
दीनानाथ दलाल

मुद्रक
मा. ह. पटवर्धन
संगम प्रेस प्रा. लि.,
३८३ नारायण, पुणें २

विद्यानिधि
सिद्धेश्वरशास्त्री चित्राव
यांस सादर समर्पण

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ३९८४१ वि: भू-प्रवास
क्रमांक ३०८ नों दि: १२/१२/६१

# अनुक्रम

१. *मैलार : खंडोबा*

महाराष्ट्र-कर्नाटकाचा लोकदेव १, मार्तण्डभैरवाची अवतारकथा ३, अवतारकथेचें विश्लेषण ५, मल्लारि-माहात्म्याचा काळ ७, मल्लारि-माहात्म्याचा कर्ता ९, मैलाराची प्राचीनता १०, खंडोबाच्या क्षुद्रतेची उत्तरकालीन जाणीव १३, खंडोबा : एक वीरदेव १७, खंडोबा : सूर्य १८, खंडोबा : सप्तकोटीश्वर २१, खंडोबा : स्कंद २५, खंडोबा : इंद्र ३०, खंडोबा : रवळोबा-ज्योतिबा ३२, खंडोबा : मूलस्थानदेव-स्वयंभूदेव ३५, ज्योतिबांचें कल्पनारंजन ३५, मल्लारि मार्तण्ड भैरव : एक रहस्य ३६, खंडोबाची नामावळी ४३, खंडोबाचीं प्रतीकें ४७, खंडोबाचा परिवार ५०, संदर्भ-टीपा ५७–५९.

२. *माळव्व : म्हाळसा*

मल्लारि-म्हाळसा-विवाहकथा ६०, म्हाळसेची प्राचीनता ६०, क्षुद्रतेची उत्तरकालीन जाणीव ६२, म्हाळसा : नामरहस्य ६३, म्हाळसेचीं

मंदिरें ६६, म्हाळसा : मोहिनी ६७, म्हाळसा : खंडेश्वरी ७१, म्हाळसा : मेंगाई ७२, म्हाळसा : रूपदर्शन ७३, म्हाळसेची महती ७५, संदर्भ-टीपा ७५-७६.

*३. खंडोबाची उपासना*

माहात्म्यें आणि स्तोत्रें ७७, मैलार-खंडोबाचीं प्रतीकस्थानें ७९, उपासक जाती-जमाती ८१, वाघ्या-मुरळी ८२, भवससायास आणि अन्य उपासना-प्रकार ९०, कुळधर्म-कुळाचार ९२, भंडार, बेल-दवणा, तेल-हंडा व कांदा-वांगें ९३, उत्सव आणि यात्रा ९५, येळकोट गर्जना ९७, उपासनेचें जानपद स्वरूप ९८, संदर्भ-टीपा ९८–९९.

*४. खंडोबाची लोकप्रियता*

संतांचा खंडोबाविषयक दृष्टिकोन १००, एकनाथ १०१, समर्थ रामदास १०२, केशवस्वामी भागानगरकर १०४, रंगनाथस्वामी निगडीकर १०५, दिनकरस्वामी तिसगांवकर १०५, मध्वमुनीश्वर १०८, अमृतराय १०९, निरंजनमाधव ११०, मोरोपंत १११, निरंजन रघुनाथ ११२, मौनीनाथ-महाराज ११३, शाहीर होनाजी ११४, इतिहासप्रसिद्ध व्यक्तींची खंडोबा-भक्ति ११५, खंडोबाचे दोन बंडखोर भक्त ११६, खंडोबा आणि ख्रिश्चन मिशनरी ११७, लोकसाहित्यांतील खंडोबा ११९, खंडोबाचा भाषेवरील प्रभाव १२३, खंडोबाच्या लोकप्रियतेचें रहस्य १२३, संदर्भ-टीपा १२७–१२८.

*५. उपसंहार*

खंडोबाचा विकासक्रम १२९, म्हाळसा : एक देवतावैज्ञानिक चमत्कार १३०, कांहीं देवतावैज्ञानिक तथ्यें १३१, कांहीं सांस्कृतिक अनुबंध १३४, लोकमानसाचें दर्शन १३५–१३६.

*परिशिष्टें*

क्षेत्र-सूचि १३७, दोन जुन्या चर्चा १४८, खंडोबाचीं गाणीं १५६, शेख महंमदाच्या संकीर्ण कवितेंतील उल्लेख १५९, शुद्धिपत्र १६०, संदर्भ-साहित्य १६१–१६४.

# थोडें प्रास्ताविक

देवताविज्ञान ही एक इतिहास-शाखा आहे. निदान भारतीय इतिहासाची तर आहेच आहे. अठराव्या शतकाच्या अखेरपर्यंत भारतीय लोकजीवन धर्मप्रधान होतें. लोकांच्या धार्मिक श्रद्धा देवतांच्या रूपानें घनीभूत होत असत. देवतांच्या घडणींत, त्यांच्या उदय-विकासांत आणि ऱ्हासांतहि लोकांच्या वृत्ति-प्रवृत्ति, आशा-आकांक्षा, भाव-भावना, क्रिया-प्रतिक्रिया काम करीत असत. अर्थातच एखाद्या देवतेच्या घडणीचा इतिहास आणि लोकप्रियतेचें रहस्य उकलण्याचा वस्तुनिष्ठ प्रयत्न केला, तर त्या अध्ययनाच्या द्वारां लोकमानसाच्या विविध आंदोलनांचा इतिहास आपल्या हातीं येईल, अशी माझी या विषयाकडे पाहण्याची दृष्टि आहे.

हा दृष्टिकोन समोर ठेवून मीं हें खंडोबाविषयक सर्वांगीण अध्ययन वाचकांपुढें ठेवलें आहे. विठोबाप्रमाणेंच खंडोबा हाहि महाराष्ट्रांतील लोकप्रिय देव. परंतु दोघांच्या लोकप्रियतेची आणि सांस्कृतिक प्रतिष्ठेची जात निराळी आहे. तें निराळेंपणहि तपासण्याचा प्रयत्न मीं केला आहे.

राजवाडे-भांडारकरांपासून अनेक संशोधकांनीं खंडोबाविषयीं स्फुट विचार केलेला आहे. त्याच्या स्वरूपाचें व्यापक अध्ययन मात्र गेल्या दहा वर्षांच्या अवधींतच होऊं लागलें आहे. १९५२ मध्यें श्री. शं. वा. जोशी यांनीं आपल्या 'मऱ्हाटी संस्कृति' या ग्रंथांत प्रथमच कानडी मैलाराचा संशोधकांना परिचय करून दिला. त्यानंतर नोव्हेंबर १९५७ मध्यें 'नवभारत' मासिकांत 'मल्लारि मार्तंड भैरव' हा श्री. पांडुरंग देसाई यांचा विवेचक लेख प्रसिद्ध झाला. त्याच वर्षीं डिसेंबर महिन्यांत श्री. ग. ह. खरे यांनीं त्याच विषयावर 'केसरीं'त संशोधनात्मक लेख लिहिला आणि १९५८ मध्यें त्यांचें 'महाराष्ट्राचीं चार दैवतें' हें पुस्तक प्रसिद्ध झालें. या पुस्तकांत जवळजवळ १००पृष्ठें खंडोबाच्या संशोधनाला वाहिलेलीं आहेत. खंडोबाविषयक प्रकरणांत श्री. खरे यांनीं दहा-अकरा मल्लारि-क्षेत्रांचीं वस्तुनिष्ठ वर्णनें आणि अनेक लैखिक उल्लेख दिलेले असल्यामुळें खंडोबाविषयक संशोधन करणारांना 'साधन-ग्रंथ' म्हणून श्री. खरे यांचें पुस्तक अत्यंत उपयोगी आहे. श्री. देसाई, श्री. जोशी आणि श्री. खरे यांनीं खंडोबाच्या स्वरूपाविषयीं मांडलेल्या अनेक मतांना माझा विरोध असला, तरी या दशकभरांत या तीन पंडितांनीं केलेलें खंडोबाविषयक संशोधन निःसंशय मोलाचें आहे. या त्रयीच्या खांद्यावर बसूनच मला या 'लोक-देवा'चें अधिक सूक्ष्म दर्शन घेतां आलें, हें मी कृतज्ञतापूर्वक नमूद करतों.

या विषयाचें अध्ययन करीत असतांना विद्यानिधि सिद्धेश्वरशास्त्री चित्राव, पं. महादेवशास्त्री जोशी, डॉ. प. कृ. गोडे, कविवर प्रा. द. रा. बेंद्रे यांच्याशीं वारंवार केलेली चर्चा उद्‌बोधक ठरली. श्री. रं. म. जोशी, डॉ. रं. श्री. मुगळी आणि श्री. पांडुरंग देसाई यांनीं आवश्यक ती माहिती पत्रांतून तत्परतेनें कळविली. या सर्वांचा मी कृतज्ञ आहें. माझ्या हातून संशोधनाचें कार्य व्हावें, अशी उत्कट सदिच्छा बाळगणाऱ्या माझ्या ज्या अनेक मित्रांनीं न मागतां मला साहाय्य दिलें, त्यांचे आभार कसे मानूं? त्या ऋणाच्या बळावर तर माझा सारा आत्मविश्वास स्थिर आहे.

विजयादशमी · शके १८८३. रामचंद्र चिंतामण ढेरे

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. 72271

# मैलार : खंडोबा

*महाराष्ट्र-कर्नाटकाचा लोकदेव*

महाराष्ट्रांत 'खंडोबा' आणि कर्नाटकांत 'मैलार' या नांवानें ओळखला जाणारा हा लोकदेव कर्नाटक-महाराष्ट्राच्या सांस्कृतिक अनुबंधाचें एक प्रकट प्रतीक आहे. 'मल्लारि मार्तण्ड भैरव' हें त्याचें संस्कृत नांव. या देवतेची लोकप्रियता एवढी व्यापक आहे कीं, धनगर-रामोश्यांपासून ब्राह्मणांपर्यंत समाजाच्या सर्व थरांत त्याची उपासना प्रचलित आहे. महाराष्ट्र आणि कर्नाटक या दोन्ही प्रदेशांत त्याचीं अनेक प्रताकस्थानें असून, तेथें यात्रा-उत्सवांच्या निमित्तानें समाजाचे सर्व स्तर गर्दी करीत असतात. या सार्वत्रिक लोकप्रियतेमुळेंच त्याची लौकिकता अद्यापि अभंग आहे. त्याची जीवन-गाथा फारशी जुनी नसूनहि त्यानें अल्पावधींत व्यापक जनमानसाची घेतलेली पकड आणि त्याच्या संस्कृतीकरणाचा प्रबल प्रयत्न होऊनहि त्यानें प्राकृत जनांशीं राखलेलें इमान यांचा विचार मनांत आला कीं, या लोकदेवाविषयीं माझें बुद्धिनिष्ठ मनहि क्षणैक भावडें बनूं लागतें. खंडोबाच्या या 'अलौकिक लौकिकते'नेंच मी त्याच्या स्वरूपाचें चिन्तन करायला प्रवृत्त झालों.

महाराष्ट्र-कर्नाटकाच्या संस्कृति-संगमाचा इतिहास अत्यंत रंजक आणि उद्बोधक आहे. त्या इतिहासांत दक्षिणेंतील समाज-जीवनाच्या घडणीचीं अनेक रहस्यें दडलेलीं आहेत. त्या रहस्यांचीं गुंफामंदिरें उघडीं करायला खंडोबाचाहि चांगला उपयोग होईल. अर्थात् त्यासाठीं अगोदर त्याचा चांगला परिचय घडायला हवा.

खंडोबा हा मूळचा कर्नाटकांतील मैलार. महाराष्ट्राच्या संस्कृतिधारेला सर्वांगीं समृद्ध करणारा विठ्ठलहि 'कानडा'च समजला जातो. परंतु महाराष्ट्रानें विठ्ठलाचें वैभव वाढवलें आणि आत्मशुद्धीची प्रेरणा देणारें त्याचें पूर्णोन्नत स्वरूप पुन: कर्नाटकाला परिचित करून दिलें. त्याचें मूळचें 'कानडे-पण' इतिहासाच्या धूसर गर्भागारांत झांकोळलें आहे. परंतु जेव्हां विठ्ठल-

भक्तीचा दासकूट संप्रदाय कर्नाटकांत उदय पावला, तेव्हां कर्नाटकाच्या कानाकोपऱ्यांत मराठी भक्ति-भीमेचा अमूर्त प्रवाह हेलावूं लागला. चौदाव्या शतकांत श्रीनरसिंह सरस्वतींनीं गाणगापूरच्या निवासांत स्वत:च्या विभूतिमत्त्वानें दत्तभक्तीची वेगवान् धारा कानडी भूमींत निर्माण केली आणि उभय प्रदेशांच्या सौहार्दाचा एक नवा दृढ अनुबंध निर्माण केला.

खंडोबाच्या कानडेपणाची कल्पना परवांपरवांपर्यंत संशोधकांना नव्हती. परंतु ती उपासकांना, निदान सीमेवरच्या उपासकांना असली पाहिजे, असें वाटतें. मैलार-मैराळ हें खंडोबाचें कानडी नांव महाराष्ट्रांत खंडोबाच्या उपासनेच्या क्षेत्रांत रूढ आहे. 'मैराळ' हें व्यक्तिनाम व उपनाम अशा दोन्ही प्रकारांनीं येथें प्रचारांत आहे. खंडोबाच्या क्षेत्रस्थानांच्या गणनेंत कर्नाटकांतील कांहीं स्थानांची नोंद होत असे. ज्ञानेश्वरांनीं विठ्ठलाच्या 'कानडेपणा'चा जसा उल्लेख केला आहे, त्याचप्रमाणें एकनाथांनीं आपल्या साहित्य-संभारांत दोन ठिकाणीं "मैराळ देव कानडे" आणि "कानडा खंडेराय" असा खंडोबा-मैराळ या दोन्ही नांवांनीं त्याच्या 'कानडेपणा'चा उच्चार केला आहे. मध्वमुनीश्वरांनींहि "कानडें रूपडें चोखडें सावडें नाम मल्लारी।" अशी मल्लारीच्या 'कानडया' रूपाची ओळख नोंदविली आहे. वाघ्यांच्या तोंडीं असलेल्या गीतांतहि ही खंडोबाच्या 'कानडेपणा'ची जाणीव आढळते.

आश्चर्याची आणि कांहींशी अभिमानाची गोष्ट अशी आहे कीं, 'कानडया' विठ्ठलाला 'बाळबोध' करण्याचा जसा विराट् भक्तिपुरुषार्थ महाराष्ट्रानें केला, त्याचप्रमाणें 'कानडया' मैलाराचें 'प्राकृत' रूप ढळूं न देतां त्याला 'संस्कृत' चरित्र देण्याचा प्रयत्न महाराष्ट्रानें केला. पहिली महाराष्ट्राची उपास्य देवता बनली, तर दुसरी कुलदेवता बनली. उपास्यदेवतेच्या अलौकिक भक्तींतहि लोकमानस, कुलदेवतेवरील लौकिक श्रद्धा अभंग राखतें, हा एक लोकधर्माचा विशेष आहे. या विशेषाचा प्रत्यय विठ्ठल-प्रभावित मराठी लोकमानसाची खंडोबावरील प्रीति पाहिल्यास लगेच येतो. त्या प्रीतीची प्रतीति करून घेण्यासाठीं देवताविज्ञानाच्या अभ्यासकांनीं लोकसमूहांत उतरलें पाहिजे.

*मार्तण्ड भैरवाची अवतार-कथा*

अशा या लोकदेवाच्या स्वरूपाची संशोधकीय चिकित्सा करण्यापूर्वी लोकश्रद्धेनें निर्माण केलेली त्याची अवतार-कथा समजावून घ्यावयास हवी. ही अवतार-कथा 'मल्लारि-माहात्म्यम्' नामक संस्कृत ग्रंथांत वर्णिली आहे.

पूर्वी कृतयुगांत मणिचूल नांवाच्या पर्वतावर धर्मपुत्र सप्तर्षि तप आचरीत होते. त्या पर्वतावरील निसर्गरम्य आणि प्रशान्त आश्रमांत परिवारासह तपस्वी जीवन व्यतीत करीत असतांना सप्तर्षींच्या तपांत एक विघ्न निर्माण झालें. मल्ल नांवाचा एक महाभयंकर दैत्य आपल्या प्रचंड राक्षससेनेसह मणिचूल पर्वतावर आला आणि त्यानें तेथील तपोवन उद्ध्वस्त केलें, ऋषींचे आश्रम नष्ट केले, गाईंचा वध केला, ऋषिपत्न्यांची विटंबना केली आणि अनेक ऋषींना पाशबद्ध करून विहिरींत ढकलून दिलें.

तें ऋषींचें तपोवन सर्व प्रकारें उद्ध्वस्त करून मल्ल दैत्य निघून गेला. घडलेल्या प्रकारानें किंकर्तव्यमूढ आणि शोकाकुल झालेले ऋषि आपल्या कुटुंबीयांना पर्वतांतील सुरक्षित ठिकाणीं ठेवून इंद्राकडे गेले. इंद्राजवळ आपलें दुःख व्यक्त करून, त्यांनीं अभयाची मागणी केली, परंतु इंद्रानें आपली असमर्थता व्यक्त केली. तो म्हणाला, "मल्ल आणि त्याचा बंधु मणि या दोघां दैत्यांनीं घोर तप करून ब्रह्मदेवाकडून अजेयत्वाचा वर प्राप्त केला आहे. त्यांचा नाश करायला मी असमर्थ आहें. तेव्हां आपण विष्णूकडे जावें."

विष्णूकडूनहि अशाच प्रकारचें उत्तर मिळाल्यानंतर ऋषी कैलास पर्वतावर भगवान् शिवाकडे गेले. ऋषिमुखांतून मल्लासुराच्या उन्मत्त-पणाचें वृत्त ऐकतांच शिव सन्तप्त झाला, "मल्ल दैत्यानें ऋषींचा छळ करून एक प्रकारें काळसर्पाचा पेटाराच खुला केला आहे!" असें गर्जून शिवानें त्वेषानें आपल्या जटा आपटल्या, तोंच त्या जटासंभारांतून एक विकराळ महामारी उत्पन्न झाली. ऋषींनीं तिला तूप पाजून शांत केली, म्हणून तिचें नांव 'घृतमारी' असें पडलें.

नंतर शिवानें मणि-मल्ल दैत्यांच्या विनाशासाठीं मार्तण्ड भैरवाचें रूप धारण केलें. गळ्यांत महासर्पाचें भूषण, कानांत चंडमार्तंडकुंडलें, हातांत

डमरु, त्रिशूळ, खड्ग आणि पात्र, वक्षावर रुळणारी रुंडमाला, मस्तकावर चंद्रकोरीनें युक्त असा मुकुट, तीन नेत्र आणि भालप्रदेशावर भंडार चर्चिलेला, असा तो मार्तण्ड भैरव नंदीवर आरूढ झाला आणि कार्तिकस्वामीच्या नेतृत्वाखालीं आपलें सप्तकोटि गणांचें सैन्य एकत्र करून मणिचूल पर्वतावर उतरला.

मल्ल दैत्याला त्याच्या दूतांनीं ही वार्ता सांगितली, तेव्हां त्यानें शिवाचा उपहास केला. परंतु नंतर त्यानें स्वत: उंच शिखरावरून मार्तंड भैरवाचें सैन्य प्रत्यक्ष पाहिलें, तेव्हां तो भयग्रस्त झाला आणि त्यानें आपले सर्व धुरेचे सहकारी आणि राक्षसांची सेना यांच्यासह मार्तंड भैरवाच्या सैन्याशीं झुंज घेण्याची सिद्धता केली. दोन्ही सैन्यें परस्परांस भिडतांच घनघोर युद्ध सुरू झालें. युद्धभूमीवर रक्ताचे पाट वाहूं लागले. युद्धगर्जनांनीं आणि शस्त्रांच्या खणखणाटानें सारें वातावरण भरून गेलें. मार्तण्ड भैरवाच्या सैन्यानें राक्षसांची आघाडीची फळी कापून काढतांच मल्लासुर अस्वस्थ झाला आणि त्यानें स्वत:च मार्तण्ड भैरवावर चालून जाण्याचें ठरविलें. परंतु आपल्या नेत्याचा हा आवेश पाहतांच खड्गद्रंष्ट्र नामक दैत्य पुढें झाला आणि त्यानें पराभवाचें उट्टें काढण्यासाठीं मार्तण्ड भैरवाच्या सैन्यावर चाल केली. खड्गद्रंष्ट्राला कार्तिकस्वामीनें अडविलें. त्या दोघांच्या धुमश्चक्रींत खड्गद्रंष्ट्र ठार झाला. त्यानंतर आलेल्या उल्कामुखास गणेशानें आणि कुंतलोम्यास नंदीनें ठार केलें.

आपले तीन धुरेचे सहकारी ठार झालेले पाहतांच मणि-मल्ल रागानें बेभान झाले. त्या क्रोधाविष्ट अवस्थेंत मार्तण्ड भैरवाचा पराजय करण्याच्या प्रतिज्ञेनें स्वत: मणि दैत्य पुढें सरसावला. त्याचा तो भीषण आवेश पाहून स्वत: मार्तण्ड भैरव त्याच्याशीं द्वंद्वयुद्ध खेळण्याकरितां पादचारी झाला. कांहीं काळ शस्त्रास्त्रांचे आघात-प्रत्याघात झाल्यावर मणीनें मायावी रूपें घेण्यास प्रारंभ केला. परंतु मार्तण्ड भैरवानें त्रिशूळानें त्याचें वक्ष विदीर्ण करून त्याला जमिनीवर पाडलें. मणिदैत्य जमिनीवर घायाळ होऊन पडतांच मार्तण्ड भैरवानें त्याच्या मस्तकावर पाय देण्यासाठीं पाय उचलला, तोंच पश्चात्तप्त मणिदैत्यानें त्याच्या चरणांना स्पर्श करून त्याची स्तुति करण्यास प्रारंभ केला. त्या विव्हल दैत्याची स्तुति ऐकून मार्तंड भैरव संतुष्ट झाला

व त्यानें मणिदैत्यास इष्टवरदानाचें वचन दिलें. मणिदैत्य म्हणाला : " प्रभो, माझें शिर तुझ्या चरणांखालीं नित्य असू दे आणि माझें अश्वारूढ रूपहि तुझ्या सान्निध्यांत राहूं दे."

मणिदैत्याच्या भक्तीनें संतुष्ट झालेल्या मार्तण्ड भैरवानें मणीचा बंधु मल्ल यास जीवदान देण्याचें ठरविलें आणि त्यास युद्धापासून परावृत्त करण्यासाठीं विष्णूस मध्यस्थी करण्यास सांगितलें. परंतु त्या हट्टी आणि दुर्बुद्धि दैत्यापुढें विष्णूच्या मध्यस्थीचा कांहींच उपयोग झाला नाहीं. आपल्या प्रचंड सेनेचा आणि सर्व सहकाऱ्यांचा भीषण संहार झालेला पाहून अत्यंत क्रोधानें जळणारा तो मल्लासुर मार्तण्ड भैरवावर चालून गेला. मार्तण्ड-भैरवानें प्रथम त्याच्याशीं लढण्यास घृतमारीला पाठविलें. घृतमारीनें बराच वेळ आपल्या भीषण शक्तीनें मल्लासुराचा पहिला तीव्र आवेग ढिला पाडला. नंतर स्वत: मार्तण्ड भैरव पुढें झाला आणि त्यानें बराच वेळ मल्लासुराशीं झुंज देऊन शेवटीं त्यास खड्गानें घायाळ केलें.

घायाळ झालेल्या मल्लासुराच्या मस्तकावर मार्तण्ड भैरवानें पाय ठेवतांच त्याचीहि अवस्था मणिदैत्यासारखीच झाली. त्यानें भैरवाची स्तुति करून असा वर मागितला कीं, " देवा, माझें नांव तुझ्या नांवाच्या आधीं असावें व माझें शिर तुझ्या चरणतळीं निरंतर रहावें." भैरवानें तें मान्य केलें.

नंतर अभय प्राप्त झालेल्या सप्तर्षींनीं मार्तण्ड भैरवाला अशी विनंति केली कीं, " हे प्रभो, जेथें तुम्हीं मार्तण्ड भैरव-रूप धारण करून आमचें, रक्षण केलें, त्या ठिकाणीं तुम्हीं स्वयंभू लिंगरूपानें सदैव रहावें, अशी आमची इच्छा आहे." ऋषींची ही विनंति मार्तण्ड भैरवानें मान्य केली आणि तो मार्गशीर्ष शुद्ध षष्ठी, रविवार, शततारका नक्षत्र या शुभ क्षणीं त्या ठिकाणीं आपली शक्ति जी म्हाळसा तिच्यासह लिंगद्वयाच्या रूपानें अवतरला. तें स्थान म्हणजेच मार्तण्ड भैरवाचें प्रख्यात प्रेमपूर होय.

*अवतार-कथेचें विश्लेषण*

ही अवतार-कथा सांगणारें 'मल्लारि-माहात्म्य' संस्कृतांत रचलेलें असून, कर्त्यानें तें ब्रह्मांडपुराणान्तर्गत असल्याचा आभास निर्माण केला आहे. ब्रह्मांडपुराणाच्या अधिकृत प्रतींत त्याचें अस्तित्व नाहीं. या 'माहात्म्यां'त दिलेलें मार्तण्ड भैरवाचें चरित्र आपण मुळावरून बारकाईनें

तपासलें, तर पुढील वैशिष्ट्यें आपल्या हातीं लागतात.

१. ज्याला आपण खंडोबा किंवा मैलार या नांवानें ओळखतों. तो शिवाचा **मार्तण्ड भैरव**रूपी अवतार आहे.

२. **मणि** आणि **मल्ल** या दोन दैत्यांनीं **मणिचूल** पर्वतावर धर्मपुत्र सप्तर्षींचा छळ केल्यामुळें त्याला मणि-मल्लांच्या वधासाठीं अवतार घ्यावा लागला.

३. अवतार-ग्रहणापूर्वीं त्यानें आपल्या जटेंतून '**घृतमारी**' नामक महामारी निर्माण केली.

४. मार्तण्ड भैरव चतुर्भुज, डमरु-त्रिशूल-खड्ग-पात्र धारण केलेला, सर्पभूषण, चंद्रकलान्वितमुकुटयुक्त, रुंडमाला ल्यायलेला आणि कपाळावर भंडार चर्चिलेला असा होता. त्याचें वाहन 'नंदी' हेंच होतें. त्याच्या-बरोबर कुत्रे होते.

५. मणि-मल्लांच्या वधानंतर, त्या दैत्यांचा प्राणान्त होते वेळीं त्यांना दिलेल्या वरांमुळें त्याच्या **चरणांखालीं दैत्यशिरें** शोभूं लागलीं, त्यास अश्वारूढ रूप प्राप्त झालें आणि '**मल्लारि**' या विशेषणाचा गौरव प्राप्त झाला.

६. मणि-मल्लांच्या वधानंतर सप्तर्षींच्या विनंतीवरून तो मणिचूल पर्वताच्या सान्निध्यांत प्रेमपूर या स्थानीं म्हाळसेसह लिंगद्वयरूपानें राहूं लागला.

७. या ग्रंथांत मार्तण्ड भैरवाच्या शक्तीचें नांव '**म्हालसा**' किंवा '**गंगा-म्हालसा**' असेंच दिलें आहे–'महालसा' असें नव्हे.

८. प्रेमपुरांत मार्तण्ड भैरव म्हाळसेसह प्रकटल्यावर तेथें यात्रेसाठीं देव गोळा झाले आणि त्यांनीं उत्सवासाठीं मार्तण्ड भैरवाची **मृण्मय मूर्ति** निर्माण केली, तिचें नांव 'मैलार'. म्हणजे प्रथम स्वयंभू लिंगद्वय होतें, नंतर मूर्ति तयार झाली. '**मैलार**' या नांवाचें स्पष्टीकरण 'मल्लारि-माहात्म्यां'त असें दिलें आहे–

म: शम्भु रश्च विष्णुश्च ताविलायां यदा स्थितौ।
तदा मेलापदं जातं तामारातीति विग्रहात्॥
मैलार इति मल्लारेर्नामधेयमभूत्तदा।
सावर्ण्य रलयो: प्रोक्तं मैराल इति तेन वा॥[१]

'म' म्हणजे शंभु व 'र' म्हणजे विष्णु. ते जेव्हां 'इला' म्हणजे पृथ्वी-(माती) मध्यें स्थित केले, तेव्हां त्या मृण्मय मूर्तीला 'मैलार' हें नांव प्राप्त झालें. म + इला + र – मैलार. 'र' आणि 'ल' यांचा सावर्ण्या-मुळें विपर्यय होऊन पुढें 'मैलारा' चेंच 'मैराल' असें रूपान्तर झालें.

हें अवतार-कथेचें विश्लेपण आपणांस येथून पुढें येणाऱ्या विवेचनांत उपयोगीं पडणार आहे.

*'मल्लारि-माहात्म्या'चा काळ*

'मल्लारि-माहात्म्य' हा संस्कृत ग्रंथ खंडोबाला प्रतिष्ठा प्राप्त करून देणारा ग्रंथ आहे. खंडोबाची उपासना जेथें जेथें आहे, तेथें तेथें– महाराष्ट्र व कर्नाटक या दोन्ही प्रदेशांत 'मल्लारि-माहात्म्य' या ग्रंथांत ग्रथित झालेली मार्तण्ड भैरवाची अवतार-कथा एकमतानें स्वीकारलेली आहे. या ग्रंथांत म्हाळसा-मल्लारि-विवाहाचें वर्णन नाहीं. कारण म्हाळसा ही मार्तण्ड-भैरवाची शक्ति म्हणून येथें गृहीत धरलेली आहे. या ग्रंथांत बाणाई व हेगडे प्रधान यांच्या कथा नाहींत. वाघ्या-मुरळीची चर्चा नाहीं. खंडोबाची उपासना आणि त्याचा परिवार यासंबंधींच्या लोककथा निर्माण होत होत्या आणि त्यांचें संकलन करणारे 'मार्तण्डविजय', 'जयाद्रिमाहात्म्य' यांसारखे ग्रंथहि तयार होत होते. त्या ग्रंथांना 'मल्लारिमाहात्म्या' इतकी प्रतिष्ठा लाभली नाहीं. हें 'मल्लारि-माहात्म्य' निर्माण झालें तरी केव्हां ? अन्तर्गत आणि बाह्य अशा उभयविध पुराव्यांच्या आधारें त्याचा काळ निश्चित करतां येतो.

१. या ग्रंथांत या देवतेला 'मार्तण्ड भैरव' असें म्हटलें असलें, तरी त्याचें 'मैलार-मैराळ' हें लोकप्रचलित देश्य नांव व त्याच्या पत्नीचें 'म्हालसा' हें प्राकृत नांव वापरलें आहे. मैलाराची प्राचीनता अकराव्या शतकाच्या मागें जाऊं शकत नाहीं आणि प्राचीनतम उल्लेखांतील त्याचें स्वरूप क्षुद्र ग्रामदेवतेचें आहे, हें आपण पुढें साधार पाहणार आहोंत. तेव्हां मैलार-मैराळ व म्हालसा हीं नांवें वापरणारें हें 'माहात्म्य' मैलाराची लोकप्रियता वाढल्यावर, त्याचें उदात्तीकरण करण्याच्या प्रेरणेनें रचलेलें असणार, हें निश्चित.

२. 'मल्लारि-माहात्म्यां'त नोंदविलेली मार्तण्ड भैरवाच्या अवतरणाची

तिथि मार्गशीर्ष शुद्ध षष्ठी (चम्पाषष्ठी) ही आहे. चम्पाषष्ठीचें नवरात्र आणि कुलधर्म खंडोबाच्या उपासनेंत सर्वत्र प्रचलित आहे. जर 'मल्लारि- माहात्म्या'ची रचना मैलाराच्या लेखिक उल्लेखांपूर्वी (अकराव्या शतकापूर्वी) झालेली असती, तर व्रतचर्चा करणाऱ्या 'चतुर्वर्गचिन्तामणीं'त चम्पाषष्ठीच्या व्रताची नोंद व्हावयास हवी होती. हेमाद्रि-पंडितानें 'चतुर्वर्गचिन्तामणी'च्या व्रतखंडांत शेंकडों ग्रंथनिविष्ट व लोक-प्रचलित व्रतांचीं वर्णनें दिलीं आहेत, परंतु त्यांत खंडोबाशीं संबंध असलेल्या व्रताची नोंद नाहीं. व्रतखंडांत चंपाषष्ठीचें व्रत आहे – परंतु तें कुमाराचें व्रत म्हणून आलेलें आहे –खंडोबाचें नव्हे. हेमाद्रीचा 'चतुर्वर्गचिन्तामणि' इ. स. १२६०-१२७१ या काळांत रचला गेला. अर्थात् आपण 'मल्लारि-माहात्म्या'च्या काळाचा शोध हेमाद्रीनंतर घ्यावयास पाहिजे.

३. हेमाद्रीनंतरचा विख्यात महाराष्ट्रीय धर्मनिबंधकार कमलाकर-भट्ट यानें मात्र आपल्या 'निर्णयसिन्धू'त चंपाषष्ठीचा खंडोबाशीं संबंध सांगितला असून, त्यासाठीं 'मल्लारिमाहात्म्या'चाच आधार दिला आहे: "मार्गशीर्षशुक्लषष्ठी चम्पाषष्ठीति महाराष्ट्रेषु प्रसिद्धा...तदुक्तं ब्रह्माण्ड-पुराणे मल्लारिमाहात्म्ये..."[२] 'निर्णयसिन्धू'चा रचनाकाल इ. स. १६१२.

आतां आपणांस 'मल्लारि-माहात्म्या'च्या काळाचे दोन बिंदु मिळाले. इ. स. १२६० ते इ. स. १६१२ या काळांत केव्हां तरी हा ग्रंथ निर्माण झाला असला पाहिजे. इ. स. १६१२ च्या मागें किती जातां येतें, तें आतां आपण पाहूं.

४. नाथांच्या स्फुट वाङमयांत खंडोबाच्या रूढ चरित्रकथेचीं सूचनें आहेत. नाथांचा समाधिकाळ इ. स. १५९९; म्हणजे नाथांचा काळ आणि कमलाकरभट्टाचा काळ जवळ जवळ एकच आहे. शेख महंमदाच्या 'योग-संग्रामां'त घोड्यावर बसलेल्या मल्हारी-म्हाळसेच्या मूर्तीच्या उल्लेख आहे.[३] बाणाईचाहि उल्लेख आहे. शेख महंमदहि नाथ-समकालीनच. एक-नाथांच्या पूर्वीचा उल्लेख म्हणजे ज्ञानेश्वरांच्या नांवावर असलेल्या 'योग-वासिष्ठ' या ग्रंथांतील होय. तो उल्लेख असा आहे:

सप्तपुत्रांसहितु। युधिष्ठिरु तपोवनां आतु।
मळमणि दैत्यें निभ्रांतु। पराभविला ॥

तो योगिया देखौनि स्वभावें। शंकर काढावेयासी धावे।
तो मल्लमणि वधावे। वहिरवरूपें ॥[४]

हा उल्लेख निःसंशय 'मल्लारि-माहात्म्यां' तील कथेचाच आहे. यांत मल्ल-मणि दैत्य आहेत आणि त्यांना मारणारा भैरव-रूपी शंकरहि आहे, परंतु 'धर्मपुत्र सप्तर्षी'च्या बाबतींत येथें गोंधळ केला आहे. 'मल्लारि-माहात्म्यां'त सप्तर्षींच्या मागें 'धर्मपुत्राः' असें विशेषण आहे, त्यांतील 'धर्म' म्हणजे 'युधिष्ठिर' असें मानून "सप्तपुत्रांसहितु। युधिष्ठिरु तपोवनां आतु।" असें येथें म्हटलें आहे. हा 'युधिष्ठिर' पुढें 'मार्तण्ड-विजय' व 'जयाद्रि-माहात्म्य' या ग्रंथांतून चांगलाच स्थिर झाला आहे. देवताचरित्रांत वाढ कशी होते, याचें जातां जातां प्रत्यंतर!

हा ज्ञानेश्वरांच्या नांवावरील ग्रंथ ज्ञानेश्वरांचा नाहीं, हें निश्चित; परंतु त्याची रचना गोव्यांत हिंदूंचा धर्मच्छळ सुरू होण्यापूर्वी झालेली आहे. फादर स्टीफन्सनें आपल्या 'ख्रिस्त-पुराणां'त या ग्रंथाची उसनवारी केली असल्याचें प्रा. प्रियोळकरांनीं दाखवून दिलें आहे.[५] प्रा. प्रियोळ-करांच्या मतें हा ग्रंथ इ. स. १५४० पूर्वीं केव्हां तरी—ज्ञानेश्वरांच्या नंतर शें-सवाशें वर्षांत – रचला गेला आहे.

—या सर्व अन्तर्बाह्य पुराव्यांवरून आज आपणांस असें निश्चित विधान करतां येईल कीं, इ. स. १२६० ते इ. स. १५४० या दोन-अडीच शतकांच्या अवधींत 'मल्लारि-माहात्म्य' हा संस्कृत ग्रंथ रचला गेला. सिद्धपाल केसरी नामक कवीनें हा ग्रंथ इ. स. १५८५ मध्यें मराठींत आणला आहे.

### *'मल्लारि-माहात्म्या'चा कर्ता*

'मल्लारि-माहात्म्य' या ग्रंथाचा कर्ता कोणी तरी महाराष्ट्रीय असला पाहिजे. असें मला वाटतें. अर्थात् या 'वाटण्या'ला सबळ कारणेंहि आहेत.

१. या ग्रंथांत खंडोबाच्या पत्नीचें नांव 'म्हालसा' असें महाराष्ट्रांत प्रचलित असलेलेंच नांव योजिलें आहे. 'म्हाळसा' हें नांव कर्नाटकांत प्रचलित नाहीं. नव्हतेंहि. माळज, माळचि, माळवी हीं म्हाळसेचीं जुनीं कानडी नांवें आणि 'माळव्व' हें रूढ नांव. 'माळचि' या नांवावरून साधलेलीं 'मालची', 'मालाची', 'मालती' हीं संस्कृतीकरणें म्हाळसेच्या

कांहीं संस्कृत स्तोत्रांत आढळतात. तीं स्तोत्रें कर्नाटकांत तयार झालीं असणें शक्य आहे.

२ खंडोबाचें 'मैलार' हें कानडी नांव यांत दिलेलें असलें तरी, 'मैराल' (मैराळ) हें वर्णविपर्ययानें महाराष्ट्रांत यादवकालापासून आजवर रूढ असलेलें नांवहि आवर्जून दिलें आहे आणि तें देतांना वर्ण-विपर्ययाचें स्पष्टीकरणहि दिलें आहे, हेंहि आपण मागें पाहिलें आहे.

३. 'मल्लारि मार्तण्ड भैरव' या नांवांतील 'मार्तण्ड' हा शब्दहि कर्त्याचें महाराष्ट्रीयत्व सिद्ध करणारा आहे– परंतु त्याचें रहस्य मी येथें उघडें करीत नाहीं. याच प्रकरणांत पुढें 'मल्लारि-मार्तण्ड भैरवाचें रहस्य' या शीर्षकाखालीं त्याचा उलगडा होईल.

––मीं प्रारंभींच असें सूचित केलें होतें कीं, मैलार या कानडी देवतेला चरित्र दिलें महाराष्ट्रानें. 'मल्लारि-माहात्म्या'चा कर्ता महाराष्ट्रीय असल्याचें सिद्ध झाल्यानें तें सूचन आतां स्पष्ट होईल.

*मैलाराची प्राचीनता*

मैलार या कानडी ग्रामदेवतेला 'चरित्र' देण्याचा उद्योग कोणा तरी अज्ञात महाराष्ट्रीयानें इसवी सनाच्या चौदाव्या-पंधराव्या शतकांत केला, हें आपण पाहिलें. ज्या मैलाराचें उन्नयन करण्याचा हा प्रभावी प्रयत्न करण्यांत आला, त्याच्या काळासंबंधीं अनेक लैखिक आणि अन्य पुरावे श्री. पांडुरंग देसाई आणि श्री. ग. ह. खरे या दोन मान्यवर संशोधकांनीं उजेडांत आणले आहेत.[६] त्यांपैकीं आपण केवळ 'मल्लारि-माहात्म्या'च्या रचनेपूर्वीचे म्हणजे स्थूलतया इ. स. १४०० पूर्वींचे पुरावे पाहूं.

१. २३ डिसेंबर इ. स. १०१२ या दिवशीं चालुक्य सम्राट् त्रिभुवन-मल्ल विक्रमादित्य याचा महासामंताधिपति महाप्रचंडदंडनायक केशवय्य यानें उमचिगे गांव रोण येथील मौनर श्रीधरभट्टास अग्रहार करून दिला व श्रीधर भट्टानें यांतील बारा मत्तर जमीन **एळ्कोटि तपोधनांच्या** अन्न-सत्रासाठीं दिली, असें कोटवुमचगि (गदग-धारवाड) येथील कानडी लेखांत म्हटलें आहे. 'एळ्कोटि' हा शब्द मैलाराच्या उपासनेंतील असल्या-मुळें येथें 'एळ्कोटि तपोधन' म्हणजे 'मैलाराचे उपासक' अभिप्रेत असावे, असा श्री. खरे यांचा तर्क आहे.

संग्रहालय, ठाणे.
अनु. क्र. ३९८४१ वि: भू-प्रवास
क्रमांक ३०८ नों. दि: १२/१२/५९



२ मुरगोड ( परसगड-बेळगांव ) येथें वेट्टद इरण्ण मंदिराजवळ असलेल्या एका कानडी शिलालेखांत २४ डिसेंबर इ. स. १०८५ या दिवशीं दिलेल्या दानाचा ग्राहक म्हणून '**मैळारशक्ति**' हें मैलारवाचक व्यक्ति-नाम आलें आहे.

३. कल्याणचा चालुक्य सम्राट् पहिला सोमेश्वर ( इ. स. १०५३ ), सौंदत्तीचा राजा रट्ट पहिला सेन ( इ. स. १०६० ), गोव्याचा कदंब राजा दुसरा जयकेशी ( सु. इ. स. ११११ ) आणि गुत्तलचा राजा गुत्त तिसरा विक्रमादित्य ( इ. स. १२५० ) या राजपुरुषांच्या पत्नींचीं नांवें **मैळलदेवी-मैळलमहादेवी**—अशीं 'मैलार' या देवनामावरून बनलेलीं होतीं.

४. इ. स. ११५१ या वर्षीच्या विजापूर येथील एका कानडी लेखांत कळचुर्य बिज्जल याचा महाप्रधान म्हणून मैलारय्य नामक व्यक्ति निर्दिष्ट आहे.

५. मल्हार ( विलासपूर-मध्यप्रदेश ) व रतनपूर येथील अनुक्रमें इ. स. ११६७-६८ व इ. स. ११६३-६४ या काळांतील दोन चेदिवंशीय लेखांत '**मल्लालपत्तन**' ( सध्यांचें मध्यप्रदेशांतील 'मल्हार' हें गांव ) या मैलारक्षेत्राचा उल्लेख आहे.

६. मानगुडि येथील इ. स. ११८८ च्या कानडी लेखांत 'सिवणूर **मैलारभट्टर** मक्कळु वासुदेव' असें एका ब्राह्मणाचें नांव आलें आहे.

७. कुडतिनि येथील २६ जुलै इ. स. १२०७ च्या लेखांत, विष्णुकर ब्रह्मचारी याच्या अध्यक्षतेखालीं पांच वर्ग, **एळ्कोटि महादेव**, असंख्य गण व मुम्मुरिदंड जमले आणि तेथें होणारे अनाचार निर्णयासाठीं उपर्युक्त ब्रह्मचाऱ्याकडे न्यावे, असें त्यांनीं ठरविल्याचें नमूद आहे. 'एळ्कोटि महादेव' हें नांव 'एळ्कोटि तपोधन' यासारखेंच आहे.

८. सोगि (हडगल्लि-बळ्ळारि) येथील कल्लेश्वर-मंदिराच्या मुखमंडपा-वरील कानडी लेखांत ( २ मार्च १२२६ ) **मयलारदेव, मल्लय्य हेग्गडे** व इतर यांनीं सोगें येथील कलिदेवास कांहीं दान दिल्याचें नमूद केलें आहे.

९. आकवीडु ( कर्नूळ ) आणि चिनगानिपल्ले येथील अनुक्रमें इ. स. ११५४ व इ. स. १२३२ या वर्षीच्या तेलगु लेखांत **मैलारमुद्द** या प्रतिग्रहीत्याचें नांव आलें आहे.

१०. वेलूर ( जि. हास्सन-म्हैसूर ) येथील ३ फेब्रुवारी १२७३ च्या लेखांत नारसिंहदेव होयसळ याचा **खंडेयराव** नामक प्रधान निर्दिष्ट आहे. तसेंच, इ. स. १२५४ च्या पुष्पगिरि ( कडपें) येथील वैद्यनाथमंदिरान्तर्गत त्रिकूटेश्वरमंदिरांत असलेल्या लेखांत सूर्यवंशी पल्लवराजा **खंडेराय** यानें पल्लवेश्वराची स्थापना केल्याची नोंद आहे.

११. रामचंद्र यादवाच्या पुरुषोत्तमपुरी संस्कृत ताम्रपटांत (इ. स. १३१०) **मैलारभट्ट** या प्रतिग्रहीत्याचा निर्देश आहे.

१२. विजयनगर-सम्राट् हरिहर याच्या इ. स. १३९१ च्या चौडला संस्कृत ताम्रपटांतहि एका **मैलारभट्टाचा** निर्देश आहे.

—— या काळानंतरचेहि अनेक लेख असे आहेत कीं, ज्यांत मैलार-मंदिरें उभारल्याचे, मैलाराच्या पूजेअर्चेसाठीं दान दिल्याचे आणि मैलाराचें नांव धारण करणाऱ्या उच्च श्रेणींतील व्यक्तींचे उल्लेख आहेत. मैलारपत्नी म्हाळसा (कानडी माळव्व) हिचा उल्लेख असलेले इ. स. १०६३ व इ. स. ११४८ या काळांतील दोन लेख उपलब्ध आहेत. (त्यांची चर्चा पुढील प्रकरणांत येणार आहे. ) मैलार व माळव्व यांचा उल्लेख करणाऱ्या या शिलालेखांवरून असें सिद्ध होतें कीं, या कानडी देवता इसवी सनाच्या अकराव्या शतकांत कर्नाटकांत लोकप्रिय होऊं लागल्या होत्या, राज-पुरुष त्यांचीं मंदिरें उभारीत होते, त्यांच्या पूजे-अर्चेची खास व्यवस्था करीत होते आणि राजे व ब्राह्मण यांच्या घराण्यांत व्यक्तिनामासाठीं या देवतांच्या नांवांचा आवडीनें उपयोग केला जात होता. अर्थात् अकराव्या शतकांतील त्यांच्या या लोकप्रियतेवरून त्यांची प्राचीनता चार-पांच शतकें मागें नेणें मात्र योग्य होणार नाहीं.अकराव्या शतकापासून आढळणाऱ्या लोकप्रियतानिदर्शक उल्लेखांवरून एवढेंच म्हणतां येईल कीं, या काळापासून मैलार झपाट्यानें लोकप्रिय होऊं लागला होता. त्याच्या क्षुद्रतेचा निषेध करणारे उल्लेखहि बाराव्या-तेराव्या शतकांतील कानडी वाङ्मयांत विपुल आहेत.

ब्रह्मशिव नांवाचा जैन कन्नड कवि ( बारावें शतक ) जैनेतर दैवतांची चेष्टा करतांना म्हणतो :

"काय विचित्र पहा ! मनेवेग्गडे चट्टपानें कालच पुढें आणलेल्या मैल

आणि माळची या देवता लोकप्रिय झाल्या; मग प्राचीन हरिहरांची काय कथा !"[७]

या उद्‌गारांतील "कालच पुढें आणलेल्या मैल आणि माळची या देवता" हे शब्द असें स्पष्टपणें दाखवितात कीं, बाराव्या शतकांतील या कवीनें या देवतांचे उदयक्षण पाहिले आहेत. "कलियुगीच्या अंतीं शिवालयें विष्णुगृहें लोपतीं : मैराळक्षेत्रपाळाचिया स्थापना होती :"[८] या चक्रधरांच्या कलिधर्मनिरूपणांतहि हेंच सूचन आहे.

*खंडोबाच्या क्षुद्रतेची उत्तरकालीन जाणीव*

मैलाराची लोकप्रियता आणि प्रतिष्ठा असंस्कृत ग्रामीण समाजांत वाढूं लागतांच, धार्मिक जीवनाच्या उच्च स्वरांत त्याच्याविषयीं विरोधाचा सूर उमटूं लागला. पुढें शिवावतार म्हणून प्रतिष्ठा पावलेला हा देव प्रथम शिवोपासक वीरशैवांकडूनहि धिक्कारला गेला होता. वीरशैवपंथ-प्रवर्तक श्रीबसवेश्वर ( इ. स. ११६० ) यांच्या वचनसंग्रहांत मैलाराचा निषेध अनेक वचनांतून आढळतो. एका वचनांत त्यांनीं मरैया, विरैया, अंतर, बेंतर, **मलैया**, केटैया इत्यादि क्षुद्र उपास्यांचा निषेध करून, त्यांच्या 'बळी मागण्याच्या वृत्ती'चा धिक्कार केला आहे.[९] दुसऱ्या एका वचनांत ते म्हणतात :

"ठाकठिकीच्या मैलाराच्या आंत सगळे सणच. वरपांगीं रंग मात्र किती छानदार ! कुत्र्याची झोंप आणि अज्ञान्याचें तप, यासारखी झाली माझी मति, कूडलसंगमदेवा !"[१०]

तिसऱ्या एका वचनांत "ठाकठिकीच्या मैलाराच्या शृंगाराप्रमाणें वेश्येचें उष्टें खाणाऱ्या दासाच्या संसारासारखी कूडलसंगमाच्या शरणांना न जाणणाऱ्या इतर हतभाग्यांची अवस्था आहे," असें त्यांनीं म्हटलें आहे.[१०]

वीरशैव कवि हरिहर ( १३ वें शतक ) यानें आपल्या शिवभक्तचरित्रपर ग्रंथांत, शंकर दासिमय्य ( ११ वें शतक ) या प्रभावी शिवभक्तानें मैलारदेवाचा पराभव केल्याची चमत्कारकथा दिली आहे. मल्लिकार्जुन कवीच्या ( १७ वें शतक ) 'शंकरदासिमय्य-पुराणां'तहि शंकर दासिमय्याच्या उपरिनिर्दिष्ट चमत्कार-वर्णनाच्या निमित्तानें मैलाराच्या

नीतिमत्तेची निंदा केली आहे.

वीरशैव संतांचा व ग्रंथकारांचा हा विरोध पुढें मावळला आणि मैलाराला शिवस्वरूप प्राप्त झाल्यावर लिंगायत आणि त्यांचें पौरोहित्य करणारे जंगम यांनीं अनेक ठिकाणीं खंडोबाच्या पूजेअर्चेची व्यवस्था आपल्याकडे घेतली. कदाचित् त्यांच्या विरोधाला न जुमानतां मैलाराचें जनसाधारणांतील प्रस्थ वाढत असल्याचें पाहून, वीरशैवपंथीयांनीं मैलाराचें उन्नयन करण्यांत हेतुपूर्वक पुढाकार घेतला असेल.

कर्नाटकांत वीरशैवांइतकेच जैनहि प्रबळ. जैन ग्रंथकारांनीं ज्या हिंदु देवतांची निंदा केली आहे, त्यांत मैलारालाहि स्थान मिळालें आहे. 'समयपरीक्षा' ( १२ वें शतक )[११] आणि गुणकीर्तिकृत 'धर्मामृत' ( इ. स. १५९२ पूर्वी )[१२] या जैन ग्रंथांत मैलार-खंडेरावाविषयीं तुच्छता व्यक्त केली आहे.

महानुभावपंथ-संस्थापक श्रीचक्रधरस्वामी यांनीं ( बारावें शतक ) महदाइसेला कलिधर्मनिरूपण करतांना "कळियुगीचां अंतीं शिवालयें, विष्णुगृहें लोपतीं : मैराळक्षेत्रपाळाचिया स्थापना होती : " अशी खंत व्यक्त केली आहे.[१३]

श्रीविद्यारण्यस्वामी यांनीं आपल्या 'पंचदशी' या सुप्रसिद्ध ग्रंथांत ईश्वराच्या उदात्त आणि क्षुद्र स्वरूपांची यादी करतांना "विघ्नभैरव-मैराल-मारिका-यक्ष-राक्षसाः ।" या श्रेणींत मैलाराला बसविलें आहे आणि शेवटीं "ईश्वराः सर्व एवैते पूजिताः फलदायिन :" असा अभिप्राय व्यक्त केला आहे.[१४]

शेख महंमद श्रीगोंदेकरानें 'योगसंग्रामां'त व्यभिचारिणी भक्तीनें केलेल्या क्षुद्र देवतांच्या विवेकशून्य उपासनेचा जागोजाग निषेध केला आहे. या क्षुद्र देवतांच्या समूहांत खंडोबा मुख्य आहे. शेख महंमदाचा विशेष कटाक्ष मुरळीच्या प्रथेवर आहे.—

मुरळ्या कुळस्वामीच्या दासी । त्यांसी रमतां कटाळेतना अपेशी ।
मल्हारी न करीच कांहीं त्यांसी । कां सत्त्वें सांडवला ।।
कुळकन्येस बोल लाविला मल्हारीनें । ऐसें विटंबिलें त्याच्या देवपणें ।
तो पुजिल्या केंवी तुटतीं बंधनें । लक्ष चौऱ्यांशीचीं ।।

कामव्यसनी मल्हारी वेडा। होता धनगराच्या पेडा।
तो पुजिल्या केंवी फिरे खोडा। लक्ष चौऱ्यांशीचा ।।
जो नवसें दिवटी हळद मागे। देऊळें करा, म्हणोनि भक्तांस लागे।
चित्रलेपास नेसविलीं लुगडीं झगे। आपण लेवों नेणे ।।[१५]

शेख महंमद श्रीगोंदेकर हा कबीरासारखा संप्रदायमुक्त चिन्तक आहे. त्यामुळें त्याच्या या निषेधाच्या उद्गारांना प्रखरता आलेली आहे. वास्तविक शेख महंमद हा नाथांच्या काळांतील कवि. नाथांच्या काळांत खंडोबा महाराष्ट्रांत सुप्रतिष्ठित झाला होता. उच्चवर्णीयांनींहि त्याचा कुलदेवतेच्या स्वरूपांत स्वीकार केला होता. नाथसमकालीन दासोपंतांचा कुलस्वामी मैलारपूरचा खंडोबा होता. नाथांच्या काळापासून पुढें संतांनीं आणि कवींनीं खंडोबाचा प्रकट निषेध फारसा केलेला दिसत नाहीं. त्याच्या क्षुद्र स्वरूपाची जाणीव असूनहि संत-कवींनीं खंडोबाचीं भक्तिगीतें रचलीं; त्यावर पारमार्थिक रूपकें लिहिलीं. अर्थात् हें करीत असतांना उपासनेच्या क्षेत्रांतील अनिष्टांचा निषेध करायला मात्र ते कचरले नाहींत.

एकनाथ-काळापासून पुढें खंडोबाच्या क्षुद्रतेची प्रकट जाणीव व्यक्त झाली आहे– परंतु ती लोकप्रिय उदात्तीकृत खंडोबाची नव्हे, तर खंडोबाचें प्राचीन ग्रामदेवतास्वरूप जें मैलार त्याची. अर्थात् मैलाराची गणना क्षुद्र निषिद्ध देवतांच्या श्रेणींत करतांना गणनाकाराला निषिद्ध मैलार व वंदनीय खंडोबा एकच असल्याचें भान मुळींच नसतें, हें मुद्दाम ध्यानांत घेण्यासारखें आहे. मागें जो विद्यारण्यस्वामींच्या 'पंचदशीं'तील उल्लेख नोंदविला आहे, त्या उल्लेखांतील वृत्तिच पुढें मैराळ-मैराळी यांच्याविषयींच्या निषेधांत दिसते. मैरालाची गणना झोटिंग-वेताळांच्या श्रेणींत आणि मैराळीची गणना शाकिनी-डाकिनींच्या श्रेणींत झालेली आहे :

१. शाकिनी डाकिनी रुद्रचंडी। मारको मेसको वनचामुंडी।
झोटिंग मैराळ पूतना प्रौढी। महिष मातंग षष्टिका ।।[१६]

२. महापिंग मैराळ झोटिंग पीसे।
भिसे मोकळे भासती जेवि रीसे ।।
त्वरें धांवती यक्षिणी मुक्तकेशा।
मळें डाकिणी शाकिनी मृत्युवेशा ।।[१७]

एकनाथांनीं आपल्या भारुडांच्या संभारांत वाघ्या-मुरळीवर भारुडें रचून खंडोबाच्या उपासनेवर परमार्थाचें रूपक रचलें. लोकप्रिय उपासना-प्रकारांचें उन्नयन करण्याची आणि लोकांची वृत्ति त्याद्वारां परमार्थप्रवण बनविण्याची नाथांची ही पद्धति प्रसिद्ध आहे. किंबहुना ही पद्धति थोड्याबहुत प्रमाणांत अनेक संतांनीं वापरली आहे. परंतु नाथांच्या मनांत खंडोबाच्या उपासनेविषयीं अनुकूल भावना नसावी, असें मानण्यास जागा आहे. एका अभंगांत नाथ म्हणतात–

पुजिती खंडेराव पतर भरिती । विठ्ठल विठ्ठल न म्हणती अभागी ते ।
लावुनी भंडार दिवटा घेती हातीं । विठ्ठल म्हणतां लाजती पापमति ।।
ऐसियासी भाव सांगावा तो कवण । एका जनार्दनी काया वाचा मरण ।।[१८]

अर्थात् हा निषेधहि उपास्याचा नसून उपासकांच्या आचाराचा आहे आणि त्याला विठ्ठलभक्तीच्या अनन्यतेची पार्श्वभूमि आहे, असें मानतां येईल. परन्तु जेव्हां नाथ–

कामखंडेरायापुढें । एक कुतरे झाले गाढे ।
कोण्ही आलिया दारापुढें । वसवसूनि ऊठती ।।[१९]

असें क्षुद्रतानिदर्शक रूपक अभावितपणें रचतात आणि त्यांचे नातू कविवर मुक्तेश्वर आपल्या मातामहांच्या शब्दांचाच अनुवाद करून–

लोभमल्लारीचा चोहटा । दांभिक वाघे हळदीकुटा ।
मिथ्याचारें लावोनि पोटा- । साठीं श्वान जे जाले ।।[२०]

असें त्याच थाटाचें रूपक योजितात, तेव्हां त्यांच्या मनांत खंडोबाचें स्थान काय असेल, याची स्पष्ट कल्पना येते. विकारग्रस्तांचा निषेध करण्यासाठीं का होईना, काम आणि लोभ या विकारावर जसें खंडोबांचें रूपक या कवींनीं योजलें, तसें तें त्यांनीं राम-कृष्ण-विठ्ठल वा शिव यांचें योजलें नसतें.

मराठी वाङ्मयांत खंडोबासंबंधीं आणखी कांहीं गमतीचे उल्लेख आढळतात. रावणानें तेहतीस कोटि देवतांना बंदींत टाकलें आणि त्यांना आपल्या घरीं क्षुद्र सेवा करावयास भाग पाडलें, हा रामायणीय कथाभाग प्रसिद्ध आहे. मराठी कवींनीं त्या दुर्दैवी देवतामंडळांत कांहीं समकालीन देवतांचा समावेश केला असून, त्यांत खंडोबाकडे रावणाचें क्षौर करण्याचें काम दिलें आहे :

१. खंडेराव असे नापिक होऊनि। तराळी जगदंबा वाहे पाणी।
दरबार झाडी मेसको मायराणी। भैरव गस्ती करीतसे ।।[२१]
२. मैराळ देव कानडे। करती राक्षसांच्या दाढ्या खांडें।
आरसा न दाविती जयापुढें। तोचि रोकडे बुकाळीं ।।[२२]
३. मार्तंड नापित होऊन। श्मश्रुकरी स्वकरेंकरून।
गर्दभ राखी गजवदन। मनांत लाज न धरितां ।।[२३]

लोकांना प्रिय असणाऱ्या वर्तमानांतील देवतांचा उल्लेख करून, रावणाच्या कृत्याविषयीं लोकमानसांत संताप निर्माण करणें सोपें असल्यामुळेंहि कवींनीं ही क्लृप्ति योजिली असेल. वरील तीन उतारे अनुक्रमें शेख महंमद, एकनाथ आणि महीपति यांच्या ग्रंथांतील आहेत. या तीनहि उल्लेखांत खंडोबाकडे एकच भूमिका दिलेली आहे. अर्थात् शेख महंमद व महीपति यांनीं नाथांचा अनुवाद केला असावा.

*खंडोबा : एक वीरदेव*

खंडोबा हा मूलतः एक ऐतिहासिक वीरपुरुष असावा आणि त्यालाच कालान्तरानें जनमानसानें कृतज्ञतेनें देवता-स्वरूप दिलें असावें, असेंहि मत कांहींनीं व्यक्त केलें आहे. ह. भ. प. ल. रा. पांगारकर यांनीं आपल्या ‘ मराठी वाङ्मयाच्या इतिहासा’च्या दुसऱ्या खंडांत नाथांच्या वाघ्या-मुरळीवरील भारुडांच्या निमित्तानें खंडोबाविषयीं लिहिलें आहे : “ ऐतिहासिक दृष्टीनें पाहतां खंडेराव हा देवगडकर जाधवांच्याहि फार पूर्वी झालेला एक शिवावतार असावा, असें मीं तीस वर्षांपूर्वीं ‘ खंडेराय व शिवराय ’ या शीर्षकाधर्मखालीं एक लेख लिहून प्रसिद्ध केलें होतें. खंडेराय हा शिवरायासारखा रक्षक व गोब्राह्मणप्रतिपालक विख्यात वीर होता. म्हणजे हा शिवावतार ऐतिहासिक असावा.”[२४]

अशाच स्वरूपाचें मत नगरचे श्री. त्र्यं. गं. धनेश्वर यांनीं ‘ वेरूळचीं लेणीं ’ या पुस्तकांत मांडलें आहे. त्यांच्या मतें “ खंडेराव ही इ. स. ६२०-मध्यें होऊन गेलेली एक बौद्धविरोधक ऐतिहासिक व्यक्ति असावी.”[२५] श्री. धनेश्वरांनीं निश्चित काळ देऊन आपलें मत नोंदविलें आहे, परंतु तो काळ त्यांनीं कोणत्या साधानांच्या आधारें नोंदविला, याचा खुलासा केलेला नाहीं. मीं श्री. धनेश्वर यांना त्यासंबंधीं पत्र पाठवून विचारणा केली होती;

परंतु वार्धक्यामुळें त्यांना त्या विधानाविषयीं कांहींच स्पष्टीकरण देतां आलें नाहीं.

अगदीं अलीकडे प्रसिद्ध झालेल्या ‘ समयपरीक्षा ’ (बारावें शतक) नामक कानडी जैन ग्रंथांत हिंदु देवतांची निंदा करतांना, “ खंडोबा ही देवता मूलतः ऐतिहासिक वीरपुरुष असल्याचें ” सूचित केलें आहे.

वीरपुरुषांचें दैवतीकरण होणें शक्य आहे. भारतीय देवता-संभारांत अशा अनेक प्रसिद्ध-अप्रसिद्ध देवता आहेत कीं, ज्या मूलतः मनुष्यरूपानें इतिहासावर ठसा उमटवून गाजल्या आहेत. प्रत्यक्ष कर्नाटकांतच ‘ वीरगळ ’ नामक अनेक स्मृति-शिला स्थानिक वीरांच्या स्मरणार्थ पूजिल्या जातात. देवता-विज्ञानांतील या विवक्षित प्रक्रियेप्रमाणें खंडोबाचीहि निर्मिति झाली असणें अशक्य नाहीं. परंतु त्यासंबंधीं निश्चित स्वरूपाचा पुरावा हातीं यावयास पाहिजे. आज उपलब्ध असलेल्या पुराव्यांवरून खंडोबाचें ( मैलाराचें ) प्रारंभिक दर्शन एका क्षुद्र ग्रामदेवतेच्या स्वरूपांत घडतें. ज्या त्याच्या अवतार-कथेवरून तो वीरदेव असल्याचा कयास बांधण्यांत येतो, ती अवतार-कथा बऱ्याच उशीरां ( चौदावें-पंधरावें शतक ) निर्माण झाल्याचें आपण पाहिलेंच आहे. ‘ समयपरीक्षे ’तील उल्लेख निंदेच्या प्रवृत्तींतून केलेला असल्यामुळें ग्रंथकारानें देवतेचें महत्त्व हिरावून घेण्यासाठीं कपोलकल्पित आधार पुढें केला असण्याचीच शक्यता अधिक आहे.

*खंडोबा : मार्तण्ड-सूर्य*

खंडोबाच्या ‘ मल्लारि मार्तण्ड भैरव ’ या नांवांतील ‘ मार्तण्ड ’ या शब्दाचा आधार घेऊन अनेकांनीं असें मत मांडलें आहे कीं, खंडोबाच्या स्वरूपांत सूर्योपासनेचा अंश प्रविष्ट झाला आहे. श्री. बी. ए. गुप्ते यांनीं आपल्या ‘ हिन्दु हॉलिडेज् अॅण्ड सेरिमोनिअल्स ’ ( १९१६ ) या ग्रंथांत प्रथम हें मत मांडलें. ते लिहितात :

...Martand is one of the names of the Sun, the great luminary. It is, therefore, difficult to reconcile the theory of the incarnation of Shiva, the god of destruction, with the power attributed to Khandoba. He is supposed to protect people from epidemics. It is suggested that the whole story is but a Sun-myth, in which its yellow rays

have destroyed the yellowish or pea fog of the Northern mountains, where the Aryans lived before they came down to India. The story of the hunter fits in, when Mrigashirsha, the fifth mansion, resembles the head of an antelope, Shata-taraka, the hundred-star mansion, the Banai, the quiver holding 100 arrows, the Ursa Major, the 7 Rishis; and cannis the dog of astronomical chart. The arrival of the Sun, therefore, at this particular point, indicated the defeat and death of the demons."[२६]

'मल्लारि-माहात्म्यां'त, मल्लारि मार्तण्ड भैरवानें लिंगरूपानें पृथ्वीवर निवास केल्याचा दिन "मार्गशीर्षामले पक्षे षष्ठ्यां वारेंशुमालिन:। शत-तारागते चन्द्रे लिङ्गं स्याद् दृष्टिगोचरम्॥" असा दिला आहे.[२७] या दिवसाच्या खगोलस्थ स्थितीचें रूपक म्हणजे मल्लारि मार्तण्ड भैरवाची अवतारकथा होय, असें श्री. गुप्ते यांचें म्हणणें. अशाच प्रकारचें खगोलीय रूपकाचें स्पष्टीकरण दत्तजन्माच्या तिथीवरून दत्तात्रेयाविषयींहि देण्यांत आलें आहे. हीं खगोलीय रूपकांचीं स्पष्टीकरणें ततोतंत जुळत असलीं तरी त्या खगोलस्थ स्थितीचें प्रतीक म्हणजे या देवता नव्हेत, एवढें निश्चित. ज्या चरित्र-कथेसह खंडोबा (आणि दत्तहि) आज आपल्यापुढें आहे, तें त्याचें चरित्र त्याला उशीरां प्राप्त झालेलें आहे. खंडोबा तर प्रारंभीं चरित्रविहीन ग्रामदेवतेच्या स्वरूपांत आढळतो. पुढें जनश्रद्धेंतून उद्‌भवणाऱ्या लोककथा आणि उन्नयनाचे सहेतुक प्रयत्न यांतून त्याची अवतार-कथा तयार झाली. मला वाटतें, उन्नयनाचा सहेतुक प्रयत्न करणारी व्यक्ति अवतरणाचा दिवस नोंदवितांना अवतारकथेला जुळणारें खगोलस्थ स्थितीचें रूपक जुळवूनच, तो दिवस निश्चित करीत असावी.

आर्य लोक भारत-प्रवेशापूर्वी उत्तरेकडील पर्वतप्रदेशांत राहत असतांना त्यांना आलेल्या एका निसर्गानुभवाची स्मृति म्हणून खंडोबा निर्माण झाला, ही गुप्ते यांची कल्पना तर अगदींच अयथार्थ आहे. मध्ययुगांत उदयास आलेल्या या ग्रामदेवतेचा शोध घ्यायला वेदपूर्व काळांत जाण्याची मुळींच आवश्यकता नाहीं.

श्री. शं. बा. जोशी यांच्या मतेंहि मल्लारि मार्तण्ड भैरवांत सूर्योपासनेचा

अवशेष आहे. ‘ मऱ्हाटी संस्कृति ’ या ग्रंथांत ते म्हणतात . “ मार्तंड म्हणजे सूर्य. ‘ इंद्रापर्वता ’ हें संयुक्त नांव जसें निरनिराळ्या दोन देवता एकत्र आल्याचें दाखवितें, तसें मल्हारी-मार्तंड हें आणखी दुसऱ्या दोन देवांच्या निरनिराळ्या उपासनामार्गांचें संमीलन किंवा एकीकरण होऊन एक देव बनला असल्याचें निदर्शक आहे .... तिसऱ्या शतकांत इराण-मध्यें मित्रपंथ (मिथ्राइझम) विशेष प्रबळ होता. या मित्रपंथाचा ‘ मणि ’ या नांवाचा एक मोठा प्रचारक त्या काळांत होऊन गेला. त्यानें त्या देशांतील विरोधास न जुमानतां मित्रपंथाचा प्रचार केला. विरोधकांकडून शेवटीं त्यास मरणहि प्राप्त झालें, तरीहि त्याच्यानंतर त्याचा पंथ जगांतील निर-निराळ्या देशांतून प्रसार पावला... तिसऱ्या शतकांत उदय पावलेल्या मणिपंथीय सूर्योपासनेचा प्रचार गुप्तांच्या काळांतील परकीय स्वाऱ्यांबरोबर भारतांतहि झाला असणें अशक्य नाहीं. त्या काळांतील सूर्याच्या मूर्ति म्हणजे या स्वाऱ्यांचें जणूं काय प्रतीकच.... मणिपंथाकडून सूर्योपासना घेतली तरी त्यांतला मणिराक्षस मारून टाकला ! परकीयांच्याकडून कोणतीहि गोष्ट घेतली असें म्हणणें स्वाभिमानास बोचक ठरतें. मल्ला-सुराबरोबर मणि हा दैत्यहि त्या पुराणांत मारला गेला. ”[२८]

प्राचीन भारतीय सूर्योपासनेच्या मूर्तिविहीन क्षेत्रांत सूर्याची मूर्तिपूजा भारताबाहेरून आली, हा इतिहास आहे. परंतु खंडोबाच्या संस्कृत नांवांतील ‘ मार्तण्ड ’ हा अंश आणि खंडोबाच्या अवतार-कथेंतील ‘ मणि ’ हें दैत्यनाम यांच्या केवळ शाब्दिक साम्यावरून, खंडोबाच्या स्वरूपांत परकीय सूर्यो-पासनेचा अंश समाविष्ट झाला आहे, असें म्हणणें योग्य ठरणार नाहीं.

‘ मणि ’ हें नांव सूर्योपासनेच्या परकीय प्रचारकाचें असेल आणि त्यानें पुरस्कारिलेली उपासना भारतांत आली असेल, तर त्याचें नांव भारतीय पुराणांतील सूर्यकथांत समाविष्ट होणें नैसर्गिक ठरेल. सूर्याच्या मूर्तिपूजेचा प्रसार निखळ स्वरूपांत भारतभर झालेला आहेच. मूलस्थान ( मुलतान ), कालप्रिया ( काल्पी ) आणि कोणार्क ( कोनारक ) हीं भवभूतिपूर्वकालीन सूर्यक्षेत्रें परकीय सूर्योपासनेच्या प्रभावाचींच द्योतक आहेत. असा या पर-प्रभावित सूर्योपासनेचा स्वतंत्र विस्तार झालेला असतांना तत्संबद्ध ‘ मणि ’ या व्यक्तिनामाचा समावेश उत्तरकालीन

ग्रामदेवतेच्या चरित्रांत होणें कसें शक्य आहे ?

शिवाय, खंडोबांत सूर्योपासनेचा अंश शोधण्याचा प्रयत्न ज्या 'मार्तण्ड' या शब्दामुळें केला जातो, तो शब्द सूर्यवाचक नसून ज्या भैरवाशीं मैलाराचें तादात्म्य कल्पिलें गेलें, त्या भैरवाचें विशेषण आहे. 'मल्लारि-माहात्म्यां'त 'मार्तण्ड भैरवा'नें अवतार धारण केला, असें वर्णन आलें असल्याचें आपण पाहिलेंच आहे. अष्टभैरवांच्या अष्टवर्गांतील पहिल्याच वर्गांत तिसरें नांव मार्तण्ड भैरवाचें आहे, हें श्री. खरे यांनीं दाखवून दिलें आहे. परंतु आश्चर्य असें कीं, 'मार्तण्ड भैरव' हा विवक्षित भैरव आहे, हें स्वतःच दाखवूनहि श्री. खरे 'मार्तण्ड' या शब्दावरून खंडोबाचा सूर्याशीं संबंध लावतातच. ते म्हणतात : "याचीं नांवें तपासलीं तर याच्या कल्पनेंत शिव, त्याचें एक रूप भैरव आणि सूर्य अशा तीन देवांचें मिश्रण झाल्याचें प्रतीत होतें आणि याच्या मूर्ति अभ्यासिल्या तर या मिश्रणाची समजूत अधिक दृढ होते."[२९] नांवांतील 'मार्तण्ड' हा अंश आणि मूर्तींतील 'घोडा' हें वाहन यावरून ही समजूत झालेली आहे. दक्षिणेंतील क्षेत्रपाळांच्या श्रेणींतील देवतांशीं घोडयाचा संबंध कसा येतो, हें आपण पुढें पाहणार आहोंत. 'मार्तण्ड' या चकविणाऱ्या शब्दाची निर्णायक चर्चा या सर्व पर्यायांचा उपसंहार करतांना येणारच आहे.

*खंडोबा : सप्तकोटीश्वर*

खंडोबाच्या प्राचीनतेचा विचार करतांना श्री. ग. ह. खरे यांनीं 'एळ्-कोटि महादेव' व 'एळ्कोटि तपोधन' या लैखिक उल्लेखांच्या आधारें खंडोबाशीं गोव्यांतील सप्तकोटीश्वर या देवाचा संबंध दाखविला आहे. या संबंधाची चर्चा करतांना ते म्हणतात, "तो ( खंडोबा ) सात कोटि किंवा प्रकारचें सैन्य घेऊन मणिमल्लासुरांशीं लढला म्हणून तो एळ्कोटि देव बनला. याचें संस्कृतीकरण सप्तकोटिदेव-नाथ-ईश्वर म्हणजेच सप्त-कोटीश किंवा सप्तकोटीश्वर किंवा सप्तकोटेश्वर असें म्हटलें तर त्यांत कांहीं चूक होईल, असें वाटत नाहीं. गोवें प्रदेशांत या नांवाचें एक फार प्रसिद्ध देवस्थान आहे. पूर्वीं हें दिवाडि बेटांतील नारवें नांवाच्या वाडया-मध्यें होतें. सध्यां ते दिवाडि बेटाच्या उत्तरेस पंचगंगेपलीकडे हिंदळें येथें आहे. आतां नव्या ठिकाणासहि नारवेंच म्हणतात. गोव्याचे कदंब राजे त्याचे

उपासक होते, असें दिसतें.... एळ्कोटि महादेवाच्या समानार्थी सप्त-कोटीश्वर फार प्राचीन देवस्थान आहे. याचेंच सुलभीकरण कोटीश्वर, कोटेश्वर, इत्यादि आहे. यापुढें जाऊन माझें असेंहि म्हणणें आहे कीं, सप्त-कोटीश्वररूपानें मैलारलिंग किंवा मल्लारीच तेथें वास करीत आहे... कदंब राजांनीं स्वत:स 'मलेवरमारि' असें एक बिरुद लावून घेतलें आहे. याचा अर्थ 'मलयवरूंना–डोंगरी लोकांना–गिरिजनांना मारणारा असा आहे. अशी एक कल्पना आहे कीं, मल्लारि शब्दामधील 'मल्ल' हें पूर्वपद गिरिजनांचें द्योतक असावें. अर्थात् मल्लारि म्हणजे गिरिजनांचा शत्रु होईल. मल्लारि, एळ्कोटि महादेव व सप्तकोटीश्वर हे शब्द एकदेवता-वाचक असतील, तर ही देवता गिरिजनांच्या विरुद्ध लढणाऱ्या लोकांची होईल."[३०]

वरील दीर्घ उताऱ्यांत व्यक्त झालेलें श्री. खरे यांचें मत चिंतनीय आहे. त्यांनीं म्हटल्याप्रमाणें सप्तकोटीश्वर व त्याचे उपासक कदंब राजे यांचा खंडोबाशीं संबंध आहेच, परंतु त्या संबंधाचा अर्थ "सप्तकोटीश्वररूपानें मैलारलिंग किंवा मल्लारीच तेथें वास करीत आहे," असा होऊं शकणार नाहीं, असें वाटतें.

१. 'एळ्कोटि तपोधन' व 'एळ्कोटि महादेव' हे मैलारनिदर्शक लैखिक उल्लेख श्री. देसाई व श्री. खरे यांनीं निदर्शनास आणले आहेत. 'एळ्कोटि' ( येळकोट ) ही खंडोबाच्या उपासनेंतील गर्जना सर्वत्र रूढ आहे. 'एळु' या कानडी शब्दाचा अर्थ 'सात' असा आहे. अर्थातच एळुकोटि-एळ्कोटि म्हणजे 'सप्तकोटि'. 'मल्लारि-माहात्म्यां'त मार्तण्ड भैरवाचें सैन्य सप्तकोटि गणांचें असल्याचें वर्णन येतें. त्या वर्णनावरून मार्तण्ड भैरव हा 'सप्तकोटीश्वर' या विशेषणाला पात्र ठरतो, हें खरें.

२. तसेंच सप्तकोटीश्वर या गोमंतकांतील देवाचे उपासक असलेले कदंब राजे स्वत:स 'मलेवरमारि' म्हणजे गिरिजनांना ( मल्लांना ) मारणारे' असें बिरुद लावून घेतात. त्या बिरुदांतून 'मल्लारि' या नांवाचें रहस्य सूचित होतें. सप्तकोटीश्वराचे उपासक ज्या अर्थी स्वत:स 'मल्लारि' म्हणवून घेतात, त्या अर्थी गोमंतकांतील सप्तकोटीश्वर हा मल्लारिच असला पाहिजे, हा तर्कहि युक्तिसंगत वाटतो.

३. परंतु या तर्काला एक प्रबळ अडचण आहे. ती अशी कीं, गोव्यांतील सप्तकोटीश्वर हें एक निखळ शिवस्थान आहे – अगदीं कदंबांच्या काळांतहि तें विशुद्ध शिवस्थानच होतें. त्या देवस्थानाच्या इतिहासांत आणि वर्तमान उपासना-पद्धतींत कुठेंहि मैलार-खंडोबाचें स्वरूप दर्शविणारा अंश आढळत नाहीं. गोव्यांतील इतर ख्यातनाम देवस्थानांप्रमाणें हेंहि सारस्वतांचें दैवत आहे. 'सौरपुराण'[३१] आणि 'सह्याद्रिखंड'[३२] यांसारख्या अर्वाचीन ग्रंथांत त्याचीं शिवस्वरूपाचींच वर्णनें आढळतात.

मुसलमानांच्या आक्रमणांत त्यांनीं संपत्तीच्या लोभानें, कदंबांनीं वैभवास चढविलेल्या सप्तकोटीश्वराचें लिंग उद्ध्वस्त केलें होतें. नंतर विजयनगरच्या माधवमंत्र्यानें त्याची पुनः स्थापना केली. इ. स. १५२५ मध्यें पोर्तुगीजांच्या विध्वंसन-सत्रांत सप्तकोटीश्वरावरहि गदा आली. त्यांनीं हें प्रचंड शिवलिंग विहिरीवर आडवें टाकलें. त्यानंतर एका भक्तानें तें तेथून हलविलें आणि इ. स. १५४९ मध्यें दिवाडीच्या उत्तरेस पंचगंगेच्या उजव्या तीरावर त्याची स्थापना झाली. इ. स. १६६८ मध्यें शिवछत्रपतींनीं या नव्या स्थानाच्या मंदिराचा जीर्णोद्धार केला. या सर्व इतिहासांत सप्तकोटीश्वराच्या मल्लारि-स्वरूपाचें चुकूनहि सूचन आढळत नाहीं. ही अडचण श्री. खरे यांनाहि जाणवली आहे. ते एके ठिकाणीं लिहितात : "सध्यां महाराष्ट्र व कर्नाटक या प्रदेशांतील अनेक गांवांत कोटिनाथ, कोटीश्वर किंवा कोटेश्वर या नांवाचे देव आहेत. हे देव मूलतः खंडोबाचीं प्रतीकें असण्याचा संभव आहे. पण यांच्या देवळांत केवळ शिवलिंगेंच असल्यामुळें आजकाल त्यांचें शिवाशीं इतकें एकरूपत्व समजलें जातें कीं, हा देव खंडोबाचें प्रतीक असेल, अशी कल्पनाहि मनास शिवत नाहीं."[३३]

"आजकाल सप्तकोटीश्वराशीं शिवाचें एकरूपत्व समजलें गेलें," असें म्हटल्यामुळें पूर्वीं कधीं काळीं तीं स्थानें मल्लारींचीं होतीं, असा भाव प्रकट होतो. परंतु तसा यत्किंचितहि पुरावा नाहीं. उलट ज्या काळांत मैलार क्षुद्र ग्रामदेवतेच्या स्वरूपांत नांदत होता, त्याच काळांत सप्तकोटीश्वर एक प्रख्यात शिवस्थान म्हणून गाजत होता. केवळ 'एळ्कोटि' व 'सप्त-कोटि' या शब्दांच्या साम्याशिवाय याला दुसरा आधार दिसत नाहीं.

४. सप्तकोटीश्वर हा मल्लारिच आहे, हें मत वरील कारणानें मला

मान्य नसूनहि सप्तकोटीश्वराचा व कदंबकुलाचा मल्लारि मार्तण्ड भैरवाशीं संबंध आहे, असें मला वाटतें. या माझ्या मताला कारणीभूत होणारे दोन दुर्लक्षित दुवे उपलब्ध आहेत.

कदंब राजवंशाचा मूळपुरुष जयन्त त्रिनेत्र हा शंकराच्या कपाळींच्या स्वेदबिंदूपासून उत्पन्न झाला, अशी कल्पना कदंबांच्या लेखांत आढळते. याचा अर्थ असा कीं, तें कुल शिवोपासक होतें. गोमंतकांतील सप्तकोटीश्वरासंबंधीं "श्रीसप्तकोटीश्वरलब्धवरप्रसाद", "निजाराध्य श्रीसप्तकोटीश्वरदेव", "श्रीसप्तकोटीश्वरपादपद्मप्रसाद" यांसारख्या विरुदांतून कदंब राजांनीं आपला भक्तिभाव व्यक्त केला आहे, तो त्यांच्या शिवोपासक परंपरेला साजेसाच आहे. या कदंब राजांचें 'मलेवरमारि' हें विरुद श्री. खरे यांनीं 'मल्लारि'— सप्तकोटीश्वर.-ऐकात्म्यासाठीं पुढें केलें आहे. या बिरुदाहूनहि अधिक स्पष्ट स्वरूपाचें विरुद कदंबांच्या नाण्यांवर आणि ताम्रपटांच्या कडीच्या मुद्रांवर आढळतें. कदंबांचीं 'भैरव' आणि 'बृहद्-भैरव' या नांवाचीं जीं सोन्याचीं नाणीं उपलब्ध झालीं आहेत, त्यांवर '**श्रीमलेगे भैरव**' असें बिरुद आढळतें.[३४] हें विरुद कदंब जयकेशी (पहिला) याच्या पणजी ताम्रपटाच्या कडीच्या मुद्रेवर देखील आहे. "श्रीमलेगे भैरव" म्हणजे 'श्रीमलेगे. (चिमलगी-जिल्हा विजापूर) येथील भैरव.' 'श्रीमल्लारिभैरव' असें त्याचें संस्कृतीकरण होऊं शकेल. हें बिरुद 'मलेवरमारि' याच स्वरूपाचें असलें, तरी यांतील 'भैरव' हा शब्द अधिक 'प्रकाशक' आहे.

५. 'श्रीमलेगे भैरव' आणि 'मलेवरमारि' या कदंबांच्या दोन बिरुदांवरून 'मले' हा शब्द कदंब-शत्रु-निदर्शक ठरतो. कदंबांच्या विजयलेखांत 'मले' किंवा 'मलय' यांच्यावरील विजयाची गौरवगाथा वारंवार वर्णिलेली आढळते. सावईवेरें येथील कदंबांच्या प्राचीनतम (२३ मार्च १०३८) ताम्रपटांत 'कादंबवंशतिलक' गुहल्लदेवानें **सप्तमलयांतील** राजांना पराभूत करून एका छत्राखालीं आणलें, असें म्हटलें आहे.[३५] (" .. सप्तमलयाधिपमौलिमालालीलाविलोललुठदंघ्रिसरोजरेणुः।") लक्ष्मण या कदंबराजानें "कोंकण प्रदेश तुडविला, सप्तकोंबूंना हांकलून लावलें आणि **सप्तमलें**ना उद्ध्वस्त केलें," असें वर्णन एका लेखांत आहे.[३६]

६. 'मले' किंवा 'मलय' या कदंबशत्रूंची '**सप्त**' ही संख्या येथें चिन्तनीय आहे. कदंब हें '**सप्त**'—कोटीश्वराचे उपासक. सप्तकोटीश्वराची निर्मिति वसिष्ठादि **सप्त** ऋषींनीं पंचगंगेच्या तीरीं **सप्त**कोटि वर्षें तप आचरल्यामुळें झाली, असें सप्तकोटीश्वराची पुराणकथा सांगते. सप्तकोटीश्वराचें लिंगहि **सप्त** धातूंचें बनविलेलें आहे.

'मल्लारि-माहात्म्यां'तील मार्तण्ड भैरवाच्या अवतार-कथेंतहि मार्तण्ड-भैरवाच्या अवताराला **सप्तर्षिच** कारणीभूत झाले आहेत. तसेंच मार्तण्ड-भैरव हा **सप्त**कोटि गणांचा ईश आहे.

—या सर्व दुव्यांवरून मला असें म्हणावेंसें वाटतें कीं,'सप्तर्षितपोजनित' सप्तकोटीश्वराची पुराणकथा आणि 'सप्त मलयांना परास्त करणारे', 'श्रीमलेगे भैरव' व मलेवरमारि' हीं कदंबांचीं बिरुदें यांतील कथा-बीजांच्या आधारें— आणि कदाचित् कदंब राजांच्या प्रेरनेंहि कुणा तरी महाराष्ट्रीयानें लोकप्रिय होऊं लागलेल्या मैलाराची 'माहात्म्य-कथा' रचली असावी. प्रत्यक्ष कदंबकुलाचाहि खंडोबाशीं—मैलाराशीं संबंध होताच. त्यांच्या कुळांत 'मैळलदेवी' हें नांव आढळतें. 'म्हालपार्य,' 'मैलारभट्ट' अशीं व्यक्तिनामेंहि त्यांच्या लेखांत येतात. म्हाळसा ही देवता गोव्यांत अधिष्ठित झालेली होतीच. मैलाराचें क्षेत्रपाळाच्या श्रेणीचें स्वरूप लक्षांत घेतां त्याला भैरवाशीं एकरूप बनविणें सोपें होतें.'श्रीमलेगे भैरव' या कदंबांच्या बिरुदांत त्या ऐकात्म्याचें पोषण करण्याची सोय होतीच. तेव्हां, सप्तकोटीश्वर हा मल्लारिच आहे, असेंकेवळ शब्दसाम्यांवरून (अन्य पुरावा नसतांना व वस्तुस्थिति विरुद्ध असतांना) मानण्यापेक्षां सप्तकोटीश्वर व त्याचे उपासक असलेले कदंब राजे यांचा प्रत्यक्षाप्रत्यक्षपणें मैलाराचे चरित्र ('मल्लारिमाहात्म्यां'तील अवारत-कथा) रचलें जाण्यांत महत्त्वाचा वांटा असावा, असें म्हणणें जास्त युक्तिसंगत ठरेल.

याच संदर्भांत हेंहि लक्षांत घ्यावयास हवें कीं, कदम्ब कुल मूळचें बनवासी प्रांतांतील—मैलाराच्या उदयभूमीला जवळचें. त्या कुळाची एक शाखा नंतर गोमंतकांत प्रतिष्ठित झाली होती.

*खंडोबा : स्कंद*

'मार्तण्ड' आणि 'एळ्कोटि' या शब्दांप्रमाणेंच 'खंडोबा' या

नांवांतील ‘ खंड ’ या मूलांशानें अभ्यासकांचा गोंधळ उडविला आहे. राजवाडे-भांडारकरांपासून, या शब्दाच्या आधारें खंडोबा हा स्कंद असल्याचें मत प्रचारांत होतें. परंतु गेल्या दशकभरांतील संशोधनामुळें हें मत आतां चुकीचें ठरलें आहे. खंडोबाविषयक संशोधनाच्या इतिहासांतील हें दीर्घप्रभावी मत विचार करण्यासारखें आहे. ‘ खंडोबा ’ या शब्दाची व्युत्पत्ति देतांना इ. राजवाडे आपल्या नेहमींच्या पद्धतीनें लिहितात :

“ हेमचंद्र ‘ हरस्कंदौ ’ या संस्कृत द्विवचनाचें ‘ हरखंडा ’ असें प्राकृत रूप देतो. ‘ खंडा ’ हें अनेकवचन आहे; कां कीं, प्राकृतांत प्रायः द्विवचन नाहीं. तात्पर्य, ‘ स्कंद ’ या संस्कृत शब्दाचें प्राकृत रूप ‘ खंड ’ असें होतें. त्याचें ममतादर्शक मराठी रूप ‘ खंडू ’ व प्राशस्त्यदर्शक मराठी रूप ‘ खंडोबा ’. म्हणजे महाराष्ट्रांत जेजूरी, पाली, वगैरे ठिकाणचे जे खंडोबा आहेत, ते मूळचे स्कंद होत. स्कंद म्हणजे कार्तिकस्वामी. कार्तिकस्वामीचें देऊळ पुण्याच्या पर्वतीस आहे, तें स्कंदाचें म्हणजे खंडोबाचेंच होय. इतकेंच कीं, पर्वतीवरच्या त्या देवाचें नांव संस्कृत आहे व जेजूरीच्या देवाचें नांव प्राकृत आहे. स्कंद ही देवता वीरांची व योद्ध्याची फार पूर्वीपासून आहे. स्कंदाला सेनानी हें अपरनाम आहे. त्याची उपासना वीर करतात. महाराष्ट्रांतील सर्व जातींचे मराठे खंडोबा हें आपलें कुलदैवत कां समजतात, तें वरील उद्घाटनावरून समजणार आहे. खंडोबा हें शिवदैवत आहे, असें कित्येक लोक समजतात, तें अर्थात् निराधार आहे. स्कंदपुराणांत स्कंदोपासकांची म्हणजे खंडोबाच्या उपासकांची माहिती सांपडते. ”[३७]

मूलगामी जिज्ञासा आणि त्या जिज्ञासेच्या तृप्तीसाठीं लागणारी प्रतिभा यांचें देणें इतिहासाचार्यांना भरपूर लाभलें होतें. इतिहास-संशोधकाजवळ भूतकाळाला विचारण्यासाठीं ‘ परिप्रश्न ’ हवे असतात आणि त्याला बोलका करण्यासाठीं ‘ प्रतिभेची किमया ’ हि हवी असते. परंतु ती प्रतिभा सत्य-शोधनाऐवजीं अनेकदां कल्पनातरंगांत उड्डाण घेऊन केवळ आत्मरंजन करूं लागते- तो धोका वाईट. खंडोबाला स्कंद ठरवितांना इतिहासाचार्यांची तीच गत झाली आहे.

केवळ व्युत्पत्तीचा आधार घेऊन त्यांनीं स्कंद-खंड समीकरण मांडलें आणि मग स्कंदाचें चरित्र, स्वरूप, मंदिरें, पुराण हें सर्व खंडोबाचेंच आहे,

असें दडपून सांगितलें. त्यांच्या मूर्तींचा, उपासनेचा, पुराणकथांचा भेद एरवीं इतिहासाचार्यांना अज्ञात असेल, असें नाहीं. परंतु या व्युत्पत्तीच्या आधारानें मिळालेल्या निर्णयाचा मोह त्यांना आवरला नाहीं, इतकेंच. हा मोह सर्वच अभ्यासकांना कमी-अधिक प्रमाणांत होत असतो. इतिहास-संशोधनाच्या क्षेत्रांत केवळ शब्दसाम्याच्या आधारावर निष्कर्ष मांडण्याचा प्रयत्न बहुशः धोक्याचा ठरतो. शब्दसाम्याचा आधार केवळ संशोधनाच्या दिशा निश्चित करायला उपयोगी पडेल — अन्य सबळ आधार नसतील, तर शब्दसाम्याचा फारसा उपयोग होणार नाहीं.

कै. राजवाडे यांनीं हेमचंद्राचा आधार देऊन जी व्युत्पत्ति पुढें केली आहे, ती व्युप्तत्तिहि हेमचंद्रानुसारी नाहीं, हें श्री. खरे यांनीं दाखवून दिलें आहे : "त्यांनीं (कै. राजवाडे यांनीं) 'हरखंडा' हें रूप कोठून आणलें, हेंच समजत नाहीं. हेमचंद्राच्या प्राकृत व्याकरणांत 'समासे वा' (२.९७) या सूत्रावर व्याख्यान करतांना उदाहरण म्हणून 'हरस्कंदौ' याचीं प्राकृतांत 'हरस्खंदा' किंवा 'हरखंदा' अशीं रूपें बनतात म्हणून सांगितलें आहे. येथें 'ड' नसून 'द' आहे."[३८]

खंडोबा-स्कंद-ऐकात्म्याला बाधक अशीं अनेक कारणें आहेत :

१. ज्या 'खंडोबा' नांवावरून खंडोबाचें स्कंदाशीं ऐकात्म्य कल्पिलें जाते, तें नांव केवळ महाराष्ट्रांतच प्रचलित आहे. खंडोबाला दोन बायका आहेत आणि मराठी समजुतीप्रमाणें स्कंद हा ब्रह्मचारी—इतकेंच नव्हे तर स्त्रीद्वेष्टा आहे.

२. खंडोबाचें वाहन घोडा आहे, तर स्कंदाचें वाहन मोर आहे.

३. खंडोबा एकमुख व चतुर्भुज आहे, तर स्कंद हा षण्मुख व द्वादश-भुज आहे.

४. खंडोबा हा शिवाचें मार्तण्डभैरवरूप आहे— म्हणजे पर्यायानें शिव आहे, तर स्कंद हा शिवपुत्र आहे.

५. 'मल्लारि-माहात्म्यां'त मार्तण्ड भैरवाच्या म्हणजे खंडोबाच्या सप्तकोटि गणांचें आधिपत्य स्कंद-कार्तिकेयाकडे असल्याचें वर्णन आहे. म्हणजे 'माहात्म्यकारा'लाहि स्कंद हा खंडोबाहून वेगळा असल्याचेंच अभिप्रेत आहे.

नाम-भेद, चरित्र-भेद व मूर्ति-भेद अशा त्रिविध भिन्नतेमुळें खंडोबा-स्कंद-ऐकात्म्य सिद्ध होऊं शकत नाहीं.

परंतु खंडोबाविषयक आधुनिक संशोधन सुरू होण्यापूर्वींहि खंडोबाचा स्कंदाशीं संबंध जोडण्याची प्रवृत्ति अस्थिर स्वरूपांत अस्तित्वांत असावी, असें वाटतें. कारण, खंडोबाच्या उपासनेंतील, 'चंपाषष्ठी' हा दिवस मूलतः स्कंदाशीं संबद्ध आहे – त्याला 'स्कंदषष्ठी' असेंहि म्हणतात. स्कंद-षष्ठीचा खंडोबाशीं संबंध जोडतांना उपासकांच्या मनांत खंड-स्कंद साम्य-संवेदनाच असेल काय ? दुसरें असें कीं, 'मैलारलिंगस्तोत्र' आणि 'मालाची-स्तोत्र' हीं मैलार-म्हाळसेचीं संस्कृत स्तोत्रें स्कंदपुराणान्तर्गत म्हणून सांगि-तलीं जातात. तसेंच खंडोबाप्रमाणें स्कंदालाहि द्रविडदेवांत दोन बायका आहेत. दोघेंहि वीर आहेत.

या द्रविडदेशांतील स्कंद-स्वरूपावरून माझ्या मनांत आणखीहि कांहीं विचार उद्‌भवतात. तिकडे स्कंदाला 'सुब्रह्मण्य' असें नांव आहे. वल्ली आणि देवयानी या त्याच्या दोन बायका. स्कंद मुळांत ब्रह्मचारी असतांना त्याला दोन बायका कोठून आल्या असाव्या ? या प्रश्नाचें उत्तर खंडोबा-स्कंद-संबंधावर प्रकाश टाकणारें आहे. पंडित महादेवशास्त्री जोशी यांनीं आपल्या नवप्रकाशित 'तमिळनाडु' या पुस्तकांत याविषयींची रंजक आणि उद्‌बोधक माहिती पुरविली आहे :

"शेयोन हा कुरिंजि प्रदेशाचा देव होय. त्याचें दुसरें नांव मुरुगन आणि तिसरें सुब्रह्मण्य.... रक्तवर्ण शेयोन हा पूर्वापार प्रेमाचा देव मानला गेला आहे. तिकडच्या उपवर कन्या आपल्याला इष्ट वर मिळावा, म्हणून याची पूजा करतात. हा देव वृत्तीनें शिकारी बाण्याचा आहे. त्याच्या हातीं सदैव भाला असतो, तो याचसाठीं. भाताची रास अन् त्यावर बकऱ्याचें ऊन ऊन रक्त हें त्याचें आवडतें भोजन आहे. हा मोरावर बसून संचाराला निघतो. द्रविड लोक त्याला कोर्रवईचा मुलगा समजतात. हा समरविजयी आहे.

"मुरुगाचीं स्थानें बहुधा डोंगरपठारावर असतात. वर्षांतून एकदां म्हणजे स्कंदषष्ठीच्या दिवशीं त्याची जत्रा भरते... आतां याची कार्तिकेयाशीं तुलना करा. तोहि पार्वतीचा पुत्र आणि देवांचा सेनापति म्हणून प्रसिद्ध

आहे. . स्कंद आणि मुरुगन हे अगदीं समस्वभावी व समानधर्म असल्यामूळें संस्कृति-संगमाच्या प्रक्रियेंत त्या दोहोंचें तादात्म्य घडवून त्याला शिव-परिवारांत दाखल केलें गेलें. अंतर इतकेंच कीं, कार्तिकेय ब्रह्मचारी आहे आणि मुरुगन विवाहित असून दोन बायकांचा दादला आहे. वल्ली आणि देवयानी हीं त्याच्या कलत्रांचीं नांवें होत. त्यांपैकीं वल्ली ही किरातकन्या आहे. मुरुगन तिच्यावर मोहित झाला आणि मोठ्या प्रयासानें त्यानें तिची प्राप्ति करून घेतली....ती कथा ऐकली कीं, जेजुरीच्या खंडोबाची याच जातीची प्रेमकथा स्मरणांत येते. बाणाई या धनगर जातीच्या मुलीवर खंडोबा असाच अनुरक्त झाला होता आणि त्यापायीं त्यानें त्या धनगराचीं मेंढरेंहि वळलीं होतीं."[३१]

शास्त्रीबुवांनीं मुरुगन-स्कंद-खंडोबा यांच्या साम्यावर नेमकें बोट ठेवलें आहे. मुरुगन आणि स्कंद यांचें ऐकात्म्य होण्याचें एकमेव कारण म्हणजे पार्वतीशीं अभिन्न मानल्या गेलेल्या कोर्रवईचा मुरुगन हा पराक्रमी पुत्र आणि स्कंद हा पार्वतीचा पराक्रमी पुत्र. स्कंद मुरुगनशीं एकरूप झाल्यावर स्कंदचरित्रांतच द्विभार्याप्रसंग दाखल झाला !

याचा अर्थ इतकाच कीं, मुरुगन हा मैलाराच्याच श्रेणींतील ग्रामदेव आहे. त्यांना दोन-दोन बायका आहेत; दोघांनाहि सामिष नैवेद्य चालतो; अनुरूप-वरप्राप्तीसाठीं दोघांचीहि आराधना करण्यांत येते. या दोघांपैकीं मुरुगन हा स्कंदाशीं एकरूप बनला आहेच. दुसऱ्याचीं त्या दिशेनें पडलेलीं अस्थिर पावलें दिसतात. त्यांत त्याला यश आलें नाहीं.

मुरुगनसारखाच आणखी एक द्राविड देव म्हणजे शास्ता किंवा अय्यप्पन ( अय्यनार ) हा होय. हा देवहि क्षेत्रपाळ आहे. तो पांढरा हत्ती किंवा काळा घोडा यावर बसून रात्रीं वेताळाप्रमाणें ग्रामसंचाराला निघतो. त्याच्या मंदिरापुढें मातीचे हत्ती-घोडे उभे केलेले असतात. त्याच्या गळ्यांत 'कुरिंजि' पुष्पांची माला असते. त्याच्या हातांत घोड्यांना चालविण्यासाठीं चाबूक असतो. पूर्णाई आणि पुष्कलाई या त्याच्या दोन बायका. मुरुगन-प्रमाणेंच तो पराक्रमी आहे. 'शबरमलै' हें त्याचें यात्रास्थान.

वरील माहितीवरून आपल्या हें ध्यानांत येईल कीं, मैलार, मुरुगन आणि अय्यप्पन हे सर्व एकाच श्रेणींतील दक्षिणी ग्रामदेव आहेत. या तिघां-

पैकीं मैलार हा तुलनेनें अर्वाचीन आहे. मुरुगननें स्कंदाशीं एकरूपता साधली, तर अय्यप्पन हा निराळ्याच मार्गानें शिवपुत्र बनला. शास्ता किंवा अय्यप्पन हा ‘ हरिहरपुत्र ’ मानला जातो ! ‘ हरिहरपुत्र ’ म्हणजे शिव आणि मोहिनी यांचा पुत्र. ही शिवमोहिनी-प्रीतिकथा मैलार-म्हाळसा यांच्या चरित्रांतहि आहेच. अर्थात् ती ‘ मल्लारिमाहात्म्यां ’त नाहीं– परंतु लोककथांत आहे. म्हणजे अय्यप्पन हा शिव-मोहिनीचा पुत्र, तर मैलार-म्हाळसा हीं साक्षात् शिवमोहिनीच.

ही सर्वत्र प्रक्रिया गूढ, अद्‌भुत, परंतु रंजक व उद्‌बोधक आहे. मुरुगन, अय्यप्पन व मैलार यांच्या उन्नयनाच्या प्रक्रियेंत स्कंद आणि शिवमोहिनी यांचा वापर झालेला आहे. तिघांच्याहि मूळ जानपद स्वरूपांत व वैशिष्ट्यांत साम्य असूनहि मुरुगन स्कंद बनला; स्कंदसदृश अय्यप्पन शिवमोहिनी-पुत्र बनला आणि भीत भीत स्कंदाशीं नातें जोडूं पाहणारा मैलार मोहिनीला बरोबर घेऊन शिव म्हणून मिरवूं लागला. परंतु लोकश्रद्धेच्या सहजस्फूर्त आविष्कारांतून उद्‌भवलेल्या लोककथांना मैलाराच्या बाबतींत थोडा धक्का बसला. महाराष्ट्रांत भैरव हा सुप्रतिष्ठित क्षेत्रपाळ. महाराष्ट्रानें ‘ मल्लारि-माहात्म्यां ’तील अवतारकथेच्या द्वारें मैलाराला ‘ मार्तण्ड भैरव ’ बनविला आणि त्यामुळें म्हाळसेचें लोककथांतील मोहिनी-स्वरूप मार्तण्ड-भैरवाबरोबर विसंगत दिसूं लागलें. यांतून सोडवणूक करण्यासाठीं लोक-कथाकारांनीं अशी दुरुस्ती करून घेतली कीं, मैलारपत्नी म्हाळसा ही मोहिनी नसून शिवाच्या मोहिनीविषयक अभिलाषेची छाया चढलेली ती पार्वतीच आहे !

दक्षिणेंतील अनेक देवतांच्या चरित्रांत या मोहिनीनें जादू उत्पन्न केली आहे. हनुमानाचा जन्महि तिच्याविषयींच्या शिवाच्या अभिलाषेंतूनच झाला, अशी कथा आहे. अर्थात् या कथेंतहि एका द्राविड ग्रामदेवतेच्या उन्नयनाचा प्रयत्न आहेच. त्याचा विस्तार येथें अनावश्यक आहे. मात्र ही मोहिनीची मोहिनी स्वतंत्रपणें पारखण्यासारखी आहे, एवढें निश्चित.

*खंडोबा : इंद्र*

‘ मल्हारी ’ या नांवानें महाराष्ट्रांत प्रसिद्ध असलेला आणि ‘ मल्लय्य ’ या नांवानें कर्नाटकांत प्रिय असलेला हा देव एकच असला तरी या उभय-

प्रदेशांतील त्याच्या रूपांची घडण कांहींशी भिन्न आहे, असें श्री. शं. बा. जोशी यांचें म्हणणें आहे. त्यांच्या मतें 'मल्लय्य' हा 'गिरीश' रुद्र ( मले– डोंगर ) आहे, तर 'मल्हारी' हा इंद्र आहे. या मताचें स्पष्टीकरण ते असें देतात : "पुरें आणि पर्वत यांविषयीं ऋषींना आपुलकी नव्हती; त्याविषयीं विरोधच आसावा. आणि त्यांचा तो विरोध त्यांनीं आपण रचलेल्या रूपकांतून पर्यायानें व्यक्त केला असावा. . या दृष्टीनें मल्लासुर म्हणजे पर्वतेयांचा नाश करणारा देव म्हणजे तो ( मल्हारी ) इंद्र असावा, असें वाटतें. . मल्हारीची मूर्ति अश्वारोही असून तिच्या हातांत खड्गासारखें आयुध आहे, यावरूनहि हा देव इंद्र असावा, असा तर्क वाहतो. . . मल्लय्य ही देवता मुळांत पत्तिजनांचीच असावी, असें म्हणावें लागतें. नंतर इंद्रा-पर्वता या स्वरूपांत या दोन्ही देवतांचा 'कूडल-संगम' ( आर्य-द्रविड ) झालेला दिसतो."[४०]

श्री. शं. बा. जोशी यांची ही कल्पना अगदीं निराधार असून, ती त्यांच्या वेदपूर्वकालप्रेमाची द्योतक आहे, असें म्हणावेंसें वाटतें. श्री. पांडुरंग देसाई यांनीं त्यांचें म्हणणें खोडून काढलें आहेच.

अश्वारोही, खड्गधारी आणि युद्धप्रवण असा मल्हारी शिवाच्या रूपाशीं आणि प्रवृत्तीशीं विरोधी आहे, असें वाटल्यामुळें श्री. जोशी यांनीं मल्हारीला इंद्र बनविला आहे. या सर्व विवेचनासाठीं त्यांनीं 'मल्हारी-माहात्म्यां'तील कथेचा आणि मल्हारीच्या रूपवैशिष्टयाचा संपूर्ण आधार घेतला आहे. 'मल्लारि-माहात्म्यां'त मल्हारी हा शिव असल्याचें सांगितलें नसून, भैरव ( मार्तण्ड भैरव ) असल्याचें सांगितलें आहे. खड्ग हें भैरवाचें मुख्य आयुध. त्याच्या सोबत कुत्राहि आहेच. अवतार-स्वीकाराच्या वेळीं त्याचें वाहन नंदी होतें–घोडा नव्हतें; घोडा त्यानें मणिदैत्याच्या आग्रही विनंतीवरून स्वीकारला, हें 'मल्लारि-माहात्म्यां'तील वर्णनहि अधिक सुसंगत आहे. मल्हारीला मार्तंड भैरव बनवितांना त्याचें वर्तमान रूप आणि त्याच्याविषयींच्या लोकधारणा यांचा मार्तण्ड भैरवाच्या रूपाशीं सुसंगत मेळ घालण्याचाच त्यांत हेतु आहे. मल्हारीच्या सान्निध्यांतील घोडा आणि कुत्रा यांचा इंद्राशीं मुळींच संबंध नाहीं. मध्ययुगांत उदय पावलेल्या आणि एक हजार वर्षांच्या गाजत्या-जागत्या जनश्रद्धेचा लाभ मिळूनहि मूळ रूपापासून

दूर न गेलेल्या या ग्रामदेवतेचा शोध घ्यायला वेदांतील इंद्र-रुद्राकडे किंवा इंद्रा-पर्वताकडे धांव घ्यायची मुळींच आवश्यकता नाहीं.

शिवाय, आपलें मत मांडतांना श्री. जोशी यांनीं देवतांचे वेदकालीन स्वभाव स्थिर मानले आहेत. इंद्राप्रमाणें रुद्र दस्यूंचा संहार करण्यास धांवून आल्याचा कोठेंच ( म्हणजे वेदांत ! ) उल्लेख नाहीं– म्हणून तो जर मल्हारी असेल तर सप्तर्षींच्या हांकेला ओ देऊन मणिमल्लांचा वध करण्यास पुढें येणें शक्य नाहीं ! ! ! देवतांच्या स्वभावांत भक्तांनीं आपल्या वृत्तिप्रवृत्ती-नुसार किती आणि कसे संस्कार घडविले आहेत, हें देवता-विज्ञानाशीं प्राथमिक परिचय असणारासहि माहीत आहे. ‘मल्लारि-माहात्म्यां’तील चरित्र प्रमाण मानावयाचें आणि चरित्रनायकच नाकारावयाचा, हा प्रकार चमत्कारिक वाटतो.

*खंडोबा : खळोबा आणि ज्योतिबा*

श्री. खरे यांनीं खळनाथ हा कोंकणांतील देव खंडोबाशीं एकरूप मानला आहे. ते म्हणतात : “खळनाथ-खळदेव-खळेश्वर हें खंडोबाचेंच एक नांव असून त्यांच्या मूर्तीवरून त्या दोघांचें एकरूपत्व चांगलेंच प्रत्ययास येतें.”[४१]

खळनाथाचीं स्थानें कोंकण, गोमंतक आणि कारवार या भागांत अनेक आहेत. खळनाथाची मूर्ति उभी असते. तिचा डावा पाय किंचित् वांकवून पुढें केलेला असतो. तो चतुर्भुज असून त्याच्या चार हातांत खड्ग, त्रिशूल, डमरु व पानपात्र या वस्तु असतात. त्याचें वाहन घोडा हें उजव्या बाजूस कोरलेलें असतें. परंतु प्रत्येक मूर्ति वाहनयुक्त दाखवितात, असें नाहीं. क्वचित् एकाद्या ठिकाणीं त्याच्याजवळ कुत्राहि असतो. त्यास मिशाहि दाखवितात. तो ब्रह्मचारी आहे, अशी समजूत आहे. परंतु दुसऱ्या समजुती-प्रमाणें त्याला एक बायको असून तिचें नांव पावणाई. ती कुठें द्विभुज तर कुठें चतुर्भुज स्वरूपांत आढळते. तिच्या चतुर्भुज रूपाचीं आयुधें खळनाथाच्या आयुधांप्रमाणेंच असतात.

रविवार हा खळनाथाचा दिनविशेष. घाडी, रावळ, गुरव किंवा सुतार या जातींचे लोक खळनाथाचे पुजारी आहेत. आणखी एक विशेष गोष्ट ही कीं, “खळनाथ म्हणजे परमेश्वराच्या तृतीय प्रकृतीचें प्रतीकआहे.

ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम ३९८४२ वि: भू-प्रवास
क्रमांक ३०८ नों: दि: ९२/१२/६९



ही देवीची मूर्ति आहे." अशी माहिती श्री. नानासाहेब चापेकर यांनीं 'चित्पावन' या ग्रंथांत नोंदविली आहे.[४२]

मूर्तीची भुज-संख्या, आयुधें, क्वचित् दिसणारा घोडा व कुत्रा यांवरून रवळनाथ हा खंडोबा असावा, असा भास होतो. परंतु घोडा व कुत्रा सर्वत्र आढळत नाहीं, दोन बायका नाहींत, भंडारासारख्या उपासनेच्या खुणा नाहींत आणि नांवांचेंहि नातें जमत नाहीं — यावरून खंडोबाशीं त्याचा प्रत्यक्ष संबंध नसावा, असें वाटतें. तो एक भैरवश्रेणींतील स्वतंत्र देव आहे.

जी स्थिति रवळनाथाची, तीच ज्योतिबा किंवा केदारनाथाची. कोल्हापूरजवळील ज्योतिबा हा देव केदारनाथ किंवा केदारलिंग या नांवानेंहि ओळखला जातो. केदाराचें ध्यान असें आहे :

केयूराणि विभूषितैः करयुगै रत्नांकितैः सुन्दरैः ।
नानाहारविचित्रपन्नगयुतैः रत्नांकितैः सुन्दरैः ।
हस्ताभ्यां धृतखड्गपात्रडमरुं शूलं सदा भ्राजितम् ।
वाजीवाहन दैत्यदर्पदलनं केदारमीशं भजे ।।[४३]

श्री. खरे यांना रवळनाथ हें खंडोबाचें दुसरें नांव वाटतें, परंतु तेवढेंच साम्य असतांना ते केदाराला वेगळा मानतात : "हा ज्योतिबा सौम्य भैरवरूपी आहे... तथापि हा खंडोबा आहे कीं नाहीं, याविषयीं शंका आहे. येथें कुत्रा, भंडार, एळ्कोट व खंडोबासंबद्ध इतर आचार यांचे अवशेष नाहींत. येथें कुंकू उधळतात व 'चांग भले' असा जयघोष करतात... तो भैरवाच्या अत्युग्र रूपांतून सौम्य रूपाकडे जाणारी खंडोबाच्या पुढची पायरी आहे, असें वाटतें."[४४]

'केदारविजय' या केदारमाहात्म्यपर ग्रंथांत केदार आणि रवळनाथ हे एकच असल्याची भूमिका आहे. त्या ग्रंथाचा चरित्रनायक 'केदाररवळेश' याच नांवाचा देव आहे. कोल्हापूरजवळील ज्योतिबा म्हणजेच केदाररवळेश, असें त्यांत वर्णिलें आहे. आणि मल्लारि मार्तण्ड भैरव यास केदारनाथाचा सहकारी मानलें आहे. "केदाररवळेश यास महालक्ष्मीनें कोल्हासुराशीं युद्ध करण्यासाठीं हिमालयांतून आणलें. त्यानें षोडशसिद्ध, अष्टभैरव, अष्टादश भैरवगण, चामुंडा आणि महामातृका व चोपडाई, महालक्ष्मी, यमाई या तीन अनादि शक्ति यांच्या सहाय्यानें दैत्यविनाशाचें

कार्य पार पाडलें. या दैत्यविनाशकार्यांत मार्तण्ड भैरवानें मल्याळ देशांत मैराळ हा असुर मारला, म्हणून त्याला तिकडे 'मार्तण्ड मैराळ' म्हणतात आणि जेजुरीला मणिमल्लासुराचा वध केला, म्हणून त्यास 'मल्लारी मार्तण्ड' म्हणतात." अशी कथा 'केदारविजय' व 'करवीरमाहात्म्य' या ग्रंथांत आलेली आहे. या ग्रंथांतून महाराष्ट्रांतील भैरवश्रेणींतील देवांचें माहात्म्य गाण्याचा हेतु स्वच्छ दिसतो.

वरील माहात्म्य-कथेंत मैराळाला 'मल्याळ देशांतील असुर' मानलें आहे, हें चिंतनीय आहे. किट्टेलच्या कन्नड-इंग्लिश-कोशांतहि 'मय्लार' या शब्दाचा एक अर्थ Name of a daitya or demon असा दिला आहे.

केदार हीहि खंडोबाइतकीच प्राचीन देवता असावी. 'स्थानपोथीं'त पैठण, पाटवध ( जि. बीड ), जळगांव ( जि. नगर ) येथील केदाराच्या स्थानांचा उल्लेख आला आहे. खोलेश्वराच्या एका लेखांत आंबें (जोगाईचें ) येथील केदार-मंदिराची नोंद आलेली आहे. चेदिवंशी राजा जाजल्लदेव याच्या मल्हार ( विलासपूर-मध्यप्रदेश ) येथें मिळालेल्या संस्कृत लेखांत सोमराज नामक ब्राह्मणानें इ. स. ११६७–६८ मध्यें मल्लालपत्तनामध्यें केदाराचें देऊळ उभारल्याचें सांगितलें आहे.[४५] चेदिवंशी राजा दुसरा पृथ्वीदेव याच्या रतनपूर येथील इ. स. ११६३-६४ च्या संस्कृत लेखांत वरील मल्लालपत्तन गांवांतील शिवमंदिराचा उल्लेख 'मल्लालेऽस्मिन् लवलधवलं धूर्जटेर्धाम चक्रे' असा आहे. 'मल्लालपत्तन' ( मल्हार ) गांवांत केदाराचें मंदिर उभारल्याची ही नोंद मैलार-केदार नात्याची सूचक ठरूं शकेल काय? तसेंच रतनपूरच्या लेखांत जें 'धूर्जटीचें धाम' ( शिवमंदिर ) वर्णिलें आहे, तें शिवाचेंच होतें, कीं मैलार वा केदार यांच्या मंदिराचेंच तें वर्णन आहे?

श्री. खरे यांच्या मतें 'लवल' या शब्दापासूनच 'रवल' शब्द बनलेला आहे. लवल हें एका वेलीचें शुभ्र वर्णाचें फळ असून, शुभ्रतेच्या वर्णनांत त्याचा उपमान म्हणून संस्कृत साहित्यांत उपयोग आढळतो. शिव हा कर्पूरगौर — पांडुरांग आहे. तेव्हां लवलनाथ-रवळनाथ म्हणजे पर्यायानें शिवच. परंतु रवळनाथ व खंडोबा हे दोघे शिवस्वरूपी ठरले, तरी भूमितींतील प्रमेयाप्रमाणें एकरूप ठरवितां येणार नाहींत.

मल्लालपत्तनांतील शिव-मंदिराचा रतनपूर लेखांतील 'लवलधवलं धूर्जटेर्धाम' हा उल्लेख पाहून माझ्या मनांत एक कल्पना अशी डोकावते कीं, जेजूरी गांवाच्या वायव्येस जें लवथलेश्वराचें मंदिर आहे, तें लवल-धवलेश्वराचें असावें.

*खंडोबा : मूलस्थानदेव आणि स्वयंभूदेव*

आठव्या शतकापासूनच्या अनेक कानडी लेखांत 'मूलस्थानदेव' नांवाच्या देवाचा निर्देश येतो. सध्यां हा देव लिंगस्वरूपांत असतो. श्री. खरे यांच्या मतें, 'तें खंडोबाचेंच पर्यायरूप असावें.' या मूलस्थानदेवाप्रमाणेंच आणि कित्येकदां मूलस्थानदेवाबरोबरच 'स्वयंभूदेव' किंवा 'स्वयंभू कलिनाथ-देव' या नांवाच्या आणखी एका देवाचा निर्देश येतो. मूलस्थानदेव जर खंडोबाचें पर्यायरूप होऊं शकत असेल, तर स्वयंभूदेवालाहि वगळतां येणार नाहीं. परंतु तसें मानणें बरोबर ठरणार नाहीं.

खळनाथ, केदार हीं भैरवश्रेणींतील दैवतें आणि मूलस्थानदेव, स्वयंभू-देव हीं मैलारश्रेणींतील दैवतें यांना मैलार व त्याचें उन्नत रूप मार्तण्ड भैरव यांच्याशीं एकरूप मानावयाचें ठरवलें, तर मुरुगन, अय्यप्पन यांसारखीं दक्षिणी दैवतें आणि म्हस्कोबा, पोटोबा, रोकडोबा, बिरोबा यांसारखीं नामभेदानें वावरणारीं महाराष्ट्रांतील भैरवाचीं रूपें यांनाहि मैलार-खंडोबा मानावें लागेल. धर्मश्रद्धेच्या क्षेत्रांत समन्वयाच्या प्रवृत्तीनें अशा प्रकारचें ऐकात्म्य प्रस्थापित करण्याचा प्रयत्न होतोहि. मात्र संशोधनाच्या क्षेत्रांत तसें मानून चालणार नाहीं. मध्ययुगांत शाक्तांच्या प्रभावाखालीं अनेक क्षुद्र ग्रामदेवींना आदिशक्तीच्या स्वरूपांत विलीन करण्याचा मोठा प्रयत्न झाला. देवीभागवतासारख्या ग्रंथांतून आणि शक्तिपीठांच्या निरीक्षणांतून ही प्रक्रिया स्पष्टपणें दिसून येते. नामभेदानें आढळणारी ती एकच आदि-शक्ति आहे, असें धर्मश्रद्धा सांगेल; परंतु त्या अनेक देवता – त्यांची स्थानिक लोकप्रियता ध्यानांत घेऊन – आदिशक्तीच्या श्रेणींत आणण्याचा समन्वय-निष्ठ प्रयत्न मध्ययुगांत, किंवा त्याहिपूर्वीपासून होत राहिला आहे, असेंच संशोधकाला म्हणावें लागेल.

*ज्योतिबाचें कल्पनारंजन*

म. ज्योतिबा फुले यांनीं मत-प्रचारासाठीं बळिराजा आणि ज्योतिबा,

खंडोबा, भैरोबा हीं महाराष्ट्रांतील दैवतें यांच्या कथांचा उपयोग केला आहे. असा उपयोग करतांना त्यांनीं प्राचीन बळीच्या राज्यांत ज्योतिबा, खंडोबा आणि भैरोबा यांना राज्याधिकारी बनविलें आहे. आपल्या 'गुलामगिरी' या प्रसिद्ध ग्रंथांत ते लिहितात :

"बळीच्या ताब्यांत कोंकण व मावळांतील कांहीं क्षेत्रें होतीं, त्यांवर जोतीबा या नांवाचा अधिकारी होता... त्याचप्रमाणें दक्षिणेंत दुसरें क्षेत्र बळीच्या ताब्यांत होतें, त्याचें नांव महाराष्ट्र.. तें महाराष्ट्र क्षेत्र अतिशय मोठें असल्यामुळें बळिराजानें त्याचीं नऊ खंडें केलीं होतीं. त्या प्रत्येक **खंडाच्या** अधिकाऱ्याचें नांव **खंडोबा** पडलें होतें. योग्यतेप्रमाणें त्याच्या हाताखालीं एक किंवा **दोन प्रधान** असत. त्याचप्रमाणें दरएक खंडोबाच्या हाताखालीं बहुत **मल्ल** असत, म्हणून त्यास **मल्लूखान** म्हणतात. त्यांपैकीं जेजुरीचा खंडोबा हा एक होता. तो आपल्या आसपासच्या क्षेत्रपतींच्या ताब्यांतील मल्लांच्या खोडी मोडून त्यांस ताळचावर आणीत असे. यास्तव त्याचें नांव **मल्ल-अरि** पडलें होतें. त्याचाच अपभ्रंश मल्हारी हा होय. तो धर्मन्यायानें लढण्याचा इतका अभिमानी असे कीं, पाठ दाखविलेल्या शत्रूवर त्यानें कधीं वार केला नाहीं; म्हणून त्याचें नांव **मार-तोंड** पडलें होतें. त्याचा अपभ्रंश **मार्तंड** हा आहे."[४६]

ज्योतिबाचें हें कल्पनारंजन मतप्रचाराच्या अभिनिवेशांतून उद्भवलेलें आहे. मतप्रचारासाठीं पुराणकथा राबविण्याचा प्रकार थोड्याबहुत प्रमाणांत नेहमींच चालतो. स्वातंत्र्यपूर्व काळांत स्वातंत्र्यलालसा चेतविण्यासाठीं इतिहास-पुराणांतील कथांचा परांजपे-सावरकरांसारख्या मातबर लेखकांनीं भरपूर उपयोग केला. अर्थात् मूळ कथेचा विपर्यास किंवा मुळाशीं विसंगत कल्पनारंजन किती करावयाचें, हें ज्याच्या त्याच्या अभिनिवेशावर, प्रवृत्तीवर व क्षमतेवर अवलंबून राहतें.

*मल्लारि मार्तण्ड भैरव : एक रहस्य*

खंडोबाची उपासना कर्नाटकांतून महाराष्ट्रांत आली, 'मैलार' हें त्याचें कानडी नांव होय आणि 'मैलार' व त्याची पत्नी 'मालची' (म्हाळसा) यांची प्राचीनता शिलालेखांच्या आधारें निदान अकराव्या शतकाइतकी मागें नेतां येते, या गोष्टी आजवरच्या संशोधनानें निश्चित झाल्या आहेत.

खंडोबाचे उपासक आणि उपासना यांचें स्वरूप पाहतां तो मूलत: ( आणि अजूनहि ) समाजाच्या खालच्या स्तरांत प्रिय असलेला एक देव आहे, हें उघड आहे. अशा क्षुद्र देवतांची लोकप्रियता वाढली कीं, त्यांचें उदात्ती-करण – संस्कृतीकरण करण्याची प्रवृत्ति हिंदुधर्मांत प्राचीन काळापासून प्रचलित आहे. खंडोबाच्या बाबतींतहि असेंच घडलें आहे.

खंडोबाची मैलार-स्वरूपांतील प्राचीनता अकराव्या शतकापर्यंत मागें जाते आणि त्याला ' मल्लारि मार्तण्ड भैरव ' बनविणारें ' मल्लारि-माहात्म्य ' चौदाव्या शतकापर्यंत मागें जातें, हें आपण पाहिलें आहे. प्रत्यक्ष ' मल्लारि-माहात्म्यां 'तहि मैलार-मैराळ व म्हाळसा हीं प्राकृत नांवें वापरलीं आहेत, हेंहि आपण पाहिलें आहे. तसेंच ' मैलारा 'च्या उल्लेखापूर्वी ' मल्लारि 'हें नांव मैलारदेवतासूचक स्वरूपांत कुठेंहि आढळत नाहीं. ( ' मल्लारि ' हें कृष्णाचें एक विशेषण आहे. ) तसें तें आढळणें शक्यहि नाहीं. कारण ग्राम-देवतांना अवतार-कथा मुळांत नसते—त्या केवळ नवसाला पावणाऱ्या आणि बळी मागणाऱ्या असतात. हळूहळू त्यांच्या भोंवतालीं लोककथांची गुंफण होऊं लागते. नंतर त्या देवतांचें स्वरूप ज्या पूर्वप्रसिद्ध उन्नत देवतांशीं जुळत असेल, त्या देवतांशीं त्यांचें ऐकात्म्य साधलें जातें आणि अशा क्षणींच ग्रामदेवतां-सारख्या देवतांना अवतार-कथेचा लाभ होतो. या अवतारकथेच्या निर्मितींत कांहीं अंशीं लोककथांचा वांटा असतो, तर बऱ्याच अंशीं, ज्या उन्नत देवतेशीं क्षुद्र देवतेचें ऐकात्म्य साधावयाचें असतें, त्या उन्नत देवतेच्या पूर्वप्रसिद्ध चरित्राचा व स्वरूपाचा अंश असतो.

ही उन्नयनाची प्रक्रिया अनेक क्षुद्र देवतांच्या इतिहासांत आढळून येते. असें असतांना श्री. खरे म्हणतात : " या शब्दांची (मैलार व म्हाळसा यांच्या नांवांचीं) अपभ्रष्ट रूपें हींच त्या देवांचीं मूळ नांवें समजलें, तर त्या रूपांतून कांहींच अर्थ निघत नसल्यानें येथें प्राकृत शब्दांचें संस्कृतीकरण झालें असण्याचा संभव दिसत नाहीं. . . ' मल्लारि ' पासून ' मैलार ' हें रूप झालें आहे. "[४७] माझ्या मतें, श्री. खरे यांचें हें मत देवताविकसनाच्या प्रक्रियेशीं विसंगत आहे. ज्यांना श्री. खरे ' अपभ्रष्ट रूपें ' म्हणतात, त्या शब्दांतून कांहींच अर्थ निष्पन्न होत नसेल, तर त्या शब्दांचा उलगडा करण्याला आवश्यक तितकी भाषिक रहस्यांची उकल आजपर्यंतच्या भाषाज्ञानाच्या

कक्षेंत आली नाहीं, असें म्हणणेंच जास्त योग्य ठरेल. 'मैलार' आणि 'म्हाळसा' या नांवांना कांहीं अर्थ नाहीं, म्हणून तीं नंतरचीं अपभ्रष्ट रूपें आणि 'मल्लारि' व 'मदालसा' (हें श्री. खरे यांनीं सुचविलेलें म्हाळसेचें मूळ नांव) यांना अर्थ आहे, म्हणून तीं मूळ नांवें असें मानावयाचें म्हटलें, तर (१) 'मल्लारि' नांवाला साजेसें चरित्र आधीं रचलें गेलें आणि नंतर त्या अर्थाला योग्य अशी देवता प्रचारांत आणली गेली, किंवा (२) मणि-मल्ल दैत्यांचा वध करणारा कोणी 'मल्लारि' खरोखर इतिहासांत केव्हां तरी होऊन गेला, असें मानण्याची आपत्ति येईल. श्री. खरे या दोन्हीहि आपत्ति मानणार नाहींत, हें निश्चित.

अर्थात्, 'मल्लारि' पासून 'मैलार' हें अपभ्रष्ट रूप बनलें नसून, 'मैलार' या कानडी नांवावरून 'मल्लारि' हें संस्कृतीकरण झालें आहे, असें मानणेंच युक्तिसंगत ठरेल. या संस्कृतीकरणाच्या प्रक्रियेच्या आधारें आतां आपणांस 'मल्लारि मार्तण्ड भैरव' या नांवाचें रहस्य शोधावयाचें आहे.

१. 'मल्लारि मार्तण्ड भैरव' या खंडोबाच्या संस्कृत नांवांत मल्लारि, मार्तण्ड आणि भैरव हे तीन शब्द आहेत. पैकीं 'भैरव' हा मैलार-खंडोबाच्या उन्नयनाचा द्योतक आहे. मैलार हा क्षेत्रपाळाच्या श्रेणींतील देव. "कलियुगीं मैलारक्षेत्रपाळाचिया स्थापना होती." या लीळाचरित्रांतील उल्लेखांतहि मैलाराला क्षेत्रपाळ मानलें आहे. 'मैलारक्षेत्रपाळ' या शब्दाचा अर्थ 'मैलार हाच क्षेत्रपाळ' किंवा 'मैलार आणि क्षेत्रपाळ' असा दोन्ही प्रकारें करतां येईल. कोणत्याहि प्रकारचा अर्थ घेतला तरी मैलाराची गणना क्षेत्रपाळाबरोबर केली जात होती, हें निश्चित. भैरव हा महाराष्ट्रांतील लोकप्रिय क्षेत्रपाळ. अर्थातच मैलाराला वर उचलून त्याला चरित्राचा आणि चारित्र्याचा लाभ करून द्यावयास भैरव हाच जवळचा मित्र होता. भैरवानें मैलाराला आपलेंसें केलें, तर त्यांत अस्वाभाविक कांहींच नाहीं. मैलार हा भैरव बनतांच त्याला भैरवाचें मूर्तिस्वरूप प्राप्त झालें असणार.

२. 'मल्लारि' हा शब्द 'मैलार'चें संस्कृतीकरण आहे, हें आपण पाहिलेंच आहे. असें देश्य वा अ-संस्कृत शब्दांचें संस्कृत ध्वनिरूपान्तर करण्याची आणि त्या रूपान्तरित संस्कृत शब्दाच्या अर्थावरून कथा रचण्याची

प्रवृत्ति आपल्या पुराणसाहित्यांत फार मोठ्या प्रमाणांत आढळते. या प्रवृत्तीमुळेंच पुराणांत संचित असणारें इतिहासधन आपल्या हातीं लागणें कठिण झालें आहे. तरीहि अभ्यासकांनीं पुराणरचनेंतील ही ' रहस्यात्मक किमया ' हेरली आहे आणि या प्रवृत्तीचें भान ठेवून अभ्यासक पुराण-कथांतील इतिहासाचें सुवर्ण उत्खनन करून बाहेर काढीत आहेत.

' मैलार 'चें ' मल्लारि ' असें संस्कृत ध्वनिरूपांतर केल्याबरोबर त्याला अर्थ आला आणि मैलारस्वरूप भैरव हा ' मल्लारि भैरव ' बनला. ' मल्लारि भैरव ' या नामोच्चाराबरोबरच, अधिक स्पष्टीकरण न देतांच, भैरवाच्या अवतारकार्याचें द्योतन होऊं शकतें. मल्ल + अरि = मल्लांचा अरि-शत्रु. देवाला अवतार घेण्यासाठीं दैत्यसंहाराचें निमित्त लागतें. ' परित्राणाय साधूनां विनाशाय च दुष्कृताम् ' या शब्दांत आपल्या परंपरेनें अवताराचें प्रयोजन सांगितलें आहे. ' मल्लारि ' हें विशेषण भैरवाला लाभतांच त्याच्या अवताराला प्रयोजन लाभलें आणि अवतार-कथेचा पाया तयार झाला. मल्ल दैत्याच्या विनाशासाठीं भैरवानें अवतार धारण केला, असें ' मल्लारि भैरव ' नांवाचें रहस्य सांगणें माहात्म्यकाराला शक्य बनलें. परंतु भैरवाला शत्रु केवळ एकटा मल्ल नाहीं, तर त्याच्या सोबतीला ' मणि ' नांवाचा आणखी एक दैत्य आहे. हा मणि दैत्य आला कोठून ? मल्लदैत्याचा सहकारी जर मणिदैत्य असेल, तर भैरवाला ' मणिमल्लारि ' असें म्हणावयास पाहिजे. या ' मणिमल्लारि ' नांवालाहि मैलाराच्या कानडी नांवांत आधार आहे. कर्नाटकांतील मैलार ( हडगल्लि-बळ्ळारि) या गांवाच्या मैलार-मंदिराला ' मण्मैलार-मंदिर ' म्हणतात. कारण तेथील मैलार हा ' मण्मैलार ' म्हणजे ' मण्णुमैलार ' ( ' मण्णु ' म्हणजे माती ) आहे. तेथील लोकांची अशी समजूत आहे कीं, ती मूर्ति मातीची आहे. ' मण्मैलार ' या नांवाचें ' मणि-मल्लारि ' हें संस्कृत ध्वनिरूपान्तर होतांच ' मणि + मल्ल + अरि ' अशा अर्थानें भैरवाच्या अवतार-प्रयोजनांत मणि व मल्ल अशा दोन दैत्यांच्या संहाराचा समावेश झाला.

' मणिमल्लारि ' या संस्कृत ध्वनिरूपान्तराचें मूळ असणाऱ्या मातीच्या मैलाराचें वर्णन प्रत्यक्ष ' मल्लारिमाहात्म्यां 'तहि आहे : मणिमल्लासुराचा वध केल्यानंतर सप्तर्षींच्या प्रार्थनेवरून मार्तण्ड भैरवानें प्रेमपूर येथें लिंग-

द्वयरूपानें वास केला. त्यानंतर त्या पुण्यस्थळीं यात्रेसाठीं स्वर्गींचे देव अवतरले आणि त्यांनीं मार्तण्ड भैरवाची मातीची उत्सवमूर्ति बनविली :

सर्वासां वर्णजातीनां ध्यानगम्या सुरैः कृता ।
मूर्तिर्महीमयी शम्भोर्यथा मार्तण्डभैरवी ।।४८

या 'महीमयी' ( मृण्मय ) मूर्तीलाच माहात्म्यकार 'मैलार' हें नांव देतो आणि त्या नांवाचें पुढें स्पष्टीकरण देतो. ( हें स्पष्टीकरण अवतार-कथेच्या विश्लेपणांत येऊन गेलेंच आहे. )

याचा अर्थ असा कीं, 'मल्लारि-माहात्म्या'च्या रचनेच्या वेळींहि मैलार या कर्नाटकांतील गांवीं किंवा कर्नाटकांत अन्यत्र मैलाराची मृण्मय मूर्ति प्रसिद्ध असली पाहिजे. या मूर्तीच्या ख्यातीमुळेंच 'मण्मैलार' या शब्दाचें संस्कृतीकरण अपरिहार्य झालें असावें.

३. आतां उरला 'मार्तण्ड' हा शब्द. या 'मार्तण्ड'चा सूर्याशीं कांहीं संबंध नाहीं, हें आपण मागें पाहिलेंच आहे. 'मार्तण्ड' हें भैरवाचें विशेषण आहे, हें श्री. खरे व श्री. देसाई यांनीं दाखवून दिलेंच आहे. अष्टभैरवांच्या अष्टवर्गांतील पहिल्या 'असितांग' वर्गांत तिसरा 'मार्तण्ड भैरव' आहे. खंडोबा हा मार्तण्ड भैरवाचा अवतार. मैलाराचें भैरवाशीं ऐकात्म्य साधलें, हें ठीक झालें. परंतु चौसष्ट भैरवांपैकीं 'मार्तण्ड भैरव' हा विवक्षित भैरव निवडून काढून त्याच्याशीं मैलाराचें ऐकात्म्य साधण्याचें विशेष कारण दिसत नाहीं. मैलार हा क्षेत्रपाळ, भैरव हा क्षेत्रपाळ—त्यांना एकत्र आणणें सुसंगत दिसतें. परंतु मार्तण्ड भैरवाचें विवक्षितीकरण बुद्धीला पटूं शकत नाहीं. तर मग 'मार्तण्ड' या शब्दाचें येथें प्रयोजन काय ?

मला वाटतें, 'मल्लारि' आणि 'मणिमल्लारि' या शब्दांप्रमाणेंच 'मार्तण्ड' हा शब्दहि कोणत्या तरी मैलारसंबद्ध प्राकृत ( कानडी वा मराठी ) शब्दाचें संस्कृत ध्वनिरूपांतर आहे. पण तो शब्द कसा शोधून काढावयाचा ? 'मल्लारि' आणि 'मणिमल्लारि' या शब्दांशीं ध्वनिसाम्य असणारे 'मैलार' व 'मण्मैलार' हे शब्द प्रचलित असल्यामुळें आपणांस त्यांचा उलगडा करतां आला. परंतु 'मार्तण्ड'ची फोड करायला उपयोगी पडणारा शब्द मैलाराच्या उपासनेच्या क्षेत्रांत आज तरी मला आढळत नाहीं.

परंतु, तसा शब्द आज प्रचलित नसला, तरी कधीं काळीं तो 'अज्ञात'

शब्द प्रचलित असला पाहिजे. त्या अज्ञात शब्दाचा कांहीं मागोवा घेतां येतो काय तें पाहूं. "आंत सण भरून वरपांगीं सजविलेल्या मैलाराचा" उल्लेख आपण बसवेश्वरांच्या वचनाधारें मागें पाहिला आहे. तशाच स्वरूपाच्या मैलारप्रतीकाचे उल्लेख शेख महंमद श्रीगोंदेकराच्या 'योग-संग्राम' या ग्रंथांत आढळतात —

जो नवसें दिवटी हळद मागे। देउळें करा म्हणोनि भक्तास लागे।
चित्रलेपास नेसविलीं लुगडीं झगे। आपण लेवों नेणे ।।
चिताऱ्याकून करूनियां आपणांस। तो केवीं तारील पुजारियास।
भंडार नांव ठेवूनि हळदीस। वेडेचार केले ।।
प्रत्यक्ष विटाळाचीं चिरगुटें। त्यांचे चितारियानें केले मुखोटे।
ते पूजिती नेटें पाटें। बाप माझा म्हणूनियां ।।[४९]

शेख महंमदानें हे उद्‌गार खंडोबाच्या निंदेसाठीं लिहिले असले तरी खंडोबाच्या उपासनेच्या दृष्टीनें एक सत्य त्यांत प्रकटलें आहे. तें म्हणजे चिताऱ्यांनीं बनविलेले चिंध्या-चिरगुटांचे 'मुखवटे' करून त्यांना सजविण्याची प्रथा त्या काळीं प्रचलित होती. बसवेश्वर कर्नाटकांतील बाराव्या शतकांतील संत आणि शेख महंमद महाराष्ट्रांतील सोळाव्या-सतराव्या शतकांतील संत. या दोघांच्या साहित्यांतील उल्लेखांवरून असें म्हणतां येईल कीं, सोळाव्या शतकापर्यंत महाराष्ट्र-कर्नाटकांत मैलार-खंडोबाच्या कापडाच्या मुखवटयांना शृंगारण्याची प्रथा होती. लिंग आणि मूर्ति या प्रतीकांचा मैलार आपणांस आजहि परिचित आहे. वरील उल्लेखांवरून कापडी मुखवटयांचें प्रतीकहि ज्ञात झालें.

'मुखवटा' या अर्थाचा कानडी शब्द 'मारि' असा आहे. मारि म्हणजे मुख (Face). मराठींत Face आणि Mouth या दोन्ही अर्थी 'तोंड' हा एकच शब्द प्रचलित आहे. कानडींत बायि म्हणजे तोंड (Mouth). लिंग-प्रतीकांतील मैलाराला 'मैलारलिंग' असें नांव रूढ आहे. मुख-मुखवटा या प्रतीकांतील मैलाराला 'मैलारमारि' असें म्हणतां येईल. मारि म्हणजे तोंड. एखाद्या परभाषेंतील शब्दाचें प्रचलन सुरू करतांना त्या शब्दाच्या अर्थासह तो शब्द वापरण्याचा मराठीचा स्वभाव आहे. जसें, कागदपत्र, बाजारहाट, अर्जविनंती, कर्जवाम, इत्यादि. याच मराठीच्या प्रवृत्त्यनुसार

'मारि' ( मुखवटा ) हा शब्द मराठींत 'मारि + तोंड' = 'मारितोंड' असा होईल. आणि मग 'मारितोंड'चें 'मार्तण्ड' हें संस्कृत ध्वनिरूपांतर व्हायला कांहींच अडचण पडणार नाहीं. प्रत्यक्ष खंडोबाच्या उपासनेंतहि 'हेग्गडे प्रधान' आणि 'चांग भला' हे दोन शब्द मराठीच्या या विवक्षित प्रवृत्तीची साक्ष द्यायला सिद्ध आहेत, 'हेग्गडे' या कानडी शब्दाचा अर्थ 'प्रधान' असा आहे. परंतु आपण 'हेग्गडे प्रधान' असा जोडशब्द वापरतों. तसेंच 'चांग' या द्राविड शब्दाचा उपयोग आपण 'भला' या त्याच्या अर्थासह 'चांग भला' या स्वरूपांत करतों.

एकदां या प्रक्रियेनें 'मार्तण्ड' शब्द सिद्ध झाल्यावर 'मार्तण्ड' विशेषणानें युक्त असा भैरवहि चौसष्ट भैरवांत दाखवितां आला आणि त्याचें 'मार्तण्ड-तुल्य भैरव' असें स्पष्टीकरणहि देतां आलें. भैरवाचें 'मार्तण्ड भैरव' हें विवक्षितीकरण करावयाला भाग पाडलें तें 'मारि' ( मुखवटा ) या मैलारप्रतीकाच्या लोकप्रियतेमुळें.

—'मल्लारि मार्तण्ड भैरव' या नांवाचें रहस्य हें असें आहे. या रहस्याच्या उलगड्यांत 'मल्लारि-माहात्म्यां'त आलेल्या खंडोबाच्या अवतारकथेच्या निर्मितीचा इतिहास आहे, हेंहि आपण जातां जातां पाहिलेंच. मणि-मल्ल हे दैत्य मैलार व मण्मैलार या नांवांमुळें, 'मार्तण्ड' हें विशेषण 'मारि' ( मुखवटा ) च्या प्रथेमुळें, सप्तर्षि हे मार्ग ( पृ. २५ ) दाखविल्याप्रमाणें कदंबांचें उपास्यदैवत सप्तकोटीश्वर याच्या उत्पत्तिकथेमुळें आणि भैरवस्वरूप हें मैलाराच्या क्षेत्रपाळ-स्वरूपामुळें निष्पन्न झालें. आणि अवतारकथेची निर्मिति झाली. हा केवळ कल्पनेचा खेळ नाहीं, तर देवतांच्या उन्नयनाच्या प्रक्रियेच्या अभ्यासांतून मिळालेल्या एका निश्चित दिशेनें घेतलेला शोध आहे, हें येथवरच्या साधार विवेचनावरून वाचकांच्या ध्यानांत येईलच.

'मल्लारि मार्तण्ड भैरवा'च्या या रहस्योद्घाटनानंतर हेंहि आपोआपच स्पष्ट होत आहे कीं, मैलार-खंडोबा या देवाचा सप्तकोटीश्वर, स्कंद, इंद्र, सूर्य, रवळनाथ, केदार इत्यादींशीं कुठलाहि प्रत्यक्ष संबंध नाहीं. तो मुळांत मैलार वा खंडोबा आहे. आणि त्याला नंतर 'मार्तण्ड भैरव' बनविलें आहे. आतां आपणांस 'मैलार' व 'खंडोबा' या मूळ नांवांचें रहस्य काय आहे, याचा शोध घ्यावयाचा आहे.

*खंडोबाची नामावळी*

मैलार-खंडोबाची लोकप्रियता लक्षांत घेऊन इसवी सनाच्या चौदाव्या शतकांत 'मल्लारिमाहात्म्या'च्या कर्त्यानें त्याला 'मल्लारि मार्तण्ड भैरव' बनविलें आणि मैलाराची ती अवतारकथा उपासकांनीं आदरानें स्वीकारली. त्यानंतर अनेक स्तोत्रें, कवचें, मंत्र-तंत्र, पूजा-विधि, सहस्रनामावळ्या इत्यादि उपासना-साहित्याची भराभर निर्मिति झाली. या उपासनाविषयक स्फुट कृतींचीं सतराव्या शतकांतील हस्तलिखितें उपलब्ध आहेत.

'मल्लारि-सहस्रनामां'त मैलार-खंडोबाचीं जीं नांवें आहेत, त्यांतील शिवत्वदर्शक व भैरवत्वदर्शक नांवांचा विचार करण्याची आवश्यकता नाहीं. तसेंच मार्तण्डभैरवाचें जें चरित्र 'मल्लारिमाहात्म्यां'त आलें आहे, त्या चरित्रांतील घटनांवरून साधलेल्या नांवांशींहि आपल्याला विशेष कर्तव्य नाहीं. खंडोबा हें महाराष्ट्रांतील सर्वप्रिय नांव. याचीं खंडेराव, खंडेराय, खंडू हीं रूपेंहि रूढ आहेत. याच नांवाचीं खंडनाथ, खंडेश्वर, खंडेश हीं संस्कृतीकरणें होत. खंड म्हणजे खड्ग या कल्पनेनें या नांवाचीं खड्गराज, खंडराट् अशींहि रूपें आढळतात. मैलार हें या देवाचें कानडी नांव. या नांवाचें मैलार, मैळार, मैलाळ, मैराळ, मैराल, मैळल, मयिलार, मय्लार, मल्लण्ण, मल्लय्य, मैल असे अनेक पर्याय आढळतात. यांपैकीं पहिलीं सहा नांवें र, ल, ळ यांच्या सावर्ण्यांतून भिन्न बनलीं आहेत. त्यानंतरचीं दोन नांवें 'मैलारा' मधील प्रारंभींचा 'ऐ', 'अयि' किंवा 'अय्' असा उच्चारला गेल्यामुळें बनलेलीं आहेत, तर मल्लण्ण व मल्लय्य हीं दोन नांवें या देवाच्या नांवाचा मूळ अंश 'मल्ल' असा कल्पून, त्यापुढें 'अण्ण' व 'अय्य' हे प्रतिष्ठासूचक प्रत्यय लागून बनलेलीं आहेत. 'मैल' हें नांव 'मल्ल' सारखेंच आहे. किंबहुना 'मैल' चेंच 'मल्ल' हें संस्कृतीकरण आहे.

'मैलार'चें 'मल्लारि' हें संस्कृत ध्वनिरूपांतर. 'मल्लाल' असेंहि संस्कृतीकरण आढळतें. 'मल्लारि'चा मराठींत 'मल्हारी' झाला. मराठीची ही महाप्राणप्रियता 'माळचि'ची 'म्हाळसा' होतांनाहि दिसतेच.

१. **मैलार**. 'मले' म्हणजे डोंगर या कानडी शब्दापासून हें नांव बनलें आहे, असा अनेक संशोधकांचा तर्क आहे. मैलाराच्या श्रेणींतील दक्षिणी देव जो शास्ता (अय्यप्पन) त्याला 'मलेदेव' असें म्हणतात.

'मले' किंवा 'मलै' ( तमीळ ) या शब्दावरून बनलेलीं अनेक देवनामें द्राविड आदिवासी समाजांत रूढ आहेत. श्रीशैलावरील शिवस्थानाचें 'मल्लिकार्जुन' हें नांवहि 'मले'पासूनच साधलेलें असल्याचा दक्षिणी अभ्यासकांचा दावा आहे. म्हाळसेच्या नांवाचे माळज, माळचि हे कानडी पर्यायहि 'माळ' ( डोंगर-उंच प्रदेश ) या 'मले'-सदृश शब्दापासून बनलेलें आहे, असें श्री. पांडुरंग देसाई कळवितात.

मैलाराचीं मैलेय, मैलय्य, मैलुग अशीं नांवें हरिहर कवीच्या ( १३ वें शतक ) ग्रंथांत आढळतात. यांतील 'मैलेय' हें नांव मला चिंतनीय वाटतें. या शब्दाचा संबंध 'मैले-मैळे' या वस्त्रवाचक शब्दाशीं असावा, असें मला वाटतें. कवीश्वर भास्कराच्या 'उद्धवगीतें'त हा शब्द वस्त्र या अर्थानें आला आहे.[५०] 'मैलेय' या नांवाचा संबंध 'मैले' ( वस्त्र )शीं असेल, तर 'मैलेय' ही कानडी व्याकरणाप्रमाणें षष्ठी होईल. मैलेय म्हणजे वस्त्राचा–कापडाचा. मैलाराचे कापडी मुखवटे करीत असत, हें आपण पाहिलेंच आहे. त्याचा निर्देश करावयाचा तर 'मैलेय मारि' ( कापडाचा मुखवटा ) असा करतां येईल. या 'मैलेय मारि' ( कापडाच्या मुखवटयाच्या स्वरूपांतील देव )चें लघुरूप मैलेय. या मैलेय नांवाशीं जसा वस्त्राचा संबंध जाणवतो, तसाच तो 'खंडोबा' या मराठी नांवांतहि जाणवतो. 'मैळे–मैले' प्रमाणेंच 'खंडे' हाहि वस्त्रवाचक शब्द आहे. नामदेवाच्या गाथ्यांत जे आत्मचरित्रपर अभंग आहेत, त्यांत गोणाईच्या तोंडीं पुढील उद्गार येतो :

एकी दिव्य वस्त्र नेसल्या परिकर ।
मज खंडें जर्जर मिळालेंसें ।।[५१]

येथें तर 'खंडें' या शब्दाचा भाव जीर्ण वस्त्र, चिरगूट असा आहे. 'मैलेय मारि' प्रमाणें 'खंडें'वरून 'खंडेय मारि', 'खंडेय' हे शब्द बनतील. योगायोग असा कीं, खंडोबाच्या व्यक्तिस्वीकृत नांवाचा पहिला लैखिक उल्लेख 'खंडेय' असाच येतो. जर माझी ही कल्पना शास्त्रीय ठरेल, तर खंडोबाचा संबंध खड्गाशीं लावण्याऐवजीं कापडी मुखवटयाच्या प्रथेशीं लावावा लागेल. मैळें आणि खंडें या यादवकालीन वस्त्रवाचक शब्दांचें अस्तित्व, त्या शब्दांचीं कानडी व्याकरणाप्रमाणें होणारीं षष्ठ्यन्त रूपें खंडोबाच्या पर्यायनामांत समाविष्ट असणें आणि वस्त्रांपासून बनविलेल्या

मुखवटयाच्या प्रथेचें मैलाराच्या उपासनेंतील प्रचलन—यांवरून मला ही कल्पना सुसंगत वाटते. जाणत्यांनीं तिचा अधिक विचार करावा.

२. **खंडोबा** : खंडोबाचा स्कंदाशीं कांहीं संबंध नाहीं, हें आपण पाहिलेंच आहे. हें नांव खंडें ( वस्त्र ) या शब्दापासून बनलें असावें, असें माझें मत मीं मागें नोंदविलेंच आहे. हें नांव खंड म्हणजे खड्ग या शब्दापासून बनलें आहे, असें श्री. शं. बा. जोशी, श्री. ग. ह. खरे व श्री. पांडुरंग देसाई या तीनहि संशोधकांनीं म्हटलें आहे. मार्तण्ड भैरवाचें मुख्य आयुध खड्ग हें आहे. खंडोबाच्या मंदिरांत ‘ खंडा ’ या नांवानें खड्ग ठेवलेलें असतें. नरेंद्राच्या रुक्मिणी-स्वयंवरांत ‘ खांडेवाहो ’ ( खंडबाहु ) असें खड्गधारी वीराचें विशेषण आलें आहे, तें ‘ खंडोबा ’ या नांवाशीं ध्वनिदृष्ट्या जुळतें.[५२] महिम्नस्तोत्रांत ‘ खंडपरशु ’ हें शिवाचें एक नांव आलेलें आहे— इत्यादि पुरावे या मताच्या समर्थनार्थ पुढें आलेले आहेत.

मला स्वत:ला खंडोबा हें नांव खंडें ( वस्त्र ) किंवा खंड-खंडा-खांडा ( खड्ग ) यांपैकीं कोणत्या तरी एका शब्दापासून बनलेलें असावें, असें वाटतें. त्याच्याशीं शिवाच्या ‘ खंडपरशु ’ इत्यादि नांवांचा कांहीं संबंध नाहीं. खंडनाथ, खंडेश्वर या नांवांनीं शिवस्थानें आढळतात. ‘ स्थानपोथीं ’त पैठणच्या खंडनाथाचा उल्लेख आहे. वऱ्हाडांतील नांदगांव येथील कृष्ण-देव यादवाचा लेख ( इ. स. १२५५ ) ज्या शिवमंदिरांत आहे, त्याचें नांव ‘ खंडेश्वर ’ असें आहे.[५३] उज्जयनीस एक खंडेश्वर शिवाचें मंदिर आहे. श्रीपतीच्या ज्योतिषरत्नमालेंत खंडेश्वरी या नांवाची एक देवी उल्लिखित आहे.[५४] बीड येथें खंडेश्वराचें मंदिर आजहि आहे. श्रीपतीचा चुलता महाकवि पुष्पदन्त याचें एक नांव खंड-खंडु असें होतें.[५५] शिवाला मस्तकावरील चंद्रकोरीमुळें ‘ खंडधर ’ असें एक नांव मिळालेलें आहे. या सर्व शिववाचक शब्दांचा खंडोबाच्या नांवाच्या निर्मितींत कांहीं संबंध नसावा, असें मला वाटतें. खंडोबा हें नांव बनल्यानंतर शिवाच्या तत्सदृश नांवाशीं ( तो स्वत: शिवस्वरूपी बनल्यामुळें ) संबंध सांगतां येणें शक्य झालें, इतकेंच.

३. **मेंगनाथ** : छापील सहस्रनामावळयांत हें नांव ‘ मेघनाथ ’ असें छापलेलें आहे, परंतु हस्तलिखितांतून ‘ मेंगनाथ ’ असाच पाठ आहे. ‘ मेंगाई ’ या नांवाची एक देवी वेल्हें येथें आहे. ती देशस्थ ब्राह्मणांची कुल-

देवता आहे. मेंगनाथ या नांवाचा मेंगाईशीं कांहीं संबंध असेल का ? खंडोबाचें एक स्थान 'मंगसूळी' या नांवाचें आहे. त्यांतील 'मंग' चा अर्थ काय ? मंग हा लक्ष्मीवाचक शब्द आहे. व्यंकटेशाची पत्नी पद्मावती हिचें दक्षिणी नांव 'अलमेलुमंग' असें आहे. मंगराज म्हणजे व्यंकटेश. पण मग गोमंतकांतील मंगेश हा देव शिव आहे, त्याचें स्पष्टीकरण काय देतां येईल ? 'मंग' हा नुसता देवीवाचक शब्द मानला, तरी मंग-मेंग अर्थदृष्ट्या संबद्ध आहेत कीं नाहींत ? कानडी पंडितांकडूनच या शंकांचीं उत्तरें मिळूं शकतील.

४. **मल्लूखान व अजमतखान** : हीं खंडोबाचीं दोन मुसलमानी नांवें आहेत. कांहीं मुसलमानहि खंडोबाचे भक्त आहेत. खंडोबाच्या उपासनेंत 'मल्लूखानाची गदा' ( गदा = भिक्षा ) ही एक मुसलमानी संज्ञा शिरलेली आहे. मल्लूखान या नांवांतील मल्लू हा अंश मराठीच आहे. खंडोबापासून खंडू, तसा मल्लारीपासून मल्लू. मालूजी हें नांव मल्लू-मालू याच प्रकारें बनलें असावें. 'मल्लूखान' या नांवाचा उल्लेख असलेल्या एका शिलालेखाचा अंश श्री. खरे यांनीं दिला आहे, तो असा : 'श्री गुरुलिगजगम वीभुतरुद्राक्षभुशेन सदासीव संकर संभु माहादेव माहारुद्र : मलुषान' ( श्रीगुरुलिंगजंगम विभूतिरुद्राक्षभूषण सदाशिव शंकर शंभु महादेव महारुद्र : मलुखान. ) हा लेख बीड येथील गाझीउद्दीननगर या भागांतील असून त्याचा काल श. १६२५ ( इ. स. १७०३ ) असा आहे. हा लेख लिंगायत परंपरेंतील आहे, हें त्याच्या भाषेवरून स्पष्ट आहे. श्री. खरे या लेखाविषयीं लिहितात : "यांतील शब्द लिंगायतपंथसंबद्ध आहेत. तेव्हां शिववाचक मलुखान हें नांवहि लिंगायतांनीं प्रचारांत आणलें असण्याचा संभव आहे."[५६]

परंतु खास खंडोबावाचक मल्लूखान हें नांव उपर्युक्त लेखाच्या कालापूर्वी मराठी वाङ्मयांत वापरलें गेलें आहे. समर्थांच्या दोन पदांत "मल्लूखान देव मल्लारी", "मल्लूखान देतो तुफान" असें हें नांव आढळतें.[५७] यांतील पहिला उल्लेख तर "तुरुक मातले, फोडाया आले" या जेजुरीवरील मुसलमानांच्या आक्रमणाच्या प्रसंगाचें वर्णन करणाऱ्या पदांतील आहे. समर्थांचा समाधिकाल इ. स. १६८२. तेव्हां समर्थकृत 'मल्लूखानाचा उल्लेख' श्री. खरे यांनीं दिलेल्या लेखाच्या निदान पंचवीस वर्षें तरी पूर्वीचा ठरतो. शिवाय हा उल्लेख खास खंडोबावाचक आहे. मध्वमुनीश्वर ( समाधि : श. १६५३ )

आपल्या पदांत "अव्वल मल्लूखान शिपाई", "जय जय भैरव मल्लूखान" असें मल्लूखान हें नांव वापरतात.[५८]

'अजमतखान' या नांवाविषयीं 'खंडोबाला हें एक नांव औरंगजेबानें दिलें' हा मोल्सवर्थच्या कोशांतील आधार श्री. खरे यांनीं दिला आहे. आणि औरंगजेबानें जेजुरीवर आक्रमण केल्याच्या कथेची आठवण दिली आहे. जेजुरीवरील आक्रमणाच्या दंतकथेवरील (कीं सत्यकथेवरील ?) समर्थांच्या पदांत मल्लूखान हें नांव आलें आहे, हें आपण पाहिलेंच आहे. मला वाटतें, 'अजमतखान' हें नांव अफझलखानानें पाली येथील खंडोबावर केलेल्या आक्रमणाशीं संबद्ध असावें. अज्ञानदास या शिव-समकालीन शाहिरानें अफझुलखानाच्या वधावर जो पोवाडा रचला आहे, त्यांत हा शाहीर म्हणतो :

खान दरमजली कूच केला । चालुनि पालीकारणें गेला ।।
**पालीचा खंडोबा । अजामत दावी मोगलाला ।।**
न्हाटो न्हाटो रे भाई बोलिला । तीन कोस मोड केला ।।
दीपमाळ बांधिली देवाला । मग खानाचा भोग पुरला ।।[५९]

पालीच्या खंडोबानें खानाला 'अजामत' दाखविली, यांत खंडोबाच्या 'अजमतखान' या नांवाचें बीज आहे, असें म्हणावयास हरकत नाहीं. शाहीर अज्ञानदासाच्या शिवकालीनत्वाबद्दल शंका घेतली तरी तो पेशवाई-पूर्वीचा निश्चित आहे– मोल्सवर्थच्या कोशापूर्वींचा तर आहेच आहे !

५. मार्तण्ड, मल्हारी मार्तण्ड, मार्तण्ड भैरव हीं नांवें 'मल्लारि मार्तण्ड भैरव'चीं लघुरूपें आहेत. 'महीपति' हें संतांच्या खंडोबाविषयक पदांत येणारें नांव त्याचें क्षेत्रपालत्व व राजेपण सूचित करणारें असावें. समर्थांनीं एका पदांत 'मलो म्हैपती' असें नांव वापरलें आहे.

*खंडोबाचीं प्रतीकें*

खंडोबाचीं प्रतीकें विविध आहेत. लिंग, तांदळा, मूर्ति, टांक हीं प्रतीकें आज रूढ असून कापडी मुखवट्याचें एके काळीं रूढ असणारें प्रतीक आज आढळत नाहीं

१. **लिंग** : 'मल्लारि-माहात्म्यां'त मार्तण्ड भैरव लिंगद्वयरूपानें प्रकट झाल्याचें वर्णन येतें. हीं लिंगें प्रायः स्वयंभू असतात. स्वयंभू म्हणजे न

घडविलेलीं अचल लिंगें. 'मैलारलिंग' हें खंडोबाचें नांव त्याच्या लिंग-प्रतीकाच्या प्रसिद्धीचें द्योतक आहे. मैलाराचें प्राचीन प्रतीक लिंगच असावें, असें वाटतें. स्वयंभू लिंगाऐवजीं क्वचित् घडीव लिंगेंहि आढळतात. कुठें कुठें लिंगद्वयाऐवजीं बाणाईचा समावेश करणारें लिंगत्रयहि असतें.

२. **तांदळा** : तांदळा म्हणजे न घडविलेली चल शिळा. ही बहुशः वर निमुळती होत गेलेली आढळते.

३. **मुखवटा** : हे मुखवटे कापडाचे असत, असें 'योगसंग्रामां'तील उल्लेखावरून वाटतें. मुखवटा हा केवळ मुखाकारापुरताच असतो, असें नाहीं. सध्यां भाद्रपदांतील गौरीचे जे कापडी मुखवटे करतात, ते कंबरे-पर्यंतचे असतात. आणि तरीहि त्या पादविहीन मूर्तीला मुखवटा असेंच आपण म्हणतों. मला वाटतें, खंडोबाचे कापडी मुखवटे याच प्रकारचे असले पाहिजेत. नाहीं तर त्यांना वस्त्रालंकारांनीं वरपांगीं सजवितां कसें येणार ?

४. **मूर्ति** : मूर्ति-प्रतीकाच्या स्वरूपांत मैलार-खंडोबाची पूजा केव्हां सुरू झाली, हें निश्चयानें सांगतां येणार नाहीं. परंतु एवढें मात्र निश्चित कीं, मल्लारिमाहात्म्याच्या रचनेपूर्वी—चौदाव्या शतकापूर्वीं खंडोबाच्या मूर्ति अस्तित्वांत असाव्या. 'मल्लारिमाहात्म्यां'त 'महीमयी मूर्ती' चा ( मण्मैलाराचा ) उल्लेख आहे, हें आपण मागें पाहिलेंच आहे. मैलाराला, मार्तण्ड भैरवरूप प्राप्त होण्यापूर्वीं मैलाराच्या मूर्तीचें स्वरूप कसें असेल, हें समजण्यालाहि आज आधार नाहीं. सध्यां आढळणाऱ्या खंडोबाच्या मूर्ति बैठ्या, उभ्या व अश्वारूढ अशा विविध आहेत.

बैठी मूर्ति सिंहासनस्थ असते. मांडी घालून बसलेल्या या मूर्तीच्या दोन गुडघ्यांखालीं आसनावर मणि-मल्लांचीं मुंडें असतात. या मूर्ति चतुर्भुज असून त्यांच्या हातांत खड्ग, त्रिशूल, डमरु व पानपात्र या वस्तु असतात. सोबत कुत्रा असतो. त्याचें वाहन घोडा. अनेक ठिकाणीं त्याच्या शिवस्वरूपाचें द्योतक म्हणून नंदी हें वाहन आढळतें. अश्वारूढ मूर्तींत कधीं खंडोबा एकटा असतो, कधीं त्याच्यामागें म्हाळसा असते, तर कधीं म्हाळसा व बाणाई या दोघीहि असतात. शेख महंमदानें म्हाळसेसह अश्वारूढ झालेल्या खंडोबाच्या सुवर्णमूर्तीचा उल्लेख केला आहे.

५. **टांक** : टांक हे घरांतील देव्हाऱ्यांत पूजिण्यासाठीं असतात. हे

प्राय: सुवर्णाचे व क्वचित् चांदीचेहि असतात. ( खंडोबाचा टांक सोन्याचाच असला पाहिजे, असा संकेत रूढ आहे.) सुवर्णाच्या पर्णावर उठावाच्या छापानें बनविलेली ही प्रतिमा अश्वारूढ असते. मागें म्हाळसा बसलेली असते आणि सोबत कुत्रा व सैनिक असतात.

६. **ध्यानें** : मैलार-खंडोबाच्या म्हणजेच मार्तण्ड भैरव अवताराच्या ध्यानाचा विचार करण्यापूर्वी आपण मार्तण्ड भैरव ज्या असितांग भैरववर्गातील आहे, त्या वर्गाचें मूर्तिवैज्ञानिक वर्णन पाहूं. 'श्रीतत्त्वनिधि' या ग्रंथांत या वर्गाचें वर्णन असें केलें आहे :

आद्याष्टकं सुवर्णाभं त्रिशूलं डमरुं तथा ।
पाशं चासिं दधानं च ध्यायेत्सर्वाङ्गसुन्दरम् ।।

अर्थात्, या वर्गातील भैरवमूर्ति चतुर्भुज, त्रिशूल-डमरु-पाश-खड्ग धारण करणारी आणि सुवर्णवर्णाची असते. या ध्यानांतील 'सुवर्णाभम्' हें विशेषण खंडोबाच्या उपासनेच्या क्षेत्रांतील पीतवर्णाच्या वैशिष्टयाच्या दृष्टीनें चिंतनीय आहे. पाशाच्या जागीं पानपात्र ठेवलें कीं हें वर्णन खंडोबालाहि लागू पडेल.

स्कन्दपुराणान्तर्गत समजलें जाणारें जें मैलारलिंगध्यानस्तोत्र 'श्रीतत्त्वनिधीं'त संग्रहिलें आहे, त्यांतील मैलारलिंगाचें मूर्तिस्वरूप दाखविणारा भाग पुढीलप्रमाणें आहे :

शुभ्राङ्गं भूषणैर्युक्तं हरिद्राचूर्णसंयुतम् ।
पीताम्बरमुदाराङ्गं भजतां कामदं सदा ।।
त्रिशूलं डमृगं खड्गं वरदं च कराम्बुजैः ।
बिभ्राणं प्राणिरक्षार्थं सर्वकालमतन्द्रितम् ।।
देवानां रक्षणार्थाय दानवानां वधाय च ।
मैलारं रूपमास्थाय शङ्करः शङ्करोऽभवत् ।।
गजसिंहवराहार्क्षव्याघ्ररूपधरान् खलान् ।
दुष्टान् शत्रून् विनिघ्नन्तुं तुरगेण चचार ह ।।[६१]

या ध्यानांत त्रिशूल-डमरु-खड्ग हीं तीनच आयुधें सांगितलीं असून, चौथा हात वरद मुद्रेंत असल्याचें वर्णन आहे, हा फरक ध्यानांत घेण्यासारखा आहे. आणखी एका ध्यानांत मल्लारिदेवाच्या मूर्तीचें व वस्त्रालंकारांचें

वर्णन करून, पुढें त्याच्या परिवारपशूंविषयींचें वर्णन असें केलें आहे :

सितहयवरपत्रं हारसम्भूपिताङ्गम् ।
परिवृतमतिघोरैः सप्तभिः सारमेयैः ।।

येथें घोड्याचा वर्ण शुभ्र सांगितला असून कुत्र्यांची संख्या सात धरली आहे. एकंदरींत खंडोबाच्या चरित्रांत 'साता'चें प्रस्थ विशेष दिसतें. 'मल्लारिसहस्रनामां'त खंडोबाचें ध्यान पुढीलप्रमाणें दिलें आहे:

ध्यायेन्मल्लारिदेवं कनकगिरिनिभं
म्हाळसाभूषिताङ्कम् ।
श्वेताश्वं खड्गहस्तं विवुधबुधगणैः
सेव्यमानं कृतार्थैः ।।
युक्ताङ्घ्रि दैत्यमूर्ध्नि डमरुविलसितं
नैशचूर्णाभिरामम् ।
नित्यं भक्तेषु तुष्टं श्वगणपरिवृतं
नित्यमोङ्काररूपम् ।।

या ध्यानांत सुवर्णवर्ण, मांडीवर म्हाळसा, पांढरा घोडा, हातांत खड्ग व डमरु, दैत्याच्या डोक्यावर पाय, कुत्र्यांचा परिवार व हळदीची शोभा यांचा उल्लेख आहे. त्रिशूल व पानपात्र धारण करणाऱ्या आणखी दोन हातांचा निर्देश यांत नाहीं.

या संस्कृत ध्यानांतून, स्तोत्रांतून व माहात्म्यांतून खंडोबाची पत्नी म्हणून म्हाळसा वा गंगाम्हाळसा येते; तेथें बाणाईला स्थान नाहीं.

*खंडोबाचा परिवार*

खंडोबाच्या परिवारांत म्हाळसा, बाणाई, हेगडे प्रधान, घोडा आणि कुत्रा एवढ्यांचा समावेश होतो. यांतील प्रत्येक घटकाचा आपण स्वतंत्रपणें विचार करूं.

१. **म्हाळसा** : म्हाळसेविषयींची चर्चा मीं पुढच्या स्वतंत्र प्रकरणांत केलेली आहे. म्हाळसा ही कर्नाटकांत माळव्व या नांवानें ओळखली जाते. तिकडे तिला गंगि माळव्व आणि तुप्पद माळव्व अशीं नांवें आहेत. माझ्या कल्पनेप्रमाणें गंगि माळव्व आणि तुप्पद माळव्व या वेगळ्या असाव्यात. देवरगुड्डु येथें तुप्पद माळव्व आणि गंगि माळव्व यांचीं स्वतंत्र मंदिरें आहेत. माळव्व या मूळ नांवाच्या पूर्वीं जोडलेले 'गंगि' आणि 'तुप्पद' हे शब्द

कशाकरितां, तें कळत नाहीं. 'तुप्पद' याचा अर्थ 'तुपाची' असा आहे. 'गंगि' या शब्दाचा अर्थ कळत नाहीं. तो 'गंगा' शब्दाचा अपभ्रंश आहे, असें समजलें जातें. परंतु तें पटत नाहीं. 'मल्लारि-माहात्म्य' या ग्रंथांतील, प्राकृताचें संस्कृतीकरण करण्याची प्रवृत्ति लक्षांत घेतली तर असें वाटतें कीं, मल्लारिमाहात्म्यांत गंगि माळव्व आणि तुप्पद माळव्व या कानडी नांवांचीं संस्कृत रूपान्तरें 'गंगाम्हालसिका' व 'घृतमारी' अशीं झालेलीं दिसतात. पैकीं पहिलें ध्वनिरूपान्तर आहे, तर दुसरें (ध्वनिरूपान्तर सहजपणें जमेना म्हणून) अर्थरूपान्तर आहे. म्हणजेच 'गंगि' हा गंगेहून निराळा कानडी शब्द असावा. 'गंगि' आणि 'तुप्पद' या शब्दांचें 'कानडेपण' कानडी पंडितांनींच उलगडून दाखविलें पाहिजे. घृतमारीपासून तुप्पद माळव्व आणि गंगाम्हालसिकापासून गंगि माळव्व हीं अपभ्रष्ट रूपें बनलीं, असें मानावयास मात्र मी तयार नाहीं.

गंगि माळव्वपासून गंगाम्हालसिका हें नांव बनविल्यावर गंगा आणि पार्वती यांच्या भांडणाची आणि नंतरच्या ऐक्याची लोककथा निर्माण झाली असावी. 'मल्लारिमाहात्म्यां'त अशा स्वरूपाची बीजभूत कथा प्रेमपुरषष्टितीर्थवर्णनांत दिलेली आहेच. सिद्धपाल केसरी त्या कथांशाचें मराठी विवरण असें देतो :

जेथें पार्वतीनें आपुले चरण प्रक्षाळिले ।
तेथें पार्वतीतीर्थ होतें झालें ।
मार्तंड भैरवें अभिवंदिलें ।
    उदकबिंदु लागले गंगेसी ।।
मग गंगा भैरवावरी रुसली ।
कोपें पाताळाप्रती गेली ।
ते वेळीं पार्वती शिवासी भांडली ।
    मग दोहींसी केलें एकपण ।।
गंगागौरीसी एक होउनी ।
सुंदर रूप म्हाळसेचें धरुनी ।
ते मार्तंड भैरवें अर्धांगीं घेउनी
    प्रीती करुनी बैसविली ।।[६२]

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. 92291

—ही सर्व कलहकथा ' गंगि 'चें ' गंगा ' हें रूपांतर समर्थिण्यासाठीं.

म्हाळसेच्या लोककथेंत तिचा पिता नेवाशाचा तिम्मशेट वाणी हा होय, असें सांगितलें आहे. तिम्मशेट हें नांवहि कानडी आहे. कानडी शिलालेखांत तिम्मण, तिम्मराज अशीं व्यक्तिनामें येतात. कर्नाटकांत मैलार या गांवाजवळ तिम्मापूर नामक एक गांव आहे.

२. **बाणाई** : मार्गें आपण खंडोबा-स्कंद-संबंधाचा विचार करतांना पाहिलेंच आहे कीं, मुरुगन, अय्यप्पन आणि मैलार हे एकाच श्रेणींतील तिन्ही देव दोन-दोन बायकांचे दादले आहेत. मुरुगनची एक बायको जशी किरातकन्या आहे, तशीच मैलाराची बाणाई धनगर-कन्या आहे. दोघांनींहि आपापली ही द्वितीय भार्या प्रीतिबळानें मिळविल्याची कथा आहे. महाराष्ट्रांत प्रचलित असलेल्या लोककथेप्रमाणें, बाणाई ही मुळांत इंद्राच्या **सप्त** कन्यांपैकीं एक. तिनें पित्यासमोर आत्मकर्तृत्वाचा अभिमान मिरवल्यामुळें इंद्रानें तिला लहान बालकाचें रूप देऊन चंदनपूरच्या जंगलांत बंद पेटींत घालून सोडून दिलें. ती पेटी मेंढरें राखणाऱ्या धनगरांना मिळाली. त्यांनीं त्या नवजातस्वरूप मुलीचें संगोपन केलें. तिचें नांव त्यांनीं ' बानू ' असें ठेवलें. वयांत आल्यावर तिनें शंकराची उपासना केली. तिच्या तपानें प्रसन्न झालेल्या शंकरानें तिच्यापुढें मनुष्यरूपानें प्रकट होऊन तिला अद्भुत खडावा दिल्या. त्या खडावा पायांत घालतांच तला ईप्सित वराचें दर्शन घडेल, असा संकेत होता. त्या खडावा पायांत घालून बानू निघाली, ती जेजूरीवर खंडोबाच्या महालांत आली. तिथें म्हाळसेसह बसलेल्या खंडोबाला पाहतांच ती त्याच्यावर मोहित झाली. तिनें डोळ्यांतलें काजळ काढून एक प्रेमपत्र लिहिलें आणि तिथेंच टाकलें. तें प्रेमपत्र हातीं पडतांच खंडोबाहि अवस्थ झाला. तो मुद्दामच सारीपाटांतला डाव हरला आणि अटीप्रमाणें बारा वर्षांच्या वनवासाला निघाला. म्हाळसेला वाईट वाटलें. तिला खंडोबाचा 'आंतर: कोऽपि हेतु: ' माहीत नव्हता. खंडोबा तेथून जो निघाला, तो भुलेश्वरला आला. भुलेश्वर म्हणे देवांचा गुरु. भुलेश्वराच्या आदेशाप्रमाणें खंडोबानें प्रौढ धनगराचें रूप घेतलें आणि तो चंदनपूर येथील बानूच्या कळपांत अवतरला. त्यानें बानूच्या पालकपित्याचीं मेंढरें राखण्याचें काम पत्करलें. **सातशें** मेंढ्या आणि **सातशें** शेळ्या. एकदां खंडोबानें त्या

मेंढ्या नदीवर गेल्या. तेथें त्यानें मुद्दामच त्या मेंढ्या सोलल्या. त्यांचें मांस वेगळें केलें, हाडें वेगळीं केलीं. हा प्रकार कळतांच तेथें धनगर आले, बानू आली. बानूनें विचारल्यावर खंडोबा म्हणाला, "बानू, तूं माझ्याशीं लग्न करायला तयार होशील तर मी मेंढ्या जिवंत करतों." बानूनें नाइलाजानें अट मान्य केली. मेंढ्या जिवंत होतांच खंडोबानें बानूचा हात पकडला आणि ती आढेवेढे घेत असतांनाच तिला आपल्याबरोबर घोड्यावर घेतलें. घोड्यावर बसतांच त्यानें आपलें मूळ रूप धारण केलें. आणि मग बानूनें ओळखलें कीं, ज्याला आपण प्रेमपत्र धाडलें, तोच हा खंडोबा आपल्यासाठीं आपल्या घरीं राबायला आला होता. नंतर बानूनें खंडोबाला तिथेंच थांबवलें आणि बानूच्या आदेशाप्रमाणें धनगरांनीं त्यांच्या ऐपतीप्रमाणें दोघांचा लग्नसोहळा थाटानें पार पाडला. त्यानंतर खंडोबा बानूला घेऊन जेजूरीला आला. त्याला पाहतांच म्हाळसेला आनंद झाला. ती आरती घेऊन आली. परंतु खंडोबाबरोबर आणखी एक बाई आहे, हें पाहतांच ती चिडली आणि दुःखानें शिळा होऊन पडली. खंडोबानें तिची समजूत घालायचा प्रयत्न केला, परंतु उपयोग झाला नाहीं. अखेर त्यानें नाइलाजानें वरचा अर्धा डोंगर म्हाळसेला वांटून दिला आणि खालच्या डोंगरावर बानूला ठेवलें. बानूला तो नियमानें भेटूं लागला.

जयाद्रि-माहात्म्यांत याहून वेगळी कथा दिलेली आहे—ती मुद्दाम गुंती-गुंतीची बनवलेली दिसते. तेथें बाणाई ही बाणदैत्याची बाणासह जन्मलेली कन्या मानलेली आहे.

बानूच्या वरील लोककथेंतहि 'सात' ही संख्या महत्त्व पावलेली दिसते. महाराष्ट्रांत अशी समजूत आहे कीं, खंडोबा-बानू-विवाह नळदुर्गास साजरा झाला. नळदुर्ग ही नळराजाची राजधानी. अनेक लोककथांत हा नळराजा येतो, त्याचा नैषध नलाशीं संबंध नाहीं.

कर्नाटकांत बाणाईला कुरुबत्यव्व किंवा कुरुबत्यम्म असें नांव आहे. कुरी म्हणजे मेंढी. कुरुब म्हणजे मेंढपाळ (धनगर). कुरुबती म्हणजे धनगर स्त्री. या कुरुबती शब्दाला अव्व-अम्म (बाई-आई) हे प्रतिष्ठा-सूचक शब्द जोडून कुरुबत्यव्व–कुरुबत्यम्म हीं नांवें साधलेलीं आहेत. महा-राष्ट्रांत बाणाईचा खंडोबाशीं विवाह झाल्याचें मानतात, परंतु कर्नाटकांत

ती त्याची ‘ राख ’ आहे, असें समजतात. तिचें स्थान बहुश: गांवाबाहेर टेकडीवर ( मरडीवर ) असतें. देव तेथें वर्षांतून एकदां वाजत -गाजत जातो.

जेजूरीस कडेपठारावर खंडोबाच्या एका मूर्तीबरोबर जोगेश्वरी व बाळाई यांच्या मूर्ति आहेत. ही बाळाई म्हणजे वाणाईच. निमगांवास बाणाईची तांब्याची उभी मूर्ति असून ती म्हाळसेप्रमाणेंच कमलकलिका-पानपात्रधारिणी आहे. पाली येथें वाणाईची हात जोडलेल्या स्थितींतील उभी शिलामूर्ति आहे. कांहीं ठिकाणीं तिचीं लिंगेंहि आहेत.

वाणाईचा उल्लेख ‘ मल्लारि-माहात्म्यां ’त नसला तरी ती त्याहून जुनी आहे, हें निश्चित. तिचें स्थान मैलाराच्या प्रारंभिक लोककथांत असलें पाहिजे, हें मुरुगन-अय्यप्पन या मैलारपूर्व देवांच्या चरित्राशीं असलेल्या मैलार-चरित्राच्या साम्यावरून दिसून येतें.

जेजूरी-भुलेश्वराशीं संबंध असलेली ‘ मल्हारीच्या बानू ’ची कथा कर्नाटकांतील लोककथेचें मराठी संस्करण असावें. कारण कानडी कुरुबांच्या (धनगरांच्या ) वसाहती पुणें प्रांतांतील भोसरी, मोशी, गोलापूर, भुलेश्वर या भागांत झाल्याच्या खुणा उपलब्ध आहेत. या कानडी कुरुबांनीं महाराष्ट्रांत आल्यावर बानूची कथा जेजूरीशीं जोडली असावी.

कर्नाटकांत ती केवळ धनगरस्त्री ( कुरुबत्यव्व ) म्हणून ओळखली जात असतांना महाराष्ट्रांत तिला बाणाई-बानू हें नांव कसें मिळालें ? जयाद्रि-माहात्म्यांत ती बाण या शस्त्रासह जन्मलेली बाणदैत्याची कन्या होय, असें तिच्या ‘ बाणा ’ या नांवाचें स्पष्टीकरण दिलें आहे. श्री. गुप्ते यांनीं आपल्या ‘ हिंदु हॉलिडेज् ॲण्ड सेरिमोनिअल्स ’ या ग्रंथांत खंडोबाच्या रूपाला सूर्यकथेचें प्रतीक ठरवितांना, चंपाषष्ठीच्या खगोलीय स्थितीचें जें वर्णन दिलें आहे, त्यांत शततारका नक्षत्राचें प्रतीक म्हणजे वाणाई—असें म्हटलें असून वाणाई म्हणजे शत बाण असलेला भाता होय, असें त्या नांवाचें स्पष्टीकरण केलें आहे. श्री. पांडुरंग देसाईहि वाणाईचा बाणाशीं संबंध जोडतात. त्यांच्या मतें, “ लढाऊ मल्लारीला खड्गाबरोबर धनुर्बाणांचीहि आवश्यकता आहे. या बाणाला त्याच्या भक्तांनीं बाणाई बनवून, उपपत्नीप्रमाणें त्याशीं गांठ घालून दिली. ”[६३]

या बाण-कल्पनेनें ‘ बाणाई ’ नांवाचें रहस्य उलगडल्याचें समाधान

... ग्रंथालय, ठाणे. ...
३९८४९ वि: ५८-प्रवास
३०८ नों. दि: १२/१२/५९



मिळत नाहीं. श्री. खरे वाणाईचें निराळेंच स्पष्टीकरण देतात. त्यांनीं बाणाईचा पालाईशीं संबंध जोडला आहे. पालाई ही पाली गांवची गवळण. तिच्या भक्तीमुळेंच खंडोबा पालीस प्रकटला, अशी कथा प्रचलित आहे. श्री. खरे पालाई-बाणा-ऐकात्म्याविषयीं लिहितात. : "पालाई ही गवळण, बाणाई ही धनगर आणि बाळाई ही अज्ञात जातीची असली तरी तिन्ही शब्दांनीं एकच स्त्री अभिप्रेत आहे, यांत शंका नाहीं. पुष्कळ धनगर दुधाचा नसला तरी लोण्याचा धंदा करतात. यामुळें गवळण व धनगरीण हे शब्द अर्थदृष्टया जवळ जवळ येतात. पालाईचीं बाळाई व बाणाई अशीं रूपांतरें होणें अगदीं शक्य आहे. प बद्दल ब आणि ल, ण, ळ यांची अदलाबदल झाल्याचीं कित्येक उदाहरणें दाखवितां येतील."[६४]

श्री. खरे यांच्या या स्पष्टीकरणावरून माझ्या मनांत असा विचार डोकावतो कीं, जर लोण्याचा धंदा करणाऱ्या धनगरांच्या समाजांतील बाणाई असेल, तर तुप्पद माळव्व ही बाणाई ठरेल काय ? मंगसूळी येथील बाणाईच्या मूर्तीच्या डोक्यावर उजव्या हातानें सांवरलेली चार हंड्यांची उतरंड व हातांत कोकरूं व कोंबडा दाखविला आहे. हें रूप गवळण-धनगरीण असें संमिश्र दिसतें. देवरगुड्डु येथील मैलार-मंदिरांत तुपाचे अनेक नंदादीप असून ते धनगरांच्या देणग्यांतून तेवत असतात, ही वस्तुस्थितिहि तुप्पद माळव्व ही बाणाई असावी, या कल्पनेला पोषक ठरते. असें असेल, तर मग बाणाईचें तुप्पद माळव्व हें नांव म्हाळसेला कसें चिकटलें ? तुप्पद माळव्व आणि कुरुबत्यव्व यांचीं स्थानें वेगवेगळीं कशीं बनलीं ?– हे प्रश्न आज तरी अनुत्तरितच राहतात. त्यांचीं उत्तरें कानडी प्रदेशांतूनच मिळूं शकतील.

३. **हेगडे प्रधान** : हेगडे प्रधान हा गंगाजमनी शब्द आहे. हेगडे या कानडी शब्दाचा अर्थ प्रधान. आपण तो शब्द मराठी अर्थासह वापरतों. "या शब्दाचें मूळ पेर्कडे या कानडी शब्दांत आहे. पेर् – मोठी, बळकट. आणि कडे – बाजू. म्हणून ( राजाच्या आधारामुळें ) बळकट ( आहे ) बाजू ( ज्याची ) तो पेर्कडे – प्रधान. या शब्दाचे जुन्या कानडी लेखांतच कालानुक्रमें पेर्कडे, वेर्कडे, हेर्कडे, पेर्गडे, वेर्गडे, हेर्गडे, वेग्गडे, हेग्गडे इतके पर्याय आढळतात. यांचेंच अर्वाचीन रूप हेगडे व त्याचें सोपें रूप हेगडि."[६५]

कर्नाटकांत यास हेग्गप्प, हेग्गडे, हेग्गडि, हेग्गण्णु अशींहि नांवें आहेत. हा बाणाईचा भाऊ आणि खंडोबाचा प्रधान असल्याची समजूत आहे. (राजश्यालक प्रधान बनल्याचीं कीचक आणि शकार हीं दोन संस्कृत साहित्यांतील उदाहरणें आहेत.)

जेजूरीस याची मिशाळ मूर्ति (बैठी) आहे. हें विष्णूचें रूप आहे, अशी समजूत असल्यामुळें देवरगुड्डु येथील मूर्ति चतुर्भुज असून तिच्या हातांत अनुक्रमें खड्ग, गदा, शंख व पुस्तक या वस्तु दाखविल्या आहेत. पाली येथें याची द्विभुज अश्वारूढ पितळी मूर्ति असून, डावीकडे त्याची वायको आहे. मैलार येथें त्याची बैठी मूर्ति चतुर्भुज असून ती दाढी-मिशांनीं युक्त आहे. त्याचे खालचे दोन हात भग्न झाल्यामुळें त्यांतील आयुधें कोणतीं तें समजत नाहीं. वरच्या दोन हातांत पाश व अंकुश आहेत.

मैलार-खंडोबाच्या परिवारांत 'हेगडे' चा समावेश कसा झाला, यावर श्री. पांडुरंग देसाई यांनीं नवा प्रकाश टाकला आहे. त्यांच्या नवप्रकाशित कानडी लेखांतील यासंबंधींचा पुरावा त्यांनीं माझ्याकडे मराठींत अनुवादून पाठविला आहे. ते लिहितात .

"ब्रह्मशिव नांवाचा जैन कन्नड कवि (काळ : बारावें शतक) जैनेतर देवतांची चेष्टा करतांना म्हणतो : 'काय विचित्र पहा ! मनेंवेग्गडे (पेर्गडे-हेगडे – एक अधिकारी) चट्टपानें कालच पुढें आणलेल्या मैल (म्ह. मैलार) आणि माळची (म्हाळसा) या देवता लोकप्रिय झाल्या. मग प्राचीन हरिहरांची काय कथा !' ही चेष्टा असली, तरी मला वाटतें, येथें ऐतिहासिक सत्याचा कण मुरत आहे.

वर चट्टप नांवाच्या हेगड्याचा उल्लेख आला आहे. कर्नाटकांत मल्लारीच्या देवळांत 'हेगडा प्रधाना'ची मूर्ति असते. हें समीकरण अर्थपूर्ण नाहीं काय ?"

श्री. देसाई यांच्या म्हणण्याचा अर्थ असा कीं, ब्रह्मशिवाच्या ग्रंथांत जो चट्टप वेग्गडे उल्लेखिला आहे, त्याचेंच स्मारक खंडोबाच्या परिवारांतील हेगड्याच्या रूपानें अस्तित्वांत आलें असावें. मैलार-माळचीच्या उपासनेचें वैभव वाढविणारा हा चट्टप हेगडे मैलाराचाहि हेगडे (प्रधान) बनला असल्यास नवल नाहीं.

४. **घोडा व कुत्रा** : कुत्रा हा खंडोबाचें भैरवरूप सुचविणारा आहे. भैरवमूर्तींत भैरवाच्या हातांतील मुंडांतून गळणारें रक्त पिणारा ऊर्ध्व-मुखी कुत्रा असतो. मार्तण्ड भैरवाच्या हातांत रक्तस्रावी मुंड नसतें. परंतु त्याच्याजवळ भैरवाची खूण असलेला कुत्रा राहिला आहे, हें स्वाभाविक आहे. घोडा हें मैलाराचें मूळ वाहन—मार्तण्ड भैरवाशीं एकरूप होण्यापूर्वींचें वाहन असावें, असें माझें मत आहे. 'मल्लारिमाहात्म्यां'त असें सांगितलें आहे कीं, "शिवानें मार्तण्ड भैरव अवतार घेतला, तेव्हां तो नंदीवरच बसून आला. पुढें मणिदैत्याचा वध केल्यावर त्यानें मणीच्या विनंतीवरून मणीच्या अश्वसहित रूपाची जोड मिळविली. त्यानंतर सप्तर्षींनीं व देवांनीं जी 'महीमयी मूर्ति' बनविली, ती अश्वयुक्त होती." तिलाच माहात्म्य-कार मैलार-मैराल नांव देतो. मल्लारिमाहात्म्यांतील या वर्णनावरून माझा असा तर्क आहे कीं, ज्या मण्मैलार-मूर्तीवरून 'मणिमल्लारि' हें नांव माहात्म्यकारानें बनविलें. ती मण्मैलार-मूर्ति अश्वयुक्त असावी. मैलाराचा समानधर्मा शास्ता याच्या मूर्तीजवळहि घोडा असतो.

—खंडोबाच्या परिवाराचें स्वरूप हें असें आहे. या परिवारांतील म्हाळसेला स्वतंत्र व्यक्तिमत्त्व नव्हे—विभूतिमत्त्व आहे. म्हणून तिचें स्वरूप पुढील स्वतंत्र प्रकरणांत स्पष्ट केलें आहे.

## संदर्भ-टीपा


१. मल्लारिमाहात्म्यम् १८.११-१२.

२. निर्णयसिंधु, पृ. २२८.

३. योगसंग्राम ९.६३.

४. ज्ञानेश्वरकृत योगवासिष्ठ १.१९३-१९४.

५. मराठी संशोधन पत्रिका, व. ६, अं. १, पृ. १०१.

६. नवभारत, जुलै १९५७ ('मल्लारि मार्तण्ड भैरव' : पांडुरंग देसाई ) आणि 'महाराष्ट्राचीं चार दैवतें' ग. ह. खरे.

७. श्री. पांडुरंग देसाई यांच्या पत्रांतील संदर्भ.

८. लीलाचरित्र-उत्तरार्ध, पृ. १८९.

९. पॉप्युलर कल्चर इन् कर्नाटक : मास्ती व्यंकटेश अयंगार, पृ. १८.
१०. श्री. पांडुरंग देसाई यांच्या पत्रांतील संदर्भ.
११. प्रा. द. रा. बेंद्रे यांनीं कळविलेला संदर्भ.
१२. 'युगवाणी', जुलै १९५७, पृ. ४.
१३. लीळाचरित्र-उत्तरार्ध, पृ. १८९.
१४. पंचदशी ६.२०६-२०८.
१५. योगसंग्राम १४.५८-५९, ११३-११४.
१६. हरिवरदा ५५.१८२.
१७. मुक्तेश्वरकृत संक्षेप-रामायण, युद्धकांड २२३.
१८. एकनाथ-गाथा, अ. २५९०, पृ. ४३३.
१९. रुक्मिणीस्वयंवर ११.६२.
२०. मुक्तेश्वर-कृत आदिपर्व १.६३.
२१. योगसंग्राम १२.८२.
२२. भावार्थरामायण-अयोध्याकांड ३.४-१४.
२३. भक्तिविजय २८.१५.
२४. मराठी वाङ्मयाचा इतिहास, खं. २ रा, पृ. ४४४-४४५.
२५. वेरूळचीं लेणीं, पृ. ९२-९३.
२६. हिंदु हॉलिडेज् अॅण्ड् सेरिमोनियल्स, पृ. २१-२२.
२७. मल्लारिमाहात्म्यम् १८.६.
२८. मऱ्हाटी संस्कृति, पृ. १३९-१४१.
२९. महाराष्ट्राचीं चार दैवतें, पृ. १६९.
३०. महाराष्ट्राचीं चार दैवतें, पृ. १४३-१४५.
३१. सौरपुराणम् ६६. ६३-७३.
३२. सह्याद्रिखंडांतर्गत मांगीशमाहात्म्याचा तिसरा अध्याय.
३३. महाराष्ट्राचीं चार दैवतें, पृ. १४९.
३४. दक्षिणच्या मध्ययुगीन इतिहासाचीं साधनें, खं. ४ था, पृ. २८,३ .
३५. महाराष्ट्रांतील कांहीं प्राचीन ताम्रपट व शिलालेख, पृ. ६४.
३६. कदंब-कुल : मोरेस, पृ. ११९.
३७. भा. इ. सं. मंडळ अहवाल : शके १८३२, पृ. ९२-९३.

३८. महाराष्ट्राचीं चार दैवतें, पृ. १४६.
३९. तमिळनाडु, पृ. ७३-७५.
४०. मऱ्हाटी संस्कृति, पृ. १३३-१३९.
४१. महाराष्ट्राचीं चार दैवतें, पृ. १४९.
४२. चित्पावन, पृ. १५५-१५६.
४३. रवळनाथ आणि कोंकणांतील देवस्की, पृ. २९.
४४. महाराष्ट्राचीं चार दैवतें, पृ. १६३-१६४.
४५. दक्षिणच्या मध्ययुगीन इतिहासाचीं साधनें, खं. १ ला, पृ. ७२.
४६. गुलामगिरी, पृ. ८४-८५.
४७. महाराष्ट्राचीं चार दैवतें, पृ. १६९.
४८. मल्लारिमाहात्म्यम् १८.९-१०.
४९. योगसंग्राम १४. ११५ व १६.३४.
५०. उद्धवगीता ७९६.
५१. नामदेव-गाथा, अ. ८८.
५२. नरेंद्र-कृत रुक्मिणी-स्वयंवर २५४.
५३. ऐतिहासिक संकीर्ण निबंध, खं. २ रा, पृ. ८-११.
५४. ज्योतिषरत्नमाला १६.७८.
५५. जैन साहित्य और साहित्यकार, पृ. २३०.
५६. महाराष्ट्राचीं चार दैवतें, पृ. १५०
५७. समर्थांचा गाथा, पदें ११६९-११७०.
५८. मध्वमुनीश्वरांची कविता, पृ. ९०-९१.
५९. ऐतिहासिक पुरुषांचे व स्त्रियांचे पोवाडे, पृ. ६.
६०. श्रीतत्त्वनिधि, पृ. ८८.
६१. श्रीतत्त्वनिधि, पृ. ३१४-३१५.
६२. मल्लारिमाहात्म्य ( मराठी ) २०. २५-२७.
६३. नवभारत, जुलै १९५७, पृ. ९.
६४. महाराष्ट्राचीं चार दैवतें, पृ. १५३.
६५. महाराष्ट्राचीं चार दैवतें, पृ. १५३.

# माळव्य : म्हाळसा

*मल्लारि-म्हाळसा-विवाहकथा*

म्हाळसा ही मल्लारि मार्तण्ड भैरवाची पत्नी. म्हाळसेच्या सान्निध्यामुळें त्याला 'म्हाळसाकान्त' या नांवानेंहि संबोधिलें जातें. जनश्रद्धेनुसार म्हाळसा हा मोहिनीचा अवतार समजला जातो. अमृतमंथनाच्या वेळीं विष्णूनें मोहिनी अवतार धारण करून दैत्यांना मोहविलें. त्या वेळचें मोहिनीचें उन्मत्त लावण्य पाहून शिव तिच्यावर भाळला आणि तिच्यामागें धांवूं लागला, ही कथा श्रीमद्भागवताच्या अष्टम स्कंधांत आलेली आहे. जनश्रद्धेनें या कथेचा धागा पुढें चालू ठेवला. शिवाची अतृप्त इच्छा पुरी करण्यासाठीं मोहिनीनें शिवास असें आश्वासन दिलें कीं, "तूं पुढें जेव्हां मार्तण्ड भैरवरूपानें अवतार घेशील, तेव्हां मी म्हाळसा या नांवानें अवतरून तुझी इच्छा पूर्ण करीन."

या जनश्रुतीचा आणखीहि एक पर्याय आहे. त्या पर्यायानुसार म्हाळसा ही साक्षात् मोहिनी नसून, मोहिनीच्या ध्यासामुळें शिवाला पार्वतीच मोहिनी-स्वरूप भासूं लागली, तिचा हा अवतार आहे.

शिवाच्या मार्तण्ड भैरवावतारीं म्हाळसा अवतरली ती नेवासें येथें तिम्माशेट वाण्याच्या घरीं. हा वाणी शिवपूजा करीत असतांना म्हाळसा त्याच्या ध्यानांत आली आणि तिनें त्यास नेत्र झांकून घेण्यास सांगितलें. वाण्यानें तसें केलें. कांहीं वेळानें डोळे उघडून पाहतो तों देवी नाहीं—परंतु एक नवजात तेजस्वी बाळ जमिनीवर पडलेलें दिसलें. हें बाळ म्हणजेच म्हाळसा. तिम्माशेटनें त्या बाळाचा सांभाळ केला. आणि मार्तण्ड भैरवाच्या स्वप्नादेशानुसार पाली येथें मार्तण्ड भैरव आणि म्हाळसा यांचा विवाह साजरा केला. पौष शुद्ध १५ हा दिवस मार्तण्ड भैरव आणि म्हाळसा यांचा विवाह-दिन म्हणून पाली येथें प्रतिवर्षीं उत्साहानें साजरा होतो.

*म्हाळसेची प्राचीनता*

जनश्रद्धेनें म्हाळसेचा मोहिनीशीं जो संबंध कल्पिला आहे, तो अनेक दृष्टींनीं विचार करण्यासारखा आहे. श्रीमद्भागवतांत वर्णिलेल्या शिव-

मोहिनीच्या विफलरतीची कथा दक्षिण भारतांतील ग्रामदेवतांच्या उन्नयनांत अनेकदां अनेक प्रकारें वापरली गेली आहे. परंतु त्याची चर्चा करण्यापूर्वी आपण म्हाळसेची प्राचीनता कोठपर्यंत जाते, याचा अगोदर विचार करूं.

श्री. पांडुरंग देसाई यांनीं म्हाळसेचा उल्लेख असणारे दोन कानडी लेख उजेडांत आणले आहेत.[१] हे दोन्ही लेख देवीहोसूर (हावेरी-धारवाड) येथील बनशंकरीच्या मंदिरांत आहेत. पहिल्या शिलालेखाचा काळ इ. स. ११४८ ( पौष व. ३०, रविवार श. १०७० ) असा आहे. या लेखाचा विषय असा आहे : महासामन्ताधिपति, सेनाधिपति, इत्यादि बिरुदांनीं युक्त असा रेचरस हा बनवासी प्रान्ताचा अधिकारी होता. हा माळचिदेवीचा परमभक्त असल्यामुळें त्या देवीचें स्थान म्हणून प्रसिद्ध असलेल्या देखद होसवूर ( देवीहोसूर ) या गांवीं नवस फेडण्यासाठीं आला. तेथें त्यानें तेथील हजार महाजन आणि स्थानिक अधिकारी यांच्या समक्ष देवीला नैवेद्य आणि नंदादीप चालावा म्हणून दान दिलें. दुसऱ्या शिलालेखाचा काळ १३ फेब्रुवारी इ. स. १०६३ ( फाल्गुन शु. १३, गुरुवार, श. ९८४ ) असा आहे. त्यांत इंदपय्य नांवाच्या अधिकाऱ्यानें माळजदेवीच्या मंदिराला मकरतोरण बांधवून दिलें, असें वर्णिलें आहे.

वरील शिलालेखांत उल्लेखिलेली माळजदेवी किंवा माळचिदेवी म्हणजेच कर्नाटकांत माळव्व या नांवानें आज ओळखली जाणारी मराठींतील म्हाळसा होय. वरील शिलालेखांत तिची स्तुति गातांना तिला काळी, काळराक्षसी, रौद्रा, भैरवी, उग्रा, महाकाळी, काळयोगिनी, या शक्तिवाचक विशेषणांनीं गौरविलें आहे. ती योगपीठासह उदय पावली असून सर्व देवांच्या स्तुतीस पात्र झाली आहे, अशीहि तिची प्रशंसा केली आहे. श्री. पांडुरंग देसाई यांचें असें मत आहे कीं, ज्या बनशंकरीच्या मंदिरांत हे दोन लेख आहेत, ती बनशंकरी माळचिदेवीचेंच परिवर्तित व नामान्तरित रूप असावें.

वरील दोन लेखांचें परीक्षण केल्यावर असें आढळून येतें कीं, इसवी सनाच्या अकराव्या शतकांत माळचिदेवी शक्तीची प्रतिष्ठा पावूं लागली असून, तिच्या उपासनेचें प्रस्थ वाढविण्यांत उच्च श्रेणीचे राज्याधिकारीहि भाग घेत होते. मध्ययुगांत इसवी सनाच्या आठव्या-नवव्या शतकापासून किंबहुना त्याच्याहि अगोदर एक-दोन शतकें, दक्षिणेंत श्रीशैलमल्लिकार्जुन

येथें तांत्रिकांचें प्रचंड प्रस्थ माजलें होतें. बौद्ध आणि शाक्त तांत्रिकांचे मेळावे तेथें जमले होते. या केंद्रांतून साऱ्या दक्षिण भारतांत शाक्तांनीं आपले पाय पसरले होते. या काळांतील शाक्तांच्या प्रभावाखालीं अनेक ग्रामदेवतांचें उन्नयन घडलें आणि त्यांना शक्तीची प्रतिष्ठा प्राप्त झाली. शाकंभरी, यल्लम्म, ज्येष्ठा, चंदला, काळम्म, उच्चंगीअम्म इत्यादि ग्रामदेवतांप्रमाणेंच माळचिदेवीहि शक्तिस्वरूप पावूं लागल्याचें चित्र देवीहोसूरच्या लेखांत दिसून येतें. देवीभागवतांत ग्रामदेवतांच्या 'उन्नत' शक्तिस्वरूपांचीं प्रतिबिंबें सर्वत्र आढळतात. देवीच्या स्थानांची नामावळी देतांना, "महालसा परं स्थानं योगेश्वर्यास्तथैव च।" असा म्हाळसेच्या स्थानाचाहि उल्लेख देवीभागवतकारानें केला आहे.[२] याचा अर्थ असा कीं, अकराव्या शतकांतील शिलालेख आणि देवीभागवत यांनुसार माळचिदेवी (म्हाळसा) ही क्षुद्र ग्रामदेवतेच्या स्वरूपाचा त्याग करून शक्तिस्वरूप पावली होती–प्रारंभीं तिचा मोहिनीशीं संबंध जोडला गेला नसावा.

*क्षुद्रतेची उत्तरकालीन जाणीव*

एकीकडे माळचिदेवीचें उन्नयन घडत असतांना धर्मक्षेत्रांतील कांहीं प्रवाह तिच्या क्षुद्रतेची जाणीव व्यक्त करीत होते. प्राचीन वीरशैव संतकवींनीं मैलारावरोबर माळचीचाहि निषेध केला आहे. मराठी संतकवींनीं एकीकडे खंडोबा आणि म्हाळसा यांचीं भक्तिगीतें गाऊनहि त्यांच्या मूळ नाम-रूपांचा नेणतेपणानें निषेध केला आहे. ('नेणतेपणानें' हा शब्द मीं या हेतूनें वापरला आहे कीं, आपण ज्या देवतांना एकीकडे मान देतों, त्यांचींच हीं मूळ रूपें आहेत, याचें त्यांना भान नसावें.)

वासनादेवी सकळी। वाळा बगळा मुकी **मैराळी**।
मारको मेसको **मैराळी**। उच्छिष्टचांडाळी भानाची ।।[३]

असा एकनाथांनीं मैलारपत्नीचा (मैराळीचा) उल्लेख असंस्कृत ग्रामदेवतांच्या श्रेणींत केला आहे. नाथांच्या परंपरेंतील कृष्णदयार्णवाहि–

**मैळी** मुकी मायराणी। आपुलालिया परिवारगणीं।
उठावल्या समरांगणीं। नग्न यक्षिणी धांवती ।।[४]

अशा पद्धतीनें 'मैळी' ची गणना क्षुद्र देवतांच्या समूहांत करतात. एक-

नाथांनीं आणखीहि एके ठिकाणीं या देवतेचा 'मैळी' या नांवानें उल्लेख केला आहे :

> तामसी मंत्र मुकी **मैळी**। अथवा उच्छिष्टचांडाळी।
> कां प्रेतदेवता कंकाळी। मंत्रशैली हे तेथें ॥[५]

नामदेवगाथ्यांत विष्णुदास नाम्याच्या एका अभंगांत 'वाळा वगळा मुकी **मैळी**'[६] असा 'मैळी'चा नामनिर्देश आहे. एखाद्या देवतेचें उन्नयन पूर्णतेला जाऊन कांहीं काळ लोटल्यावर तिचें मूळचें क्षुद्र स्वरूप आणि उन्नत स्वरूप यांची संपूर्ण फारकत होते आणि त्याच क्षुद्र स्वरूपाचें हें उन्नत स्वरूप आहे, याचें संपूर्ण विस्मरण पडतें, यासंबंधींची चर्चा मैलाराच्या उन्नयनाच्या संदर्भांत येऊन गेलीच आहे.

*म्हाळसा : नामरहस्य*

महाराष्ट्रांत म्हाळसा आणि कर्नाटकांत माळव्व या नांवांनीं लोकप्रिय असलेली ही देवता माळजदेवी, म्हालजा, मालचिदेवी, मालची, मालाची, मालती, माळवी, म्हालसा, म्हालसिका, महालसा, महालया, महालाय इत्यादि नांवांनीं उल्लेखिली गेली आहे. श्री. ग. ह. खरे म्हाळसेच्या नांवाची चर्चा करतांना असें मत मांडतात कीं, "खंडोबाप्रमाणें याच्या बायकोचें नांवहि मूलतः प्राकृत नसून संस्कृत आहे. कारण तें प्राकृत समजलें तर त्याचाहि अर्थ नीट लागत नाहीं."[७] श्री. खरे यांनीं या मतानुसार म्हाळसेची व्युत्पत्ति "मदालसा–मआलसा–महालसा–म्हालसा–म्हाळसा" अशी दिली आहे.

मैलार-म्हाळसा या दोन्ही प्राकृत देवता–दहाव्या शतकाच्या मागें त्यांची प्राचीनता जाऊं शकत नाहीं – अकराव्या शतकांत त्यांच्या उन्नयनाची प्रक्रिया सुरू झाली. ही जर वस्तुस्थिति आहे, तर त्यांचीं मूळ नांवें संस्कृत असून, त्या नांवांचें नंतर प्राकृतीकरण झालें, असें कसें मानतां येईल? जर 'मदालसा' पासून 'म्हाळसा' हें नांव बनलें आहे, असें गृहीत धरलें, तर संस्कृतांत रचलेल्या स्तोत्र-माहात्म्यादि उपासनाग्रंथांत 'मदालसा' या नांवाचा सर्रास वापर आढळावयास हवा होता. परंतु तसा तो आढळत नाहीं. उलट 'म्हाळसा' या नांवाचीं 'म्हालसा', 'म्हालसिका', 'महालसा' अशीं सुलभसंस्कृतीकृत रूपेंच वापरलेलीं आढळतात.

ज्ञानेश्वरीच्या अखेरीस ज्ञानेश्वरांनीं आपल्या ग्रंथाच्या रचना-स्थलाचा महिमा गातांना म्हटलें आहे कीं :

त्रिभुवनैकपवित्र । अनादि पंचक्रोश क्षेत्र ।
जेथ जगाचें जीवनसूत्र । **श्रीमहालसा** असे ।।[८]

या ओवींतील 'श्रीमहालसा' हा पाठ राजवाडे आणि माडगांवकर प्रतींत आहे, तर अन्य प्रतींत 'श्रीमहालया' असा पाठ आहे. श्री. खरे यांच्या मतें कोणा तरी अक्षरशत्रु प्रतलेखकानें 'सा'चा 'या' बनविला असावा, आणि त्या प्रतीच्या परंपरेंत 'श्रीमहालया' हा पाठ रूढ झाला असावा.[९]

परंतु हें म्हणणें तितकेंसें बरोबर नसावें, असें वाटतें. मला वाटतें, महालसा आणि महालया हीं दोन्ही संस्कृतीकरणें बरोबर आहेत. महानुभावीय वाङमयांत 'माल्हाइसा' असें व्यक्तिनाम आढळतें. यादवकालीन महानुभावीय वाङमयांत 'आई' या पदाप्रमाणेंच 'आइसा' हें पदहि स्त्रियांच्या नांवापुढें योजलेलें आढळतें. 'माल्ह' (माल-माळ) एवढाच मूळ नामांश. 'माल्हण' असें पुरुषाचें नांव आढळतें. 'स्थानपोथी'त 'माल्हणदेवी' नामक देवतेचा उल्लेख आहे. 'माल्ह' याला 'आई' वा 'आइसा' हीं पदें जोडून 'माल्हाई' आणि 'माल्हाइसा' अशीं नांवें सिद्ध होतील. 'माल्हाई' पासून माल्हाई–म्हालाई–म्हालाय–महालाय–**महालया** आणि त्याच पद्धतीनें 'माल्हाइसा' पासून **महालसा** सिद्ध होऊं शकेल. 'महिकावतीच्या बखरीं'त 'महालाय' नामक एका कुलदेवतेचें नांव आलें आहे–ती म्हाळसाच होय. महिकावतीच्या बखरींतील महाराष्ट्र-धर्मनिरूपणाचा प्रसंग घडला तोहि 'म्हालजापूर' या स्थानींच.[१०] गोपाळकवीनें आपल्या 'महाभारतां'त आणि यदुमाणिकार्ने आपल्या 'गणेशगीते'वरील 'संजीविनी' टीकेंत म्हाळसेला वंदन करतांना 'महालया' असें नांव वापरलें आहे.

म्हाळसा ही मैलाराची पत्नी, म्हणून मैलार-मैराळ याचीं स्त्रीलिंगी रूपें मैळी-मैराळी म्हाळसेच्या नाम-संभारांत समाविष्ट झालीं. तिचीं मूळचीं 'माळ-ज,' 'माळ-चि,' 'माळ-अव्व', 'माल्ह-आइसा' हीं नांवें तपासलीं, तर त्यांत सर्वत्र 'माल-माळ-माल्ह' हा अंश समान दिसतो. माल-माळ म्हणजे डोंगर किंवा उंच प्रदेश. 'मैलार' या नांवाचें रहस्य जर 'मले' वा

मलै' या पर्वतवाचक द्राविड शब्दाशीं संबद्ध असेल, तर 'माल-माळ' ( = डोंगर ) या शब्दापासून म्हाळसेचें नांव बनणें सुसंगतच ठरेल.

मालची, मालाची, मालती हीं 'माळचि' या नांवाचीं संस्कृतीकरणें आहेत. पैकीं 'मालाची' हें नांव 'घृताची' या नांवाच्या अनुकरणासारखें वाटतें. 'माळचि' या नांवापासूनच माळची-माळसी-म्हाळसी-म्हाळसा या प्रक्रियेनेंहि म्हाळसा हें नांव बनलें असणें शक्य आहे. शब्दपरिवर्तनांत च-स-अभेद अनेकदां आढळतो. तसेंच 'म्हाळसी' असें या देवीचें नांव 'लीळाचरित्रां'त आलेलें आहेच.[११]

एखाद्या देवतेचें उदात्तीकरण पूर्णतया घडून आलें म्हणजे—किंवा तें घडविण्यासाठीं, हेतुपूर्वक वा श्रद्धेच्या उदरांतून उफाळणाऱ्या बुद्धिप्रकर्षा-मुळें त्या देवतेच्या नांवाचीं आध्यात्मिक वा उदात्तचरित्रदर्शक स्पष्टी-करणें दिलीं जातात. म्हाळसेच्या बाबतींतहि अशीं स्पष्टीकरणें आढळतात. 'महालसा' या नांवांतील 'म' म्हणजे ममत्व ( माया ), 'हा' म्हणजे 'हर्ष' आणि 'लस' म्हणजे 'लसत्व' (तेज)— असें स्पष्टीकरण 'जयाद्रि-माहात्म्यां'त दिलें आहे. विख्यात महाराष्ट्रीय तंत्रभाष्यकार भास्करराय आपल्या 'ललितासहस्रनामभाष्यां'त—

महालनामकं दैत्यं स्यति क्षपयतीति च ।
महालसा महालक्ष्मीरिति च ख्यातिमागता ।।
उपत्यकायां सह्याद्रेः पश्चिमोदधिरोधसि ।. . . .[१२]

हा 'मैरालतन्त्रां'तील उतारा देतात. 'मैरालतन्त्र' हा ग्रंथ आज उपलब्ध असल्याचें आढळत नाहीं. त्यामुळें त्या ग्रंथांत या स्पष्टीकरणाच्या अनु-षंगानें अधिक काय लिहिलें आहे, तें कळणें अशक्य आहे. वरील स्पष्टी-करणांत ज्या 'महाल' नामक दैत्याचा संबंध दाखविला आहे, तो मैलार-म्हाळसेशीं संबंध असणाऱ्या कोणत्याहि प्रचलित कथेंत आढळत नाहीं. परंतु खंडोबाच्या उत्सवयात्रांत ज्या 'काठ्या' मिरवल्या जातात, त्यांना 'महाल' म्हणतात. त्या 'महाल' दैत्याचा आणि या 'महालां'चा ( विजय-पताकांचा ) कांहीं संबंध असेल काय ?

श्री. राजारामशास्त्री भागवत यांनीं 'मराठ्यांच्या संबंधानें चार उद्गार' या ग्रंथांत मामेबहिणीशीं लग्न करण्याच्या प्रथेच्या संदर्भांत

लिहितांना ‘ म्हाळसे ’चें एक वेगळेंच स्पष्टीकरण दिलें आहे. ते लिहितात : “ ‘ ह्माळ ’ शब्द संस्कृत ‘ महालय ’ शब्दाचा अपभ्रंश समजतात. पण ‘ महालय ’ शब्द अस्सल धर्मभाषेंत आढळत नाहीं. तेव्हां ‘ ह्माळ ’ शब्दासच ‘ महालय ’ अहें संस्कृत रूप ब्राह्मणांनीं महाराष्ट्र देशांत आल्यानंतर दिलें, हें म्हणणें अधिक सयुक्तिक होय. ‘ ह्माळसा ’ म्हणून एक देवी महाराष्ट्रांत प्रसिद्ध होती व तीस ‘ महालया ’ असें ज्ञानेश्वरांनीं आपल्या ज्ञानेश्वरींत म्हटलें आहे. या ‘ महालया ’ किंवा ‘ ह्माळया ’ देवीचा ‘ ह्माळ ’ या शब्दाबरोबर संबंध नसेल ना ? ‘ ह्माळ ’ कांहीं पितृपितामहप्रपितामहांच्याच नांवानें होत नाहीं, तर सर्व पितरांच्या नांवानें होतो. अशा प्रकारची पितृपूजा रूमी लोकांमध्यें देखील होती. जर ‘ महालया ’ देवीचा ‘ ह्माळा ’ बरोबर संबंध असला, तर त्या देवीपुढें पितरांच्या नांवानें मद्यमांस ठेवणें हा ‘ ह्माळ ’ शब्दाचा मूळचा अर्थ असावा. ”[१३]

म्हाळसेला ‘ जोगेश्वरी ’, ‘ भैरवी ’ अशींहि नांवें आहेत. म्हाळसा ही मार्तण्ड भैरवाची पत्नी. ‘ भैरवी ’ हें भैरव-पत्नीवाचक स्त्रीलिंगी रूप. जोगेश्वरी ( योगेश्वरी ) महाराष्ट्रांत भैरवाबरोबर सर्वत्र आहे.

*म्हाळसेचीं मंदिरें*

म्हाळसा खंडोबाची पत्नी म्हणून आज नांदत असली, तरी मूळची ती स्वतंत्र देवता होती आणि तिनें खंडोबाशीं नातें जोडल्यानंतरहि आपल्या स्वतंत्र ‘ निवास ’-स्थानाचा त्याग केला नाहीं. आजहि ती एक स्वतंत्र देवता म्हणून अनेक ठिकाणीं गाजत आहे. देवीहोसूर येथील अकराव्या शतकांत प्रसिद्ध असलेलें माळजदेवीचें मंदिर आज बनशंकरीचें मंदिर म्हणून ओळखलें जात असल्याचा उल्लेख आपण मागें पाहिलाच आहे. ‘ स्थानपोथीं ’त भोगावती ( पैठण ), वालसेंग ( जि. औरंगाबाद –‘ वाल सावंगी ’ ), नांदुरा ( ‘ अगर नांदरा ’- जि. बीड ) आणि नेवासें ( जि. नगर ) या चार स्थानीं म्हाळसेचीं मंदिरें असल्याचे उल्लेख आहेत. बीडजवळ म्हाळसापूर-जवळें व टोक्याजवळ म्हाळापूर नामक म्हाळसेचें उपेक्षित स्थान आजहि आहे. बीदर विभागांत खंडोबाच्या मैलारपुरापासून दोन मैलांवर एक म्हाळसापूर आहे. ‘ महिकावतीच्या बखरीं ’ तील म्हालजापूरची देवी ही म्हाळसाच. म्हालजापुरींच केशवाचार्यानें म्हाळसेच्या साक्षीनें महाराष्ट्र-धर्म-

रक्षणाची स्फूर्तिदायक योजना मांडली. या बखरींत या देवीला 'योगेश्वरी' म्हटलें असून "श्रीदेवी जगदंबिका महाराष्ट्रधर्मरक्षिका" असा तिचा गौरव केला आहे.[१४]

सध्यां विशेष प्रसिद्ध असलेलीं म्हाळसेचीं स्थानें म्हणजे नेवासें (जि. नगर) आणि म्हाडदोळ (गोमंतक) हीं दोन होत. पैकीं नेवासें हें प्राचीन असून म्हाडदोळचें स्थान सतराव्या शतकारंभीं निर्माण झालें आहे. गोमंतकांतील म्हाळसेचें स्थान पूर्वी वर्णें या गांवीं होतें. परंतु सोळाव्या शतकांत पोर्तुगीजांनीं हिंदु मंदिरांचा विध्वंस सुरू केला. त्यांत वर्णें येथील म्हाळसा-मंदिराचा क्रम पहिला लागला. वर्णें येथील म्हाळसा पुढें म्हाडदोळला स्थलान्तरित झाली.

नेवासें आणि म्हाडदोळ येथील म्हाळसेचीं स्थानें आणि येथील उपासना-पद्धति यांचा विशेष परिचय परिशिष्ट-प्रकरणांत करून दिला आहे.

*म्हाळसा : मोहिनी*

नेवासें आणि म्हाडदोळ तेथील म्हाळसा मोहिनीशीं ऐकात्म्य पावली आहे. म्हाळसा हें मोहिनीचेंच पर्यायनाम म्हणून वापरलें जातें. म्हाळसेच्या प्रचलित अवतार-कथेंतहि ती मूलत: मोहिनी असल्याचें सांगितलें आहे. मैलार-म्हाळसेच्या कथेंत मोहिनी कशी प्रविष्ट झाली असावी, याविषयींची चर्चा खंडोबा-स्कंद-संबंधाचा विचार करतांना येऊन गेलीच आहे.

प्राचीन कानडी शिलालेख आणि देवीभागवत यांतील उल्लेखांच्या आधारें आपण पाहिलेंच आहे कीं, म्हाळसा ही प्रारंभीं शक्तीशीं ऐकात्म्य पावूं लागली होती– मोहिनीशीं नव्हे. यादवकालीन मराठी वाङ्मयांत नेवाशाच्या देवतेचा उल्लेख 'म्हाळसा' याच नांवानें केलेला आढळतो; तेथें मोहिनीचा संबंध कुठेंहि लावलेला नाहीं. ज्ञानेश्वर 'जगाचें जीवन-सूत्र' या शब्दांनीं 'श्रीमहालसे'चें वर्णन करतात, तेव्हां त्यांच्या मनांत महालसेचें मोहिनीरूप अभिप्रेत असावें, असें वाटतें. 'जगाचें जीवनसूत्र' या शब्दांत विश्वपोषक विष्णूचा – म्हणजेच पर्यायानें मोहिनीचा निर्देश आहे, असें मानावयास हरकत नाहीं. ज्ञानेश्वरीशिवाय अन्यत्र तत्कालीन वाङ्मयांत म्हाळसा-मोहिनी-ऐकात्म्याचा स्पष्ट निर्देश नाहीं. ब्रह्मपुराणान्त-र्गत समजल्या जाणाऱ्या 'गौतमी-माहात्म्यां'त नेवासें हें मोहिनी-शिवाचें

वसतिस्थान असल्याचें वर्णन आहे. परंतु ' गौतमी-माहात्म्य ' हा ब्रह्मपुराणांत मागाहून घुसडलेला भाग असावा, असें वाटतें; कारण पुरुषोत्तम-क्षेत्राचें वर्णन चालू असतां मध्येंच ' गौतमी-माहात्म्य ' सुरू होतें. वेंकटेश्वर प्रेसच्या प्रतींत ब्रह्मपुराणाचें परिशिष्ट या स्वरूपांत हें ' माहात्म्य ' वेगळें छापलें आहे.

एकनाथांच्या पूर्वीपासूनच मराठी वाङमयांत म्हाळसा-मोहिनी-ऐकात्म्याचीं वर्णनें आढळतात. बहिरा जातवेद आपल्या दशमटीकेच्या प्रारंभीं कुलदेवता-वंदनाच्या निमित्तानें लिहितो :

ऐसी संतकृपा जालि । तवं कुळदेवता स्मरलि ।
जे मुळ कुळें विस्तारलि । येथवरि ।।
जे उजवेनि अंगें भातारु । डावेनि अंगें जगविस्तारु ।
ब्रह्मादिकां नारि किं नरु । निर्धारवेना ।।
विरंचि म्हणे माझि माये । कवण पां जवं पाहों जायें ।
तवं दोहि तोचि आहे । जनकु जननी ।।
तरि प्रियुचि प्राणेस्वरि । येणें लाघवें घराचारिं ।
सांतवितसें नारि । बाळें जगाऐसिं ।।
ते समस्ता कुळा कुळदेवता । देवां दानवां नेमितां ।
जिच्यिये येकछ्वर सत्ता । तिहिं लोकिं ।।
त्या योग्य अयोग्य जाणितलें । देव दैत्य समजाविले ।
ज्या अमृत विभागिलें । **म्हाळसादेवि** ।।
वाचाकमळनिचा कमळि । येहि पांचै पुष्पांजुळि ।
ते कुळदेवता सांवळि । नमस्कारिलि ।।[१५]

बहिरा जातवेदानें घडविलेलें हें म्हाळसादर्शन हृदयंगम आहे. येथें कवि नेवाशाच्या म्हाळसेचें वर्णन मोहिनीच्या रूपानें करीत आहे. नांव मात्र ' म्हाळसा ' हेंच वापरलें आहे. या वंदनांत अमृतानुभवांतील शिव-शक्तिसमावेशनाचें स्पष्ट प्रतिबिंब आहे, हें जाणत्यांना मुद्दाम सांगण्याची आवश्यकता नाहीं. " जे उजवेनि अंगें भातारु । डावेनि अंगें जगविस्तारु ।" किंवा "तरि प्रियुचि प्राणेश्वरि । येणें लाघवें घराचारिं । सांतवितसे नारि । बाळें जगाऐसि ।। " यांमध्यें तर ज्ञानेश्वरांचें वाग्धनहि जसेंच्या तसें

स्वीकारलें आहे. नेवाशाची म्हाळसा-मोहिनी हें परमात्म्याचें अर्धनारी-नटेश्वर रूप आहे, ही बहिरा जातवेदाची कल्पना अमृतानुभवाच्या शब्दांत प्रकटलेली पाहतांना माझ्या मनांत असा विचार डोकावतो कीं, ज्ञानेश्वरांनीं अमृतानुभवाच्या प्रारंभीं शिवशक्तिसमावेशनाचें जें प्रातिभ दर्शन घडवलें आहे, त्याची स्फूर्ति कदाचित् नेवाशाच्या म्हाळसा-मोहिनीच्या स्वरूपांतहि असेल — तसें असेल तर भारतीय दर्शन-परंपरेला म्हाळसेनें दिलेली ती एक पृथ्वीमोलाची कृपावस्तु ठरेल !

बहिरा जातवेद ज्ञानेश्वरांनंतर शंभर-सवाशें वर्षांनीं होऊन गेला असावा. त्याच्यानंतर एकनाथांनीं आपल्या तिन्ही प्रमुख ग्रंथांत म्हाळसा-मोहिनीचा उल्लेख केला आहे. एकादश-टीकेंत मोहिनीअवताराचा निर्देश असलेल्या एका श्लोकावर ( ११.४.२० ) टीका करतांना नाथ लिहितात :

समुद्रमंथनाच्या शेवटीं । क्षीरसागराचे तटीं ।
सुरां असुरां कळी मोठी । अमृतासाठीं मांडली ।।
तेव्हां अमृत विटे जें देखोनि । तो अवतार घेतला मोहिनी ।
तेणें असुरां सुरापानी । अमृतदानी देवांसी ।।
तेथें चोरूनि घेतां अमृतग्रासा । निवटिला राहूचा घसा ।
त्याच्या कबंधावरी **म्हाळसा** । वास **नेवासा** स्वयें केला ।।[१६]

मूळ श्लोकांत कांहींहि आधार नसतांना येथें नाथांनीं मोहिनी म्हणजे नेवाशाची म्हाळसा असें गृहीत धरून टीका केली आहे. रुक्मिणी-स्वयंवरांत कृष्णविरोधकांच्या तोंडीं कृष्णाची निंदा घालतांना नाथांनीं पुन: लिहिलें आहे :

कृष्णाची आणीक काहाणी । तो स्त्री जाहला मोहिनी ।
सुरां असुरांतें ठकवूनी । महादेव मोहिला ।
शेखीं जाहला तो **म्हाळसा** । वास केला त्या **निवासा** ।
त्याचेचि धर्में राहू कैसा । रविचंद्राशीं लागला ।।[१७]

भावार्थरामायणांतील उल्लेखांत ( ५०.५९.३३ ) 'म्हाळसा' असा नामनिर्देश नसला तरी "मोहिनी बैसूनि उरावरी । वास करी **नेवासीं** ।।"[१८] असा नेवाशाचा उल्लेख आहेच.

गोपाळकवि आपल्या महाभारतांत म्हाळसेला वंदन करतांना लिहितो :

पुण्योदकें या मेदिनी । प्रवरा नामें वरतटिनी ।
मोहिनीरूपें चक्रपाणि । साक्षात् असे तटाकीं ।।
महालया नामें सत्क्षेत्र । भूमंडळीं परमपवित्र ।
सर्व पुराणांतरीं चरित्र । वर्णिलें असें द्वैपायनें ।
मोहिनीचरणपद्मभ्रमर । असे तेथें कविकिंकर ।
सेवूनिया प्रवरातीर । देवीलागीं ध्यातसे ।।[१९]

गोपाळकवि नेवाशाचाच. त्यानें 'महालयामाहात्म्य' आणि 'मल्हारिमाहात्म्य' नामक दोन ग्रंथ रचले असल्याची नोंद आढळते.

यदुमाणिकानें आपल्या 'संजीविनी' (श. १६४७) या गणेशगीतेवरील टीकेच्या प्रत्येक अध्यायारंभीं "श्रीमहागणपति-**महालया**-माणिकेश्वर–चरणारविंदेभ्यो नमः ।" असें वंदन केलें आहे. प्रस्तुत टीकेच्या प्रथमाध्यायांत कुलदेवतेला वंदन करतांना यदुमाणिक लिहितो :

देखोनि त्वत्कृपाकटाक्षासी । हर्ष जाला कुळदेवतेसी ।
ते मोहिनीनें आश्वासनासी । दिल्हें त्वद्गुणासी बोलावया ।।[२०]

—हा यदुमाणिकहि नेवाशाचाच रहिवासी.

म्हाळसा-मोहिनी-ऐकात्म्याच्या संदर्भांत मी ज्ञानेश्वरींतील एका शब्दाची चर्चा जाणत्यांच्या परीक्षणासाठीं मांडीत आहें. मागें मीं म्हाळसेच्या माळज, माळचि, माळव्व, माल्हाइसा इत्यादि नामपर्यायांतील 'माल-माळ-माल्ह' या नामांशाविषयीं लिहिलें आहेच. या अंशाचा 'डोंगर' वा 'उंच प्रदेश' असा अर्थ तेथें दिला आहे. या नामांशाचा विचार करीत असतांना मला ज्ञानेश्वरींतील 'मालातणें-मालाथणें-माल्हातणें-माल्हाथणें' हें क्रियापद जाणवलें. "तैसा तूतें मी जेथ स्मरें। तेथ मालातिलें जें विसरें।" (१८.१७); "आलस्याचें दाढर्च माल्हांत।" (१४. १७८); "माजिरेनि मोहें माल्हाथिलें।" (१४.२५१), इत्यादि ठिकाणीं उपयोजिला गेलेला हा शब्द "अंगीकार करणें, आश्रय घेणें" या अर्थाचा आहे. या शब्दाची फोड माल-माल्ह + आतणें-आथणें अशी करतां येईल. आतणें-आथणें हा अंश 'स्नेहाथिला', मोहाथिला', इत्यादि शब्दांत ज्या अर्थानें आला आहे, त्याच अर्थानें आपल्यापुढें असलेल्या शब्दांत आला आहे, असें मला वाटतें. उरलेला 'माल-माल्ह' हा अंश आपल्या म्हाळसेच्या

उपरिनिर्दिष्ट अंशाशीं एकरूप आहे. प्रस्तुत शब्दाच्या ज्ञानेश्वरींतील उपयोजनाचें बारकाईनें निरीक्षण केल्यास असें वाटतें कीं, त्याचा कोशगत अर्थ " अंगीकार करणें, आश्रय घेणें " असा असला तरी " आकर्षित करणें, उत्कटपणें स्वीकारणें, मोहविणें " यासारखी त्याची अर्थगर्भता असावी. तसें असेल तर ' माल-माल्ह ' या अंशाचा अर्थ ' आकर्षण ' ( मोहिनी ? ) असा होणें शक्य आहे. आणि मग अर्थदृष्टचा म्हाळसा-मोहिनी-ऐकात्म्याला सवड मिळेल. ( अर्थात् ' माल्हाथणें ' या शब्दाचा वरीलप्रमाणें अर्थ मानून असेंहि म्हणतां येईल कीं, म्हाळसा-मोहिनी-ऐकात्म्य घडून आल्यानंतरहि म्हाळसा या नांवावरून ' माल्हाथणें ' हा ' आकर्षित करणें ' या अर्थाचा शब्द प्रचारांत येणें शक्य आहे.)—हा माझ्या कल्पनेचा खेळ आहे. जाणत्यांना त्यांत कांहीं सत्त्वांश आढळला, तर त्यांतून कदाचित् म्हाळसेच्या स्वरूपावर प्रकाश पाडण्याची एक दिशा निश्चित होऊं शकेल.

*म्हाळसा : खण्डेश्वरी*

बीड या गांवाचा म्हाळसेशीं संबंध असल्याचें आपण पाहिलें आहेच. बीडच्या परिसरांत मैलार आणि म्हाळसा यांचीं स्थानें असल्याचे उल्लेख प्राचीन महानुभावीय वाङमयांत आहेत. सध्यां प्रत्यक्ष बीडमध्यें गांवाबाहेर उंच ठिकाणीं खंडोबा आणि खंडेश्वरी अशीं दोन देवतांचीं दोन स्वतंत्र मंदिरें आहेत. नेवासें येथेंहि म्हाळसेच्या मंदिराबरोबर खंडोबाचें मंदिर आहे. नेवाशाचे दोन भाग असून एकास ' म्हाळसेचें ' (मोहिनीराजाचें) नेवासें व दुसऱ्यास ' खंडोबाचें नेवासें ' असें म्हणतात. खंडोबाच्या सान्निध्यांत असलेली वा जिच्या सान्निध्यांत खंडोबा आहे अशी ही खंडेश्वरी म्हणजे म्हाळसाच असावी, असें वाटतें. निदान तिचें नंतरच्या काळांत म्हाळसेशीं ऐकात्म्य कल्पिलें जाऊन तिच्या शेजारीं खंडोबाचें मंदिर उभारलें गेलें असावें.

सध्यांचें बीड येथील खंडेश्वरीचें मंदिर वास्तुशिल्पाच्या दृष्टीनें सतराव्या शतकांतील असलें, तरी त्याचा कांहीं भाग प्राचीन हेमाडपंती बांधणीचा आहे. मंदिरांतील मूळची अधिष्ठात्री देवता खंडेश्वरी आज तेथें अस्तित्वांत नाहीं. सध्यां तेथें घोड्यावर बसलेल्या खंडोबा-म्हाळसेचें उत्तरकालीन मूर्तिशिल्प कोनाड्यांत आहे. सूर्यसूरिपंडितांचें जीवन-वृत्त देणाऱ्या ' सूर्योदय '

नामक संस्कृत ग्रंथांत (श. १५०० पूर्वी) खंडेश्वरी देवीचा उल्लेख आहे. श्रीपतीच्या 'ज्योतिपरत्नमालें'त (११ वें शतक-प्रथमार्ध) खंडेश्वरीचा उल्लेख आहे :

"राजा शत्रुचिया देशावरि चालिलियावरि जिते ।। तरि इतुकिया ठाइं हात न घलावा ।। ब्राह्मण, देव, स्त्रियांसि हस्ती घोडे सांडुनी पळती ते न मारावे ।। निशस्त्री, शरणांगत, भ्याड हे न मारावे ।। यद्यपि घाली तरी **खंडेश्वरी** यश नेदी ।। . . . . ."[२१]

'ज्योतिषरत्नमाले'चा कर्ता श्रीपति हा प्राकृत महाकवि पुष्पदन्ताचा पुतण्या. पुष्पदन्ताचें एक नांव 'खण्ड'–'खण्डु' असें असल्याचें स्वत: पुष्पदन्तच आपल्या ग्रन्थांत सांगतो. श्रीपतीनें येथें आवर्जून केलेल्या खण्डेश्वरीच्या उल्लेखावरून पुष्पदन्त-श्रीपतीच्या घराण्याचा खंडेश्वरीच्या उपासनेशीं संबंध असावा, असें दिसतें. 'ज्योतिषरत्नमालें'तील खंडेश्वरीचा उल्लेख पाहतां असें वाटतें कीं, ती वीरांना–धर्मयुद्ध करणाऱ्या वीरांना–यश देणारी देवता असावी. बीडचें खंडेश्वरीचें मंदिर एकटें नाहीं–शेजारीं खंडोबाचेंहि मंदिर आहे. आणि खंडोबाच्या उपासनेंत 'वीरां'चें स्थान आहे; या गोष्टी ध्यानांत घेतां श्रीपतीनें केलेला खंडोबाचा उल्लेख सूचक वाटतो. खंडोबाची-खंडेश्वराची पत्नी म्हणून म्हाळसेला प्राप्त झालेलें 'खंडेश्वरी' हें पर्यायनाम आहे, कीं खंडेश्वरी ही स्वतंत्र देवता असून नामसादृश्यामुळें ती खंडोबाशीं संलग्न बनून म्हाळसेचें स्थान पावली असावी, याचा निश्चित निर्णय पुराव्याच्या अभावीं देतां येत नाहीं.

*म्हाळसा : मेंगाई*

खंडोबाच्या नामावळींत 'मेंगनाथ' या नांवाचा समावेश आहे. या 'मेंगनाथ'चें 'मेघनाथ' असें (खंडोबाच्या बाबतींत निरर्थक ठरणारें) संस्कृतीकरणहि झालें आहे. वेल्हें येथें 'मेंगाई' या नांवाची देवी असून, ती कांहीं देशस्थ ब्राह्मणांची कुलदेवता आहे. या मेंगाईचा आणि मेंगनाथाचा संबंध काय? 'मेंग' या शब्दाचा अर्थ तरी काय? महाराष्ट्र-शब्दकोशांत दिलेला 'सापाची कात, कवच' हा अर्थ येथें जमत नाहीं. खंडोबाचें एक स्थान 'मंगसूळी' या गांवीं आहे. मंगराज, मंगेश, इत्यादि 'मंग'-युक्त देवता व व्यक्ति यांचीं नांवें आढळतात. 'मंग' या कानडी शब्दाचा

एक अर्थ लक्ष्मी असा आहे. मंगेश-मंगराज म्हणजे वेंकटरमण-व्यंकटेश. परंतु गोमंतकांतील ' मंगेश ' हा देव तर शिव आहे. अर्थात् गिरीचा व्यंकटेश हाहि निखळ विष्णु नाहीं. श्रीरामानुजांच्या उदयापूर्वी तो शैव श्रेणींतीलच होता—वीरभद्र होता. ' मंग ' या शब्दाचा रूढार्थ जरी ' लक्ष्मी ' असा असला, तरी मूलत: तो निराळ्याच देवतेचा वाचक शब्द असावा, असें वाटतें. व्यंकटेशाची पत्नी पद्मावती हिचें द्राविड नांव ' अलमेलुमंग ' असें आहे. मंग—मेंग हे दोन्ही शब्द एकाच कल्पनेचे द्योतक असतील, तर म्हाळसेचें हें आणखी एक रूप—मंगाई ( मेंगाई ) संशोधनाचा विषय ठरेल.

महाराष्ट्रांत देशावरील ग्रामीण विभागांत ' म्हाळी—वेडी म्हाळी ' हा शब्द ' बावळट , मूर्ख स्त्री ' या अर्थानें वापरला जातो. ' मेंगा-मेंग्या ' हा मराठी शब्दहि ' बावळट, मूर्ख, नेभळट पुरुष ' या अर्थानें वापरला जातो. यावरून म्हाळसा-मेंगाई अनुबंधाचा धागा जुळवितां येईल काय ?— जें जाणवलें आणि सुचलें तें अभ्यासकांच्या मुक्त परीक्षणासाठीं नोंदविलें आहे, इतकेंच.

*म्हाळसा : रूपदर्शन*

म्हाळसेच्या प्राचीन मूर्ति आज अस्तित्वांत नाहींत. त्यामुळें तिचें मूळ रूप कसें होतें, तें सांगणें अशक्य आहे. आज आढळणाऱ्या म्हाळसेच्या मूर्ति संकीर्ण कल्पनांनीं युक्त आहेत. मोहिनी-म्हाळसा आणि मैलार-पत्नी म्हाळसा असे त्या मूर्तींचे दोन गट पाडतां येतील. परंतु यांपैकीं कोणत्याहि गटांतील मूर्ति निश्चित कल्पनांनीं घडविलेल्या नाहींत. वज्रवूर येथील मोहिनीची मूर्ति नग्ना आणि द्विहस्ता आहे, परंतु नेवासें आणि म्हाडदोळ येथील मोहिनी-म्हाळसेच्या मूर्ति मात्र चतुर्भुजा आहेत. म्हाडदोळच्या म्हाळसेच्या उजव्या दोन हातांत ऊर्ध्वाध:क्रमानें त्रिशूळ व एका दैत्याचे केस धरलेले आणि डाव्या दोन हातांत अमृतकलश आणि रक्त गळत असलेलें दैत्य-शिर आहे. हातांतील दैत्यशिरांतून सांडत असलेलें रक्त कुत्रा पीत, असून, तिच्या पायांखालींहि एक दैत्य तुडविला जात आहे, असें दाखविलें आहे. म्हाळसेनें चंडासुराचा वध केल्याची कथा सह्याद्रिखंडांतील ' वरुणापुरमाहात्म्यां 'त दिलेली आहे. नेवाशाच्या म्हाळसा-मोहिनीराजाच्या उजव्या दोन हातांत ऊर्ध्वाध:क्रमानें चक्र व

गदा आणि डाव्या दोन हातांत शंख व पानपात्र आहे. ही मूर्ति अर्धनारी-नटेश्वररूप आहे, असें दाखविण्यासाठीं तिचें केवळ डावें वक्षच स्तनयुक्त घडविलेलें आहे. लीळाचरित्रांत तत्कालीन म्हाळसेचें वर्णन आलेलें आहे, परंतु त्या वर्णनावरून म्हाळसेच्या मूर्तिस्वरूपावर प्रकाश पडू शकत नाहीं :

एकदां चक्रधरांचा मुक्काम नेवासें येथें होता. त्यांचा सकाळचा पूजावस्वर आटोपल्यावर ते म्हाळसेच्या देवळांत गेले. देवीदर्शन करून गोपाळाच्या देवळांत शिरतांना ते उत्तरेच्या ओटयावर आसनस्थ झाले. इतक्यांत 'साधे' नांवाची त्यांची शिष्या आली, तिला त्यांनीं देवीच्या दर्शनास पाठविलें. साधे देवीच्या दर्शनास गेली तेव्हां देवीचें स्नान चालू असल्यामुळें तिचे वस्त्रालंकार काढलेले होते. साधे दर्शन घेऊन परत आल्यावर स्वामींनीं तिला विचारलें : "साधे हो, म्हाळसा देखिली ?" "जी, देखिली. आहे काळी बीटीकी." सर्वज्ञें भणीतलें, "तुमतें कोण्ही पुसैल, तया पुढें काइ ऐसी सांघाल ? एकु वेळ पाहा जा." "हो का ? जी." मागुती गेली, तवं श्रीघारू केला असे, ऐसी देखिली. आली. मग गोसावीं पुसिलें, "साधे हो, म्हाळसी देखिली ?" "जी, देखिली. पाटाऊ, साउले नेसली असे. पाटाऊ, चोळी, कांकर्णे, कळावीया, सानैपाचीं तानवडें, भवरीया, भांगु, टीळा, नाकीं मोतीं–जी, ऐसी देखिली." सर्वज्ञें भणीतलें, "आतां होए."[२२]

या वर्णनांत नेमकें उघडच्या मूर्तीचें वर्णन टाळलें आहे– ती कृष्ण पाषाणाची मूर्ति होती, एवढेंच यावरून समजतें. देवीला चढविले जाणारे वस्त्रालंकार कोणकोणते होते, याचा मात्र विस्तारानें तपशील मिळतो.

मैलारपत्नीच्या स्वरूपांत ती स्वयंभू लिंगाच्या रूपानें, खंडोबाच्या अश्वारूढ मूर्तीत खंडोबाच्या मागें बसलेली, स्वतंत्र मूर्तिरूपानें अशी आढळते. तिची मूर्ति जशी मैलार-खंडोबाच्या शेजारीं असते, तशी ती कांहीं ठिकाणीं ( मैलार देवरगुड्डु, मैलार-बळ्ळारि ) स्वतंत्र मंदिरांत अधिष्ठित झालेली दिसते. जेजुरी येथें असलेल्या म्हाळसेच्या तीन मूर्ति द्विभुजा असून त्यांच्या उजव्या हातांत कमलकलिका वा उत्पल असून डावा हात गजहस्त मुद्रेंत आहे. देवरगुड्डु येथील स्वतंत्र माळव्व-मंदिरांतील म्हाळसा चतुर्भुजा असून, त्या हातांत खड्ग, त्रिशूल, डमरु व पानपात्र या वस्तु आहेत. निंवगांवची म्हाळसा कमलकलिका व पानपात्र धारण करणारी द्विभुजा

आहे. मैलार ( बळ्ळारि ) येथील मूर्ति खड्ग, डमरु, त्रिशूल व पानपात्र धारण केलेल्या चतुर्भुज म्हाळसेची आहे, तर मंगसूळी येथील द्विभुज म्हाळसा-मर्तीच्या हातांत खड्ग व पानपात्र या वस्तु आहेत.

*म्हाळसेचीं महती*

अशी ही 'बहुरूपिणी' म्हाळसा देवता-विज्ञानाच्या क्षेत्रांत रहस्यमय स्थान प्राप्त करणारी आहे. ती मूलत: एक कानडी ग्रामदेवता आहे. तिच्या उपासनेची ख्याति जानपदांत वाढू लागल्यावर तिनें आदिशक्तीचें आवरण घेतलें आणि दुसरीकडे मैलार या ग्रामदेवतेशीं नातें जोडलें. ती केव्हां तरी– एका गूढाज्ञांत क्षणीं मोहिनीशीं एकरूप झाली आणि विश्वनाट्याचा प्रयोग रंगविणाऱ्या 'देवो-देवी'च्या रूपानें ज्ञानेश्वर-बहिरा जातवेदांसारख्या कवीश्वरांच्या प्रतिभाविश्वांत झळाळून गेली. मैलाराचा मार्ण्तंड भैरव बनल्यावर ती मोहिनी आणि गंगा यांच्या रंगच्छटा ल्यायलेली पार्वती म्हणून मिरवूं लागली. तिचें हें रूपनाट्य खरोखर अद्भुत आहे- उद्बोधक आहे–प्रेरक आहे. तिच्या नाम-रूपांमागें दडलेलें रहस्य जर सर्वार्थानें आकळलें तर मध्ययुगीन दक्षिण भारतांतील अनेक संमिश्र चिन्तनधारांचा उलगडा होऊं शकेल. तो उलगडा होण्यापूर्वी अभ्यासकाचा बुद्धिपिंडहि द्रवीभूत होऊन उद्गारतो–

> मल्लारपत्नी मालाची महामाया च मालती ।
> माया लक्ष्मीर्महालक्ष्मीर्मायावल्यभिमानिनी ।।
> मैलारयोगिनी चैव भैरवी चाम्बिका तथा ।
> द्वादशैतानि नामानि रहस्यानि तवाम्बिके ।।

## संदर्भ-टीपा


१. नवभारत, जुलै १९५७, पृ.४.
२. देवीभागवत-उत्तरार्ध ७.१३.
३. एकनाथकृत रुक्मिणी-स्वयंवर १७.१५.
४. हरिवरदा ५५.१७९.
५. एकनाथी भागवत १३.१२६.

६. नामदेव-गाथा, पृ. ४०३.
७. महाराष्ट्राचीं चार दैवतें, पृ. १६९.
८. ज्ञानेश्वरी १८.१७८२.
९. चित्राव अभिनंदन ग्रंथ, पृ. ६९.
१०. महिकावतीची बखर, पृ. १५, २४, ७१.
११. लीळाचरित्र-उत्तरार्ध, लीळा १८४.
१२. ललितासहस्रनामभाष्य, पृ. ६९.
१३. मराठ्यांच्या संबंधानें चार उद्गार, पृ. ७५-७६.
१४. महिकावतीची बखर, पृ. ५३.
१५. मराठी संशोधन पत्रिका, व. २, अं. २, पृ. १९.
१६. एकनाथी भागवत ४.२३२-२३४.
१७. एकनाथकृत रुक्मिणी-स्वयंवर २.१९-२०.
१८. भावार्थ रामायण ५०.५९-६३.
१९. महाराष्ट्र-कविचरित्र, भा. २. पृ. १०२.
२०. मराठी संशोधन पत्रिका, व. ७, अं. १, पृ. १०.
२१. ज्योतिषरत्नमाला १६.७८.
२२. लीळाचरित्र-उत्तरार्ध, लीळा १८४.

३९८८९ ... वि: भू-प्रवास
३०८ ... नों. दि. ९२।९२।८९

# खंडोबाची उपासना

*माहात्म्यें आणि स्तोत्रें*

'मल्लारि-माहात्म्या 'च्या निर्मितीमुळें मैलारदेवाला ' मल्लारि मार्तण्ड भैरव ' असें नामाभिधान आणि तें नांव सार्थ ठरविणारी अवतार-कथा लाभली, हें आपण पहिल्या प्रकरणांत पाहिलें आहेच. मैलार एकदां मार्तण्ड भैरव बनल्यावर त्याच्या माहात्म्याला पोषक असें अन्य उपासनापर साहित्य निर्माण व्हायला अनुकूल पार्श्वभूमि तयार झाली.

'मल्लारि-माहात्म्य ' या संस्कृत ग्रंथाचे एकूण २२ अध्याय असून, श्लोकसंख्या ९४० आहे. ग्रंथकारानें प्रस्तुत ग्रंथ हा ब्रह्मांडपुराणाचा भाग आहे, असें भासविलें आहे. "इति श्रीब्रह्माण्डपुराणे क्षेत्रखण्डे मल्लारि-माहात्म्ये. . ." अशी समाप्ति-मुद्रा प्रत्येक अध्यायाच्या शेवटीं आहे. पहिल्या १८ अध्यायांत ऋषिपीडनापासून मणिमल्ल-वधापर्यंतची कथा वर्णिली असून पुढील ४ अध्यायांत अनुक्रमें प्रेमपुरांतील अष्टतीर्थें, षष्टितीर्थें, पूजा-विधि व प्रसादवाक्य हे विषय आले आहेत. या ' माहात्म्या 'चा काल आणि कर्ता कोणता, याविषयींची चर्चा पहिल्या प्रकरणांत येऊन गेली आहे. या माहात्म्य-ग्रंथानें अल्पावधींतच मैलार-खंडोबाच्या उपासनेंत प्रसिद्धि मिळविली आणि मराठींत त्यावर अनेक लहान-मोठीं विवरणें तयार झालीं. ' मल्लारि-माहात्म्या 'च्या मराठी अवतारांत सिद्धपाल केसरीचें ' मल्हारी-माहात्म्य ' अति प्रसिद्ध आहे. हा ओवीबद्ध ग्रंथ २२ अध्यायांतच विभागलेला असून, त्याची रचना श. १५०७ मध्यें झाली आहे. सिद्धपाल केसरीशिवाय अनंत बडवे, श्रीधर, माधव, शिवदिन इत्यादि कवींचीं मराठी मल्हारी-माहात्म्यें उपलब्ध आहेत. मोरोपंतांनीं ७७ आर्यांत लिहिलेल्या ' मल्लारि-विजयां 'त ' मल्लारि-माहात्म्यां 'तीलच कथा आहे.

' मल्लारि-माहात्म्या 'शिवाय ' मार्तण्डविजय ', ' जयाद्रिमाहात्म्य ' असेहि अन्य माहात्म्यग्रंथ आहेत. शिवरामबोवांचा ' मार्तण्डविजय ' आणि ' जेजूरीमाहात्म्य ' हे त्या ग्रंथांचे मराठी अवतार होत. कानडींत

'मल्लारि-माहात्म्या'च्या आधारें किंवा स्वतंत्रपणें अशा रचना झालेल्या आहेत काय, अशी विचारणा केली असतां श्री. पांडुरंग देसाई यांनीं कळविलें कीं, "संस्कृत मल्लारि-माहात्म्याची कर्नाटकांत प्रतिष्ठा आहे. त्यावर एक अर्वाचीन भाविक काव्यरचना झालेली आहे. तें नुस्तें पद्यीकरण आहे."

या माहात्म्यग्रंथांप्रमाणेंच स्तोत्रें, मंत्र-तंत्र, पूजाविधि, कवचें अशा स्वरूपाचें उपासनापर वाङमय भरपूर निर्माण झालें आहे. मल्लारिसहस्र-नामस्तोत्रम्, मल्लारिसहस्रनामावलि:, मल्लारिकवचादिविधि:, मल्लारि-भुजङ्गस्तोत्रम्, मल्लारिपंजरस्तोत्रम्, मल्लारिपूजापद्धति:, मल्लारिमन्त्र :, मल्लारिमन्त्रविधि:, मल्लारिमूलमन्त्र:, मल्लारिरहस्य, मल्लारिस्तव-राज:, मल्लारिस्तुति:, मल्लारिस्तोत्रम्, मल्लारिहृदयम्, मल्लार्यथर्व-शीर्षम् ( उपनिषद् ), मल्लार्यष्टोत्तरशतनामावलि:, मल्लारि-कवचम्, मार्तण्डभैरवकवचम्, मार्तण्डभैरवस्तोत्रम्, मार्तण्डभैरवहृदयम्, मैराळ-पूजापद्धति:, मैलारलिंगस्तोत्रम्, मालाचीस्तोत्रम्, इत्यादि स्तोत्रें उपलब्ध आहेत. यांतील तीन-चार प्रकाशितहि झालेलीं आहेत. भास्कररायांनीं, 'ललितासहस्रनामभाष्यां'त उल्लेखिलेलें 'मैरालतंत्रम्' कुठें आढळत नाहीं. अगदीं अलीकडे जेजुरीच्या एका पुजाऱ्यानें सत्यनारायणाच्या पोथी-प्रमाणें मराठींत 'श्रीखंडेराव देवाची सत्यमहापूजाकथा' तयार करून प्रसिद्धिली आहे. मराठी संतकवींनीं रचलेल्या आरत्यांचा समावेश उपासनापर साहित्यांतच करावा लागेल.

खंडोबाचें माहात्म्य वाढविण्याच्या प्रयत्नांचें स्वरूप पाहतांना आणखी एक रंजक उल्लेख अभ्यासण्यासारखा आहे. आनंदगिरींच्या 'शङ्कर-विजय' या ग्रंथांत शंकराचार्यांच्या बौद्धिक विजयाच्या अनेक कथा वर्णि-लेल्या आहेत. त्यांत २९ वा अध्याय 'मल्लारि-मतनिराकरणा'चा आहे. त्यांत असें वर्णन आहे कीं, शंकराचार्य उज्जयिनीच्या वायव्येस असलेल्या मल्लपत्तन या गांवीं गेले. तेथील त्यांच्या २१ दिवसांच्या निवासांत त्यांचा आणि स्थानिक ब्राह्मण मल्लारिभक्तांचा वाद झाला. मल्लारिभक्तांचें म्हणणें असें कीं, "मल्लासुराचा वध करणारा मल्लारि देव याच ठिकाणीं प्रकट झाला. त्याचें वाहन कुत्रा. म्हणून आम्हीं कुत्र्याप्रमाणें वेश व भाषा

अवलंबिली आहे. आम्ही गळ्यांत कवड्यांच्या माळा घालतों व स्तोत्रादींनीं त्यास प्रसन्न करून घेतों." पुढें या मल्लारिभक्तांनीं आपल्या देवाचें व स्वत:च्या श्वानवेशभाषेचें वेदविहितत्व सिद्ध करण्याचा प्रयत्न केला :

"वेदेषु मल्लारिण: सर्वव्यापकत्वं वर्तते तद्वाहनस्यापि वेदविहितत्वात् तद्वेषभाषासक्तानामस्माकं नह्यन्येच्छा, तथा हि श्रुति: । **श्वभ्य: श्वपतिभ्यश्च वो नम:** इति । अत: श्रुतिप्रसिद्धाचारस्य दुर्निवार्यत्वात् त्वमपि सशिष्य: परममुक्तिकारणमस्मदाचारानुग्रहणं कुरु । भवद्धारणयोग्यानि वराटकानि दास्याम: ।"

"श्वभ्य: श्वपतिभ्यश्च वो नम: ।" या श्रुतीशीं मल्लारीचा संबंध जोडून, स्वत:च्या श्वानवत् वेश-भाषेचें समर्थन करण्याचा हा मल्लारिभक्तांचा प्रयत्न, देवता-माहात्म्य कसें वाढविलें जातें आणि त्यासाठीं वेदांतून आधार शोधण्याची वृत्ति कशी काम करते, या दृष्टीनें चिंतनीय आहे.

–जेथें वरील घटना घडल्यानें वर्णन आलें आहे, तें मल्लपत्तन म्हणजे बळ्ळारि जिल्ह्यांतील 'मैलार' हें गांव होय. या मल्लपत्तनाचें स्थान ठरवितांना श्री. खरे यांची दिशाभूल झाली आहे. ते म्हणतात : "मल्लपत्तन उज्जयिनीच्या वायव्येस होतें, असें सांगितलें असल्यानें तें वायव्य माळवा किंवा पूर्व राजस्थान यांत कोठें तरी असलें पाहिजे." हा घोटाळा 'उज्जयिनी'मुळें झाला आहे. 'शंकरविजयां'त उल्लेखिलेलें उज्जयिनी म्हणजे माळव्यांतील प्रख्यात महाकाळेश्वराचें उज्जयिनी नसून कर्नाटकांतील वीरशैवांचें पीठ असलेलें उज्जयिनी ( उज्जैन ) होय. मैलारदेवाचें मैलार ( जि. बळ्ळारि ) हें कर्नाटकांतील प्रसिद्ध स्थान नेमकें या दक्षिणीं उज्जयिनीच्या वायव्येस आहे.

*मैलार-खंडोबाचीं प्रतीकस्थानें*

खंडोबाचीं क्षेत्रें जशीं महाराष्ट्रांत, तशींच कर्नाटकांतहि अनेक आहेत. जेजूरी ( ता. पुरंदर, जि. पुणें ), निमगांव (ता. खेड, जि. पुणें), शेंगुड ( ता. कर्जत, जि. नगर ), सातारें ( ता. व जि. औरंगाबाद ), नळदुर्ग ( जि. उस्मानाबाद ) आणि पाली ( जि. सातारा ) हीं महाराष्ट्रांतील सहा प्रसिद्ध स्थानें. तसेंच नांदेडजवळील मालेगांव, पेठ ( ता. इस्लामपूर,

जि. सांगली ), मल्हारपेठ (जि. सातारा), तिलोरें ( मुंबई-गोवें मार्ग ), पुण्याजवळील कोंढापूर (पुणें-नगर मार्ग ), वीड, चांदखेड ( ता. मावळ, जि. पुणें ), नेवासें ( जि. नगर ), नागपूर, इत्यादि अनेक ठिकाणीं खंडोबाचीं स्थानें आहेत. कर्नाटकांत मंगसूळी ( बेळगांव ), मैलारलिंग ( धारवाड ), मैलार-देवरगुड्ड ( धारवाड ), मैलार किंवा मण्मैलार ( बळ्ळारी ), मैलारपूर ( बीदर ) हीं स्थानें जागतीं-गाजतीं आहेत.

वरील स्थानांशिवाय लैखिक आणि वाङमयीन उल्लेखांवरून पुढील स्थानांचीं नांवें कळतात : कौरवदुर्ग ( भुवनदुर्ग ), पाली ( जि. बीड ), साडेगांव ( जि. औरंगाबाद ), सोनई ( ता. नेवासें, जि. नगर ), कल्लु-कोटे ( शिरें-तुमकूर, म्हैसूर ), अनेगुंदि ( विजयनगर ), कारीमनि ( परसगड-बेळगांव ), पेनुगोंडें ( अनंतपूर ), वेमवरम् ( रामचंद्रपुरम्-गोदावरी), कोंडवीड्ड (गुंटूर ), पट्ट्रु (पाटूर), कुबटूर (शिवमोग्ग-म्हैसूर), मैलापूर (मद्रासचा एक भाग,) पेदिपाडु (ओंगोल-नल्लूर). या स्थानांपैकीं पाली ( बीड ), साडेगांव व सोनई या तीन स्थानांशिवाय बाकीचीं द्राविड प्रदेशांतील आहेत. आज तेथें मैलाराची उपासना रूढ आहे काय, याचा शोध घ्यावयास हवा. 'मंगराजनिघंटु' या प्राचीन कानडी कोशांत मय्लारिदेव याचा अर्थ 'पल्लिम्बदेशाधीश' असा दिला आहे-तो पल्लिम्बदेश अतिदक्षिणेंतील भाग असावा, असा कविवर बेंद्रे यांचा अंदाज आहे. मध्यप्रदेशांत मल्हार ( विलासपूर ) व बडी देवरी ( सागर ) हीं खंडोबाचीं दोन स्थानें असल्याचें समजतें. श्री. गजपतिराय वर्मा हे आंध्रप्रांतीय अभ्यासक दक्षिणेंतील जानपद देवतांसंबंधीं एक ग्रंथ तयार करीत आहेत, त्यांत मैलाराचीं त्या भागांतील स्थानें आणि तिकडील उपासनेचें स्वरूप यांविषयीं कांहीं नवीन माहिती मिळेल, अशी अपेक्षा आहे. महाराष्ट्रांतील जेजूरी हें स्थान फार प्रसिद्ध आहे. जेजूरी येथील प्राचीनतम लेख संवत् १३०३ ( इ. स. १२४६ ) या वर्षीचा आहे. त्यांत 'धउल्लकानें आत्मकल्याणासाठीं कपर्दि यक्षाची प्रतिमा केली' असें म्हटलें आहे. कपर्दि हा एकोणिसावा जैन तीर्थंकर मल्लिनाथ याचा यक्ष. मल्लारि हा आपला मल्लिनाथच आहे, अशा समजुतीनें कुणा तरी जैन मल्लारि-भक्तानें ही यक्षप्रतिमा येथें स्थापली असावी. (याच संदर्भांत जैन अपभ्रंश-

कवि पुष्पदंत याचें ' खंड-खंडु ' हें नांव आणि ऋषभनाथाचें ' नाभिमल्हार ' हें पर्यायनाम यांचा मल्लारि-जैन-संबंधाच्या दृष्टीनें कांहीं धागा जुळेल काय, याचा जाणत्यांनीं विचार करावा. ) जेजूरीचें वैभव मराठी राज्य-कर्त्यांनीं वाढविलें. निंबगांव हें होळकरांचे दिवाण सरदार चंद्रचूड यांच्या निवासाचें गांव. चंद्रचूडांनीं आपल्या स्वामींचें दैवत निंबगांवीं स्थापलेलें दिसतें.

प्रेमपूर (पेमर–पेंवर), पाली, नळदुर्ग, जेजूरी असा क्रम सांगितला जातो. प्रेमपूर हें स्थान म्हणजे बीदरजवळचें मैलारपूर-पेंवरच होय. हनुमदात्मज कवीनें ' दासोपंतचरित्रां 'त या बीदरजवळील प्रेमपूरचा खंडोबा दासोपंतांचा कुलदेव असल्याचें सांगितलें आहे.[१] मैलाराचीं प्राचीनतम स्थानें कर्नाटकांत–द्राविड प्रदेशांतच असणार. मैलार किंवा मण्मैलार (बळ्ळारि) हें स्थान अत्यंत प्राचीन असावें. मल्लारि मार्तण्ड भैरवाच्या अवतारकथेंत या स्थानाचा सूचक उल्लेख असून या स्थानांतील देवनामाचा व देवमूर्तीच्या वैशिष्ट्याचा अवतारकथेच्या घडणींत वांटा आहे, हें मीं दाखविलें आहेच. प्रेमपुराचा महिमा मल्लारि-माहात्म्यांत दोन अध्यायांत ( २०-२१ ) वर्णिला आहे. जेजूरीचा महिमा गाणारें ' जयाद्रिमाहात्म्य ' रचलें गेलें आहे. याचप्रमाणें अनेक मल्लारिक्षेत्रांच्या उत्पत्तीच्या कथा लिखित वा मौखिक परंपरेनें रूढ आहेत. त्या कथांचा संग्रह करून त्यांचें सूक्ष्म विश्लेषण केल्यास मैलाराच्या उपासनेच्या विस्ताराचा इतिहास आणि विस्ताराला कारणीभूत होणाऱ्या जनश्रद्धेची प्रक्रिया समजूं शकेल, असें वाटतें.

*उपासक जाती-जमाती*

खंडोबाच्या परिवारांत त्याच्या दोन पत्नींपैकीं म्हाळसा ही लिंगायत वाण्याची कन्या आहे, तर बाणाई ( आणि तिचा भाऊ हेगडे प्रधानहि ) धनगर आहे. प्रारंभीं लिंगायतांनीं मैलाराला विरोध केला असला तरी पुढें त्यांनीं मैलाराचा स्वीकार केलेला दिसतो. अनेक मैलारक्षेत्रांत देवसेवा लिंगायतांकडे आहे. धनगर जातीनें तर मैलाराला अत्यंत उत्कट भक्तीनें स्वीकारलें आहे. मैलाराचा आणि या जातीचा संबंध देवाच्या उदयकाळा-पासूनच असावा, असें वाटतें. या जातींतून उदयास आलेलें होळकर घराणें पेशवाईच्या काळांत खंडोबाचें वैभव वाढवायला मोठ्या प्रमाणांत उपयोगी

पडलेलें आहे. अलीकडच्या काळांत पुणें जिल्ह्यांतील चांदखेड या गांवीं रामजीबाबा नामक धनगर संताच्या मल्लारि-भक्तीमुळें चांदखेडला खंडोबाचें ठाणें निर्माण झालें आहे. याशिवाय रामोशी, कोळी, मांग इत्यादि जमातीहि खंडोबाच्या उपासनेंत आहेत. उमाजी नाईक हा रामोशी होता, तर राघो भांगऱ्या हा कोळी होता. कोळयांत 'मल्हारकोळी' नांवाची एक पोटजात आहे. मराठा जातींतील अनेक घराणीं खंडोबाला भजणारीं— कुलदेव म्हणून भजणारीं आहेत. ब्राह्मणांपैकीं देशस्थ ब्राह्मणांनीं मैलार-खंडोबाचा मोठ्या भक्तीनें स्वीकार केला आहे. अनेक देशस्थ ब्राह्मणांचा तो कुलस्वामी असून, त्याच्यासाठीं आवश्यक असणारे कुळधर्म-कुळाचार ते निष्ठेनें आचरतात. 'मैराळ' या नांवाची मैलाराला भजणारी एक स्वतंत्र जातहि निर्माण झालेली आहे. कांहीं मुसलमानांनींहि 'मल्लूखाना'चा स्वीकार केलेला आहे. एवंच, महाराष्ट्र-कर्नाटकांतील सर्व समाज-स्तरांत कमीअधिक प्रमाणांत याची भक्ति रूढ असून हा या उभय प्रदेशांचा कुलदेव बनलेला आहे. या अमाप लोकप्रियतेमुळें आणि बहुजनांच्या आचार-विचारांशीं, कल्पना-भावनांशीं मिळतें-जुळतेंपण राखल्यामुळेंच त्याला 'लोकदेव' बनण्याचें 'भाग्य' लाभलें आहे.

*वाघ्या-मुरळी*

देवीचे जसे गोंधळी आणि भुत्ये हे उपासक, तसेच खंडोबाचे वाघ्या-मुरळी. अपत्यप्राप्तीसाठीं देवाला नवस करणारे लोक दोन मुलें होतांच पहिलें मूल देवास अर्पण करीत. त्यांतील मुलगे वाघ्ये बनत आणि मुली मुरळ्या बनत.

एन्थोवेननें मुंबई इलाख्यांतील जातींच्या सर्वेक्षणांत वाघ्या-मुरळ्यां-विषयीं पुढील माहिती दिली आहे : "एखाद्या मनुष्यास मुलें होत नसलीं अथवा त्याचीं मुलें जगत नसलीं, म्हणजे तो 'मूल जगल्यास तुला अर्पण करीन,' असा नवस खंडोबाला करतो. अशा तऱ्हेनें खंडोबास अर्पण केलेल्या मुलींस मुरळ्या म्हणतात व मुलांस वाघ्ये म्हणतात. कधीं कधीं विवाहित स्त्रियाहि नवसानें अथवा 'आपणांस खंडोबाची स्त्री होण्याविषयीं स्वप्न पडलें आहे' असें सांगून आपणांस खंडोबास अर्पण करतात. खंडोबास मुलगे व मुली वाघ्ये व मुरळ्या म्हणून वाहण्याची चाल मुख्यत्वेंकरून

कुणब्यांत व त्यांच्याच दर्जाच्या इतर जातींत आढळते. महारांतहि ही चाल प्रचलित आहे.

वाघ्ये व मुरळ्या सर्व दक्षिण महाराष्ट्रभर आढळतात. मुरळ्यांचें लग्न खंडोबाबरोबर करतात. वाघ्ये बहुधा आपल्या वडिलांच्या जातींतील मुलींशीं लग्न करतात. तथापि वाघ्यांच्या मुलामुलींतहि लग्न होण्यास हरकत नाहीं.

मुरळ्या वेश्यावृत्तीनें व भिक्षा मागूनं उदरनिर्वाह करतात. त्यांचा पोशाख कुणब्यांच्या बायकांप्रमाणेंच असतो; पण त्या कपाळास हळद माखतात व गळ्यांत कवड्यांच्या माळा घालतात. कांहीं मुरळ्या जेजूरीस कायमच्या राहतात. बाकीच्या वाघ्यांबरोबर सर्व दक्षिण महाराष्ट्रांत गाणीं गात व भिक्षा मागत गांवोगांव भटकत असतात.

वाघ्यांस खंडोबाचे चेले समजतात. मराठे आणि खालच्या जातींचे लोक त्यांस नमस्कार करतात. त्यांस दर तिसऱ्या वर्षी जेजूरीस जावें लागतें. वाघ्यांच्या चालीरीती व धार्मिक समजुती मराठा कुणब्यांप्रमाणें आहेत."

वाघ्या बनण्याचा विधि असतो. प्रथम चैत्र महिन्यांत देवास मूल वाहण्याचा संकल्प पालकानें गुरवाकडे कळवावा लागतो. मग नियुक्त दिवशीं मुलास मिरवणुकीनें खंडोबाच्या मंदिरांत नेतात. तेथें गुरव त्या मुलास हळद लावतो व वाघाच्या कातड्याच्या पिशवींत हळद ( भंडार ) भरून ती पिशवी मुलाच्या गळ्यांत बांधतो. मग देवावर भंडार उधळून तो देवाला मुलाचा स्वीकार करण्याची विनंती करतो.

महाराष्ट्रांत वाघ्याचा विवक्षित वेश नाहीं, परंतु कर्नाटकांत वाघ्या घोंगडीची कफनी वापरतो. भंडार ठेवण्यासाठीं वाघाच्या कातड्याची पिशवी गळ्यांत अडकवलेली, कोटंबा किंवा दोणि ( धातूचें वा लाकडी भिक्षापात्र ), गांठा ( रुप्याचा गोफ किंवा कातड्याची वा वाखाची कवड्या गुंफलेली दोरी ), दिवटी-बुधली, ध्वज, पोवतें ( गळ्यांत बांधावयाची भंडाररंजित सुताची दोरी ), घोळ ( एक वाद्य ), शंख किंवा डमरु, शूल-त्रिशूल, इत्यादि वस्तु वाघ्याजवळ असतात. अर्थात् या सर्व वस्तु तो नेहमींच बरोबर वागवतो, असें नाहीं. अनेकदां खांद्यावर घोंगडी टाकलेला, गळ्यांत व्याघ्रचर्माची भंडारानें भरलेली पिशवी अडकवलेला

आणि हातांत लहान घाट्यांचा जोड असलेलें वाद्य असलेला वाघ्या खंडोबाची गाणीं म्हणत 'मल्हारीची वारी' मागत हिंडतांना दिसतो.

वाघ्ये बनण्याची पद्धति अजूनहि रूढ आहे, परंतु मुरळी बनायला कायद्यानें बंदी आहे. वाघ्ये दोन प्रकारचे असतात : घरवाघ्ये व दारवाघ्ये. घरवाघ्ये म्हणजे नवसाच्या फेडीसाठीं कांहीं वेळ वाघ्याचा वेश परिधान करून 'वारी' ( भिक्षा ) मागणारे-- केवळ श्रद्धा व्यक्त करणारे वाघ्ये. आणि दारवाघ्ये म्हणजे कायमची दीक्षा घेतलेले, भिक्षेवर जगणारे व भक्तांचीं क्षेत्रांतील धार्मिक कामें करणारे धंदेवाईक वाघे. भक्तांच्या वतीनें जागरण करणें व लंगर तोडणें हीं यांचीं विशेष कामें होत.

वाघ्ये हे स्वत:ला खंडोबाचे कुत्रे समजून भुंकतात, गुर्रगुर्र आवाज काढतात. यासंबंधींचे उल्लेख बाराव्या शतकापासून आढळतात. बसवेश्वरानें कुत्र्या-प्रमाणें भुंकणाऱ्या मैलारभक्तांची चेष्टा केली आहे. शेख महंमदानें "घडिक भुंके मागतसे वारी", "कुमारांस श्वानें करूनि भुंकविती । मनुष्य असतां ।।" असा दोनदां या प्रकाराचा निषेध केला आहे.[२] आनंदगिरींच्या 'शंकरविजयां'-तील या श्वानवेशभाषेचा उल्लेख आपण या प्रकरणाच्या प्रारंभींच्या छेदकांत पाहिलाच आहे. वाघ्या-मुरळ्यांवर संतांनीं भारुडें रचलेलीं आहेत आणि स्वत:कडे वाघ्याची भूमिका घेऊन खंडोबाविषयक श्रद्धाभाव व्यक्त केला आहे. संतांच्या या रचनांचा परिचय आपण पुढील प्रकरणांत करून घेणार आहोंत.

अनेकदां दोन हात टेकून कुत्र्याप्रमाणें चार पायांवर चालण्याचा व भुंकण्या-गुरगुरण्याचा अभिनय श्रद्धेनें करणारा वाघ्या हें एक रहस्यच आहे. श्री. पांडुरंग देसाई वाघ्यांविषयीं असें स्पष्टीकरण देतात कीं, "कुत्रे मल्लारीला प्रिय आहेत. मल्लारि कुत्र्यांचा तांडा घेऊन स्वारीवर निघतो. मनुष्यरूपी वाघ्या स्वत:स कुत्रें समजून कुत्र्यासारखे चाळे करतो. पाशुपत मतांत भक्त स्वत:स पशु आणि शिवास पशुपति म्हणजे पशूंचें पालन करणारा असें मानतात. वाघ्याचें वर्तन यासारख्या भावनेनें प्रेरित झालें आहे.

वाघ्या या नांवाचें मूळ कन्नड भाषेंत सांपडतें. त्याचें कन्नड नांव ओग्गय्य. हा शब्द 'उग्गु' धातू पासून निघाला आहे. 'उग्गु' म्हणजे बोबडें बोलणें,

अर्थशून्य किंवा अस्पष्ट ध्वनि काढणें, इत्यादि. या अर्थाला अनुरूप असें वर्तन करून, म्हणजे कुत्र्याप्रमाणें भुंकून, गुर् गुर् शब्द करून, इत्यादि प्रकारानें ओग्गय्य किंवा वाघ्या आपल्या नांवाची अन्वर्थकता पटवून देतो."[३]

१. वाघ्याचें कानडी नांव वग्गय्य किंवा ओग्गय्य याचा अर्थ जर 'बोबडें, अर्थशून्य व अस्पष्ट बोलणारा' असा असेल} तर त्याचा संबंध पर्यायानेंहि कुत्र्याकडे कसा पोंचतो ? वाघ्ये जर 'आपण देवाचे कुत्रे आहोंत' असें समजतात, तर त्यांना श्वानवाचक नांवच मिळावयास नको होतें काय ? वग्गय्य किंवा ओग्गय्य हा कानडी शब्द जर श्वानवाचक असेल, तशा अर्थानें कानडी वाङमयांत अन्यत्र--खंडोबाच्या उपासनेच्या संदर्भाच्या बाहेर--तो वापरला गेला असेल, तरच हें स्पष्टीकरण पत्करतां येईल.

२. शिव हा पशुपति आणि जीव हा पशु, ही पाशुपतांची कल्पनाच शिवस्वरूप मार्तण्ड भैरवाच्या भक्तांनीं आचरणांत आणली आहे, असें मानण्यांतहि एक अडचण येते. ती अशी कीं, जर जीव-पशु-कल्पनेनुसार वाघ्या कुत्र्याप्रमाणें वागत असेल, तर वाघ्याचा श्वानवत् आचार मैलाराच्या मार्तण्डभैरवीकरणानंतर प्रचारांत आलेला असला पाहिजे. परंतु वस्तुस्थिति अशी आहे कीं, मैलार हा मार्तण्ड भैरवाचें स्वरूप पावला तो तेराव्या शतकानंतर आणि वाघ्यांच्या किंवा मैलारभक्तांच्या श्वानवत् वर्तनाचा उल्लेख बाराव्या शतकांतील बसवेश्वरांच्या वचनांतहि आढळतो, असें श्री. देसाई यांनींच दाखवून दिलें आहे.

३. तिसरें असें कीं, वग्गय्य किंवा वाघ्या यांच्या गळ्यांत व्याघ्रचर्माची पिशवी असते. मराठींत वाघ्याचा संबंध वाघाशीं-व्याघ्राशीं लागतो. जुन्या मराठी वाङमयांत हा शब्द 'वाघा' या स्वरूपांत आढळतो. म्हणजे चिन्ह व नांव वाघाचें आणि वर्तन कुत्र्याचें--अशी विसंगति आहे. या विसंगतीची कल्पना खंडोबाच्या जुन्या सश्रद्ध भक्तांनाहि असावी. जयाद्रिमाहात्म्यांत या विसंगतीचें स्पष्टीकरण देणारी एक अद्‌भुत कल्पित कथा आहे. तीनुसार वाघ्या म्हणजे वाघाचें कुत्र्यांत झालेलें रूपांतर होय.

४. श्री. खरे यांनीं या विसंगतींत मेळ घालण्याचा प्रयत्न करतांना व्याघ्रचर्माचा व शिवाच्या 'व्याघ्रकृत्ति वसानम्' या लक्षणाचा संबंध दाखविला आहे.[४] त्यांचा अभिप्राय असा कीं, शिवाच्या व्याघ्रांबराचा

व्याघ्रचर्म व वाघ्या हें नांव यांच्याशीं संबंध आणि भैरवाच्या कुत्र्याचा वाघ्यांच्या श्वानवत् आचाराशीं संबंध अशा प्रकारें भक्तांनीं शिवत्व आणि भैरवत्व यांचा मेळ घातला म्हणायचा !

५. परंतु याहि स्पष्टीकरणांत पूर्वीचीच अडचण आहे. ती अशी कीं, मैलाराला मार्तण्डभैरवत्व आणि पर्यायानें शिवत्व उशीरां प्राप्त झालें आहे आणि भक्तांचा श्वानवत् गुरगुरण्याचा आचार मात्र तत्पूर्वीचा आहे.

६. या सर्व शंका-उपशंकाचा अर्थ असा निघतो कीं, वाघ्याच्या नांवाचें व श्वानवत् आचाराचें—तसेंच त्याच्या व्याघ्रचर्माच्या पिवीसारख्या चिन्हाचें मूळ अजून सांपडावयाचें आहे. वाघाच्या कातडीच्या पिशवीची प्रथा जर उशीरा—'वाघ्या' या शब्दाच्या ध्वनिसाम्यावरून वाघाशीं संबंध जोडला जाऊन—सुरू झाली असेल आणि वाघ्या-वग्गय्य हा शब्द जर श्वानार्थक असेल, तरच वाघ्याच्या स्वरूपांतील विसंगतीचें स्पष्टीकरण मिळेल. आज तरी माझें मत असेंच झालेलें आहे.

मुरळी ही देवदासींच्या वर्गांतील उपासिका. देवदासी, भाविणी, जोगिणी यांच्याप्रमाणेंच मुरळींना देवसेवेंत राहून अविवाहित जीवन व्यतीत करावें लागतें. त्यांचें लग्न देवाशींच लागतें. त्या देवाची सेवा करतात आणि जागरणासारख्या कार्यक्रमांत वाघ्यांना साथ देतात. महाराष्ट्र-शब्दकोशांत 'मुरळी' ची व्युत्पत्ति दोन प्रकारांनीं दिली आहे. : १ मैरालाची पत्नी-मैराली-मुरळी, व २. मरळी (कानडी शब्द)-मुरळी. या दुसऱ्या व्युत्पत्तीला पुष्टि देतांना श्री. देसाई म्हणतात : "कानडींत 'मरळी' म्हणजे बुद्धिशून्य किंवा बुद्धिशून्याप्रमाणें बतावणी करणारी. श्वानवत् वागणाऱ्या वाघ्याचें स्त्रीपात्र हीच मुरळी. म्हणून तिचें मूळ 'मरळी' हें कन्नड नांवहि अन्वर्थक वाटतें.

"वाघ्या आणि मुरळी या पद्धतीचें मूळ पवित्र आणि उदात्त असावेंसें वाटतें. शाक्त संप्रदायाप्रमाणें शक्तिक्षेत्रांत शक्तियोग साधण्याच्या उद्देशानें योगी किंवा बैरागी आणि योगिनी किंवा जोगिणी वास करीत. . . कुकनूरच्या शिलालेखांत तेथील शक्तिदेवतेच्या सान्निध्यांत योगिनींचा समुदाय निरंतर राहत होता, असें वर्णिलें आहे. मल्लारीचा उदय शाक्तपंथाच्या आवरणांत झाला असावा. शाक्तपंथांत योगी आणि योगिनींना महत्त्व दिलें आहे.

हे मूलत: साधक आणि उपासक होत. शक्तिक्षेत्रांत शक्तियोग साधण्याच्या निमित्तानें एकत्र झालेल्या या बैराग्यांत खालच्या वर्गांतील सामान्य लोकांचा भरणा अधिक असल्यामुळें त्यांच्यामध्यें ज्ञान, नीतिमत्ता किंवा तपश्चर्येचें तेज नव्हतें. म्हणून त्यांच्याविषयीं इतरांना आदरभाव वाटला नाहीं. त्यांच्या विचित्र वर्तनामुळें त्यांना ओंगग्य आणि मरळी किंवा मुरळी यांसारखीं ग्राम्य व निंदापर नांवें रूढ झालीं."

१. श्री. देसाई यांच्या वरील स्पष्टीकरणाला कांहीं अडचणी आहेत. एक तर 'मरळी'चें 'मुरळी' हें रूपांतर भाषाशास्त्रदृष्टचा शक्य आहे काय ?

२. दुसरें असें कीं, वाघ्या-मुरळी ही जोडी शाक्तांच्या पठडींतील शक्तियोगाच्या असंस्कृत व अध:पतित दीक्षितांचा अवशेष आहे, हें अनुमान फार दूरान्वित आणि कांहींसें कल्पनारंजित वाटतें. श्री. देसाई यांनीं शिलालेखांच्या आधारें असें दाखविलें आहे कीं, अकराव्या शतकांत मालचीला शक्तीची प्रतिष्ठा प्राप्त झाली होती. "क्षेत्राधिपं विना यस्तु पूजयेत् पीठदेवताम् । भैरवैर्ह्रीयते सर्वं जपपूजादिसाधनम् ।।" या शाक्तांच्या संकेताप्रमाणें मैलार हा शक्तिपीठांतील भैरव बनला, हें श्री. देसाईचें त्यापुढील अनुमान आहे. श्री. देसाई यांचें हें अनुमान मान्य करावयाचें झालें तर, हेंहि मान्य करावें लागेल कीं, शाक्तांच्या तत्त्वज्ञानाप्रमाणें शक्ति प्रधान असून भैरवाला गौणत्व आहे– तो शक्तिपीठांतील सेवक आहे. मालचीचें शक्तिदेवतेंत झालेलें रूपांतर पुढें मोहिनीच्या–वैष्णवी शक्तीच्या रूपानें स्वतंत्रपणें नांदत राहिलें आणि मैलाराशीं संबद्ध असा तिचा प्रवाह मैलाराहून गौण बनला, ही तर वस्तुस्थिति आहे. या वस्तुस्थित्यनुसार हा शाक्त योगसाधनेच्या अनुयायांचा भ्रष्ट अवशेष म्हाळसा-मोहिनीच्या उपासनेंत रूढ राहावयास हवा होता–मार्तण्ड भैरवाच्या नव्हे. माळची-म्हाळसा ही शक्ति आणि मैलार हा तिचा भैरव–असा प्रकार घडलेला नाहीं. मैलार हा क्षेत्रपाळाच्या श्रेणींतील देव असल्यामुळें महाराष्ट्रांत पूर्वप्रतिष्ठित असलेल्या भैरवाशीं त्याचें ऐकात्म्य कल्पिलें गेलें आणि त्यामुळें मैलाराचें स्कंदाशीं व मोहिनी -कथेशीं नातें जोडण्याचा प्रयत्न कसा मागें पडला, याची चर्चा मीं पहिल्या प्रकरणांत विस्तारानें केलेलीच आहे.

३. मला वाटतें, मैलाराच्या उपासनेंतील देवदासींना त्यांच्या अस्तित्वामुळें 'मुरळी' हें नांव मिळालें असावें. हेमचंद्राच्या देशीनाममालेंत 'मुरई' असा शब्द असून त्याचा अर्थ 'असती' असा दिला आहे.[५] आजहि आपण 'असती' या लाक्षणिक अर्थानें 'मुरळी' हा शब्द वापरतों. कानडींतहि 'मरळी' चा लक्ष्यार्थ तसाच आहे, असें कळतें. कदाचित् मुरळ्यांची अनाचारमग्नता पाहून हेमचंद्रानें त्या निराळ्याच (अज्ञात) अर्थाच्या शब्दाचा 'असती'हा लक्ष्यार्थ नोंदविला असणेंहि शक्य आहे. केरळ प्रदेशाचा निर्देश क्वचित् 'मुरल' या नांवानें केलेला आढळतो, त्याचा मुरळीशीं कांहीं संबंध असेल काय?

—वाघ्या आणि मुरळी यांचें मूलरहस्य अजून अज्ञात आहे, असें मानणेंच योग्य होईल.

नाथांच्या नांवावर एक 'मुरळी' हें भारूड आहे, त्यांतील आध्यात्मिक रूपक बाजूला काढून आपणांस मुरळीचें स्वरूप समजावून घेतां येईल :

निःसंग मुरळी झालें। या मालूचें घर रिघालें।।
गळा भक्तीची भांडारी। भावाचा कोटंबा करीं।
विवेकाची मागतें मी वारी। या संतांच्या चौंधा आलें।।
चौहात घांट वाजती। सोहं शब्द घोळ गर्जती।
वाघ्या मुरळ्या या नाचती। गुरुकृपेचें अंजन ल्यालें।।
वाजे वैराग्य-तुणतुणं। तें कदा नव्हे वा सुनं।
मन-घुंगरूं वाजे छुनछुनं। नाचत जेजुरी गेलें।।
गड देखिला जेजुरी। आतमा नांदतो मल्हारी।
जाउनि बसलें मी मांडीवरी। एका जनार्दन बोले।

नाथांनीं मुरळ्यांच्या निःसंगपणावर पारमार्थिक रूपक रचलें—मुरळ्यांनीं आपला निःसंगपणा वासनांच्या तुष्टीसाठीं न वापरतां परमात्म्याच्या भेटीसाठीं वापरावा, ही नाथांची दृष्टि. परंतु नाथसमकालीन मुक्तचिंतक शेख महंमद श्रीगोंदेकर असें कांहीं गुळमुळीत न बोलतां या अनिष्ट प्रथेवर सरळ सरळ प्रखर हल्ला चढवितो :

ज्या मुरळ्या करिती अनाचार। चालविती उन्मत्ताचे घरचार।
त्यांस म्हणती लावी भंडार। आपुलिया हातें।।

पुण्य आचरण न ये मुरळ्यांच्या चित्ता । भलत्याच्या होतील कांता ।।
त्यांचा हात भाळास लावितां । कोण तरला सांग वा ।।
भाळ वाडवी, पुढें ओढवी । म्हणे तूं आपल्या हातें लावी ।
मुरळी डोळे घालूनी खुणावी । त्या मुरळ्यालागुनी ।।
जे आपल्या कुळस्वामीची मुरळी । तिसी कैसे खेळती ढवाळी ।
ऐसी कलियुगीं प्रभावळी । पापाची वर्ततसे ।।
मुरळ्या कुळस्वामीच्या दासी । त्यांसी रमतां कंटाळेत ना अपेशी ।
मल्हारी न करीच कांहीं त्यांसी । कां सत्त्वें सांडवला ।।
कुळकन्येस बोल लाविला मल्हारीनें । ऐसें विटंविलें त्याच्या देवपणें ।
तो पुजिल्या केंवी तुटतीं वंधनें । लक्ष चौऱ्यांशीचीं ।।[६]

शेख महंमदानें विवेकनिष्ठेच्या शस्त्रानें मुरळ्यांच्या अनाचारावर चढविलेला हा हल्ला अत्यंत तीव्र असला तरी इष्ट असाच आहे. यानंतर शेख महंमदानें 'ऐसें ज्याचें वालक घ्यावें, त्यांस पूर्वजांसहित मोक्षास न्यावें,' हा चिलयाच्या कथेंतील शिवचरित्राचा विशेष सांगून प्रश्न विचारला आहे कीं, "देव म्हणवून घेऊन चरणींच्या दासांचें 'सुफळ' निर्फळ करावें, हें योग्य आहे काय ? "

मुरळ्यांवरील टीकेचा उपसंहार करतांना शेख महंमदानें स्पष्टपणें म्हटलें आहे :

मुरळी म्हणजे हे कल्पना । श्रीहरि न ये तिच्या अगुणा ।
जन विपयलंपट जाणा । तिच्या गुणासंगें ।। [७]

शेख महंमद आणि एकनाथ यांच्याहि पूर्वीं वंगालचे महाप्रभु चैतन्य यांनीं आपल्या दक्षिणयात्रेंत जेजूरीस भेट दिली असतां मुरळ्यांचें हृदयपरिवर्तन करण्याचा प्रयत्न केला होता. महाप्रभूंची ही दक्षिणयात्रा इ. स. १५१०-११ या काळांत झाली. त्यांच्यावरोवर गोविंददास नामक एक शिष्य होता. या गोविंददासानें यात्रेंतील अनुभवांचीं टिपणें लिहिलेलीं आहेत. या टिपणांच्या आधारें जेजूरीची घटना वर्णितांना रायसाहेब दिनेशचंद्र सेन लिहितात :

Khandava was the God of the temple there and parents used to offer their daughters to that deity. These daughters

called themselves 'wives of Khandava' and led unholy lives and the pilgrims were often enticed by these wretched women, known in the locality as the 'Muralis'. Chaitanya, when he saw them, felt a deep compassion for them and said to Govinda, "How cruel are the parents of these girls, Govinda ? How have they the heart to offer their own children to Khandava to lead vicious lives ?" He went to the Muralis himself, though Govinda did not like his going there. The most conspicuous among the Muralis was Indira Devi, and as Chaitanya held a sweet discourse full of spiritual fervour with the unfortunate women, they felt a thrill of repentance and an ardent desire to reform themselves. Indira Devi particularly was greatly moved. She eventually left the city as an anchoress.[८]

या अपवादात्मक इंदिरादेवीची धन्य होय. तिचें अनुसरण झालें नाहीं, हा इतिहास आहे. पुढें इंग्रजी राज्यांत महर्षि शिंद्यांसारख्या सुधारकांनीं प्रचार करून या प्रथेविरुद्ध लोकमत तयार करण्याचा प्रयत्न केला आणि शेवटीं कायद्यानें मुरळीच्या प्रथेवर बंदी घातली गेली. अर्थात् अजूनहि कायदा धाब्यावर बसवून चोरून मुरळी बनण्याचे प्रकार चालू आहेतच.

*नवससायास आणि अन्य उपासना-प्रकार*

खंडोबा हा नवसांना पावणारा, भक्तांच्या प्रापंचिक आधि-व्याधि दूर करणारा, त्यांच्या इच्छा-आकांक्षांची परिपूर्ति करणारा देव आहे, अशी समजूत प्रारंभापासून आढळते. माळचीचे पहिले लैखिक उल्लेख नवसफेडीची नोंद करणाऱ्या लेखांतच आहेत. तमिळनाडमध्यें धोबी आणि तत्सम अन्य जाती पोंगल महोत्सवानंतर मय्लार देवाचा उत्सव-सप्ताह साजरा करतात. या सप्ताहांत स्त्रिया इष्टवरप्राप्तीसाठीं उपवास करतात. शेख महंमदानें 'जो नवसें दिवटी हळद मागे । देउळें करा म्हणोनि भक्तास लागे ।' असा खंडोबाच्या उपासनेंतील नवसांचा उल्लेख केला आहे.[९] समर्थशिष्य दिनकरस्वामी तिसगांवकरांनीं 'नवस घेऊनि वासना पुरविसी । ठेंगणें कीर्तीसी भुवनत्रय ॥' अशी खंडोबाची नवसाला

पावण्याची ख्याति वर्णिली आहे.[10] मल्लारिक्षेत्रांतील नवसांचें प्रस्थ वर्णितांना समर्थ म्हणतात :

देशोदेशींचा जन उदंड येतो । नाना प्रकारें नवस फेडितो ।
देव त्याचे लळे पाळितो ।।
मार्गी लागतां बेड्या तुटती । कुलुपें तोंडींचीं तुटोनि जातीं ।
नाना खोडे खिळीं निघतीं ।।
जिव्हा कापितां मागुता बोले । शिरें वाहतां उठोनि चाले ।
उदंड ठायीं प्रसंग जाले ।।
वांझे लेकुरें, निधन्या धन । भक्तां पाळितो मनापासुन ।
दास म्हणे आनंदघन ।।[11]

नवसफेडीसाठीं मूल्यवान् वस्तु समर्पिणें, मंदिर बांधणें, मंदिराचा जीर्णोद्धार करणें, पायऱ्या बांधणें, दीपमाळ बांधणें या धार्मिक स्वरूपाच्या सत्कार्यांबरोबरच अनेक आत्मक्लेशाचे प्रकारहि अवलंबिले जातात. पोटचा मुलगा वा मुलगी देवाला वाहण्याचा मानसिक क्लेशाचा प्रकार सोडला तर अन्य सर्व प्रकार देहक्लेशाचे आहेत. खेटे घालणें ( नियमित कालानंतर देवदर्शनाला जाणें– असें अनेकदां, कबूल केलेल्या संख्येनुसार ), कावडी घालणें (पाण्याच्या कावडी देवास घालणें—यांचीहि संख्या कबूल केल्याप्रमाणेंच ), वारी मागणें ( देवाच्या नांवानें ठराविक काळांत भिक्षा मागणें ) हे नवसांचे सौम्य प्रकार होत. परंतु बगाड घेणें ( मानेस किंवा कमरेस गळ टोचून घेऊन देवापुढें टांगून घेणें किंवा टांगलेल्या अवस्थेंत देवास प्रदक्षिणा घालणें ) आणि हाळावरून किंवा इंगळांवरून चालणें ( एका चरांत अंगार फुलवून आणि त्यावर भंडार उधळून त्यावरून चालत जाणें ) हे दोन प्रकार भयंकर आहेत. या नवसांच्या भयंकर प्रकारांवर टीका करतांना गणेशनाथ नामक ग्रंथकार आपल्या 'गोरखबोध' या ग्रंथांत म्हणतो :

मेळउनी लोकपरवडी । जिता जीव तडाजोडी ।
गळ टोचणें खाडाबेडी । भजनपरवडी असुराची ।।
कुळीचा कुळधर्म वीरभद्र । धडधडीत अग्नी घेती डोईवर ।
सर्वांगीं टोचिती शस्त्र । इंगळावर चालती ।।

नग्न करूनि खर्गधारा । हाणूनि घेती निजशरीरा ।
श्वान होऊनि भुंकती सैरा । कोण पसारा भजनाचा ।।
प्राण गेलिया समूळ । धर्म न करिती एक वेळ ।
देवतांसी वाहती पोटींचें बाळ । कुळ अमंगळ करावया ।।
कुलूप करिती जिव्हा-वदना । वेसणी घालूनि धरिती जिव्हा-शिश्ना ।
पोटीं अनिवार कल्पना । जन्ममरणा हें मूळ ।।[१२]

या गळ-इंगळांच्या प्रकारांप्रमाणेंच वीरांचे पवाडहि भयंकर असतात. खंडोबाच्या उपासनेंत वाघ्या-मुरळ्यांप्रमाणेंच 'वीर' नामक उपासकांचा वर्ग असतो. शेख महंमद वीरांचा उल्लेख 'वीर भूतांचे पुजारी हो ।' या शब्दांत करतो.[१३] 'आम्ही प्रतिवर्षी तरवारीनें मांडीचें रक्त काढून देवास त्याचा टिळा लावतों,' असें जेजूरीच्या वीरांच्या कैफियतींत लिहिलेलें आहे. देवरगुड्ड येथें दसऱ्याच्या दिवशीं कंचवीर नामक उपासक अर्धा ते पाऊण इंच व्यासाची पहार पिढरीच्या खालच्या भागांत आरपार मारून घेतात आणि नंतर ही पहार काढून मग त्यांतून तेवढ्याच वेराची चामड्याची दोरी ओवतात व काढतात. तसेंच त्याच छेदांतून बाभळीची कांटेरी फांदी ओवून काढतात. अशी माहिती श्री. खरे यांनीं नोंदविली आहे.[१४] गळ-इंगळ आणि पवाड यांतील जखमा भंडारानें बऱ्या होतात, असा अनुभव आहे. वीरांच्या पवाडाप्रमाणेंच कांहीं ठिकाणीं वारू (ज्यांच्या अंगांत वारें आलेलें असतें, ते) स्वतःच्या अंगावर चाबूक मारून घेऊन अंगाचीं कातडीं लोंबायला लावतात. त्यांच्याहि जखमा भंडारानेंच बऱ्या होतात.

या नवसांशिवाय देवास दहीभाताची पूजा बांधणें, मेंढी अर्पण करणें, नैवेद्य समर्पिणें, खोबरें व भंडार उधळणें, वाघ्या-मुरळ्यांकडून जागरण करवून त्यांना जेवावयास घालणें, नवसानें झालेल्या मुलांचें जावळ, नाककान टोचणें इत्यादि संस्कार देवापुढें करणें, बुतफरोसी करणें (देवाच्या मूर्ति विकणें), देवावर चौरी ढाळणें, इत्यादि सौम्य नवसहि असतात

*कुळधर्म-कुळाचार*

खंडोबा हा कुलदेव असल्यामुळें अनेक कुटुंबांत देव्हाऱ्यांत त्याचा टांक असतो आणि त्याच्यासाठीं कुळधर्म साजरा करावा लागतो. चंपाषष्ठीच्या निमित्तानें मार्गशीर्ष शु. प्रतिपदेपासून देवीच्या नवरात्राप्रमाणें खंडोबाचें

नवरात्र ( पंचरात्र ) सुरू होतें आणि षष्ठीच्या दिवशीं कुळधर्म होतो. हा कुळधर्म पौषी, माघी, चैत्री, श्रावणी या पौर्णिमांनाहि असतो. खंडोबाच्या कुळधर्मासाठीं ठोंबरा (जोंधळे शिजवून त्यांत दहीमीठ घालून केलेला पदार्थ) कणकेचा रोडगा ( जाड भाकरी ), वांग्याचें भरीत, पातीचा कांदा व लसूण हे पदार्थ नैवेद्यांत असतात. तसेंच गव्हांच्या ओंब्या, हुरडा, तीळ व गूळ असें एकत्र कांडून त्याचा दिवा करून त्यांत फुलवात- त्या दिव्याला 'उंडी' असें म्हणतात. चातुर्मासांत कांदा-लसूण वर्ज्य मानणारे लोक चंपाषष्ठीच्या कुळधर्मानंतर– त्याच दिवशीं देवाच्या नैवेद्यांत कांदा-लसणाचा समावेश करून कांदा-लसूण खावयास प्रारंभ करतात।

कुळधर्माच्या वेळीं नैवेद्य-समर्पणापूर्वीं तळी भरण्याचा विधि असतो. तळी भरणें म्हणजे एका ताम्हणांत पानें-पैसा-सुपारी-भंडार-खोबरें हे पदार्थ ठेवून तें ताम्हण 'एळकोट' गर्जना करून तीनदां उचलावयाचें असतें. या तळी-भरणानंतर हातीं दिवटी-बुधली घेऊन आरती करावयाची आणि आरतीनंतर 'लाक्षणिक जेजूरी'ला जाऊन यावयाचें. म्हणजे जेजूरी ( वा अन्य खंडोबाचें स्थान ) ज्या दिशेला असेल, त्या दिशेला चार पावलें जाऊन देवाला ओवाळावयाचें, जयघोष करायचा आणि भंडारा उधळून परत यायचें. 'जेजूरीला जाऊन आल्या' वर दिवटी दुधानें विझवावयाची असते. ही घरांतील दिवटी-बुधली दर पिढीला ओहरयात्रेच्या वेळीं बदलतात. कांहींच्या घरीं कुळधर्मांत आहाळावरून पांच पावलें मुलाबाळांसह चालण्याचा विधि रूढ असतो.

लग्न-मुंजीसारख्या संस्कारानंतर देवदर्शनाला जाणें आणि वाघ्या-मुरळ्यांचें जागरण करविणें हाहि कुलाचार रूढ आहे. 'जागरण' म्हणजे पांच उसांच्या मखरांत प्रतीकात्मक देवस्थापना करून वाघ्या-मुरळ्यांचा समूह तुणतुणें, घोळ, घांट या वाद्यांच्या साथीनें देवाचीं गाणीं गाण्याचा जो कार्यक्रम करतात, तो होय.

★ *भंडार, बेल-दवणा, तेलहंडा व कांदा-वांगें*

[खंडोबाच्या उपासनेंत भंडाराचें महत्त्व फार. भंडार म्हणजे हळदीची पूड. हळद ही सौभाग्यभूषण आणि एक बहुगुणी औषधी म्हणून प्रसिद्ध आहे. अनेक आदिवासी जमातींत हळदीच्या उत्पत्तीच्या लोककथा प्रचलित

आहेत. जखमेवर हळद भरली कीं जखम बरी होते, असा अनुभव असल्यामुळें खेड्यापाड्यांतून हळदीचा व्रणविरोपण म्हणून उपयोग करतात. मुका मार बसून सूज आल्यास तेल-हळद चोळतात. वीरांचे पवाड आणि वगाड, तसेंच वारूंचें अंगावर चाबूक मारून घेणें यांमुळें ज्या जखमा होतात, त्या भंडारानेंच बऱ्या करण्याचा प्रघात आहे. भंडाराचें हें व्रणविरोपक व सांस्कृतिक असें उभयविध महत्त्व जानपदांत रूढ असल्यामुळें, ज्याच्या उपासनेंत व्रणविरोपणाची आवश्यकता भासणारे प्रकार आहेत, त्या मैलाराशीं हळदीचें नातें जानपदांनीं जोडलें असलें, तर त्यांत आश्चर्य नाहीं. मैलाराच्या उपासनेंत रूढ असणाऱ्या भंडाराला पुढें मार्तण्ड भैरवाच्या सुवर्णकांतीची जोड मिळाली असावी आणि भंडाराचें निराळें समर्थन पुढें आलें असावें. खंडोबाला वेल आणि दवणा प्रिय आहे. या दोन्ही वनस्पति शिवसंबद्ध आहेत. खंडोबा हा शिवावतार ठरल्यामुळें त्या त्याच्याहि उपासनेंत रूढ झाल्या.

चंपाषष्ठीच्या आदल्या दिवशीं एका हंड्यांत अनेकांच्याकडील तेल गोळा करून, तो हंडा गडावर न्यावयाचा आणि तें तेल देवाला समर्पण करावयाचें— त्या तेलानें देवाला अभिषेक घालावयाचा, अशी प्रथा जेजूरीला आहे. श्री. खरे या प्रचलित प्रथेवरून खंडोबाचा तेली जातीशीं संबंध असावा, असा अंदाज व्यक्त करतात.[१५]

खंडोबाच्या नैवेद्यांतील कांदा हा धार्मिक दृष्ट्या अत्यंत निषिद्ध असतांना त्याला प्रतिष्ठा कशी लाभली, हा एक प्रश्न आहे. चातुर्मासांत वर्ज्य असलेलीं कांदा व वांगें हीं शाका-फळें चंपाषष्ठीच्या नैवेद्यांत आवर्जून वापरलीं जातात आणि त्या दिवसापासून पुनः चातुर्मास सुरू होईपर्यंत त्यांचें भक्षण निषिद्ध मानीत नाहींत. याचें स्पष्टीकरण विद्यानिधि श्री. सिद्धेश्वरशास्त्री चित्राव पुढीलप्रमाणें देतात :

"कांदा हा पदार्थ धर्मशास्त्रानें निषिद्ध मानलेला आहे. हा भक्षिल्यास पुनरुपनयन करावें, असें सांगितलें आहे. पण खंडोबाचा कांदा हा प्रिय पदार्थ आहे. खंडोबाला कांद्याचा नैवेद्य दाखवावा लागतो. आचारशील ब्राह्मण खंडोबास भरीतरोडग्याचा नैवेद्य दाखवितात व कच्चा पातीचा कांदा देवापुढें ठेवून त्याचा दुरून नैवेद्य दाखवितात. सोवळ्यानें कांद्याला

शिवतहि नाहींत. धार्मिक कार्यांत कांद्याचा संबंध आणीत नाहींत. कांदा खाण्याचा महाराष्ट्रांतील ब्राह्मणांचा आचार बराच जुना दिसतो. याचें कारण माहाराष्ट्रांतील भौगोलिक परिस्थिति होय. इतर बागाइताचा पाण्याच्या अभावीं संभव नसल्यानें व कांद्याचें पीक अशा स्थितींतहि विपुल होत असल्यानें कांदा हा धार्मिक दृष्टचा वर्ज्य असणारा पदार्थ व्यवहारांत आला आणि त्याला खंडोबामुळें धार्मिक साहाय्य मिळालें. खानदेश व वऱ्हाड भागांत कांद्याशिवाय एक दिवसहि चालत नाहीं. उन्हाळ्यामुळें कांदा सतत जवळ बाळगून त्याचा उपयोग करावा लागतो. संयुक्त प्रांत, बंगाल वगैरे भरपूर बागायती प्रांतांत मात्र कांदा सध्यांहि निषिद्ध समजतात. पण राजपुतान्यांत कांदा केव्हांहि खाल्ला तरी चालतो, अशी तिकडे धार्मिक लोकांतहि समजूत आहे. जेजूरीमाहात्म्यांत चंपाषष्ठीला खंडोबाला कांद्याचा नैवेद्य दाखवून जे कांदे खातात, त्यांना कांदा खाण्याचा दोष लागत नाहीं, असें सांगितलें आहे.[१६]

खंडोबाच्या नैवेद्याचा आणखी एक विशेष म्हणजे खंडोबाच्या क्षेत्रांत सामिष नैवेद्यहि चालतो.

*उत्सव आणि यात्रा*

खंडोबाच्या उपासनेंतील दिनविशेष म्हणजे रविवार, सोमवती अमावास्या, चैत्री-श्रावणी-माघी या पौर्णिमा आणि मार्गशीर्ष शुद्ध षष्ठी ( चंपाषष्ठी ) हे होत. रविवार हा भैरवाचा वार. हा वार म्हाळसेच्या स्वतंत्र स्थानांतहि ( नेवासें व म्हाडदोळ येथें ) महत्त्वाचा मानला जातो. खंडोबा हा मार्तण्ड भैरव मानला गेल्यामुळें भैरवाचा रविवार त्याच्याहि उपासनेंत महत्त्व पावला असावा. चैत्री पौर्णिमेस मार्तण्ड भैरवानें अवतार घेतला आणि मार्गशीर्ष शुद्ध षष्ठीस त्यानें मणिमल्लांचा वध करून तो लिंगद्वयरूपानें ऋषींच्या समोर प्रकटला; तसेंच माघी पौर्णिमेस म्हाळसेचा नेवाशास तिम्माशेटच्या घरीं जन्म झाला आणि पौषी पौर्णिमेस पाली इथें तिचा मार्तण्ड भैरवाशीं विवाह झाला. श्रावणी पौर्णिमा हा बाणा-मल्हारी विवाहदिन. या सर्व दिनविशेषांच्या निमित्तानें उत्सव साजरे होतात आणि दर्शनेच्छूंची गर्दी लोटते. समर्थांनीं एका पदांत जेजूरीच्या यात्रेचें यथार्थ चित्र रेखाटलें आहे :

खंडेराव देखिला देव । जन यात्रा मिळाले सर्व ।
काय सांगू नाना वैभव ।।
लोकांची दाटी, स्वारांची दाटी । यात्रेची दाटी, दिवटयांची दाटी ।
दिंडयांची दाटी, वाद्यांची दाटी ।।
ढोल दमामे टाळ माघळ । बुरुग बाके नाना कल्लोळ ।
कर्णे काहाळ मिळविती मेळ ।।
हत्ती किंकाटती, उंट भडकती । घोडे हिंसती, बैल डुरती ।
नामघोषें गर्जताती ।।
कोण कोठें कांहीं कळेना । यात्रेमध्यें तें आकळेना ।
गर्द जाला आश्चर्य मना ।।
पुढें दाटी माघुन दाटी । दोहोंकडे दुकानदाटी ।
अंतराळीं छत्र्यांची दाटी ।।
नंदकोले नाना निशाणें । तळपतातीं माहिनिशाणें ।
छत्रचामरें तीं सूर्यापानें ।।. . . .
नाना ब्रीदांचें तें डफगाणें । नाना भेदाचे दांड भेजणें ।
दाटी होतां होतीं भांडणें ।।
बाजारीं जावें चकित व्हावें । काय घ्यावें, काय न घ्यावें ।
सीमा नाहीं, धन्य वैभव ।।
येकेकडे निवांत माळी । तेथें जावें ते वाळीं भोळीं ।
देवा जाणें निवांत काळीं ।।
रात्रभागीं निवांत वेळा । ठाईं ठाईं गायनकळा ।
वाटे नेणों गाती कोकिळा ।।
दास म्हणे विवेकबळें । सकळांमध्यें परी निराळें ।
तेंचि सुख सर्वां आगळें ।।[१७]

लोकान्तांतहि एकान्त अनुभवणारे आणि एकान्तांत लोकांची चिंता वाहणारे समर्थ जेजूरीप्रमाणें पालीच्या यात्रेंतहि उपस्थित राहिले होते. तेथें शाहिरांच्या कूट-स्पर्धेत ( कलगी-तुऱ्याच्या चढाओढींत ) त्यांनीं म्हटलेलें एक कूटगीत ( डफगाणें ) उपलब्ध आहे.[१८]

कांहीं ठिकाणीं खंडोबाच्या यात्रेंत गाड्यांच्या शर्यती होतात. निंबगांव आणि मालेगांव येथील गाड्यांच्या शर्यती ग्रामीण यात्रिकांत अत्यंत प्रसिद्ध आहेत.

*'येळकोट' गर्जना*

खंडोबाच्या यात्रेंत आणि सर्व उपासनाविधींत 'येळकोट' ही गर्जना होत असते. 'खंडोरायाचा येळकोट', 'सदानंदाचा येळकोट', 'शिवा-मल्हारीचा येळकोट' असे उद्‌घोष सारखे कानांवर येत असतात. 'येळकोट' हा शब्द येळु (सात) आणि कोटि (प्रकार किंवा कोटि ही संख्या) असे दोन शब्द मिळून झाला आहे. 'एळ्कोटि महादेव' आणि 'एळ्कोटि तपोधन' असे याचे प्राचीन लैखिक उल्लेख आढळतात. मार्तण्ड भैरवाचें सैन्य सप्तकोटि गणांचें होतें, त्यावरून ही घोषणा वापरली जात असावी, असें सांगितलें जातें. पहिल्या प्रकरणांत आपण सप्तकोटीश्वर, सप्तर्षि, सप्तमलय, सप्तकोटिगण, सातशें मेंढया, सात कुत्रे इत्यादि बाबींचा विचार करतांना 'सात' ही संख्या कुठल्या तरी सांकेतिक अर्थानें पावित्र्य पावून मैलाराच्या उपासनेंत व चरित्रांत स्थान पावली असल्याचें पाहिलेंच आहे. या घोषणेसंबंधीं श्री. ल. गो. घाणेकर 'प्राचीन द्राविड' या पुस्तकांत लिहितात:

"This cry is raised when a tray, with coconut in it, is lifted in memory of the temple originally built by the Jain minister Racha Rasa, a minister of a Kalachurya king. The same cry is raised when a lamp is shown to the West, i. e., the temple of Yella-kuta."[१९]

या उताऱ्यांत उल्लेखिलेला राचरस (रेचरस?) प्रधान आणि येल्ल-कूट-मंदिर यांचा विशेष शोध घ्यावयास हवा.

'येळकोट' प्रमाणेंच 'चांगभले' ही गर्जनाहि रूढ आहे. ही गर्जना भैरव, ज्योतिबा यांच्या उपासनेंतहि आहे. कानडींत 'सांगु भलो' (स-च यांचा अभेद) अशा स्वरूपांत ही गर्जना वापरतात. 'चांग' आणि 'भला' हे दोन्ही एकार्थी शब्द आहेत. श्री. द. रा. बेंद्रे हे या घोषणेच्या मागें 'चंद्र-भद्र' या लुप्त देवतेचें मूळ दडलें आहे, असें मानतात. सिंधमध्यें 'चंगो भलो' हा स्वस्तिवाचक उद्‌गार आहे आणि त्याचा उपयोग नमस्काराच्या वेळीं

करतात. श्री. भास्करराव जाधव यांचा असा कयास आहे कीं, "ज्योति (ज्योतिबा) ही देवता सिंधमध्यें रूढ असून, ज्योतिबा हें त्याच देवतेचें स्थान आहे. या ज्योति देवतेबरोबर 'चांग भले' ही गर्जना इकडे आली."[२०]

*उपासनेचें जानपद स्वरूप*

आतांपर्यंत आपण पाहिलेलें खंडोबाच्या उपासनेचें स्वरूप जानपद आहे, हें निश्चित. त्या उपासनेंतील निखळ सकामता, मुलें वाहणें—बगाड घेणें- इंगळांवरून चालणें- चाबूक मारून घेणें- मांडींत वा पिंढरींत शस्त्र आरपार खुपसणें हे प्रकार दैवतोपासनेचें आदिमस्वरूप व्यक्त करणारे आहेत. अर्थात् खंडोबाची बहुजनप्रियता टिकून आहे ती उपासनेच्या या पातळीमुळेंच. खंडोबाची लोकप्रियता आणि विठोबाची लोकप्रियता यांत मूलभूत भेद आहे. त्या भेदाचें स्वरूप समजावून घेण्यापूर्वीं खंडोबाच्या लोकप्रियतेचें समग्र दर्शन घ्यावयास हवें.

## संदर्भ-टीपा


१. दासोपंत दिगंबर (अॅबट-संपादित), पृ. २४.
२. योगसंग्राम १२.९५ व १४.६९.
३. नवभारत, जुलै १९५७, पृ. ९.
४. महाराष्ट्राचीं चार दैवतें, पृ. १५७.
५. देशीनाममाला ६.१३५.
६. योगसंग्राम, १४.५४-५९.
७. योगसंग्राम १५.९.
८. चैतन्य अॅण्ड हिज् कंपॅनियन्स, पृ. २५६-२५७.
९. योगसंग्राम १४.११४.
१०. दिनकरांची स्फुट कविता, पृ. ११५-११६.
११. श्रीसमर्थांचा गाथा, पृ. ३५३.
१२. गोरखबोध, ४.९२-१०० (श्री. ना. ब. जोशी यांच्या संग्रहांतील हस्तलिखितावरून).

१३. योगसंग्राम १५.२७.
१४. महाराष्ट्राचीं चार दैवतें, पृ. ९७.
१५. महाराष्ट्राचीं चार दैवतें, पृ. १६६.
१६. दे. ऋ. ब्रा. परिचय-ग्रंथ, पृ. १३२-१३३.
१७. श्रीसमर्थांचा गाथा, पृ. ३५३-३५४.
१८. श्रीसमर्थांचा गाथा, पृ. ४९८.
१९. प्राचीन द्राविड, पृ. १३३.
२०. मराठे आणि त्यांची भाषा, पृ. ४३-४८.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
अनुक्रम ३९८४९ वि: भ्र-प्रवास
क्रमांक ३०८ नों दि: १२/१२/८१

# खंडोबाची लोकप्रियता

*संतांचा खंडोबाविषयक दृष्टिकोन*

पहिल्या प्रकरणांत खंडोबाविषयक प्रतिक्रियेचें ओझरतें दर्शन आपण घेतलेंच आहे. कर्नाटकांत प्रथम वीरशैवांनीं मैलाराला विरोध केला, त्याच्या क्षुद्रतेचा निषेध केला; परंतु पुढें लिंगायतांनीं त्याच्या पूजे-अर्चेची व्यवस्थाच आपल्याकडे घेतली. महाराष्ट्रांत ज्ञानेश्वरांच्या काळांत खंडोबाविषयक दृष्टिकोन नेमका काय होता, हें कळायला साधनें उपलब्ध नाहींत. महानुभावांची प्रतिक्रिया सर्वच संप्रदायबाह्य देवतांविषयीं विरोधाची असल्यामुळें 'मैराळा'च्या वाढत्या प्रस्थाविषयीं त्यांनीं व्यक्त केलेली खंत विचारांत घेण्याचें कारण नाहीं. त्या काळापासून महाराष्ट्रांत म्हाळसा-मैराळ यांची उपासना झपाट्यानें मूळ धरीत होती, एवढें मात्र खरें. ज्ञानेश्वरांनंतरचें अस्मानी-सुलतानींतील मराठी वाङ्मय अभावानेंच उपलब्ध असल्यामुळें त्या काळांतील महाराष्ट्रांतील खंडोबाच्या भक्तीचा विस्तार व संतांची तद्विषयक दृष्टि कळायला मार्ग नाहीं.

एकनाथ-काळापासून मात्र खंडोबाविषयक उद्गार—अनूकूल वा प्रतिकूल—संत-वाङ्मयांत आढळतात. एकनाथ-काळांत शेख महंमद श्रीगोंदेकरांनीं खंडोबाचा आणि त्याच्या उपासनेच्या स्वरूपाचा तीव्र निषेध व्यक्त केला आहे. शुद्ध विवेकनिष्ठा आणि मुक्त चिंतनशीलता हे कबीराचे गुणविशेष घेऊन महाराष्ट्रांत अवतरलेल्या या अविंध संतानें लोकसंग्रहाच्या लालसेपायीं असत्याशीं व अनाचाराशीं तडजोड करण्याचें नाकारलें आहे. ज्यांना केवळ चिन्तन करावयाचें असतें—विचारांची निर्मिति करावयाची असते, त्यांना हें जमतेंहि. परंतु ज्यांना लोकांना विवक्षित मार्गानें नेण्याचें कार्य करावयाचें असतें, त्यांना लोकांच्या वृत्ति-प्रवृत्तींशीं मिळतें-जुळतें घ्यावें लागतें—थोडी तडजोड करणें भाग पडतें. या दोन प्रकारच्या महापुरुषांचें ताजें उदाहरण म्हणजे टिळक-आगरकरांचें. याच दृष्टीनें एकनाथांनीं, मनांतून नापसंती असतांनाहि, खंडोबाच्या उपासनेच्या उन्नयनाचा हेतु

ग्रा. क्र. १२२११



ठेवला आहे. केवळ धिक्कार करतां आहे त्यांतूनच आत्मशुद्धीची वाटचाल कशी करतां येईल, हे त्यांनीं सांगितलें. पुढच्या काळांत " बहिरव खंडेराव । रोटीसुटीसाठीं देव ।। " अशा प्रकारचे कांहीं उद्‌गार ऐकूं येत असले, तरी खंडोबाविषयींच्या प्रामाणिक भक्तीनें लिहिलेलीं अनेक भक्तिगीतें संतांच्या स्फुटकाव्यसंभारांत आढळतात. अर्थात् त्या भक्तिगीतांतून त्यांनीं 'पाहिलेल्या' खंडोबाचें दर्शन आहे- प्रत्यक्ष खंडोबाचें नाहीं. म्हणजे असें कीं, संतांनीं आपल्या भक्तिरंजित दृष्टींतून खंडोबाचें जें स्वरूप पाहिलें आणि रंगविलें, तें आध्यात्मिक रूपकांच्या स्वरूपाचें आहे. खंडोबाच्या क्षेत्रांतील उपासनेचें बाह्य स्वरूप पाहून संतांच्या मनांत घृणाच उत्पन्न होत असे, असें मानायला लावणारे उद्‌गारहि एकनाथोत्तर संतवाङ्मयांत आहेतच.

पुढें कांहीं संतांच्या खंडोबाविषयक उद्‌गारांचा स्थूल परिचय दिला आहे, त्यावरून त्यांच्या खंडोबाविषयक दृष्टिकोनाचें स्वरूप स्पष्टपणें प्रत्ययास येईल.

*एकनाथ*

महाराष्ट्रांतील थोर संतकवि एकनाथ (श. १४५५-१५२१) हे अस्मानी-सुलतानींत उद्‌ध्वस्त झालेल्या मराठी लोकमानसाचे संजीवक समजले जातात. त्यांची परमार्थ-दीक्षा दत्तपरंपरेंतील, परंतु त्यांच्या कार्यामुळें उजळा मिळाला वारकरी परंपरेला. नाथ परंपराहि त्यांना आपला अग्रणी मानते. एकनाथांनीं भारुडांची रचना करून क्षुद्रोपासनेंत रंगलेल्या मराठी लोकधर्माला परमार्थाचें अधिष्ठान देण्याचा विराट् प्रयत्न केला. विविध देवतांच्या उपासनेंतील असंस्कृत जनांना त्यांनीं रूपकांच्या द्वारां अध्यात्माचें अमृत पाजलें आणि त्या अमृतपानाच्या द्वारां त्या असंस्कृत उपासकांची आपल्या देवतेकडे पाहण्याची दृष्टि उन्नत बनावी, अशी अपेक्षा राखली. गोंधळी, भुत्ये, बाळसंतोष, भराडी, जोगी, इत्यादींवरील रूपकांप्रमाणेंच त्यांचीं वाघ्या-मुरळ्यांवरहि रूपकें आहेत.[१] या रूपकांत नाथांनीं त्यांची उपासनेंतील अनिष्टांविषयींची नापसंतीहि सूचित केली आहे. वाघ्याच्या भूमिकेंतून नाथ म्हणतात :

अहं वाघ्या सोहं वाघ्या प्रेम नगारा वारी ।
सावध होउनि भजनीं लागा देव करा कैवारी ।।

मल्लारीची वारी माझ्या मल्लारीची वारी ।।
इच्छा मुरळीस पाहूं नका पडाल नरकद्वारीं ।
बोधबुधली ज्ञानदिवटी उजळा महाद्वारीं ।।
आत्मनिवेदन रोडगा निवतील हारोहारीं ।
एका जनार्दनी धन्य खंडेराव त्यावरि कुंचा वारी ।।

दुसऱ्या एका 'वारी'वरील रूपकांत नाथ जेजूरीच्या खंडेरायाच्या दर्शनाची आस व्यक्त करतांना म्हणतात :

वारी वो वारी । देई कां गा मल्हारी ।
त्रिपुरारि हरि । तुझे वारीचा मी भिकारी ।।
वाहन तुझें घोड्यावरील । वरी बैसली म्हाळसा सुंदरी ।
वाघ्या मुरळी नाचती परोपरी । आवडी ऐसी पाहीन जेजूरी ।।

परंतु ही जेजूरी-यात्रा करणाऱ्या नाथांची मूळ भूमिका मात्र यत्किंचितहि शिथिल होत नाहीं. जेजूरीला जातांना—

ज्ञान कोटंबा घेउनी आलें द्वारीं ।
बोध भंडार लाविन परोपरीं ।।
एका जनार्दनी विनवी श्रीहरि ।
वारी देउनी प्रसन्न मल्हारी ।।

अशी नाथांची मानसिक बैठक आहे. त्यांच्या खंडोबाविषयक समग्र उद्‌गारांचें निरीक्षण केलें, तर त्यांच्या मनांत खंडोबाच्या उपासनेच्या उन्नयनाची तळमळ तीव्र आहे, हें सहज दिसून येतें.

*समर्थ रामदास*

समर्थ रामदास ( श. १५३०-१६०३ ) हे शिवकालीन स्वातंत्र्ययुद्धांतील वैचारिक जागृतीचे नेते आणि प्रवृत्तिनिष्ठ संत म्हणून मराठी संतमंडळांत प्रसिद्ध आहेत. शिवकाळांत खंडोबाच्या लोकप्रियतेनें उत्कर्ष गांठला होता. खंडोबा हा वीरवृत्तीचा देव असल्यामुळें आणि त्याच्या भक्तीनें बहुजन भारावलेले असल्यामुळें लोकसंग्राहक समर्थांना पाली-जेजूरीच्या यात्रेंत सामील होणें अपरिहार्य होतें. त्यांनीं आपल्या एका पदांत जेजूरीच्या प्रचंड यात्रेचें वास्तव चित्र रेखाटलें आहे, तर दुसऱ्या एका पदांत पालीच्या यात्रेंत शाहिरांच्या कलगीतुऱ्याच्या स्पर्धेत स्वत: टाकलेलीं कूटें वर्णिलीं आहेत. शिवाचा अवतार

असलेल्या या देवाचें वर्णन करतांना ते एका पदांत म्हणतात :

देव शिवाचा अवतार। जाउनि बसला गडावर ।।
एक निळ्या घोड्यावर। एक ढवळ्या नंदीवर ।।
एका विभूतीचें लेणें। एका भंडार-भूषणें ।।
रामदासीं एक जाला। भेदभाव तो उडाला ।।

खंडोबाच्या यात्रेंत 'अंदु हत्तीचे तुटती' यांसारखे जे चमत्कार घडत आणि देव नवस पुरवितो, या प्रतीतीनें भक्त जे नवस-फेडीचे प्रयत्न करीत, त्यांचीं वर्णनेंहि समर्थांनीं अनेक पदांत केलेलीं आहेत.[२]

देशोदेशींचा जन उदंड येतो।
नाना प्रकारें नवस फेडितो।
देव त्याचे लळे पाळितो ।।

हें जें देवाचें वैभव आहे, त्याचें समर्थांना आकर्षण फार. खंडोबाच्या उपासनेंतील अनिष्टांची त्यांना जाणीव आहे, परंतु 'देशोदेशींचा उदंड जन' देवाविषयींच्या दृढ श्रद्धेनें एकत्र येतो, याचा त्यांना, त्यांच्या त्या 'उद्ध्वस्त' काळांत, विशेष आनंद होणें स्वाभाविक आहे. जेजूरीवर आलेलें 'तुरुकां'चें आक्रमण मल्लुखान देवानें रात्रींच्या वेळीं कसें परतवून लावलें, याचें भरघोस वर्णन समर्थांनीं एका पदांत केलें आहे :

महीपति कळेना गति। पाहों जातां सामर्थ्य किती।
करामती दावी आजि मती ।।
तुरुक मातले, फोडाया गेले। भोंगे उठिले, तेहीं पिटिले।
कोणें नेणों मार्गीं कुटिले ।।
श्वानासारिखीं एक भुंकतीं। तोंडें वांकडीं, कंप सूटती।
पिसाळले, विष्ठा भक्षिती ।।
हत्ती घोडे बहु मारिले। थोर लोक भूमीं काढिले।
तांति वाहणा बाजीद जाले ।।
ऐसी हे लीळा कळे ना कळा। कळा विकळा धाक सकळां।
थोर थोर म्हणती पळा ।।
मल्लुखान देव मल्लारी। रात्रिभागीं चाबुक मारी।
तोंडें सुजतीं पैजारांवरी ।।

गर्व जातां ते बराबरी। संतोषतां न्याहाल करी।
दास म्हणे करा चाकरी ।।

या पदांत वर्णिलेली तुरुकांना रात्रींच्या वेळीं अंधारांत पिटून काढल्याची घटना ऐतिहासिक असावी, असें त्यांतील वर्णनाच्या ढंगावरून वाटतें. 'भोंगे' (भुंगे) उठण्याचा प्रकारहि योजनापूर्वक घडविलेला असावा, असा वास येतो. मल्लूखान देव असा दुर्जनांना हैराण करणारा असल्यामुळेंच समर्थांची त्याच्यावर भक्ति आहे. शिवाय त्यांच्या मल्लारिभक्तीचें आणखी एक रहस्य असें आहे कीं, रामनाम जपणाऱ्या महादेवाचा खंडेराव हा अवतार आहे—म्हणजेच रामभक्तीच्या क्षेत्रांतील तो 'पुरोगामी' आहे :

रामनाम जपतो महादेव। त्याचा अवतारी हा खंडेराव ।।
हळदीचीं भंडारें उधळिती। तेणें सोन्यारुप्याचीं भांडारें भरतीं ।।
मणिमल्लमर्दन देव। एका भावें भजतां मार्तंड भैरव ।।
म्हाळसा बाणाई सुंदरी। मध्यें शोभे भूषणमंडित मल्लारी ।।
अखंड रणनवरा त्यासी भंडारें प्रीती। रोकडी प्रचीति जनांमध्यें दाखवी ।।
तषास भजतां भक्त होताती खवी ।।
भक्त कुतरे वाघे अंदु तोडिती। दुर्जनाची तत्काळ होतसे शांति ।।

*केशवस्वामी भागानगरकर*

केशवस्वामी (समाधि : श. १६०४) हे दास-पंचायतनांतील एक संतकवि. समर्थकालीन संतकवींत यांचा अधिकार मोठा आहे. यांनीं आपलें परमार्थ-जीवन स्फुट रचनेंत व्यक्त केलें आहे. त्यांचें खंडोबाविषयींचें एक पद त्यांच्या कविता-संग्रहांत आढळतें :

उधळित भव-भंडारासी। नाचत आलों तुजपाशीं ।।
मल्हारी भवभ्रम वारी। पडलों तुझिया दरबारीं ।।
देउनि केवळ पदथारा। बरवें रक्षी दातारा ।।
सेवुनि वारी प्रेमाची। आवडि धरिली नामाची ।।
अनुभव-जेजुरिराया रे। करि केशवकविवरि छाया रे ।।[३]

केशवस्वामींची या पदांतील भूमिका शुद्ध परमार्थाची आहे. भव-भंडाराची उधळण करीत ते जेजूरीरायापाशीं नाचत जातात, त्याच्या दर-बारांत दंडवत घालतात आणि त्याला विनवितात कीं, "प्रेमाची वारी सेवून

मीं तुझ्या नामाची आवडी धरली आहे– तूं या केशवकवीवर कृपादृष्टीची पांखर घाल."

केशवस्वामी ज्या जेजूरीरायापुढें विनीत होतात, तो साक्षात् परमानुभव आहे–त्या परमप्रतीतीसाठींच त्यांचें मन भुकेलेलें आहे.

*रंगनाथस्वामी निगडीकर*

रंगनाथस्वामी निगडीकर ( श. १५३४-१६०६ ) हेहि दास-पंचायतनांतील प्रंतकवि. यांची परमार्थदीक्षा आनंद परंपरेंतील होती. यांच्या स्फुट रचनेंत एक 'मार्तण्डाष्टक' आहे.[४] मार्तण्ड भैरवाचें अवतारकार्य सांगतांना रंगनाथस्वामी म्हणतात :

घेतां हा अवतार दुष्ट दमुनी, सद्भक्त संरक्षिले ।
गाई, ब्राह्मण, योग, याग सकळै हे धर्म संस्थापिले ।।
गाती भक्त ऋषी मुनी गण सदा सत्कीर्ति ऊदंड हो ।
तो हा पाहुं चला कृपाजलनिधी मल्हारि मार्तंड हो ।।

या अवतार-कार्यवर्णनांत समकालीन वातावरणाचा रंग सांडला आहे, असें वाटतें. 'सकळै', 'ऊदंड' हे समर्थांचें स्मरण करून देणारे शब्द रंगनाथस्वामींच्या समर्थानुसरणाला साक्षी आहेत. खंडोबाच्या क्षेत्रांची गणना करतांना पहिलें पेंबर, त्यानंतर पाली, तिसरें नळदुर्ग आणि चौथें जेजूरी असा क्रम रंगस्वामी सांगतात. त्यांची अशी सश्रद्ध धारणा आहे कीं–

ऐशा या कुलदैवतासि नमुनी जो नित्य भावें भजे ।
त्याला काय उणें ? न मागत तरी अप्राप्त तेंही दिजे ।।

*दिनकरस्वामी तिसगांवकर*

दिनकरस्वामी तिसगांवकर ( सुमारें श. १५५०-१६२० ) हे समर्थांचे एक प्रख्यात शिष्य. यांचा 'स्वानुभवदिनकर' हा ग्रंथ समर्थांच्या 'दासबोधा'च्या खालोखाल महत्त्वाचा आहे. सखोल अनुभूति, मूलगामी चिन्तन आणि भाषेचें मर्मस्पर्शी रोकडेपण या दृष्टीनें त्यांचा हा ग्रंथ वाचनीय आहे. अर्थात् त्यांची भाषा कमावलेली आहे. तिच्यांत समर्थांच्या भाषेचें खडबडीतपण मुळींच नाहीं. दिनकरस्वामींनीं स्फुट रचनाहि बरीच केली आहे. खंडोबा हें त्यांचें कुलदैवत आणि श्रीरामचंद्र हें त्यांचें उपास्य दैवत. आपली अभिजात अध्यात्मप्रवणता, समर्थांच्या दीक्षेची प्रतिष्ठा आणि उत्कट

रामभक्ति यांच्याशीं यत्किंचितहि प्रतारणा न करतां त्यांनीं आपल्या कुलदेवतेचा गौरव गाइला आहे. त्या गौरवामागची दिनकरस्वामींची बैठक अत्यंत उदात्त आहे. 'स्वानुभवदिनकरा'च्या प्रारंभीं कुळदैवताला वंदन करतांना ते म्हणतात :

आतां परमप्रीतीचिया योगें । कुळदैवत वंदूं सर्वांगें ।
तरों तयाचिया संगें । भवसमुद्र हा ।।
जो सदैव देह जेजुरीनिवासिया । माया-म्हाळसाविलासिया ।
तया आत्मराज खंडेराया । नमन सद्भावें ।।
सज्ज करूनि विवेकपर घोडा । हातीं घेऊनि सतेज ज्ञानखंडा ।।
कामक्रोधादि मणिमल्ल होडा । वधिले ससैन्य ।।
उधळलें प्रेम भंडार । उभे सप्तकोटि गणपरिवार ।।
जे दैवी संपदेचे नर । वळकटपणें ।।
ऐसें आद्यन्त घवघवीत ध्यान । देखोनि दिनकर सुखसंपन्न ।
लाहोनि निजकृपावरदान । स्वानुभवदिनकरीं संतृप्त ।।[५]

दिनकरस्वामींच्या देहजेजूरींत राहणारा हा 'आद्यन्त घवघवीत' असणारा आत्मराज-खंडेराय विवेकाच्या घोड्यावर बसून ज्ञानखड्गानें कामक्रोधादि मणिमल्लांना ससैन्य नष्ट करणारा असल्यामुळें तो त्यांच्या परमश्रेयाशीं सर्वथा एकरूप आहे. किंबहुना आपल्या परमश्रेयाचें प्रतीक म्हणूनच त्यांनीं खंडेरायाकडे पाहिलें आहे.

'स्वानुभवदिनकरां'त पुढें एकादशरुद्रांची चर्चा करतांना दिनकर-स्वामींनीं मार्तण्ड भैरवाची एकादश रुद्रांत गणना केली आहे. हे एकादश रुद्रहि योगप्रक्रियेचीं प्रतीकें म्हणूनच वर्णिले आहेत. नाद-त्र्यंबकभैरव, बिंदु-पिनाकभैरव, कळा-काळभैरव, ज्योति-कपाळी भैरव, रूप-कपर्दी भैरव, रेखा-हरभैरव, स्वर-वृषभध्वज भैरव, वर्ण-धूर्जटी भैरव, हे अष्ट भैरव आणि खंडेराव, हनुमंत, व मुख्य महारुद्र हे अनुक्रमें अ, उ, म या ॐ कारमात्रांचीं प्रतीकें. येथें अ-कारात्मक मार्तण्ड भैरवाला ते 'बहुरूपी' म्हणतात आणि ग्रंथारंभींच्या रूपकाप्रमाणेंच त्याच्या स्वरूपावर प्रदीर्घ आध्यात्मिक रूपक[६] मांडतात :

जो कैवल्यजेजुरीनिवासिया । मायाम्हाळसाविलासिया ।

निजप्रकृतिबाणाईचिया । सुंदरपणा भाळला ।।
भुलोनि तिला निजांगीं धरिलें । मायाम्हाळसेसी रुसविलें ।
मग तिजलागीं पाठीसी घातलें । निजवक्रगतीं ।।

या रूपकांत दिनकरस्वामींनीं बाणाईच्या प्रीतिकथेला विलक्षण उंची प्राप्त करून दिली आहे. बाणाईला ते परमात्म्याची निजप्रकृति मानून जेव्हां 'भुलोनि तिला निजांगीं धरिलें । मायाम्हाळसेसी रुसविलें' असें म्हणतात, तेव्हां त्यांच्या शब्दांत रसिकता, कल्पकता आणि प्रतीति यांचें रसायन प्रकट होतें. खंडोबाच्या स्वरूपावरील हें रूपक १५ ओव्यांत विस्तारलें आहे. त्यापुढें, ज्या गडावर खंडोबा राहतो त्या गडाला 'अष्टांगगड' असें यौगिक नांव दिलें आहे आणि त्या अष्टांगगडाचें, त्यांतील मार्तण्ड भैरवाच्या मंदिराचें व मंदिराच्या गर्भगृहांतील मूर्तीचें वर्णन योगप्रक्रिया व समाधि-सुख यांच्या रूपकाच्या स्वरूपांत केलें आहे. या रूपकात्मक वर्णनाचा उप-संहार करतांना दिनकरस्वामी लिहितात :

ऐसा कैवल्यजेजुरीनिवासिया । त्याची उपासना परिच्छिन्न विचारूनियां ।
स्वानुभवदिनकरीं जाला सुखिया । दिनकर रामदास ।।

दिनकरस्वामींनीं मार्तण्ड भैरवाच्या स्वरूपाची जी ही 'परिच्छिन्न : विचारणा' केली आहे, ती त्यांच्या समर्थानुयायित्वाला आणि परमानु-भवाला सर्वथा साजेशी आहे.

दिनकरस्वामी हे 'रोकड्या प्रचीती'चे बोल बोलणाऱ्या समर्थांचे शिष्य. समर्थांनीं रामाचें गुणगान करतांना प्रत्यक्ष रामालाहि छेडलें आहे. "पूर्वीच्या युगांत तूं दैत्यदलन केलेंस हें ठीक झालें. परंतु आतां जे दैत्य मातले आहेत, त्यांचा विनाश करून तूं जर रोकडा प्रत्यय देशील, तरच तुझें ब्रीद खरें ! ' असें त्यांनीं रामचंद्राला दटावलें आहे. दिनकरस्वामींनींहि एका अभंगांत आपल्या कुलदेवाला कसोटीवर धरलें आहे. खंडेराय हा नवसाला पावणारा देव, अशी त्याची ख्याति. दिनकरस्वामींचाहि एक नवस आहे–त्यांना हवा आहे राम. खंडेराय जर त्यांना रामाची जोड करून देईल, तरच त्याची नवसाला पावण्याबद्दलची कीर्ति खरी :

विनवितों देवा तुज खंडेराया । मनोरथां माझिया पूर्ण करीं ।।
पूर्ण करी माझे मनोरथ आतां । राघवीं तत्त्वतां मन रंगो ।।

मन रंगो रामीं काया वाचा जीवें । आणीक न भावें तयावीण ।।
तयावीण दुजें नावडे आणीक । देई तेंचि एक महीपति ।।
महीपति इच्छा करितील पूर्ण । देव्हारा मांडीन तरी तुज ।।
तुज कुळदेव कुळींचा करीन । माझी इच्छा पूर्ण जरी होय ।।
जरी होय मन राघवीं निमग्न । तरी तूं सर्वत्र खंडेराया ।।
खंडेराया फार आहेसी सत्त्वांचा । तरी हा इच्छेचा पांग फेडी ।।
पांग फेडी माझा रामरायाच्या भजनें । जरी असें घेणें नवसासी ।।
नवस घेऊनि वासना पुरविसी । ठेंगणे कीर्तीसी भुवनत्रय ।।
भुवनत्रयीं कीर्ति वाढेल अपार । म्हणे दिनकर रामदास ।।[७]

—आन्तर-खंडेरायाच्या दर्शनानें मत्त होणारे दिनकरस्वामी येथें बाह्य खंडेरायाला छेडीत आहेत, असें वाटतें.

*मध्वमुनीश्वर*

मध्वमुनीश्वर ( समाधि : श. १६५३ ) हे नाशिकचे संतकवि. पदकार म्हणून यांची ख्याति आहे. उच्च पारमार्थिक अनुभूतीमुळें त्यांना सर्व देवतांच्या स्वरूपांत एकच तत्त्व प्रत्ययास येई. अनेक देवदेवतांवर व तीर्थ-क्षेत्रांवर त्यांनीं पदें लिहिलीं आहेत. खंडोबाविषयींचीं सात पदें त्यांच्या कविता-संग्रहांत संकलित झालेलीं आहेत.[८]

एका पदांत स्वतः मध्वमुनीश्वर मल्लारि बनले आहेत आणि—

मनाच्या तुरंगावरी स्वार झालों ।
अहंकारमल्लासि मारूनि आलों ।।

असा आत्मविजय उद्घोषित करीत आहेत. त्यांच्या पदांत खंडोबाचीं मार्तण्ड, महीपति, मैराळ, हयपति, महीपाळ, मालोजी, खंडेराय, मल्लूखान अशीं नांवें आलेलीं आहेत. खंडोबाच्या चरणीं आत्मनिवेदन करतांना ते विनयानें म्हणतात :

पायन्यांपुढें लोटांगण घालीन । हयपति तुझा तेजी प्रक्षालीन ।
उजळुनि दिवटी अज्ञान जाळीन । आज्ञा श्रीमध्वनाथाची पाळीन ।।

हा तुरंगामावर बसलेला आणि हातीं फिरंग ( खंडा ) धारण करणारा मैराळ कळिकाळाला दूर करणारा आहे, अशी ग्वाही मध्वनाथ देतात. प्रेमपूर आणि जेजूरी या दोन्ही स्थानांचा उल्लेख त्यांनीं केला आहे. एका

हिंदी पदांत त्यांनीं मल्लूखानाचा पराक्रम वर्णिला आहे :

जय जय भैरव मल्लूखान ।।
खंडेराय महाबलि महीपति । शंकरजी भगवान ।।
जेर किया मणिमल्ल महासुर । मारा है बैमान ।।
जेजुरीमें महाराज विराजत । होत महा घमशान ।।
सुरनरकिन्नर महलके आगे । ठाडे है दरवान ।।
अनहृत निरंतर वाजे बजंतर । धमकत भेरि निशान ।।
मध्वनाथका सीस चरनपर । लागा है दिलध्यान ।।

मध्वमुनीश्वरांची खंडोबावरील आरती उपासकांनीं प्रचारांत आणण्यासारखी आहे. ती आरती खालीं संपूर्ण देत आहें :

मस्तकिं मुगुट अंगीं सोन्याचा शेला ।
हस्तकिं खड्गा घेउनि मारिसि मणिमल्ला ।।
कैलासाची प्रतिमा जेजुरचा किल्ला ।।
बैसोनियां रक्षिसि दक्षिणचा जिल्हा ।। १ ।।
जयदेव जयदेव जय खंडेराया ।
अखंड भंडारानें डवडवली काया ।।
चंपाषष्ठीचा जे करिती कुळधर्म ।
त्यांचे होत आहे परिपूर्ण धर्म ।।
ज्यांना न कळे तूझ्या भक्तीचें वर्म ।
त्यांचें तोडित आहे कळिकाळ चर्म ।।२ ।।
तूझे भक्तीविन्मुख जे ते कौरव ।
जिकडे तूझा धर्म तिकडे गौरव ।।
मध्वनाथ जपतो येळकोट भैरव ।
निंदा करिती त्यांना होती रौरव ।। ३ ।।

*अमृतराय*

अमृतराय ( श. १६२०-१६७५ ) हे विख्यात प्राचीन पदकार. त्यांच्या पदांची अमृतमोहिनी कीर्तनपरंपरेंत विशेष दिसते. कटाव-रचनेमुळें प्राचीन मराठी स्फुट कवितेंत त्यांना एक विशेष स्थान मिळालें आहे. " जय महादेव जय महादेव जय महादेव बोला ! " अशा ध्रुवपदानें सुरू होणाऱ्या एका

शिवपर पदांत त्यांनीं "मल्हारीचें रूप धरी, म्हाळसेसि विश्राम" असें शिवाचें वर्णन केलें आहे. खंडोबाविषयीं त्यांचें एक स्वतंत्र पद आहे :[९]

जय जय मल्लारी । तूं अमुचा कैवारी ।। ध्रु० ।।
विधि हर सुर नर तुजला ध्याती । आदि करुनि शैलारी ।।
चंपाषष्ठी कुळधर्मीं जन । अर्चितात कल्हारीं ।।
देव्हाऱ्यावरि वसवुनि पुजितो । नंदाचा खिल्लारी ।।
अमृतेश्वर निजदरिद्र शत्रु । ठोकितसे कैलारी ।।

या पदांत भक्ति किंवा चिंतन यापेक्षां निरर्थक शब्दांचाच खेळ अधिक आहे. अमृतराय या नांवाच्या प्रतिष्ठेला साजेसें 'अमृत' यांत अंशत:हि जाणवत नाहीं.

*निरंजन माधव*

निरंजन माधव ( अठरावें शतक ) हे पेशवाईंतील कवि. पहिल्या बाजीरावाच्या आश्रयांत यांचें पूर्वायुष्य गेलें. यांची ग्रंथरचना श. १६५७ ते १६९० या काळांतील आहे. यांच्या कविता-संग्रहांत जो विपुल आणि विविध स्तोत्र-संभार आहे, त्यांत 'श्रीमल्लारिस्तोत्रराज' नांवाचें ४४ कडव्यांचें प्रदीर्घ स्तोत्र आहे.[१०] निरंजन माधवांचें हें मल्लारि-स्तोत्र अभ्यसनीय आहे- उपासकांच्या मनाची पकड घेणारें आहे. निरंजन माधव मल्लारीच्या स्वरूपांत परमात्म्याचा प्रत्यय घेतात आणि त्या प्रतीतीमुळेंच—

तूं विश्वंभर, तूं परात्परगुरु, तूं आद्य सर्वां जनां ।
कल्पांतीं तुझिया स्वरूपसरिते ये विश्व हें मज्जना ।।

असें ते मल्लारीच्या कर्तुमकर्तुमन्यथाकर्तुम्-शक्तीचें वर्णन करतात. मल्लारीच्या मणि-मल्ल-विजयाची कथा स्मरतांच निरंजन माधव म्हणतात :

आले त्यां अभया दिलें, करुनियां शत्रूंसि उन्मूलना ।।
ऐसा हा अवतार केवळ तुझा दीनांचिया पालना ।।

मल्लारीच्या स्वरूपाची आणि चरित्राची महती गाणारे निरंजन माधव मल्लारीच्या चरणांजवळ आत्मोद्धाराची याचना करतात—आत्मशुद्धीची प्रेरणा मागतात :

मोठासा मणिमल्ल दुष्ट वधिला त्वां ज्या प्रतापें तरी ।
तो होता विबधां बुधासि वळसा देणार त्या अंतरीं ।।

तैसा पातकदैत्य हा विकसतो मद्देहवासी वधीं ।
तेव्हां त्वत्पुरुषार्थ मानिन खरा, दुःखासि तूं आवधी ।। '

निरंजन माधवांची ही ' रोकडया प्रचीती 'ची मागणी हृद्य आहे- समर्थांचें स्मरण करून देणारी आहे. शिवावतार मल्लारीचें वर्णन करतांना भिकारी शिव आणि भूपति मल्लारि यांचा रूपभेद निरंजन माधवांनीं कौशल्यानें वर्णिला आहे :

कोठें तो तव वृद्ध बैल ? हय हा कैंचा तुवां आणिला ?
कोठें मूठवळी ? सुवर्णमणिचा हा जीन पालाणिला !
कैं खट्वांग जुनें घुणें लिबडिलें ? हें खड्ग कैंचें करीं ?
भिक्षापात्र त्यजोनि, भूपति कसा झालासि बा ! लौकरीं ?

हें रूपभेदाचें वर्णन चर्म-दिव्यवस्त्र, मुंडमाळा-मौक्तिकमाळा, शवभस्म-भंडार, सर्पवलयें-ग्रैवेयकें कुंडलें, जटामुकुट-सुवर्णमुकुट इत्यादिकांच्या सहाय्यानें रंगविलें असून, त्यापुढें—

आतां थोरपणासि घेउनि अम्हांसंगेंचिना बोलसी ।
श्रीकंठा, विभवेंचि माजुनि कसा मत्तापरी चालसी ।।

अशी सलगीची दटावणी दिली आहे. घरीं म्हाळसेसारखी सुंदर गृहिणी असतांना तूं बाणाईच्या मार्गे कां लागलास ?—असा मल्लारीला प्रश्न विचारतांना निरंजन माधवांनीं शिवशक्तीच्या स्वरूपाचें सुंदर दर्शन घडविलें आहे. "ते माता अमुची तिच्याच सुकृपें ऐश्वर्य हें जोडिलें ! " असा म्हाळसा-मोहिनीचा गौरव करून अखेरीस निरंजन माधव मल्लारीस उद्देशून म्हणतात :

तूझी भाज महालसा घरधणी तूं नागवा जोगडा ।
मी झालों अतिदीन याचक तुझा-मीहूनि तूं ऊघडा ।।
मागावें तुज काय तें ? म्हणुनियां मौनासि म्यां वाहिलें ।
तूंहि देसिल काय सांग मजला ? तूझें तुपें राहिलें ।।

*मोरोपंत*

आपल्या प्रचंड ग्रंथरचनेनें आणि आर्याप्रभुत्वानें प्राचीन मराठी कवितेच्या इतिहासांत ख्याति पावलेले कवि मोरोपंत ( श. १६५१-१७१६ ) यांनीं रचलेल्या ' मल्लारि-विजया 'चा उल्लेख गेल्या प्रकरणांत आलाच आहे.

38849 भू-प्रवास

त्या लघुग्रंथाच्या शेवटीं मोरोपंत मल्लारिमहती सांगतांना म्हणतात :

भक्तमयूरदयाघन भगवान् चरितें जगद्धितें करितो।
हरि तो हर, हर तो हरि, कलिमल निजपुण्यकीर्तिनें हरितो ।।

मोरोपंतांच्या स्फुट कवितेंत एक 'खंडोबास्तव' आहे.[११] 'या १२ आर्यांच्या स्तोत्रांत पंतांनीं आपली खंडोबाविषयींची भक्तिभावना व्यक्त केली आहे. ते खंडोबाला विनवितात :

तुझिया कृपाकटाक्षें हा दुःसह मोहपाश खंडो वा।
प्रभुवर तूं परमपुरुष वरदेश्वर दीनबंधु खंडोबा ।

या स्तोत्रांत पंतांनीं 'मालूखान' हें नांवहि वापरलें आहे. खंडोबाची भक्तजनांविषयींची सदयता ध्यानीं घेऊन पंत उद्गारतात :

सधन अभक्त न बरवे, खंडेराया ! बरे अधन वाघे !

*निरंजन रघुनाथ*

निरंजन रघुनाथ ( श. १७०४-१७७७ ) हे मूळचे मराठवाड्यांतील. नोकरीनिमित्त पेशवाईंत पुण्यांत आले आणि मूळचा पिंड वैराग्यशील असल्यामुळें एके दिवशीं ठाकुरदासांच्या कीर्तनानें प्रभावित होऊन सर्वस्वाचा त्याग केला. पुणें सोडून ते बाहेर पडले आणि एक वर्ष सात दिवसांनीं त्यांनीं गिरनार येथें दत्तदर्शनाचा लाभ मिळविला. त्यांचे गुरु नाशिकचे रघुनाथ-स्वामी. निरंजन रघुनाथांनीं उत्तरायुष्य मिरजेस घालविलें. त्यांनीं अनेक ग्रंथ, आत्मचरित्र व स्फुट रचना केलेली आहे. त्यांच्या स्फुट काव्यसंभारांत कांहीं खंडोबाविषयक पदें आहेत.[१२] त्यांत एक आरतीहि आहे.

शिव जाला मार्तंड । मोडावया दैत्य बंड ।
करि दुष्टालागी दंड । भक्ता अखंड रक्षिता ।।
मागूं प्रेमाची हे वारी । नरदेह-रविवारीं ।
आलिया संसारीं । चुकवूं फेरे सर्वस्वें ।।
स्मरोनिया त्याचे गुण । येळकोट गाऊं गाण ।।
भुंकूं होऊनियां श्वान । त्याचे द्वारीं सर्वदा ।।
निरंजन आला वाघा । जाउनि मल्हारीला सांगा ।
चरणीं थोडी जागा । द्यावी भागा येईल ती ।।

निरंजन वाघ्या बनून मल्हारीच्या चरणीं जागा मागतात, याचें कारण

असें आहे कीं, तो रघुवीरप्रिय आहे- निरंजनस्वामींचे गुरु जे रघुनाथस्वामी त्यांनाप्रिय आहे. निरंजनस्वामींचा आणखी एक वाघ्या आहे, तो द्वैताला भाजून निश्चय-भरीतरोडगा मार्तण्ड भैरवाला अर्पण करीत आहे, औट हात कोटंब्यांत ( देहरूपी पात्रांत ) चिद्रस भरीत आहे; संसाराला येळ-कोट बोलून, देहभंडारा उधळीत आहे; मोहाचा सांखळदंड तोडीत आहे आणि जिवाचा श्वान सोडून देत आहे– " निरंजन हा वाघा। सोहं भुंकुनि स्वरूपीं जागा ।। " ( हा वाघ्या रामदासांच्या नांवावरहि तंतोतंत याच शब्दांत–निरंजनाऐवजीं रामदासांची मुद्रा लेऊन–आढळतो. )

एका पदांत निरंजनांनीं सुंदर कल्पना मांडली आहे. त्यांना 'डमरु' या वाद्याचा ध्वनि 'मार्तण्ड'- नामजपासारखा भासतो आणि त्यामुळें ते मार्तण्डाच्या करींचें डमरु बनून नामजपाचें सुख लुटूं इच्छीत आहेत.

खंडेराया रे शंभु अवतारा।
सोडुनिया कोदंडा, धरि करिं खंडा
मणिमल पुंडांतें करि दंडा
सुरवर लागति पायां ।।

हें कटावाच्या चालीचें पद तालबद्धतेमुळें कटाव-लावणीच्या थाटाचें बनलेलें आहे. 'जाला शिव मल्लारि' या पदांतील पुढील अंश खंडोबाच्या स्वरूपाचें स्पष्टीकरण करणारा आहे :

मणिमल्लाचें मर्दन करितां घाम बहुत आला।
त्यायोगें भस्माचा रंग पीतवर्ण जाला ।।
म्हाळसा हें नाम येणें पार्वतीस दिलें।
वाणाई या नामें गंगेलागीं बाहिलें ।।
वेगवान नंदीचें वाहन अश्वरूप जालें।
सामवेदि द्विज शापास्तव श्वानत्वा पावले ।।
वाणाईच्या पदस्पर्शानें निजपदा गेले।
भरित-रोडगे वाहुनि पूजन निरंजनें केलें।

*मौनीनाथमहाराज*

मौनीनाथमहाराज ( श. १७०६-१७९८ ) हे सत्पुरुष सिन्नर या गांवचे. त्यांनीं अनेक लघुग्रंथ व स्फुट रचना केलेली आहे. त्यांची 'खंडेरावाची

आरती ' म्हणजे एक अध्यात्मावरचें सुंदर रूपक आहे.[१४] ती आरती येथें संपूर्ण अवतरण्याचा मोह आवरत नाहीं :

जय देवा खंडेराया । निज शिवरूप सखया ।
आरती ओवाळीतों । भावभंडारसुप्रिया ।। ध्रु० ।।
देहत्रय गड थोर । हेचि दुर्घट जेजुर ।
येथें तू नांदतोसी । आत्मा साक्षित्वें निर्धार ।।
उन्मनि म्हाळसा हे । शांति बाणाई सुकुमार ।
भुक्ति मुक्ति दया क्षमा । मुरळ्या नाचती सुंदर ।। १ ।।
स्वानंद-अश्व धीर । यावरि बैसूनि सत्वर ।
अद्वैतबोध-धार । हातीं घेऊनि तलवार ।।
अहंकार-मल्लासुर । यातें मारिसी साचार ।
मर्दूनि दैत्यभार । विजयी होसी तू मल्हार ।। २ ।।
निरसोनि द्वैतभाव । करिसी ठाणें तू अपूर्व ।
अद्वैतचि भक्त देव । भेदबुद्धि मिथ्या वाव ।।
तुजविण न दिसे कोणी । जगिं या एकचि तूं धणी ।
मौनी म्हणे तूंचि सर्व । अससि व्यापक खंडेराव ।। ३ ।।

*शाहीर होनाजी*

शाहीर होनाजी दुसऱ्या बाजीरावाच्या काळांत गाजला. ' अमर भूपाळी 'च्या रचनेमुळें त्याचें नांव मराठी लोकमानसांत गौरवाचें स्थान पटकावून बसलें आहे. तो मूळचा सासवडचा. जेजूरीच्या सगनभाऊशीं त्याची स्पर्धा होती. जेजूरीच्या सान्निध्यामुळें त्यानें खंडोबावर एक लावणी रचलेली आहे.[१५] या लावणीमध्यें ' मल्लारि-माहात्म्यां 'तील मार्तण्ड भैरवाच्या अवताराची व विजयाची कथा संक्षेपानें गुंफली आहे. परंतु तींत ' मार्तण्ड भैरव ' असें नांव एकदांहि आलें नसून मल्लारीला सर्वत्र ' शिव 'च मानलें आहे. मल्हारीचीं स्थानें सांगतांना पेमरी ( पेंवर ), पाली, नळदुर्ग आणि जेजूरी हाच क्रम मानला आहे. लावणीच्या शेवटीं होनाजी म्हणतो :

कृपाकटाक्षेंकरून पूजिती भक्त मूर्ति निजकरीं ।
तो हा मल्हारी दृष्टीं पाहिला नगाचे शिरीं ।।

होनाजी बाळा म्हणे आश्रय धरिला अंतरीं ।
तुजविण त्राता नसे अम्हांला त्रैलोक्याभीतरीं ।।
त्रिशूळधारी श्रीमल्हारी उभा पर्वतावरी ।।

*इतिहास-प्रसिद्ध व्यक्तींची खंडोबा-भक्ति*

संतांनीं आणि कवींनीं ज्याप्रमाणें खंडोबावर भक्तिभंडार उधळला, त्याप्रमाणें मराठ्यांच्या इतिहासांतील अनेक प्रसिद्ध वीर आणि मुत्सद्दी खंडेरायाच्या भंडारानें पिवळे झाले होते. मराठेशाहींतील अनेक प्रसिद्ध घटनांच्या स्मृति खंडेरायाच्या चरणांशीं– जेजूरीगडाशीं निगडित आहेत. मराठ्यांचीं अनेक गाजलेलीं घराणीं खंडोबाचीं उपासक होतीं. जेजूरीच्या परिसरांतील ऐतिहासिक स्मृतींचें शब्दचित्र रेखाटतांना महाराष्ट्र-गौरवाचे शाहीर श्री. बाबासाहेब पुरंदरे लिहितात :

"पुण्याच्या परिसरांत जितका इतिहास गाजला आहे, तितकाच जेजूरीच्या परिसरांतहि पावलापावलावर गाजला आहे. शिवाजीमहाराजांनीं स्वराज्यसंग्रामांत आपली तलवार रणांत शत्रूच्या रक्तांत प्रथम भिजविली ती जेजूरीच्या जवळच. महाराजांनीं विजापूरचा सरदार फत्तेखान यावर सन १६४९ च्या ऑगस्टांत जेजूरीनजिकच्या खळद-बेलसरापाशींच पहिला छापा घातला. अन् फत्तेखानाचा पुरता पराभव केला तोहि कऱ्हेपठावरील पुरंदर किल्ल्याखालींच. मराठ्यांनीं स्वातंत्र्याकरितां दिलेली ही पहिली लढाई. अन् १८१८ त स्वातंत्र्य गेल्यावर तें परत इंग्रजांकडून हिसकावून घेण्याकरितां जी पहिली बंडाळी उभारली गेली, तीहि खंडोबाच्या समक्षच– ह्याच कऱ्हेपठारांत. हें बंड उभारणाऱ्या स्वातंत्र्यवीराचें नांव उमाजी नाईक.

"याशिवाय सरदार अंताजीपंत पुरंदरे, पिलाजी जाधवराव, भिवराव पानसे, खंडेराव दरेकर, सखारामबापू बोकील, विठ्ठल शिवदेव विंचूरकर, राघो बल्लाळ अत्रे, नीळकंठराव सरनाईक, दमाजी थोरात, जानोजी भिताडे, मल्हारराव होळकर हे गाजलेले पुरुष आणि त्यांचीं घराणीं जेजूरीच्या सावलींतच मोठीं झालीं. खंडोबा हेंच या साऱ्यांचें कुलदैवत. छत्रपति शिवाजीराजांचे आजोबा मालोजी राजे हे खंडोबाचे मोठे भक्त होते. मालोजी राजांपासून ते शेवटच्या प्रतापसिंह छत्रपतींपर्यंत झाडून सारे राजकारणी पुरुष निदान एकदां तरी खंडोबाचें दर्शन घेऊन गेले

आहेत, हें निश्चित."[१६]

—या आणि इतर अनेक इतिहासप्रसिद्ध व्यक्तींनीं जेजूरीच्या खंडोबाचें वैभव वाढविलें! नारायणराव पेशव्यांच्या वधानंतर बारभाईंनीं जेव्हां कारभार हातीं घेतला, तेव्हां गंगाबाईच्या पोटीं पुत्र व्हावा म्हणून नानांनीं ज्या देवांस नवस केला, त्यांत जेजूरीचा खंडेरायहि होता. गंगाबाईच्या उदरीं पेशवाईचा वारस उदयास आल्यावर मोठ्या थाटामाटानें नवस फेडण्यांत आला- देवाला एक हजार रुपयांचा मोत्याचा तुरा, एक लाख रुपये आणि मणाचा भंडारा समर्पिला. मराठेशाहींत नवसफेडीसाठीं खंडोबाला हत्ती सुद्धां वाहिला जाई.[१७] व्यवहार-निर्णयांतील दिव्यें करण्यासाठीं जेजूरी आणि पाली हीं खंडोबाचीं दोन्ही क्षेत्रें उपयोगांत आणलीं जात.[१८]

*खंडोबाचे दोन बंडखोर भक्त*

अलीकडच्या काळांत दोन बंडखोरांनीं खंडोबाचा जयजयकार करीत बंडें उभारलीं : उमाजी नाईक आणि राघो भांगऱ्या. उमाजी ( इ. स. १७९१–१८३२ ) हा पुरंदरचा. पेशवाईच्या अखेरीस नादान बाजीरावा-विरुद्ध पुरंदरावर रामोश्यांनीं बंड उभारलें. बापू गोखल्यानें रामोश्यांवर छापा घालून हें बंड मोडून काढण्याचा प्रयत्न केला. त्यांत रामोश्यांचे अनेक पुढारी मारले गेले आणि उरलेल्यांना, त्यांची मालमत्ता जप्त करून, हांकलून देण्यांत आलें. या 'निर्वासित' रामोश्यांतच बावीस वर्षांचा तरुण उमाजी होता. त्याच्या थोरल्या चुलतभावानें—रघूजीनें पुरंदरावरील केदारनाथाच्या चरणांशीं सूड उगविण्याची प्रतिज्ञा घेतली होती. रघूजीच्या नेतृत्वाखालीं रामोश्यांनीं दरोडे घालून बाजीराव व इंग्रज यांना खूप सतावलें, परंतु १८१५ मध्यें रघूजी व त्याचा मुलगा इंग्रजांच्या छाप्यांत जखमी होऊन मेले. त्यांतून सुरक्षित राहिलेला उमाजी पुन: पुरंदर परिसरांत आला आणि त्यानें भावाची प्रतिज्ञा पुरी करण्याचें ठरविलें. उमाजीनें खून, दरोडे, लूट-मार या प्रकारांनीं इंग्रजांना व श्रीमंत-सावकारांना छळण्याचे सतत प्रत्यन केले. तो अत्यंत धाडसी, गरिबांविषयीं कनवाळू आणि स्त्रियांच्या प्रतिष्ठेची बूज राखणारा होता. लूटमारींतून मिळालेल्या द्रव्यांतून तो कांहीं भाग खंडोबाला अर्पण करीत असे. अनेक वर्षें इंग्रज अधिकाऱ्यांना सळो कीं पळो करणारा हा ध्येयवादी दरोडेखोर १८३१ मध्यें पकडला गेला आणि

दि. २ फेब्रुवारी १८३२ रोजीं त्याला देहान्ताचें शासन मिळालें.

राघो भांगऱ्या हा जातीचा कोळी. तो अहमदनगरच्या एका जमादाराचा मुलगा होता. एका कर्जाच्या प्रकरणीं त्याच्या घरादाराचा लिलांव झाला आणि त्या क्षणीं उद्ध्वस्त झालेल्या त्याच्या मनांत इंग्रजी कायद्याविषयीं क्रोधाची लाट उसळली. त्यानें आपल्याभोंवतीं अनेक निधडे साथीदार गोळा केले आणि पुणें जिल्ह्याच्या वायव्येला असलेल्या डोंगरी भागाचा आसरा घेऊन त्यानें लूटमार सुरू केली. या सर्व बंडखोरींत त्याची दृष्टि उमाजीप्रमाणेंच होती. तो गरिबांचा कनवाळा बाळगणाऱ्या आणि श्रीमंतांचा कोथळा बाहेर काढणाऱ्या उमाजीप्रमाणेंच होता. त्याला उमाजीप्रमाणेंच खंडोबा प्रसन्न आहे, अशी जानपदांची श्रद्धा होती.

परंतु हा खंडोबाचा भक्त अखेर खंडोबावरच उलटला. एका रात्रीं त्यानें जेजूरी देवस्थानावरच धाड घातली. चौदा तोळे सोन्याचा खंडोबा सतत कंठीं वागविणारा हा राघो भांगऱ्या—त्यानें खंडोबा व म्हाळसा यांच्या सुवर्ण-मूर्ति आणि सव्वा लाखाचा भुंगा, तसेंच इतरहि अनेक मूल्यवान् वस्तु लुटल्या आणि अंधाराच्या आश्रयानें तो पसार झाला. ती लूट त्यानें जागजागीं पुरून ठेवली असावी. त्यांतील म्हाळसेची मूर्ति पुढें बारा वर्षांनीं बेलसर भागांत एक शेत नांगरतांना सांपडली.

—असे हे दोन खंडोबाचे 'भक्त' होते. त्यांचे पोवाडे गातां-ऐकतांना ग्रामीण जनांचें हृदय अभिमानानें भरून येतें.

*खंडोबा आणि ख्रिश्चन मिशनरी*

लोकप्रिय हिंदु देवतांचें विडंबन करणें हें ख्रिस्ती धर्म-प्रचारांतील एक तंत्र होतें. या त्यांच्या प्रचारतंत्रांत खंडोबावरहि त्यांनीं हल्ला केला आहे, हें खंडोबाच्या लोकप्रियतेचेंच द्योतक आहे. फादर क्रुवानें आपल्या पीटर-पुराणांत अनेक हिंदु देवतांचीं विडंबनें केलीं आहेत, त्यांत खंडोबाचा समावेश आहे कीं नाहीं, तें मला सांगतां येणार नाहीं. परंतु एक स्कॉटिश मिशनरी रेव्हरंड जे. मरे मिचेल यानें खंडोबा आणि त्याची उपासना यांची निंदा करणारें 'खंडोबाची गोष्ट' या नांवाचें जें छोटें चोपडें प्रसिद्धिलें आहे, तें माझ्या संग्रहीं आहे. हा रे. मरे मिचेल इ. स. १८३८ च्या नोव्हेंबरांत भारतांत आला. त्याचें मराठी शिक्षण कृष्णशास्त्र्यांच्या मार्गदर्शनाखालीं

झालें. त्यानें मराठींतून पुस्तकें लिहिलीं आणि तीं हिंदूंच्या यात्रास्थानीं वांटलीं. 'आळंदीची यात्रा', 'पंढरपूरची यात्रा' हीं त्याचीं पुस्तकें यात्रांतून धर्मप्रचार करण्याच्या हेतूनेंच लिहिलेलीं आहेत. त्याचें 'खंडोबाची गोष्ट' हें पुस्तकहि त्याच हेतूनें प्रसिद्धिलेलें दिसतें.

हें पुस्तक संवादात्मक आहे. लेखक स्वत: पुण्यांतील गंगाधरशास्त्री नामक कोंकणस्थ मित्राकडे बसला आहे आणि तेथें एक देशस्थ ब्राह्मणहि बसलेला आहे. इतक्यांत शास्त्रीबुवांच्याकडे खंडोबाच्या यात्रेहून एक ओळखीचा कुणबी येतो. भंडारानें रंगलेला आणि गळ्यांत रुप्याचा गांठा घातलेला तो कुणबी दिसतांच लेखक शास्त्रीबुवांना त्याच्याविषयीं प्रश्न विचारूं लागतो- अशी या पुस्तकाची भूमिका आहे. या प्रश्नोत्तरांतून मरे मिचेलनें खंडोबाच्या उपासनेंतील व्यंगांवर बोट ठेवून खंडोबाची उपासना कशी त्याज्य आहे ( आणि आकाशांतल्या ख्रिस्ती बापाची उपासना कशी इष्ट आहे ), हें कौशल्यानें पटवून दिलें आहे. पुढील उतारा पहा :

"भटजीबावा : जर आम्ही कांहीं कुलधर्म चुकलों तर तो लागलीच पीडा करितो.

साहेब : या प्रकारची पीडा करणें हें कोणाचें काम ? हें भुताचें काम, असें तुमचे लोक बोलत असतात नाहीं बरें ?

भटजीबावा : होय, बोलत असतात खरे.

साहेब : तर मग हा तुमचा देव खंडोबा भूत आहे किंवा देव आहे ?

शास्त्रीबावा : या बोलण्यावरून तर तो भूत असावा, असें मला वाटतें."

यावरून एकंदर विडंबनाचें रहस्य ध्यानीं येईल. मुरळ्यांविषयींचीं प्रश्नोत्तरेंहि पाहण्यासारखीं आहेत :

"साहेब : ते लोक ( वाघ्या-मुरळी ) लग्न करितात कीं काय ?

पाटील : वाघे लग्न करितात. मुरळ्या लग्न करीत नाहींत.

साहेब : त्या लग्न करीत नाहींत, हें योग्य आहे ?

पाटील : त्या देवाच्या बायका आहेत ना ? त्यांचें लग्न खंडेरावाशीं लागलेंच आहे. असा नवरा मिळाला असतां, दुसरा कां करावा बरें ?

साहेब : हें काम चांगलें आहे. शेताआड चोरी आणि नवऱ्याआड

छिनाली. त्यांनीं खंडोबाचें नांव करून इच्छेस येईल त्याप्रमाणें वागावें, नाहीं बरें ? शास्त्रीबावा, त्या पतिव्रता तरी असतात काय ? सर्व मुरळ्या व्यभिचारिणी असतात, असें माझ्या ऐकण्यांत आहे, हें खरें काय ?

शास्त्रीबावा : साहेब, आपण म्हणतां तो गोष्ट खरी. त्या वाईट असतात.

साहेब : पाटील, अस्या मुरळ्यांचें जाग्रण ऐकून आपल्या बायकांचा नाश करावा हें तुम्हांस योग्य वाटतें ना ?. . . "

—या सर्व संवादात्मक निर्देत कोंकणस्थ शास्त्रीबुवांची देशस्थांच्या खंडोबाविरुद्ध साक्ष काढण्याचा 'इंग्रजी कावा' जातां जातां पाहण्यासारखा आहे.

*लोकसाहित्यांतील खंडोबा*

खंडोबा ही लोकप्रिय देवता असल्यामुळें त्याची चरित्रगाथा आणि भक्तिगाथा लोकसाहित्यांत अवतीर्ण होणें अगदीं स्वाभाविक आहे. किंबहुना खंडोबाचें चरित्र प्रथम लोकसाहित्याच्या क्षेत्रांतच रचलें गेलें असणार. खंडोबा हा ग्रामदेव. त्याची लोकप्रियता वाढतांच ग्रामीण जनांनीं त्याच्याविषयींच्या लोककथा ( दैवतकथा ) जाणते-नेणतेपणानें रचल्या असतील— सांगितल्या असतील. अशा कथांच्या निर्मितीला त्याच श्रेणींतील पूर्वप्रसिद्ध देवांच्या कथांचे संस्कार आणि वर्ण्य देवाच्या भक्तिक्षेत्रांतील श्रद्धाजन्य चमत्कारांचीं वृत्तें अभावितपणें उपयोगीं पडतात. 'मल्लारि-माहात्म्यां'त खंडोबाचें जें परिष्कृत चरित्र चितारलें आहे, त्याची सामग्री या लोककथांतच संचित असणार.

ज्या बाणाईला व म्हाळसेच्या मोहिनी-स्वरूपाला 'मल्लारि-माहात्म्यां'त स्थान मिळालें नाहीं, त्यांच्या हृदयंगम कथा लोकसाहित्यांत परंपरेनें गाजत आलेल्या आहेत. या कथांत आणि लोकगीतांच खंडोबाविषयींची लोकांची धारणा स्पष्ट स्वरूपांत व्यक्त झाली आहे. बाणाईची प्रीतिकथा आणि म्हाळसा-बाणाई यांचा सवती-मत्सर स्त्रियांच्या अनेक गीतांत प्रकटला आहे. बाणाईला घेऊन जेजूरीला परत आल्यावर म्हाळसेजवळ सर्व प्रकाराचा खुलासा करतांना खंडोबाची उडालेली गाळण आणि सत्य लपविण्यासाठीं त्यानें केलेला बनाव वर्णितांना एक स्त्री म्हणते :[१९]

काखेला कोकरूं, बाणु जातिया नटतु,
देवा मल्लारीनं झेंडा लाविला पेटतु !
देव मल्लारी म्हणतु, कां ग म्हाळसा, रागं रागं ?
गेलों व्हतों शिकारीला, बाणु लागुनि आली मागं !
देव मल्लारी म्हणतु, कां ग म्हाळसा, रागामंदी ?
गेलों व्हतों शिकारीला, बाणु धावली बागेमंदी !

ही कल्पक लोककवयित्री पुढें मल्लारीदेवाचें बाणाईवरील प्रेम व्यक्त करतांना म्हणते :

काखेला कोकरूं, बाणु जाती मेंढवाड्या,
देव मल्लारी गावड्या !
बाणाई धनगरणीच्या ताकामंदी लेंड्या,
मल्लारी देव तिच्या राखितो शेळ्यामेंढ्या !

या धनगरणीच्या मागें देव लागला आहे, हें म्हाळसेला कसें रुचावें ? ती तर थोराघरची होती :

तारळाबाईला देव मल्लारी मासे धरी,
म्हाळसाबाई म्हणे, लिंगायताची आम्ही नारी !

तारळानदींत मासे धरणारा आणि धनगरणीवर भाळणारा नवरा असतांना या लिंगायताच्या नारीनें अभिमान मिरवून काय उपयोग ? शेवटीं तिचा जातिप्रतिष्ठेचा अहंकार दुबळेपणानें व्यक्त होत आहे, इतकेंच. ( पहिल्या प्रकरणांत मी 'तिम्माशेट' या नांवावरून सूचित केलें होतें कीं, म्हाळसेच्या जन्मकथेंतील तिचा पिता तिम्माशेट हा कानडी असला पाहिजे. वरील स्त्री-गीतांत 'लिंगायताची नारी' हें म्हाळसेचें विशेषण त्या अनुमानाचें पोषण करीत आहे. खंडोबाच्या लोककथांचीं बीजें कर्नाटकांत शोधलीं पाहिजेत. )

म्हाळसा आणि बाणाई या दोघींच्या जाती वेगवेगळ्या. खंडोबामुळें त्यांना एकत्र नांदावें लागलें. त्यांच्या सहजीवनाविषयीं साशंक झालेली लोक-कवयित्री म्हणते :

बाणू-म्हाळसाच्या दोघींच्या दोन जाती ।
मल्लारी देवासाठीं बसल्या एका ताटीं ।।

धनगराची बाणाई, वाण्याची म्हाळाइसा ।
घास गिळतु तिला कसा ?

वाघ्याच्या तोंडच्या एका लोकगीतांत हा बाणाई-म्हाळसांचा संघर्ष अधिक तीव्र स्वरूपांत व्यक्त झाला आहे.[२०] नवऱ्याबरोबर घरीं आलेल्या धनगरणीला पाहून चिडलेली म्हाळसा बाणाईला म्हणते :

आईक मी सांगतें तुला,
चित्त दे माझ्या बोलाला,
कां ग तूं भुललिस द्येवाला,
जा तूं अपुल्या देशाला !
झांकल्या पाठीनं जाईं म्हणतें घे तूं ऐकून,
एक्या घडीमधिं तोंड बाणाई, टाकिन उतरून !

त्या वाण्याच्या लेकीनें आपला पाणउतारा करावा, हें बाणाईला सहन होणें अशक्यच. कारण ती कांहीं देवाच्या मागें लागून आली नव्हती, तर देवच तिच्यावर भाळला होता—तिचा दास झाला होता. म्हाळसेनें केलेल्या अपमानामुळें ती भडकली :

तूं वाण्याची हायेस म्हूण करशिल पडिभार,
अम्ही धनगरणी जशा नागिणी मोठ्या शिरजोर !
तुज्या द्येवानं आमच्या घरीं वळिलीं खिल्लारं,
लेंड्या, लोकर, कन्या मिसळी तुझाच भर्तार !

कोळ्यांच्या जातींत खंडोबाची भक्ति फार. कोळ्यांत 'मल्हारकोळी' नांवाची एक उपजाती आहे. कोळ्यांच्या एका गाण्यांत[२१] भानय (बाणाई) आणि खंडेराव देव यांच्या पहिल्या भेटीचें चित्र चितारलेलें आहे :

चालली चालली गो भानयबाय बाउडी पान्याला
उसलील्या निली भानयनी वुरायिल्या दुरी
मगारी बगिते गो भानयला वलवायला नाई कोनी
पुराडी बगिते गो भानयला वलवायला नाई कोणी
तवारसी येत होता गो खंडेराव देवू
तो ते बाद घोडेवर बैसला गो

बावडीवर पाणी भरायला बाणाई गेली होती. ती मागें-पुढें पाहत

चालली असतां तिथें घोड्यावर बसलेला खंडेराव देव आला आणि त्यानें या धनगराच्या तरुण पोरीला हटकलें :

“ तू बाय कोनाची कोनु ? ”
“ मी हाईनी धनगराची भानय गो !
“ तूं दादा कोनाचा यो कोनु ? ”
“ मी हाई खंडेराव देवु ! ”
उजवा का यो हातु देवानी वटल्या घातिला गो
कारिल्या कारिल्या गो देवानें हालदुल्या भंजरा
लाविल्या लाविल्या गो भानयच्या कपालीं लाविल्या गो
डावा का यो हातु भानयच्या दुरी लाविला
चालती झाली गो भानयबाय आपुले घराला
सदा काली भानय कुकवाचं बोटु
“ आज कां गो भानय, हलदुल्या भंजरू ? ”
“ वाटे भेटला खंडेराव देवु,
त्यानीं लाविल्या हलदुल्या भंजरू । ”

अशीं अनेक हृदयंगम गीतें स्त्रियांच्या, आदिवासींच्या, वाघ्या-मुरळ्यांच्या आणि ग्रामीण जनांच्या मुखीं आहेत. त्या गीतांच्या संकलन-संश्लेषणांतून खंडोबाच्या चरित्रावर आणि चारित्र्यावर निश्चित प्रकाश टाकतां येईल.

लोकगीतांप्रमाणें लोककथांतहि खंडोबाचें चरित्र व उपासना-विस्तार व्यक्त झालेला आहे. ‘ मल्लारीची बानू ’ ही बाणाईच्या प्रीतिप्रकरणावरील सुंदर कथा, पाली, मंगसूळी, तिलोरें इत्यादि ठिकाणच्या खंडोबाच्या प्रकटीभवनाच्या कथा, म्हाळसेच्या विवाहाची कथा, इत्यादि खंडोबाविषयक मराठी लोककथा आहेत. कर्नाटकांतील उपासनापर वाङमयाप्रमाणेंच अशा प्रकारच्या लोककथांचें व लोकगीतांचें संकलन-संपादन-परीक्षण झाल्यास मैलार-खंडोबाच्या उपासनेचा विस्तार मराठी भूमींत कसकसा होत गेला, याचें ज्ञान होऊं शकेल. देवताविषयक लोककथांत (दैवतकथांत) लोकधर्माचें रहस्य सर्वांगानें उघडें झालेलें असतें; त्यामुळें अशा कथांच्या अध्ययनांतून देवतांच्या विकसनांत वांटा उचलणारें लोक मानस पूर्णांशानें तपासतां येतें आणि त्याच्या क्रिया-प्रतिक्रिया समजावून घेतां येतात.

*खंडोबाचा भाषेवरील प्रभाव*

एखाद्या कल्पनेनें लोकमनाची पकड घेतली कीं, त्या कल्पनेशीं संबद्ध असणाऱ्या सर्व छटांना त्याच्या भाषेंत स्थान प्राप्त होतें. खंडोबा आणि त्याची उपासना यांच्या लोकप्रियतेमुळें तत्संबद्ध अनेक शब्द आणि वाक्प्रचार भाषेंत रूढ झाले आहेत. खेळखंडोबा, सतरा गुणांचा खंडोबा, खंडोबाचा कुत्रा '(' पिंडीवरचा विंचू 'चा अर्थाचा वाक्प्रचार), मैराळभाऊ (दणकट मनुष्य), तळी उचलणें (एखाद्याचें अवास्तव समर्थन करणें), बेल-भंडार उचलणें (शपथ घेणें) इत्यादि वाक्प्रचार श्री. खरे यांनीं आपल्या पुस्तकांत दिलेले आहेत.[२२] 'म्हाळसा' पासूनम्हालपार्य, म्हाळू हीं प्रतिष्ठा-सूचक नांवें गोव्यांत रूढ आहेत, तर देशावर 'म्हाळी' किंवा 'वेडी म्हाळी' असे शब्द बावळट, अव्यवस्थित स्त्रीचें वर्णन करतांना वापरतात. 'मुरळी' हा शब्द नटव्या व कामुक हालचाल करणाऱ्या स्त्रीसाठीं वापरतात. कानडींतहि 'मैलारा 'वरून अनेक वाक्प्रचार रूढ झालेले आहेत.

*खंडोबाच्या लोकप्रियतेचें रहस्य*

खंडोबाच्या लोकप्रियतेची व्याप्ति ही एवढी आहे. रामोशी-मांग-धनगर-कोळी या स्तरापासून तों देशस्थ ब्राह्मणांपर्यंत समाजाच्या सर्व स्तरांत तो प्रिय आहे. संतांनीं त्याच्यावर अध्यात्माचीं रूपकें रचलीं आहेत; वीरांनीं आणि बंडखोरांनीं त्याच्यापासून साहसाची प्रेरणा घेतली आहे; लोक-प्रतिभेनें त्याला जनसाधारणांच्या भाव-भावनांशीं एकरूप बनविलें आहे आणि सामान्य भक्तांनीं त्याला नवसांच्या बंधनांनीं दास बनवलें आहे. सारा कर्नाटक आणि महाराष्ट्र त्याच्या गाजत्या-जागत्या प्रतीकस्थानांनीं गजबजलेला आहे. त्या सर्व ठिकाणीं प्रचंड यात्रा-जत्रा भरतात, उत्सव-महोत्सव साजरे होतात, भंडार उधळला जातो आणि भल्या-बुऱ्या कामनांच्या पूर्तीनंतर नवस फेडले जातात. 'खंडेरायाचा येळकोट' उद्घोषितांना ग्रामीण लोकमानस स्वतःचें अस्तित्व विसरतें.

या सर्व लोकप्रियतेच्या गाभ्याला हात घातला तर हातीं लागतें तें एकच सत्य—हा देव नवसाला पावणारा आहे. निपुत्रिकांनीं अपत्यलाभासाठीं, निर्धनांनीं धनासाठीं, एकाकी असलेल्यांनीं सवंगडी मिळण्यासाठीं, सत्ता-हीनांनीं सत्तेच्या लाभासाठीं—एवढेंच काय, पापात्म्यांनीं पापकर्मांतील

यशासाठीं याला नवस करावे आणि यानें ते पुरवावे–न पुरवावे ! पुरवल्यास नवसफेडीचा सोहळा, न पुरल्यास आपण कुठें तरी कुळधर्म-कुळाचारांत उणें पडूं दिलें, ही भक्तांची खंत ! दरोडेखोर भक्तानें दरोडे घालावे आणि देवाची पूजा बांधावी ! खंडेरायाचा नवसाच्या बाबतींतला लौकिक एवढा मोठा आहे कीं, त्याच्या चरणांखालीं दडपल्या गेलेल्या मणिमल्लांनीं नवस केला, तरी त्यांनाहि पुन: सप्तर्षीचा गळा दावण्यांत यश येईल, असें वाटतें.

याचा अर्थ असा आहे कीं, खंडोबाला चरित्र देण्याचा, त्याच्यामागें उदात्त अवतारप्रयोजन उभें करण्याचा जो खटाटोप झाला, तो लोक-मानसांत रुजला नाहीं. अवतार-कथा रचून उन्नयनाचा भक्तिपुरुषार्थ गाजवूं पाहणाऱ्या त्या अज्ञात भक्ताला खंडेरायानें यश दिलें नाहीं, याचें वाईट वाटतें ! कदाचित् त्या प्रयत्नाला यश दिल्यानें आपण बहुसंख्य भक्तांच्या आटोक्यांत राहणार नाहीं, अशीहि देवाला शंका आली असावी.

संतांनीं प्रथम खंडोबाच्या उपासनेचा निषेध केला–त्यांतील अनिष्ट प्रकारांवर टीकेचें शस्त्र धरलें. परंतु लोकश्रद्धेच्या प्रभावानें ते आघात फिरवले-पचवले. पुढें संतांनीं खंडोबाकडे संपूर्ण परमार्थदृष्टीनें पाहून त्याच्या स्वरूपावर अध्यात्माचीं रूपकें रचलीं–खरा वाघ्या, खरी मुरळी म्हणजे परमार्थपथावरचे विशुद्धचरित प्रवासी, अशीं स्पष्टीकरणें पुढें केलीं. परंतु हा सर्व प्रयत्न–सहेतुक वा केवळ प्रामाणिक भक्ति-भावांतून स्फुरलेला–विफल ठरला. संतांच्या विरोधामुळें वा उदात्त आशय प्राप्त करून देण्याच्या सद्धेतूमुळें खंडोबाच्या उपासनेंतील अनिष्टांचें निराकरण होऊं शकलें नाहीं. बगाडासारखे नवस आणि मुरळ्यांचा अनाचार यांना आळा बसला नाहीं–तो आळा बसविण्यासाठीं विसाव्या शतकांत इंग्रजी कायद्याचा आधार घ्यावा लागला.

लोकांची खंडोबावरील श्रद्धा एवढी दृढ कीं, त्या श्रद्धेपायीं ते पाठींत गळ टोचून घेतात, इंगळांवर चालतात, पोटच्या पोरांना खंडोबाच्या चरणीं वाहतात. खंडेराय हें मुकाट्यानें सहन करतो. कारण तो नवसाला पावतो-भक्तांनीं आत्मक्लेशांतून व्यक्त केलेल्या भक्तीमुळें तो लोकांच्या मन:-कामनांची पूर्ति करतो, असा त्याचा लौकिक आहे ! त्या ब्रीदाला तो जागला नाहीं, तर लोक तरी त्याला कसे विचारतील ? ज्या श्रद्धेपायीं लोक देहदंडन

स्वहस्तें करतात आणि वात्सल्यासारख्या सात्त्विक व नाजुक भावनांचा बळी देतात, ती श्रद्धा सकाम आहे. तिच्यामागें आत्मशुद्धीची आंच नाहीं. त्याचमुळें आजवर खंडोबाच्या भक्तिपरंपरेंत कुणी संत-सत्पुरुष अवतरूं शकला नाहीं.

एखाद्या दरोडेखोरानें दरोड्याचा संकल्प करावा, एखाद्या दुरात्म्यानें निरपराध्याच्या खुनाचा घाट घालावा, एखाद्या कामग्रस्तानें परस्त्रीचा अभिलाष धरावा आणि या कामनांच्या पूर्तीसाठीं त्यांनीं खुशाल खंडेरायाला नवस करावा- त्यांत लोकांना कांहीं विसंगत वाटत नाहीं. तसें लोकांना वाटत असतें, तर उमाजी नाईक आणि राघो भांगऱ्या यांच्या साहसांमागें खंडोबाची कृपा आहे, असें त्यांनीं मानलें नसतें. नारायणराव पेशव्यांच्या वधासाठीं सुमेरसिंग गारदी प्रभृति खुन्यांकडून बेलभंडार उचलायला लावण्यामागची श्रद्धा कोणत्या प्रकारची आहे, हें मुद्दाम स्पष्ट करण्याची जरूरी नाहीं. तपोमय जीवन व्यतीत करणाऱ्या सत्त्वसंपन्न सप्तर्षींच्या संरक्षणासाठीं आणि मणि-मल्लांसारख्या दुरात्म्यांच्या विनाशासाठीं अवतरलेल्या खंडोबाविषयींची ही श्रद्धा!– म्हणूनच मी म्हणतों कीं, खंडेरायाला भक्तानें दिलेलें हें चरित्राचें ओझें पेललें नाहीं.

दक्षिणेंत मैलाराच्या श्रेणींतील शास्ता आणि मुरुगन या देवांनीं जन-श्रद्धेच्या मागें आत्मशुद्धीची प्रेरणा उभी करण्यांत यश मिळविलें आहे. 'शबरमलै' येथील महोत्सवाला उपस्थित राहण्यासाठीं लोक प्रदीर्घ काळ ब्रह्मचर्याचें पालन करतात आणि इकडे खंडोबाच्या यात्रेंत मुरळ्यांकडे सकामदृष्टीनें पाहतांना आम्हांला चुकल्यासारखें वाटत नाहीं. आश्चर्य असें कीं, जिनें खंडोबाशीं प्रेमानें घरोबा केला, त्या म्हाळसेनें आपली स्वतंत्र प्रतिष्ठा राखली आहे. तिनें मोहिनीशीं ऐकात्म्य पावून, सात्त्विक भक्तीचें लक्ष्य आणि उच्चतम तत्त्वांचें प्रतीक म्हणून स्वतःचें मूल्य प्रस्थापित केलें आहे. खंडोबाशीं लग्न लावून तिनें फारच मोठा त्याग केला आहे, असें राहून राहून वाटतें.

याच संदर्भांत पुरीच्या जगन्नाथाचें चरित्र उद्बोधक आहे. तो मूलतः शबरांचा देव. पुढें बौद्ध, शैव आणि वैष्णव परंपरांच्या आघात-प्रत्याघातांत त्याचें चरित्र घडत राहिलें आणि अखेरीस तो लोकमानसाचें शुद्धी-

करण करणारा 'जगन्नाथ' बनला. त्याच्या चरणीं प्रेरणा घेऊन शंकरदेव, महाप्रभु चैतन्य आणि जगन्नाथदास यांसारख्या महान् संतांनीं संपूर्ण पूर्व भारताचें सांस्कृतिक उत्थान घडविलें. अर्थात् हेंहि विसरतां येणार नाहीं कीं, जगन्नाथाचा इतिहास दोन-अडीच हजार वर्षांचा आहे. खंडोबाचा उदय हजार-बाराशें वर्षांपूर्वी झाला आणि तोहि दक्षिणेंतील लोकजीवन विध्वंसनाच्या कांठावर असतांना ! त्यामुळें त्याच्या परिष्करणाला पुरेसा अवसर लाभला नाहीं– आणि आतां तर बुद्धिनिष्ठेचें युग श्रद्धेला झांकोळूं पाहत आहे.

खंडोबा हा महाराष्ट्राचा कुलदेव आणि विठोबा हा इष्टदेव. अनेक कुलदेवांना पुढें इष्टदेवाची प्रतिष्ठा लाभते. ती खंडोबाला लाभली नाहीं. लोकप्रियतेच्या बाबतींत तो विठोबाला हार जाणार नाहीं. हें लोकप्रियतेचें साम्य ध्यानांत घेऊनच एक जेजूरीचा यात्रिक म्हणतो :

पंढरीसी राही रखुमाबाई । येथें म्हाळसा बाणाई ।।
तेथें विटेवरी उभा । येथें घोड्यावरी शोभा ।।
तेथें पुंडलिक निधान । तेथें हेगडी प्रधान ।।
तेथें बुविकयाचें देणें । येथें भंडार भूषणें ।।
तेथें वाहे चंद्रभागा । येथें जटीं वाहे गंगा ।।
तेथें मृदंग वीणा टाळ । येथें वाघ्या-मुरळ्यांचा घोळ ।।

हें साम्य ठीक आहे– पण तें केवळ बाह्य संभारांतील साम्य आहे. खंडोबा हा कुलसंरक्षक लोकदेव आहे, तर विठ्ठल हा आत्म्याची परमात्म्यांत विलीन होण्याची आस पुरविणारा इष्टदेव आहे.

खंडोबा हा शिवाचा अवतार समजला जातो. शिव हा तप आचरणाऱ्या दैत्यांनाहि वरप्रदान करणारा भोळा देव आहे. तो केवळ तपानें तुष्ट होतो- तपाचरणाच्या मागें वास करणाऱ्या हेतूंची चिकित्सा करीत नाहीं. परंतु जेव्हां त्याच्यापासून मिळालेल्या वरानें दैत्य उन्मत्त बनून साऱ्या विश्वव्यवस्थेचा भंग करूं पाहतात, तेव्हां त्याची चूक निस्तरण्यासाठीं विष्णूला अवतार घ्यावा लागतो. हिरण्यकशिपु, रावण, भस्मासुर हे सर्व शिवाराधना करून सामर्थ्य मिळविलेले दैत्य–त्यांच्या विनाशासाठीं विष्णु पुढें झाला. मार्तण्ड भैरव अवताराची कथा शिवाच्या नेहमींच्या भोळेपणाविरुद्ध

आहे. विष्णूनें नाकारलेलें दैत्यविनाशाचें कार्य करायला तो स्वत: अवतरला आहे– असें असतांना त्यानें या नव्या अवतारांत तो पूर्वीचा भोळेपणा कां चालूं ठेवावा? विश्वकल्याणासाठीं हालाहल पचविणारा शिव–मन:-शान्तीचा भंग करूं पाहणाऱ्या आणि गार्हस्थ्याची प्रतिष्ठा उद्ध्वस्त करूं इच्छिणाऱ्या मदनाला जाळणारा कामारि शिव संतांनीं मार्तण्ड भैरवाच्या ठायीं पाहण्याचा प्रयत्न केला; परंतु त्यांत त्यांना यश आलें नाहीं. ती केवळ त्यांची आत्मतुष्टि ठरली.

अपरिष्कृत, स्थूल आणि सकाम अशी लोकश्रद्धा जेव्हां एखाद्या देवतेला जन्म देते, तेव्हां ती देवता सर्वस्वीं लोकश्रद्धेच्या स्वाधीन असते. परंतु लोकश्रद्धेची व्याप्ति आणि दृढता जसजशी वाढत जाते, तेव्हां समाजांतील जाणतीं व सात्त्विक माणसें त्या लोकश्रद्धेचें व पर्यायानें लोकश्रद्धेचें प्रेम असणाऱ्या त्या देवतेचें उन्नयन करण्याचा प्रयत्न करतात–प्रेयाला श्रेयाची प्रतिष्ठा प्राप्त करून देऊं इच्छितात. या उन्नयनाच्या प्रयत्नांना ज्या प्रमाणांत यश येईल, त्या प्रमाणांत ती देवता लोकश्रद्धेचें बाहुलें न राहतां लोकश्रद्धेच्या परिष्करणाचें केंद्र बनूं शकतें. म्हणजे असें कीं, लोकमानस प्रतीकें घडवितें आणि नंतर प्रतीकांच्या निष्ठेंतून लोकमानस घडूं लागतें. खंडोबाच्या बाबतींत असें घडलें नाहीं–तो सर्वस्वीं लोकश्रद्धेच्या अधीन राहिला. याच अर्थानें त्याला 'लोकदेव' म्हणावें लागेल.

## संदर्भ-टीपा


१. एकनाथ-गाथा, पृ. ६५०, ६५१.
२. श्रीसमर्थाचा गाथा, पृ. ३२, २९५, ३५२, ४६८.
३. केशवस्वामींची कविता, पृ. १८२.
४. रंगनाथस्वामी निगडीकर-कृत कवितासंग्रह, पृ. ६८.
५. स्वानुभवदिनकर १.६. ६५-६९.
६. स्वानुभवदिनकर ७.३.३६-६९.
७. दिनकरांची स्फुट कविता, पृ. ११५-११६.
८. मध्वमुनीश्वरांची कविता, पृ. ९०-९१, १९५.

९. अमृतराय-कृत कवितासंग्रह, पृ. ९९, १०१.
१०. निरंजनमाधवांचा कवितासंग्रह, भाग पहिला, पृ. ६४-६९.
११. मोरोपंतकृत स्फुट काव्यें, भाग पहिला, पृ. १६१-१६२.
१२. निरंजन रघुनाथांचे ग्रंथ : पदपदांतरें, पृ. १२, ४०, ५९, ११०, १३९.
१३. श्रीसमर्थांचा गाथा, पृ. ३५३.
१४. श्रीमौनी-चरितामृत, पृ. ३१५.
१५. होनाजी बाळ यांच्या लावण्या, पृ. ६-७.
१६. तरुण भारत, ६ डिसेंबर १९५९.
१७. ऐतिहासिक संकीर्ण साहित्य, खंड ९ वा, पृ. ३६-३७.
१८. भा. इ. सं. मं. संमेलन-वृत्त, शके १८३६, पृ. १५२-१५३.
१९. भा. इ. सं. मं. वार्षिक इतिवृत्त, शके १८३५, पृ. ४१६.
२०. तीर्थरूप महाराष्ट्र, भाग दुसरा, पृ. ८-९.
२१. महाराष्ट्र लोकसाहित्य माला, पुष्प पहिलें, पृ. ११-१२.
२२. महाराष्ट्राचीं चार दैवतें, पृ. १५४-१५५.

# उपसंहार

*खंडोबाचा विकासक्रम*

मागील चार प्रकरणांत आपण खंडोबा आणि म्हाळसा यांच्या उदय-विकासांचा शोध घेण्याचा प्रयत्न केला. उपलब्ध साधन-सामग्रीच्या प्रकाशांत या दोन देवतांचें जेवढें स्पष्ट दर्शन घडवितां येईल, तेवढें मीं घडविलें आहे. अजूनहि अनेक रहस्यें उकलायचीं आहेत; अनेक प्रश्न-चिन्हांना उत्तरें द्यायचीं आहेत. परंतु आज साधनांच्या उपलब्धीची मर्यादा जांचत आहे. या विषयावर येथून पुढें मराठी साधनांच्या आधारें अधिक प्रकाश पडूं शकेल, असें वाटत नाहीं. कर्नाटकांत मात्र नवनवीं साधनें उपलब्ध होऊं शकतील. अर्थातच या विषयांतील अनुत्तरित प्रश्नांच्या उत्तरांसाठीं मी कानडी पंडितांच्या संशोधनाकडे अधिक औत्सुक्यानें पाहत राहीन.

मागील सर्व विवेचनाचें सारभूत फलित पाहिलें तर आपणांस खंडोबाचा विकासक्रम एका दृष्टिक्षेपांत न्याहाळतां येईल. महाराष्ट्रांत 'खंडोबा' या नांवानें प्रख्यात असलेला हा देव मूलतः कर्नाटकांतील आहे. त्याचें लोकप्रिय कानडी नांव ' मैलार ' हें होय. इ. स. १००० पासून हा ग्राम-देव कर्नाटकांत लोकप्रियता पावूं लागला. अय्यप्पन (अय्यनार वा शास्ता) व मुरुगन हे त्याच्याच श्रेणींतील आणखी दोन ग्रामदेव द्राविड भूमींत प्रतिष्ठा मिळवीत होते. यांपैकीं अय्यप्पन हा ' हरिहरपुत्र ' (शिव-मोहिनींच्या संबंधांतून जन्मलेला) आणि मुरुगन हा ' स्कंद ' मानला जाऊं लागला. मैलाराला प्रतिष्ठा देण्याच्या प्रयत्नांत कर्नाटकांत शिव-मोहिनी आणि स्कंद हे दोन्ही मार्ग वापरले जाऊं लागले होते. परंतु शिव-मोहिनी-कथेशीं आणि स्कंदाशीं नातें जोडूं पाहणारा मैलार लौकरच मराठी प्रभावाखालीं आला आणि महाराष्ट्रांतील ग्रामजगतांत प्रतिष्ठित झालेल्या क्षेत्रपाळ-भैरवाशीं एकरूप झाला. अर्थातच मैलाराच्या या

भैरवीकरणामुळें शिव-मोहिनी आणि स्कंद हे दोन्ही संबंध मैलाराच्या उन्नयन-प्रक्रियेंतून दूर फेकले गेले. इसवी सनाच्या चौदाव्या शतकांत 'मल्लारि-माहात्म्या'ची रचना महाराष्ट्रांत झाली आणि खंडोबाचें 'मल्लारि मार्तण्ड भैरव' हें संस्कृत नामकरण स्थिर झालें. 'मल्लारि-माहात्म्या'नें खंडोबाला अवतार-प्रयोजनाची बैठक देण्याचा प्रयत्न केला. खंडोबाची ही अवतार-कथा महाराष्ट्र-कर्नाटकांत सार्वत्रिक पातळीवरून स्वीकारली गेली.

परंतु खंडोबाची ही अवतारकथा खंडोबाच्या उपासनेचें जानपद स्वरूप बदलूं शकली नाहीं. या अवतारकथेला केवळ वाचिक लोकप्रियता लाभली, इतकेंच. खंडोबाच्या उपासनेंतील क्षुद्रतेचें आणि हीनतेचें स्वरूप पाहून संतांनीं क्षुद्रदेवता-निखंदनाच्या निमित्तानें खंडोबावरहि कडाडून हल्ला चढविला. परंतु ग्रामीण लोकश्रद्धेला त्यामुळें यत्किंचितहि तडा गेला नाहीं. लोकश्रद्धेचें उन्नयन करण्याची तळमळ संतांना असल्यामुळें त्यांनीं पुढें खंडोबा आणि त्याचे उपासक यांच्यावर उदात्त आध्यात्मिक रूपकें रचलीं आणि लोकांना खंडोबा-भक्तीच्या माध्यमांतूनच वर उचलण्याचा प्रयत्न केला. परंतु हाहि प्रयत्न निष्फळ ठरला.

आजहि हा देव आपल्या उदयकालीन मूलरूपापासून फारसा दूर गेलेला नाहीं. त्याच्या उपासनेंतील कांहीं अमानुष अनिष्ट प्रकार बंद झाले आहेत, ते केवळ कायद्यांच्या भयामुळें !

*म्हाळसा : एक देवतावैज्ञानिक चमत्कार*

म्हाळसा हीहि मूलतः एक कानडी ग्रामदेवी. 'माळव्व' हें तिचें लोकप्रिय कानडी नांव. मैलाराबरोबरच ती कर्नाटकांत प्रतिष्ठा पावूं लागली. परंतु तिच्या विकसनाचे दोन वेगळे प्रवाह बनले. एकीकडे ती खंडोबाची पत्नी बनली आणि दुसरीकडे आदिशक्तीचें एक स्वरूप म्हणून विकास पावूं लागली. प्रारंभीं या दोन्ही प्रवाहांतील उन्नयनाचें साधन 'मोहिनी' हेंच होतें. मैलार हा शिव आणि माळव्व ही मोहिनी. परंतु पुढें मैलार शिव-मोहिनी-कथेचा संबंध सोडून भैरव बनल्यानंतर मैलारपत्नी माळव्व ही 'मोहिनी'ऐवजीं योगेश्वरी पार्वतीचेंच एक रूप म्हणून ओळखली जाऊं लागली. तिच्या उन्नयनाच्या पहिल्या स्वतंत्र प्रवाहांत मात्र तिचें

मोहिनीरूपच अबाधित राहिलें आणि एक वैष्णवी शक्ति म्हणून तिला तेराव्या शतकांतच अत्युच्च प्रतिष्ठा लाभली. नेवाशाचा मोहिनीराज म्हणजे मोहिनीचें रूप ल्यायलेली मूळची म्हाळसाच होय. एकाच ग्रामदेवीच्या विकसनाचे हे दोंन प्रवाह इतके अलग बनले कीं, खंडोबापत्नी म्हाळसा आणि नेवाशाची मोहिनी यांचें मूळ एकच होय, हें सत्य आज आपणांस आश्चर्याचा धक्का देतें. एकीकडे मैलाराच्या संपर्कानें आपलें ग्रामदेवीचें स्वरूप फारसें ढळूं न देणारी म्हाळसा दुसरीकडे एका वैष्णवी शक्तींत पूर्णांशानें परिणति पावते आणि या दोन्ही प्रवाहांना परस्परांची ओळखहि उरूं देत नाहीं, हा खरोखरीच एक देवतावैज्ञानिक चमत्कार आहे !

*कांहीं देवतावैज्ञानिक तथ्यें*

खंडोबा आणि म्हाळसा या दोन देवतांच्या विकसनाचा अभ्यास केल्यावर कांहीं देवतावैज्ञानिक तथ्यें आपल्या हातीं येतात. अर्थात् हीं तथ्यें म्हणजे देवताविज्ञानांतील निरपवाद सिद्धान्त नव्हेत; तर देवतांच्या घडणींत लोकमानस ज्या वळणा-वांकणांनीं प्रवास करतें, त्यांतील कांहीं वळणा-वांकणांचे केवळ निर्देश होत. अन्य देवतांच्या विकसनाचा शोध घेतांना हीं तथ्यें संशोधकांना उपयुक्त ठरतील, अशी अपेक्षा आहे.

१. खंडोबा आणि म्हाळसा या मूळच्या कर्नाटकांतील क्षुद्र ग्रामदेवता. त्यांची लोकप्रियता वाढल्यावर त्यांना अनुक्रमें भैरव (मार्तण्ड-भैरव) आणि पार्वती-जोगेश्वरी (व मोहिनी) या पुराणप्रसिद्ध प्रतिष्ठित देवतांचें स्वरूप दिलें गेलें. क्षुद्र देवतांचें उन्नयन आणि परधर्मीय देवतांचें स्वीकरण करण्याची भारतीयांची ही पद्धतिच आहे.

२. खंडोबाचें अवतार-चरित्र रचतांना त्याचें मूळ मैलार (व मण्मैलार) हें नांव, त्याचीं मृण्मय मूर्ति व कापडाचे मुखवटे हीं मूलप्रतीकें, त्याच्यासंबंधींच्या लोककथा, त्याच्या उपासनेचें मूळ जानपदस्वरूप या सर्वांचा उपयोग करून घेतला आहे. मूळ नांवाचें केवळ संस्कृत ध्वनिरूपान्तर करावयाचें आणि त्या ध्वनिरूपांतरित नव्या नांवाला जो अर्थ प्राप्त होतो, त्या अर्थाच्या स्पष्टीकरणासाठीं (तें नांव सार्थ बनविण्यासाठीं) पुराण-

कर्थांच्या धर्तीवर नवी पुराण-कथा रचावयाची, असा प्रकार अनेक देवतांच्या चरित्रकथांच्या बाबतींत आढळतो. उदा. कूर्म-प्रतीकाच्या स्वरूपांत पूजिली जाणारी बंगालमधील धर्म-देवता. 'धर्म' हें या देवतेचें संस्कृत नांव 'दर (दर-दुर-दुल = कासव) आणि 'ओम्' (कोल भाषेंतील एक स्वार्थक प्रत्यय) या दोन ऑस्ट्रो-आशियाई शब्दांच्या संयोगाचें ध्वनि-रूपान्तर आहे, असें डॉ. सुनीतिकुमार चतर्जी यांनीं दाखवून दिलें आहे. 'हनुमन्त' हें मारुतीचें एक नांव 'अणमान्दि' (= नर-वानर) या द्राविड शब्दाचें संस्कृत ध्वनिरूपान्तरच आहे. उन्नयन-प्रक्रियेंतील या प्रवृत्तीचीं अनेक उदाहरणें भाषाशास्त्रज्ञांच्या निदर्शनास आलेलीं आहेत.

३ खंडोबाचें (मैलाराचें) मार्तण्डभैरवस्वरूपांत उन्नयन घडून आल्या-नंतर, 'मैलार' हें क्षुद्र स्वरूप आणि 'मार्तण्डभैरव' हें उन्नत स्वरूप यांचा संबंध लोकमानसांतून विस्मृत झाला आणि एकनाथोत्तर कालांत खंडोबाची स्तुति करणाऱ्या संतांनीं क्षुद्र देवतांची गणना करतांना त्या यादींत मैलार आणि मैराळी यांचींहि नांवें गोवलीं आहेत. यक्ष-राक्षस-पिशाच्चांच्या यादींत येणारा 'विनायक' आणि बालग्रह म्हणून भयकारी ठरलेला 'कुमार' हीं याच तथ्याचीं आणखी दोन उदाहरणें आहेत.

४. कर्नाटकांत 'मैलार' या नांवानें गाजत राहिलेला हा देव महा-राष्ट्रांत 'खंडोबा' या लोकप्रिय नांवानें प्रतिष्ठित झाला. दोन्ही प्रदेशांत आजहि या देवाची उपासना प्रचलित असतांना आणि या दोन्ही प्रादेशिक प्रवाहांत फारशी भिन्नता नसतांना, खंडोबाचें मूळ कर्नाटकां-तील मैलार हें होय, हें सत्य संशोधकीय पातळीवरून शोधावें लागलें—इतकें त्याचें विस्मरण पडलें होतें. तसेंच, खंडोबाची पत्नी म्हाळसा आणि मोहिनीचा अवतार म्हणून स्वतंत्रपणें नांदणारी म्हाळसा मूलत: एकच (माळचि-माळव्व) होय, याचेंहि स्मरण नष्ट झालें. म्हाळसेच्या या दोन स्वरूपांचा संचार एकाच प्रदेशांत असूनहि (महाराष्ट्रांत दोन्ही स्वरूपें नांदनाहेत) त्यांच्या एकात्मतेचें भान उरलें नाहीं. ही विस्मरणाची प्रवृत्तिहि चिन्तनीय आहे.

५. मुरुगन आणि अय्यप्पन या समान पातळीवरील दक्षिणी देवतांच्या उन्नयन-प्रक्रियेचा परिणाम मैलाराच्या उन्नयन-प्रक्रियेवर होऊं लागला

होता, मैलार मराठी प्रभावाखालीं येतांच त्याचें भैरवीकरण झालें आणि मराठी प्रदेशांतील भैरवश्रेणींतील केदार, रवळनाथ इत्यादि देवतांशीं त्याची आत्मीयता प्रस्थापित झाली. शक्ति-स्वरूप पावलेल्या अनेक ग्रामदेवींच्या बावतींतहि हाच प्रकार आढळतो. आपण या प्रकाराला ‘ देवताविज्ञानांतील जातिसंस्था ’ असें नांव गमतीनें देऊं शकतों.

६ अय्यप्पनच्या उन्नयन-प्रक्रियेंतील शिव-मोहिनी-कथा आणि मुरुगनच्या उन्नयन-प्रक्रियेंतील स्कन्द-कथा या दोन्हींचाहि प्रारंभीं जडूं पाहणारा संबंध तोडून मैलार मराठी प्रभावाखालीं भैरव बनला. ही घटना असें सिद्ध करते कीं, विशिष्ट लोकसमूहाचा अल्पकालीन प्रभावहि देवतांच्या विकसनांत क्रान्तिकारक स्थित्यन्तर घडवूं शकतो. अर्थात् या प्रवृत्तींत प्रत्येक वेळीं मात करण्याचाच हेतु असतो, असें नाहीं. प्रभावशाली लोकसमूहाच्या पारंपरिक दृढ श्रद्धांचा तो अभावित परिणामहि असूं शकतो.

७. ‘ मल्लारि-माहात्म्यां ’ त सप्तर्षींचें ‘ धर्मपुत्राः ’ असें विशेषण आलेलें आहे. ज्ञानेश्वरांच्या नांवावरील ‘ योगवासिष्ठ ’ या ग्रंथांत ‘ धर्मपुत्राः ’ या शब्दांतील ‘ धर्म ’ शब्दाचा ‘ युधिष्ठिर ’ असा अर्थ करून, सप्तर्षींना युधिष्ठिराचे सप्त पुत्र बनविलें आहे. त्याचप्रमाणें नाथांनीं ‘ भावार्थ रामायणां ’त रावणाच्या बंदींतील देवतांत समकालीन खंडोबाचा समावेश करून, त्याच्याकडे रावणाची दाढी करण्याचें काम दिलें आहे. पुढील मराठी कवींनीं या गोष्टीचा मुक्त अनुवाद केला आहे. जाणते-नेणतेपणानें घडलेल्या या विपर्यासांनींहि देवता-चरित्रांत भर पडत राहते. श्रीमद्भागवताच्या एकादश स्कंधांतील यदु-अवधूत-संवादांत जो अवधूत आहे, त्याचें नाथांनीं एकादश-स्कंध-टीकेंत दत्तात्रेयाशीं ऐकात्म्य कल्पिलें आणि तेव्हांपासून ‘ अवधूतानें केलेले चोवीस गुरु ’ हे दत्तात्रेयाच्या गुरुस्थानीं येऊन बसले. मूळ रामायणांत आधार नसतांना श्रीधरस्वामींनीं आपल्या ‘ रामविजय ’ ग्रंथांत रामाच्या अत्रि-आश्रम-निवासाच्या निमित्तानें राम आणि आत्रेय दत्त यांच्या भेटीचा सोहळा रसभरित शब्दांत वर्णन केला आहे. एखाद्या देवतेच्या विकसनाविषयींचे पुरावे कालक्रमानें मांडतां आले, तर ही देवताचरित्रवृद्धिकारक प्रवृत्ति चांगलीच स्पष्ट होऊं शकते.

३९८८९

८ सन्तांनीं खंडोबाच्या उपासनेंतील अनिष्टांचें निराकरण करण्यासाठीं खंडोबावर आध्यात्मिक रूपकें रचलीं. संतांचा हा प्रयत्न लोकमानसांत रुजला असता—दृढावला असता, तर खंडोबा लोकधर्माच्या क्षेत्रांतून अध्यात्माच्या क्षेत्रांत प्रविष्ट झाला असता आणि विठोबाच्या भक्तांप्रमाणेंच खंडोबाच्या भक्तांची वाणी आदरणीय बनली असती. देवताभेद आणि उपासनाभेद असून, भक्तांच्या अनुभूतींत जें सार्वकालिक आणि सार्वदेशिक ऐकात्म्य आढळतें, त्याचें कारण ही अध्यात्माची वैठक. आपलें उपास्य परब्रह्मस्वरूप आहे, असें मानल्यामुळें बाह्य नामरूपभेद अनुभूतीचें ऐकात्म्य बिघडवूं शकत नाहींत. खंडोबा संतांच्या या प्रयत्नांना विरोध करीत राहिला, ही गोष्ट वेगळी.

*कांहीं सांस्कृतिक अनुबन्ध*

खंडोबा हा कर्नाटक-महाराष्ट्राच्या सांस्कृतिक अनुबंधाचें जितें-जागतें प्रतीक आहे, हें आपण यापूर्वीं विस्तारानें पाहिलें आहे. या अनुबंधाचें विश्लेपण पुढीलप्रमाणें थोडक्यांत मांडतां येईल :

१ महाराष्ट्रांत खंडोबा या नांवानें लोकप्रिय असणारा हा देव मूळचा कर्नाटकांतील मैलार होय. मैलाराच्याच नामरूप-उपासनेचें संस्कृतीकरण 'मल्लारि मार्तण्ड भैरवा'च्या रूपानें झालें. या संस्कृतीकरणाचें श्रेय महाराष्ट्राकडे जातें. मैलार-खंडोबा कर्नाटक-महाराष्ट्राच्या सांस्कृतिक स्नेहबंधाचें प्रतीक आहे.

२. केरळमधील अय्यप्पनच्या उन्नयन-प्रक्रियेंतील शिव-मोहिनी-कथा आणि तामिळनाडमधील मुरुगनच्या उन्नयन-प्रक्रियेंतील स्कंदकथा यांचा मैलार-खंडोबाच्या उन्नयन-प्रक्रियेंत प्रारंभीं थोडा वांटा होता आणि आजहि त्या वांट्याचे अवशेष आपणांस खंडोबाच्या नामरूप-उपासनेंत आढळतात. ही वस्तुस्थिति केरळ-तामिळनाड-कर्नाटक-महाराष्ट्र या समग्र दक्षिणापथाच्या सांस्कृतिक अनुबंधाचा निर्देश करते.

३ कर्नाटक-महाराष्ट्राची सांस्कृतिक देवाण-घेवाण प्रादेशिक सान्निध्यामुळें पुष्कळच झालेली आहे. परंतु मध्यकाळांत अनेक शतकें दोन्ही प्रदेशांचे राज्यकर्तेहि एकच होते. शिव-मोहिनी आणि स्कंद यांचा संबंध डावलून मैलाराचें भैरवीकरण घडलें, तें मराठी प्रभावाखालीं—ही घटना

राजकीय स्थित्यंतरांतून घडलेली सांस्कृतिक देवाण-घेवाण स्पष्ट करते.

४. कदंब मूळचे कर्नाटकांतील होत. कदंबकुलाची एक शाखा गोव्यांत नांदूं लागली. सप्तकोटीश्वर हें कदंबांचें उपास्य दैवत. कदंबांच्या घराण्यांत मैळलदेवी असें म्हाळसावाचक व्यक्तिनाम आढळतें. मैलाराच्या मार्तण्डभैरव-स्वरूपांतील अवतार-कथेंत सप्तकोटीश्वराची प्रकटीकरण-कथा व ' मिलेगे भैरव ' हें कदंब राजांचें बिरुद यांचा कांहीं वांटा असल्याचें आपण मागें (पृ. २४–२५) पाहिलेंच आहे. कर्नाटकांतील कदंबांचें महाराष्ट्रांत झालेलें हें स्थलांतर कर्नाटक-गोमंतक-महाराष्ट्र यांच्या सांस्कृतिक संबंधांत एक नवा अनुबंध जोडावयास कारणीभूत झालें.

*लोकमानसाचें दर्शन*

आतांपर्यंत आपण खंडोबा आणि म्हाळसा या दोन देवतांच्या विकसनाचा इतिहास पाहिला आणि त्यांतून निष्पन्न होणारीं देवतावैज्ञानिक तथ्यें व सांस्कृतिक अनुबंधहि तपासून घेतले. या सर्व विवेचनांतून लोक-मानसाचें दर्शनहि घडत गेलें आहे. देवतांच्या घडणींत ज्या प्रवृत्तींचा संचार असतो, त्यांपैकीं कांहीं प्रवृत्ति ' देवतावैज्ञानिक तथ्यां 'च्या तपासणींत आपण पाहिल्याच आहेत. ' सांस्कृतिक अनुबंधा 'चें दर्शन घेतांना, प्रादेशिक सान्निध्य आणि शासकीय प्रभाव लोकमानसावर कोणता परि-णाम घडवितात आणि त्या परिणामाचें प्रतिबिंब देवतांच्या घडणींत कसें पडतें, तेंहि आपण पाहिलें. मैलार-खंडोबाचें एक प्रधान वैशिष्ट्य हें आहे कीं, त्याच्या उन्नयनाचे सर्व प्रयत्न बह्वंशीं निष्फळ ठरले. तो सर्वस्वीं लोकश्रद्धेच्या अधीन राहिला. सकाम, स्थूल आणि अपरिष्कृत अशी लोक-श्रद्धाच त्याच्या उपासनाक्षेत्रांत आजहि प्रभावशाली आहे. तो आपल्या मूळ स्वरूपाशीं इमान राखून राहिला आहे. हें असें कां घडलें ? खंडोबाला विठोबाप्रमाणें अध्यात्मक्षेत्रांत अनन्यसाधारण प्रतिष्ठा कां लाभली नाहीं ? याचें कारण, मला वाटतें, असें असावें कीं, विज्ञानयुगापूर्वीच्या लोकमानसाला अशा सकाम भक्तीच्या देवतांची प्राथमिक गरज होती. अध्यात्माची कास धरणारीं–धरूं शकणारीं अपवादात्मक थोडीं माणसें सोडलीं, ––आणि अध्यात्माची महती, बौद्धिक पातळीवरून कां होईना, ओळखणारीं कांहीं जाणतीं माणसें सोडलीं — तर उरलेला व्यापक समाज

अशा प्रवृत्तीचा होता कीं, आपल्याला कोणा तरी शक्तीनें चमत्कारानें संकटांतून तारावें, आपल्या प्रापंचिक आधि-व्याधि त्या शक्तीच्या कृपेनें दूर व्हाव्यात, आपल्या काम-कामनांची पूर्ति तिनें करावी आणि हें सर्व घडण्यासाठीं आपण त्या शक्तीच्या प्रतीकाची पूजा करावी, तिच्यापुढें आत्मक्लेश करून घ्यावेत, तिला बळी अर्पावे! 'शक्तीच्या प्रतीकाची पूजा' असे शब्द मीं वापरले खरे, परंतु या अपरिष्कृत लोकमानसाची निष्ठा त्या प्रतीकाशींच सर्वांशानें निगडित असे– त्या निष्ठेला त्या प्रतीका-मागच्या सर्वव्यापक शक्तीचें भान नसे. याचमुळें अशा देवतांच्या समूहाला एकाच सर्वव्यापक शक्तीच्या अनेकविध बाह्य प्रतीकांचें स्वरूप न येतां अनेक शक्तींच्या वेगवेगळ्या प्रतीकांचें स्वरूप येत असे.

विज्ञान-युगाच्या उदयानंतर ही अपरिष्कृत आणि सकाम लोकश्रद्धा हळूहळू मावळूं लागली आहे. कालांतरानें ती समूळ मावळेल आणि आत्म-शुद्धींतून उमलणारी अध्यात्मशक्ति विज्ञानाचें अधिष्ठान बनून मानवी जीवन निरामय आणि आनंदमय करण्यासाठीं अग्रेसर होईल, असा मला विश्वास वाटतो.

# क्षेत्र-सूची

खंडोबा आणि म्हाळसा यांच्या तीर्थक्षेत्रांविषयींचे उल्लेख मागें (पृ. ७९–८१ व ६६–६७) संक्षेपानें येऊन गेले आहेतच. श्री. ग. ह. खरे यांनीं आपल्या 'महाराष्ट्राचीं चार दैवतें' या पुस्तकांत नऊ-दहा खंडोबाक्षेत्रांची माहिती प्रत्यक्ष निरीक्षणावरून दिली आहे. जेजुरी, पाली, नेवासें इत्यादि क्षेत्रांच्या स्वतंत्र परिचय-पुस्तिकाहि प्रसिद्ध झालेल्या आहेत. जिल्हा गॅझेटियर्समधूनहि कांहीं स्थानांची माहिती मिळते. याशिवाय पौराणिक धर्तीवर रचलेलीं जेजुरीसारख्या प्रसिद्ध स्थानांचीं 'माहात्म्यें' हि उपलब्ध आहेत. क्षेत्रपरिचयाचा विस्तार माझ्या पुस्तकाच्या कक्षेंत येत नसल्यानें मीं येथें केवळ स्थूल-वर्णनात्मक क्षेत्र-सूची स्थलनामांच्या वर्णानुक्रमानें दिली आहे.

**अणदूर** : (जि. उस्मानाबाद) नळदुर्ग-सोलापूर रस्त्यावर नळदुर्गाच्या अलीकडे तीन मैलांवर हें गांव आहे. हें नळदुर्गाच्या खंडोबाचें उपस्थान आहे. गांवाच्या मध्यभागीं बंदिस्त प्राकारांत खंडोबाचें मंदिर आहे. गाभाऱ्यांत खंडोबाचा तांदळा आहे. या मंदिराच्या पश्चिमेस 'जुन्या खंडोबा'चें आणखी एक मंदिर आहे. अणदूरच्या देवस्थानाचें वार्षिक उत्पन्न सुमारें २००० रुपये असून, एक समिति देवस्थानची व्यवस्था पाहते. देवाच्या नित्य पूजेसाठीं नळदुर्गाच्या नागझरीचें पाणी आणतात. मार्गशीर्ष शु. प्रतिपदेस येथें यात्रा भरते. त्या दिवशीं रात्रीं छबिना झाल्यावर देव नळदुर्गास जातात आणि तेथें सुमारें दीड महिना राहून पौष व. द्वादशीच्या सुमारास परततात. येथें शालिवाहन शकाच्या सतराव्या शतकांतील चार-पांच शिलालेख आहेत. त्यांवरून या स्थानाची उभारणी उत्तरपेशवाईंत झालेली दिसते.

**अनेगुंदि** : (विजयनगर-तुंगभद्रेपलीकडे). येथें मैलारमंदिर आहे. या मंदिराजवळ इ. स. १५८० मधील एक कानडी लेख आहे. त्या लेखांत

'रामराज चिन्न तिम्मराजु यानें अनेगुंदि येथील कांहीं जमीन व नारळीचीं झाडें मैलारदेवाच्या पूजेसाठीं दिल्याचें ' सांगितलें आहे.

**कल्लुकोटे** : (शिरें-तुमकूर-म्हैसूर) येथें श्रावण शु. ५, श. १५२२ (३ ऑगस्ट १६००) या दिवशींचा एक कानडी शिलालेख असून, त्यांत 'नागणदेव नांवाच्या गृहस्थानें आपल्या पित्याच्या स्मरणार्थ तेथें मैलार-लिंगाचें देऊळ बांधल्याचा ' उल्लेख आहे.[१] या ठिकाणीं आज मैलार-मंदिर अस्तित्वांत आहे कीं नाहीं, तें माहीत नाहीं.

**कारीमनि** : (परसगड-बेळगांव). येथें मल्लय-मंदिर आहे. या मंदिरांत मयिलारदेवाचा उल्लेख करणारा माघ श. १४९४ (जानेवारी १५७३) या काळांतील एक लेख आहे.

**कुबटूर** : (जि. शिवमोग्ग-म्हैसूर). येथें मैलाराचें देऊळ आहे. हें मंदिर राष्ट्रकूटकालीन असावें, असें तेथील प्राचीन अवशेषांवरून श्री. खरे यांचें अनुमान आहे.

**कोंडवीडु** : (गुंटूर). येथील मशिदीच्या चार खांबांवर इ. स. १४१५ मधील एक तेलगु शिलालेख आहे. त्यांत मैलारदेवाच्या मंदिरास दिलेल्या खासगी देणग्यांचा तपशील आहे. या लेखावरून हें स्पष्ट आहे कीं, मूळ मैलार-मंदिराचें मशिदींत रूपांतर झालें आहे.

**कोंढापूर** : पुणें-नगर रस्त्यावरील या खेडयांत एक खंडोबाचें साधें देऊळ आहे.

**कौरवदुर्ग** : केळदीचा राजा पहिला वेंकटप्प (इ. स. १४९२–१५२९) यानें हा किल्ला शत्रूंच्या ताब्यांतून परत मिळवून त्यास ' भुवनदुर्ग ' असें नांव दिलें आणि त्याच्या बालेकिल्ल्यांत जीं चार मंदिरें उभारलीं, त्यांत एक मैलाराचें होतें, असा उल्लेख ' केळदिनृपविजयां ' त आलेला आहे.

**चांदखेड** : (मावळ-पुणें). या गांवीं धनगरजातींतील रामजीबाबा नामक खंडोबा-भक्ताच्या निमित्तानें अलीकडच्या काळांत खंडोबाचें मंदिर उभारलें गेलें आहे.

**जेजुरी** : (ता. पुरंदर, जि. पुणें) हें गांव पुण्याच्या आग्नेयीस सुमारें तीस मैलांवर आहे. महाराष्ट्रांतील खंडोबाच्या स्थानांत याची ख्याति सर्वाधिक आहे. येथें कऱ्हेपठार व किल्ला-कोट अशा दोन ठिकाणीं खंडोबाचीं

स्थानें आहेत. यांतील कऱ्हेपठार हें अधिक जुनें असल्याची समजूत आहे. हें स्थान गांवाच्या नैर्ऋत्येस सुमारें चार मैलांवर एका डोंगरावर आहे. हें मंदिर पूर्वाभिमुख असून गाभाऱ्यांत खंडोबाची मूर्ति आणि लिंग अशीं दोन्ही प्रकारचीं प्रतीकें आहेत. मंदिराच्या उत्तरेस हेगडेप्रधानाची वेगळी देवळी आहे. या मंदिराच्या परिसरांतील राम-मंदिरांत श. १७१२ या कालनिर्देशाचा एक मराठी शिलालेख आहे.

कऱ्हेपठाराच्या पूर्व-ईशान्य दिशेस बऱ्याच अंतरावर एका टेकडीवर खंडोबाचें दुसरें ठाणें आहे. हें तटबंदीनें व्यापलेलें असल्यामुळें लोक यास 'गड-कोट' म्हणतात. वर जाण्यासाठीं पायऱ्या आहेत. उत्तर दरवाजावर नगारखाना आहे. मंदिर मात्र पूर्वाभिमुख आहे. मंदिरासमोर वीस फूट व्यासाचें पितळी पत्र्यानें मढवलेलें मोठें कासव आहे. सोपा, मंडप आणि गाभारा अशा तीन भागांनीं युक्त असें हें मंदिर अगदीं साधें आहे. गाभाऱ्यांत खंडोबा व म्हाळसा यांचीं स्वयंभू लिंगें आहेत. शिवाय खंडोबा व म्हाळसा यांच्या चांदी-सोन्याच्या मूर्तिहि आहेत. वाणाईचेंहि स्वयंभू लिंग आहे.

येथें चैत्र (शु. १२ ते व. १), पौष (शु. १२ ते व. १), माघ (शु. १२ ते व. १), मार्गशीर्ष (शु. १ ते शु. ६), आश्विन (शु. १ ते शु. १०) या महिन्यांत आणि प्रत्येक सोमवती अमावास्येस यात्रा भरते. यात्रांना प्रचंड गर्दी असते.

येथें अनेक शिलालेख आहेत. त्यांतील सर्वांत प्राचीन शिलालेख संवत् १३०३ या कालोल्लेखाचा आहे. मराठेशाहींत अनेक सरदारांचा आणि पेशव्यांचा या स्थानाशीं आत्मीय संबंध आला. होळकरांचें हें कुळदैवत. या देवस्थानासंबंधींचे अनेक ऐतिहासिक कागद उपलब्ध आहेत. पेशवाईंत या देवस्थानास हत्ती वाहण्याची चाल होती. राज्यकर्तेहि येथील देवास नवस करीत. न्यायनिवाड्यासाठीं दिव्यें करण्याचे प्रसंगहि या स्थानीं घडलेले आहेत. माहात्म्यें, स्तोत्रें, लोकगीतें, लोककथा इत्यादींचा मोठा संभार जेजुरीच्या स्थानाविषयीं उपलब्ध आहे.

**टाकळी खंडेश्वरी** : (ता. कर्जत, जि. नगर). येथें खंडोबाचें मंदिर आहे. त्या परिसरांतील हें प्रसिद्ध स्थान आहे.

**तिलोरें** : मुंबई-गोवें मार्गावरील या गांवीं खंडोबाचें मंदिर आहे.

**देवी-होसूर** : (ता. हावेरी, जि. धारवाड). येथें सध्यां बनशंकरीचें मंदिर आहे. या मंदिरांत इ. स. १०६३ व ११४८ या काळांतील दोन शिलालेख आहेत. या शिलालेखांत, अनुक्रमें इंदपय्य व रेचरस या अधिकाऱ्यांनीं माळजदेवीच्या मंदिरावर मकर-तोरण बांधलें व तिच्या नैवेद्य-नंदादीपाची व्यवस्था केली, असे उल्लेख आहेत. या शिलालेखां-वरून श्री. पांडुरंग देसाई यांनीं असें अनुमान काढलें आहे कीं, पूर्वीच्या माळज-(म्हाळसा)-मंदिराचेंच पुढें बनशंकरी-मंदिरांत परिवर्तन झालें असावें. म्हाळसेच्या उपासनेचा प्राचीनतम पुरावा देणारें हें स्थान आहे.

**नळदुर्ग** · (जि. उस्मानाबाद). गांवाच्या उत्तर दिशेस खंडोबाचीं दोन मंदिरें परस्परांपासून फर्लांगभर अंतरावर आहेत. पूर्वेकडील मंदिर उपेक्षितावस्थेंत आहे. असें म्हणतात कीं, कोणींतरी देवापुढें गाय मारल्या-मुळें देव अणदूर येथें जाऊन राहिला आणि नंतर पश्चिमेकडील सध्यांचें मंदिर देवी अहल्याबाईनें बांधल्यावर देव तेथें येऊन राहिला. हें मंदिर शिखरविरहित आणि मजबूत बांधणीचें असून त्याच्याभोंवतीं उत्तम फरसबंदी केलेली आहे. गाभाऱ्यांत लिंगप्रतीक आहे. देव येथें नेहमीं राहत नाहीं. तो अणदूरच्या मंदिरांतच नेहमीं राहतो. केवळ वर्षांतून एकदां मार्गशीर्ष शु. १ ते पौष व. १२ एवढा काळच देवाचा निवास नळदुर्गास असतो. छबिन्याच्या दिवशीं येथें ज्या लोकांच्या अंगांत येतें, त्यांना ' वारू ' म्हणतात. ते अंगांत आल्यावर सुताच्या कोरड्यानें, कातडीं लोंबू लागे-पर्यंत स्वत:च्या अंगावर मारून घेतात.

**नागपूर** (विदर्भ). शहराच्या रामबाग या भागांत खंडोबाचें मंदिर आहे. दुसरें मंदिर एम्प्रेस मिल नं. ५ जवळ आहे. हें अठराव्या शतकांत उभारलें गेलें असावें. गर्भगृहासमोर बसविलेल्या शिळेवर फसली सन १२२९ (इ. स. १८१९) चा कालोल्लेख आहे.

**नांदुरा** : (बीड). या गांवीं म्हाळसेचें मंदिर असल्याचा उल्लेख महानुभावांच्या ' स्थानपोथीं 'त आहे.

**निबगांव** : (ता. खेड, जि. पुणें). खेडच्या आग्नेयीस पांच मैलांवर, निबगांवीं–गांवाच्या उत्तरेस सुमारें मैलभर अंतरावर खंडोबाचें प्रसिद्ध

देवस्थान आहे. या उंचवट्यावरील मंदिराभोंवतीं चोवीस फूट उंचीचा तट असून त्या तटास बुरूज आहेत. प्राकारांत फरसबंदी असून मध्यभागीं मुख्य मंदिर आहे. फरसबंदी प्राकाराची लांबी-रुंदी १९५' × ११८' एवढी आहे. गाभाऱ्यांत सयोनि स्वयंभू लिंगें असून, वाणाई, मल्लारि, म्हाळसा, भैरव व जोगेश्वरी यांच्या धातुमूर्ति आहेत. येथें देवाच्या नित्य पूजेसाठीं भीमेचें पाणी आणतात. चंपाषष्ठी, माघी पौर्णिमा आणि चैत्री पौर्णिमा या वेळीं यात्रा भरतात. येथें वाघ्ये आहेत, पण मुरळ्या नाहींत. या ठिकाणीं दीपमाळांवर दोन शिलालेख आहेत. त्यांचे काळ श. १६९५ व १८०५ असे आहेत. या देवस्थानासंबंधींचे ११ कागद सरदार आबासाहेब मुजुमदारांनीं श. १८३५ च्या भा. इ. सं. मं. इतिवृत्तांत प्रसिद्ध केले आहेत. त्यांतील एका शिवकालीन कागदांत, या ठिकाणीं देव कसा प्रकट झाला, यासंबंधींची हकीकत दिली असून प्रकटीकरणाचा काळ मार्गशीर्ष शु. ५ श. १३४७ (२६ नोव्हेंबर १४२४) असा दिला आहे. सोळाव्या शतकांत हें देवस्थान सुस्थिर झालें असावें, असें कागदपत्रांतील उल्लेखांवरून दिसतें.

**नेवासें** (ता. नेवासें, जि. अहमदनगर). हें म्हाळसा-मोहिनीचें प्रख्यात स्थान आहे. येथील देवतेला 'मोहिनीराज' असें लोकप्रिय नांव असून, तो विष्णूचा अर्धनारीनटेश्वर अवतार आहे, अशी लोकांची धारणा आहे. नेवासें हें नांव अत्यंत प्राचीन आहे. इतिहास-पूर्व काळांतील संस्कृतीचे अनेक स्तर तेथील उत्खननांत सांपडले आहेत. निवास किंवा निधिवास या नांवांनीं त्याचे प्राचीन उल्लेख आढळतात. हें गांव प्रवरा नदीच्या कांठीं असून जवळच गोदा-प्रवरा-संगम आहे. नेवाशाचे दोन भाग असून त्यांस नेवासें खुर्द व नेवासें बुद्रुक अशीं नांवें आहेत. पैकीं नेवासें (खुर्द)-मध्यें मोहिनीचें मंदिर आहे आणि नेवासें (बुद्रुक) मध्यें खंडोबाचें मंदिर आहे. मोहिनीचीं जुनें मंदिर आणि नवें मंदिर अशीं दोन मंदिरें आहेत. जुन्या मंदिरावर मुसलमानांनीं अतिक्रमण करून शेजारीं मशीद बांधली व त्या परिसरांत वस्ती केली, त्यामुळें होळकरांचे दिवाण सरदार गंगाधरपंत चंद्रचूड यांनीं नवें मंदिर बांधलें. नवें मंदिरच सध्यां गाजतें आहे. ज्ञानेश्वरीचें जन्मस्थान, म्हाळसेचें निवासस्थान आणि एक प्राचीन

संस्कृतीचें केंद्र म्हणून या स्थानाचा महिमा अपार आहे. वाङ्मयांत आणि कागदपत्रांत या स्थानाचे अनेक उल्लेख आलेले आहेत.

**पट्टरु** (पाटूर) . (पुल्लंपेट—कडपें). या गांवाच्या दक्षिणेस असलेल्या एका तेलगु लेखांत इ. स. १३३२ मध्यें पौलम्मगारू या व्यक्तीनें पाटूर येथें मैलारमंदिर उभारून त्यास कांहीं जमीन दान दिल्याचा उल्लेख आहे.

**पाली** : (बीड). येथें मैलार-मंदिर असल्याचा उल्लेख 'लीळाचरित्रां'त (पूर्वार्ध-द्वितीय खंड) आणि 'स्थानपोथी'त उल्लेख आहे. या मंदिरांत चक्रधरांचा कांहीं काळ निवास घडला होता.

**पाली** : (ता. कऱ्हाड, जि. सातारा). हें गांव सातारा-कोल्हापूर रस्त्यावर साताऱ्यापासून १३ मैलांवर असलेल्या अतीत या गांवाच्या नैर्ऋत्येस पांच मैलांवर आहे. तारळी नदीच्या प्रवाहामुळें गांवाचे पाली आणि राजापूर असे दोन भाग झालेले आहेत. खंडोबाचें मंदिर राजापूर भागांत आहे. राजापूरच्या पूर्वेस बांधलेल्या या पूर्वाभिमुख मंदिराभोंवतीं फरसबंदी व तटबंदी आहे. गाभाऱ्यांत खंडोबा व म्हाळसा यांचीं स्वयंभू लिंगें असून, त्यांचे मुखवटेहि ठेवलेले आहेत. कोणा पालाई गौळणीच्या भक्तीनें प्रसन्न होऊन देव इथें प्रकट झाला, अशी स्थानिक लोककथा आहे. येथें दोन-तीन शिलालेख आहेत आणि देवस्थानसमितीजवळ कांहीं कागदपत्रेंहि आहेत. परंतु ते लेख व कागद अठराव्या शतकांतील आहेत. चंपाषष्ठी, दसरा, सोमवती अमावास्या हे येथील दिनविशेष असून मुख्य यात्रा पौष शु. १४ या दिवशीं मृगनक्षत्रावर भरते. येथील यात्रेस रामोश्यांची गर्दी फार असते.

**पेदिपाडु** : (ओंगोल-नल्लूर). येथें मल्लेश्वराचें मंदिर आहे. या मंदिरांत ५ ऑगस्ट १४२४ या कालोल्लेखाचा देवाच्या पूजेच्या 'वृत्ती'-विषयींचा एक तेलगु शिलालेख आहे.

**पेनुगोंडे** : (अनंतपूर). येथें किल्ल्याच्या पूर्वद्वाराच्या वाटेवर २२ ऑक्टोबर १५२८ या दिवसाचा एक कानडी शिलालेख आहे. त्यांत, जायनायकाचा मुलगा कोमरनायक यानें येथें मैलारदेवासाठीं माळवदी मंदिर बांधल्याचा उल्लेख आहे.

**बीड** . येथें गांवाबाहेर एका उंचवटयाच्या भागीं खंडोबा आणि खंडे-

श्वरी यांचीं मंदिरें आहेत. या खंडेश्वरीचा उल्लेख श्रीपतीच्या ' ज्योतिष-रत्नमालें 'त आहे. स्थानिक आख्यायिकेप्रमाणें तें माहूरच्या रेणुकेचें ठाणें आहे. परंतु खंडोबाच्या सान्निध्यामुळें असें खात्रीपूर्वक वाटतें कीं, तें म्हाळसेचेंच स्थान असावें.

**भोगावती** : (पैठण). येथें म्हाळसेचें मंदिर असल्याचा उल्लेख ' स्थान-पोथीं 'त आहे.

**मंगसूळी** : (ता. अथणी, जि. बेळगांव). हें गांव पुणें–मिरज–बेळगांव रेल्वेरस्त्यावर शेडबाळ स्टेशनाच्या पूर्वेस शेडबाळ–विजापूर रस्त्यावर पांच-सहा मैलांवर आहे. मंगसूळी गांवाच्या पश्चिमेस गांवापासून एक मैल अंतरावर टेकडीवर हें देवस्थान आहे. देवळाच्या भोंवतीं मोठा तट आहे. प्राकारांत खंडोबा आणि हेगडेप्रधान यांचीं स्वतंत्र मंदिरें आहेत. गाभाऱ्यांत मल्लय, गंगा, म्हाळसा व बाणाई यांचीं लिंगें आहेत. शिवाय गाभाऱ्यांत खंडोबा, म्हाळसा व बाणाई यांच्या मूर्तिहि आहेत. अली आदिलशहाच्या कारकीर्दींत, बसवप्रभु नामक स्वाभिमानी हिंदु जहागिरदाराच्या भक्तीमुळें हें स्थान निर्माण झालें, अशी लोककथा स्थानिक लोक सांगतात. येथें चैत्र शु. ५ ते १० पर्यंत मोठी यात्रा भरते.

**मल्हार** : (विलासपूर-मध्यप्रदेश). कलचूरि संवत् ९१९ (इ. स. ११६७–६८) या काळचा एक संस्कृत शिलालेख येथें आहे. त्यांत या गांवाचें नांव 'मल्लालपत्तन ' असें आहे. ग्रामनामावरून हें मैलाराचेंच स्थान दिसतें.

**मल्हारपेठ** : (ता. पाटण, जि. सातारा). येथें मल्हार-कोळ्यांची वस्ती असून, गांवांत खंडोबाचें मंदिर आहे.

**मालेगांव** : हें गांव मराठवाड्यांत नांदेडजवळ आहे. येथील खंडोबाचें स्थान प्रसिद्ध आहे. येथील खंडोबाच्या यात्रेंत होणाऱ्या गाड्यांच्या शर्यती स्थानिक लोकांत प्रतिवर्षी गाजत असतात.

**मैलापूर** : मद्रास शहराचा एक भाग. तमिळ वाङ्मयांत व प्राचीन लेखांत याचीं नांवें मयिलाप्पुर, मयिलाप्पु, मयिलार्पु, मयिलाप्पिल अशीं आढळतात. जुन्या काळांत हें मैलाराचें स्थान असावें.

**मैलार** : (ता. हडगल्लि, जि. बळ्ळारि). हें मैलाराचें प्रसिद्ध ठाणें

असलेलें खेडेगांव तुंगभद्रेच्या कांठीं आहे. देवाचें आणि गांवाचें नांव एकच आहे. गांवाच्या उत्तरेस जवळच मैलार-मंदिर आहे. मंदिराच्या गाभाऱ्यांत उद्भवलिंग, धातूची भोगमूर्ति आणि मण्मैलार (मृण्मय मैलार) मूर्ति आहे. मण्मैलार म्हणजे मातीचा मैलार (मण्णु—माती). ही मूर्ति मातीची आहे, असें मानलें जातें. या मूर्तीमुळें या स्थानास 'मण्मैलार' असेंहि म्हणतात. ही मूर्ति आणि हें स्थान मैलार-खंडोबाच्या विकसनाच्या इतिहासांत महत्त्वपूर्ण कसें आहे, याचा विचार मागें (पृ. ३९–४०) येऊन गेलाच आहे. येथें वैशाख शु. १२ या दिवशीं मैलार-माळव्व-विवाहाचा सोहळा असतो. त्या निमित्तानें वैशाख शु. १० ते व. १ इतके दिवस उत्सव चालतो. याशिवाय कार्तिकांत महिनाभर दीपोत्सव, मार्गशीर्षांत शु. १ ते ६ नवरात्र व चंपाषष्ठीचा उत्सव, पौषांत धनुर्मास, रथसप्तमीच्या दिवशीं गांवाबाहेरील कुरबत्त्यव्वाच्या भेटीस जाण्याचा कार्यक्रम हे दिन-विशेष प्रसिद्ध आहेत. माघांत शु. १५ ते व. ३ या दिवसांत सर्वांत मोठी यात्रा भरते. या यात्रेस लाख-दीड लाख यात्रिक जमतात. या देवस्थानास सेवेकऱ्यांसाठीं ६०० एकर जमीन असून समर्पणद्रव्याचें उत्पन्न सुमारें १५ हजारांचें आहे. येथें मुरळ्यांना कायद्यानें बंदी असल्यामुळें केवळ वाघ्येच आढळतात.

**मैलारपूर** : (बीदर). बीदर-उदगीर रस्त्यावर बीदरच्या वायव्येस सुमारें दहा मैलांवर हें गांव आहे. या मंदिराच्या परिसरांत अनेक पुरातन अवशेष आहेत. मंदिर बंदिस्त प्राकारांत असून पूर्वाभिमुख आहे. गाभाऱ्यांत चतुर्भुज मार्तण्ड भैरवाच्या अनेक मूर्ति आहेत. मार्गशीर्ष शु. ६ (चंपाषष्ठी) ते शु. १० या दिवसांत मुख्य वार्षिक उत्सव होतो. मार्गशीर्षांत महिनाभर यात्रा लोटत असते; गुरांचा बाजार चालू राहतो आणि अमावास्येच्या दिवशीं पंधरा हजारांवर यात्रिकांची दाटी जमते. जुन्या वाङ्मयांत उल्लेखिलें जाणारें मैलार-खंडोबाचें प्रेमपूर (पेंबर) तें हेंच होय. संत दासोपंतांचा हा कुलदेव होता. याच्या दक्षिणेस दोन मैलांवर म्हाळसापूर आहे.

**मैलार-देवरगुड्ड** : सदर्न रेल्वेच्या पुणें-बंगलूर मार्गावर पुण्यापासून ३९५ मैलांवर हें स्टेशनाचें गांव आहे. गांवाच्या पूर्वेस चार मैलांवर

एका टेकडीवर देवाचें स्थान आहे. या देवस्थानामुळेंच या गांवाला 'देवर-गुड्ड' (देवाची टेकडी) असें नांव मिळालें आहे. मंदिर पूर्वाभिमुख आहे. पण प्राकाराचें महाद्वार उत्तराभिमुख आहे. दरवाजाच्या बाहेर हेगडे-प्रधानाचें स्वतंत्र मंदिर असून त्यांत त्याची विष्णुस्वरूप मूर्ति आहे. प्राकारांत घृतमारी (तुप्पद माळव्व) चें छोटें मंदिर आहे; तसेंच गंगि-माळव्वचेंहि मंदिर आहे. मुख्य मंदिराच्या गाभाऱ्यांत मैलाराचें स्वयंभूलिंग, मार्तण्डभैरवाची चतुर्भूज शिलामूर्ति आणि आणखी दोन धातुमूर्ति आहेत. स्वयंभू लिंगाचें दर्शन स्त्रियांनीं घ्यायचें नाहीं, असा येथील संकेत आहे. या मंदिरांत सुमारें चाळीस नदादीप देवत असतात—यांतील अनेक धन-गरांच्या देणग्यांतून चालणारे व तुपाचे आहेत. येथें ज्येष्ठ शु. १४ या दिवशीं रंगोत्सव होतो. आश्विनांत नवरात्रोत्सव असतो. दसऱ्याच्या दिवशीं गोरप्प देवाच्या धनुष्यावर चढून भविष्य सांगतात आणि कंचवीर पवाड (छोटी पहार पोटरींत आरपार मारून घेणें) करतात. आश्विन व. ९ या दिवशीं देव कुरवत्यव्वाच्या भेटीस जातो. चंपाषष्ठीचें नवरात्र आणि माघी पौर्णिमेची यात्रा या वेळीं यात्रिकांची विशेष दाटी जमते. येथील गोरप्प (वाघ्ये) बहुश: धनगर आहेत. बसव्यांची (मुरळ्यांची) संख्या आतां कमी झालेली आहे.

**मैलारलिंग** : (धारवाड). धारवाडपासून सुमारें दोन मैलांवर एका टेकडीवर मैलारलिंगाचें मंदिर पूर्वाभिमुख आहे. मंदिरांत मैलाराची (मार्तण्डभैरवाची) चतुर्भुज मूर्ति आहे. मंदिरांतील खांबांवर असलेल्या फारसी लेखांवरून असें दिसतें कीं, या मंदिराचें मशिदींत रूपांतर झालें होतें. इ. स. १७५३ मध्यें धारवाड पेशव्यांच्या ताब्यांत आल्यावर या मंदिराचें मशीद-स्वरूप घालवून त्यांत मैलारलिंगाची पुन: प्रतिष्ठा केली गेली, असें धारवाड गॅझेटियरमध्यें म्हटलें आहे.

**म्हाडदोळ** : (फोंडे महाल—गोमंतक). हें म्हाळसेचें प्रख्यात मंदिर फोंडे-पणजी रस्त्यावर आहे. पूर्वी म्हाळसेचें मंदिर साष्टी महालांत वेर्णे (वरुणापुर) येथें होतें. सोळाव्या शतकांत पोर्तुगीजांनीं त्याचा मूर्तीसह विध्वंस केला. त्यानंतर देवीची नवी प्रतिष्ठा सध्यांच्या ठिकाणीं झाली. देवीस म्हाळसा नारायणी म्हणतात. 'नारायणी' म्हणजे नारायणाचा

अवतार असलेली मोहिनी. हें अत्यंत रमणीय स्थान आहे. या देवालयांत रामजन्मोत्सव, अक्षय्यतृतीया, वसंतपूजा, अनंतव्रत, नवरात्र, दसरा, वनभोजन, चंपाषष्ठी, काला, माघ शु. ६ ते १० पर्यंत जत्रोत्सव इत्यादि उत्सव होतात. यांत जत्रोत्सव फार गाजतो. उत्पन्नाच्या दृष्टीनें हें गोव्यांतील चौथ्या क्रमांकाचें देवस्थान आहे.

**म्हाळसापूर** : बीदरजवळील मैलारपुराच्या दक्षिणेस दोन मैलांवर हें गांव असून, तेथें म्हाळसेच्या पादुका आहेत.

**म्हाळसापूर-जवळें** : हें म्हाळसेचें स्थान बीडजवळ आहे.

**म्हाळापूर** : हें म्हाळसेचें स्थान नगर विभागांत टोक्याजवळ असून, कांहींसें उपेक्षित आहे.

**वालसेंग** : ( वाल सावंगी, जि. औरंगाबाद ). येथें म्हाळसा-मंदिर असल्याचा उल्लेख ' स्थानपोथीं 'त आहे.

**वेमवरम्** : (रामचंद्रपुरम्–गोदावरी). अल्लय वेम रेड्डि याच्या श. १३५६ (इ.१४३४) मधील संस्कृत–तेलगु ताम्रपटांत येथील विविध देवांना ज्या वृत्ति दान केल्याची नोंद आहे, त्यांत येथील मैलारदेवतेच्या वांट्यास पाव वृत्ति आलेली आहे.

**शेंगुड** : (जि. नगर). हें खंडोबाचें प्रसिद्ध ठाणें आहे.

**साडेगांव** : (जि. औरंगाबाद). येथें मैलाराचें ठाणें असल्याचा उल्लेख 'स्थानपोथीं'त आहे.

**सातारें** : (जि. औरंगाबाद). हें गांव औरंगाबाद स्टेशनाच्या आग्नेयीस सुमारें दोन मैलांवर डोंगराच्या पायथ्याशीं आहे. येथें खंडोबाचें प्रसिद्ध स्थान आहे. येथील खंडोबाचें मंदिर जांभ्या दगडाचें व कलाकुसरीनें नटवलेलें असून, त्याची बांधणी पेशवाईंत औरंगाबादेजवळच्या वोरसरच्या भालेराव-कुलकर्ण्यांनीं केली, असें म्हणतात. येथील गाभाऱ्यांत खंडोबाच्या अनेक मूर्ति आहेत, पण त्याच्या परिवारांत हेगडे प्रधान व कुत्रा यांचा अभाव आहे. गाभाऱ्यांत आठ फूट लांबीचा दुधारी खांडा आहे. येथें चंपाषष्ठी, वांगरषष्ठी (पौष शु. ६) आणि पौषी पौर्णिमा अशी वर्षांतून तीन वेळां मोठी यात्रा भरते. चंपाषष्ठीच्या यात्रेला वीस-पंचवीस हजार यात्रिकांची दाटी जमते. येथें मुरळ्या नव्यानें वनत नाहींत,

परंतु वाघ्ये बनण्याची चाल अजूनहि जिवंत आहे.

**सोनई** : (ता. नेवासें, जि. अहमदनगर). येथें मैलाराचें स्थान असल्याचा उल्लेख 'स्थानपोथीं'त आहे.

# दोन जुन्या चर्चा

पुस्तक छापून झाल्यानंतर, 'विविधज्ञानविस्तार', 'लोकशिक्षण', 'सह्याद्रि' या जुन्या नियतकालिकांचे कांहीं अंक चाळीत असतांना भारताचार्य चिं. वि. वैद्य, श्री. वि. नी. छत्रे आणि श्री. आबा चांदोरकर या तीन पंडितांनीं खंडोबाविषयीं प्रकट केलेले विचार सहज हाताशीं आले. खंडोबाविषयक संशोधनाचा समग्र इतिहास समजावा, या संशोधन-विषयांत ज्यांनीं ज्यांनीं आपापल्या परीनें वांटा उचलला आहे, त्यांचें ऋण मुक्तपणें मान्य करावें आणि पुढील संशोधकांना नवमंथनासाठीं सर्व सामग्रीचा परिचय घडावा, या हेतूनें पुढें खंडोबाविषयक दोन जुन्या चर्चा जशाच्या तशा देत आहें. या नवोपलब्ध विचारांमुळें मला माझ्या मतांत बदल करण्याची आवश्यकता न वाटल्यामुळें त्यासंबंधीं मीं कांहींच लिहिलें नाहीं.

*१. भारताचार्य चिं. वि. वैद्य*

मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाच्या बत्तिसाव्या वार्षिक समारंभाचे अध्यक्ष या नात्यानें श्री. भास्करराव जाधव यांनीं 'मराठे लोक व मराठ्यांची भाषा' या विषयावर दिलेल्या भाषणाची प्रतिक्रिया भारताचार्य चिं. वि. वैद्य यांनीं 'लोकशिक्षण' मासिकाच्या सप्टेंबर १९३२ च्या अंकांत 'मराठ्यांच्या चालीरीती' या शीर्षकाखालीं प्रसिद्ध केली. भा. वैद्यांनीं त्या लेखांत श्री. जाधवांच्या देवताविषयक मतांचा परामर्श घेतांना खंडोबाविषयीं पुढील विचार व्यक्त केले आहेत :

" . . खंडोबासंबंधानें हा द्राविडी सुब्रह्मण्य स्कन्दस्वामी आहे, असें रा. जाधव म्हणतात तें बरोबर नाहीं, असें माझें मत आहे. स्कंद या शब्दाचा खंड होऊं शकेल. पण खंडोबा म्हणजे शंकर, अर्थात् तो स्कंदाचा पिता आहे. म्हणून तो व हा एक नव्हेत. हा देव मराठ्यांचाच आहे. दक्षिणेकडे तो नाहीं. द्राविडांचा एळकोट यांत कां येतो हें मात्र गूढ आहे. खंडोबाचीं दोनच स्थानें प्रसिद्ध आहेत; एक जेजुरी व दुसरें

वेदराजवळचें. पण दोन्ही स्थानें महाराष्ट्रांत आहेत. महाराष्ट्राबाहेर खंडोबाची पूजा किंवा स्थान द्रविड-कर्नाटकांत असल्याचें मला तरी माहीत नाहीं. सुबानराव, साबाजी वगैरे नांवें सुब्रह्मण्यावरून आलीं असतील, पण हा देव महाराष्ट्रांत नाहीं."

—'लोकशिक्षण', सप्टेंबर १९३२ पृ. ४९६–४९७.

*२. श्री. विष्णु नीळकंठ छत्रे*

भारताचार्य वैद्यांच्या मागील लेखांतील खंडोबा व विठोबा या देवतां-विषयींच्या मतांना विरोध करणारें आणि या दोन देवतांविषयीं नवी माहिती मांडणारें एक पत्र श्री. छत्रे यांनीं 'लोकशिक्षण'च्या नोव्हेंबर १९३२ च्या अंकांत प्रसिद्ध केलें. श्री. छत्रे यांच्या पत्रांतील खंडोबाविषयक भाग पुढीलप्रमाणें आहे.

"... खंडोबा हा द्राविड सुब्रह्मण्य स्कंदस्वामी आहे, असें जें श्री. जाधव म्हणतात तेंच बरोबर आहे; आणि हा स्कंददेव महाराष्ट्र, कर्नाटक व तेलंगण या तिन्ही प्रांतांत एक आवडतें दैवत आहे.

महाराष्ट्रांत खंडोबाचीं विशेष प्रसिद्ध अशीं दोनच स्थानें श्री. चिंतामण-राव देतात; व तीं म्हणजे जेजुरी आणि वेदराजवळचें एक. पण महा-राष्ट्रांत यांखेरीज अन्य प्रसिद्ध स्थानें आहेत. महाराष्ट्राबाहेरहि खंडोबाची पूजा किंवा स्थान द्राविड-कर्नाटकांत असल्याचें श्री. चिंतामणरावांना माहीत नसेल. परंतु तिकडेहि ह्या दैवताचीं पुष्कळ प्रसिद्ध स्थानें आहेत व तेथील पूजाहि खंडोबाच्यासारखीच आहे. उदाहरणार्थ, धारवाड जिल्ह्यांतील राणी-बेन्नूर ह्या तालुक्याच्या गांवानजिकचें एक स्थान व दुसरें संस्थान रामदुर्ग सुरेबानजवळचें. एवढेंच नव्हे, तर कर्नाटकांत ज्या नांवानें हें दैवत विशेष ओळखलें जातें, तें 'मैलारलिंग' हें नांव हैदराबाद संस्थानांतील बीड ह्या गांवाजवळील खंडोबास दिलेलें आढ-ळतें. येथेंहि राणी-बेन्नूर–जेजुरीप्रमाणें शिवलिंग आहे.

महाराष्ट्रांत खंडोबास दोन बायका आहेत. त्यांचीं नांवें म्हाळसा व बनाई. पहिली लग्नाची व दुसरी पाटाची. कानडी मैलारलिंगासहि दोनच बायका आहेत. एक म्हाळसा व दुसरी कुर्वत्तिअव्वा. पहिली लग्नाची व दुसरी रखेली आहे. द्राविड प्रांतांतील सुब्रह्मण्याला देखील दोनच

बायका आहेत. एक देवसेना अथवा देवयानी आणि दुसरी कुर्वत्तिअम्मा. दोन्ही लग्नाच्या, परंतु दुसरी अगदीं हलक्या धीवर, कैकाडी, असल्या जातीची ( सं. कैवर्त-कोळी, कैकाडी ). कर्नाटकी दैवताच्या एका बायकोचें नांव महाराष्ट्रीय आहे व दुसरें द्राविड आहे, हें लक्षांत घेण्यासारखें आहे.

ही सर्व माहिती मीं पुणें येथील भारत-इतिहास-संशोधक मंडळाच्या एका बैठकींत वाचली होती; व त्या वेळीं श्री. चिंतामणराव तेथें हजरहि होते. पुढेंहि कार्तिकस्वामीच्या स्त्रियांसंबंधीं वाद गेल्या वर्षी चालू असतां माझी मुलगी कु. नर्मदाबाई छत्रे हिनें त्याच्याच आधारें एक लेख 'ज्ञानप्रकाशां'त छापला होता. परंतु त्याकडे श्री. चिंतामणरावांचें लक्ष बहुधा गेलें नसावें.

आपल्याकडे खंडोबा संप्रदायाचीं खंडोबा, हयवती, गोडाजी, मल्हारी, दलपती, बाजीराव हीं नांवें जशीं प्रचलित आहेत, त्याप्रमाणेंच तिकडेहि खंडप्पा, हयप्पा, गुड्डाप्पा, मल्लप्पा अशीं त्याच अर्थाचीं नांवें अगदीं रोजच्या व्यवहारांत भेटण्याइतकीं प्रचलित आहेत. सुब्रह्मण्याचीं सुब्रह्मण्य, दंडपाणि इत्यादि नांवें ब्राह्मणांत विशेष रूढ आहेत आणि मुर्धन्, षण्मुख, आरुमुख (आरु =सहा), वेलन् (=भालाईत, वेल=भाला ) हीं नांवें अब्राह्मणांत रूढ आहेत. यांपैकीं वेलन् हें नांव अपभ्रष्ट होऊन वेलंग या स्वरूपांत एक ग्रामनाम म्हणून महाराष्ट्रांत आढळतें. तें वाईजवळ आहे; व जवळच्याच डोंगरावर कार्तिकेयाची मूर्ति आहे. खंडोबाचा दिवटी, बुधली, घोडा वगैरे सरंजाम कर्नाटकांतील मैलारलिंगाचाहि आढळतो. दोन्ही ठिकाणीं हळद हाच भंडार वापरतात. दोन्ही प्रांतांत दैवतांचा मदतनीस प्रधान हा 'हेगडी' याच नांवाचा आहे.

श्रीशिवाजीमहाराजांप्रमाणें पूर्वी केव्हां तरी कोणा एका धाडसी वीरानें हलकी माणसें हाताशीं धरून राष्ट्रावरील प्रचंड संकट स्वतेजानें नाहींसें केलें असावें व त्याची उपासना ह्या संप्रदायाच्या रूपानें आजवर चालत आली असावी. त्याचे मदतगार म्हणजे कोळी, धनगर, कैकाडी, वगैरे हलक्या वन्य जाति. हे सात ठिकाणचे लोकसमूह मदतीस म्हणून आले तेच हे 'येळकोट' (येळु=सात) खंडोबाच्या संप्रदायांतल्या-

प्रमाणेंच वाघ्या, मुरळी सोडण्याची चाल कर्नाटकांतील दैवतासंबंधानेंहि आहे. वरील सर्व विवेचनावरून हें ध्यानांत येईल कीं, खंडोबा तोच मैलार-लिंग व तोच सुब्रह्मण्य स्कंद. 'स्कंद'चा 'खंड' होणें हें श्री. चिंतामण-रावांस शक्य दिसतच आहे. त्यांची मुख्य अडचण अशी दिसते कीं, तेंच दैवत शिव व त्याचा पुत्र स्कंद ह्या दोघांचाहि अवतार कसा होऊं शकेल ? पण ही अडचण वाटते तेवढी मोठी नाहीं. ऐतिहासिक व्यक्ति ह्या सत्य-वस्तूवर अवतार ही केवळ कल्पनाच बसवावयाची असते. त्यांत सर्वच ऐक-मत्य होईल, अशी कशी अपेक्षा करावी ? खुद्द शिवाजीमहाराज हे विष्णूचे अवतार आहेत, अशी कल्पना 'शिवभारत'कार करतात, तरत्याच वेळीं तो शिवाचा अवतार असें समजत नाहींत काय ? महाराष्ट्रांत गणरायाला अष्टनायिकांची प्राप्ति व स्कंद अविवाहित, तर द्रविड- देशांत बरोबर याच्या उलट प्रकार. तेव्हां खंडोबाची उपासना सर्व ठिकाणीं एकच आहे, हें पाहिल्यानंतर अवताराच्या द्वैतानें विचारांत द्वैत होण्याचें कारण नाहीं."

—'लोकशिक्षण', नोव्हेंबर १९३२, पृ. ६२९–६३१.

*३. पुनः भारताचार्य चिं. वि. वैद्य*

श्री. छत्रे यांच्या पत्राला भारताचार्य वैद्यांनीं 'विविधज्ञानविस्तार'च्या मार्च १९३३ च्या अंकांत 'खंडोबा व विठोबा' या शीर्षकाखालीं विस्तृत उत्तर दिलें. त्या उत्तरांतील खंडोबाविषयक भाग पुढें देत आहें :

" . खंडोबा आणि विठोबा या दोन देवतांची भक्ति महाराष्ट्रांतच आहे, उत्तर हिंदुस्थानांत नाहीं, आणि मला वाटतें, या देवतांची भक्ति या नांवांनीं व प्रकारांनीं महाराष्ट्राच्या दक्षिणेस कर्नाटक-तेलंगण-तामिळ प्रांतांतहि नाहीं हें सिद्ध आहे. तथापि या देवांचीं मुख्य स्थानें महाराष्ट्राच्या दक्षिण भागानें—विशेषत: कानडी मुलखाच्या सरहद्दीवर असल्यानें हे देव आम्हीं महाराष्ट्रीयांनीं कर्नाटकांतून घेतले, असें अनुमान करण्याकडे प्रवृत्ति होते, व कर्नाटकी मोह पडणारे लेखक त्यास बळकटी आणतात; परंतु माझ्या मतें हे देव व यांचीं नांवें महाराष्ट्रीयच आहेत, याचीं कारणें पुढीलप्रमाणें देतां येतील.

१. प्रथम या नांवांत जो बा प्रत्यय आहे तो महाराष्ट्रीय आहे. वप्तृ, बप्प, बाप, बा अशा प्रकारच्या व्युत्पत्तिपरंपरेनें तो संस्कृतोत्पन्न असून

महाराष्ट्रांतच रूढ आहे. राघोबा, पांडोबा, सदोबा वगैरे अनेक नांवांत तो दिसतो. अर्थात् मूळ शब्द खण्डू व विठू असून त्याला सन्मानार्थी बा प्रत्यय लागून खण्डोबा व विठोबा हे शब्द झाले आहेत. तात्पर्य, हीं नांवें स्पष्ट महाराष्ट्रीय आहेत.

२. यांचीं देवस्थानेंहि महाराष्ट्रांत आहेत. कर्नाटकांत किंवा तामिळ-तेलंगणांत नाहींत. निदान विठोबाचें देवस्थान तिकडे नाहीं, खंडोबाचेंहि नाहीं; सुब्रह्मण्याचें आहे, पण सुब्रह्मण्य म्हणजे स्कंद अथवा कार्तिकस्वामी होय. खंडोबा तर शंकर होय. तेव्हां बापलेकांचा गोंधळ कसा करतां येईल ? रा. छत्रे याचा उलगडा करण्याचा प्रयत्न करतांना, असें म्हणतात कीं, 'ऐतिहासिक व्यक्ति या सत्यवस्तूवर अवतार म्हणून केवळ कल्पनाच बसवावयाची असते.' व उदाहरण म्हणून शिवाजीस विष्णूचाहि अवतार मानलें आहे व शिवाचाहि मानलें आहे, ही गोष्ट देतात. पण खंडोबा कोणी ऐतिहासिक व्यक्ति नाहीं, तर तो प्रत्यक्ष शंकर होय. स्कंदहि कोणाचा अवतार नाहीं, तो शिवाचा पुत्र आहे. तेव्हां तामिळ किंवा कानडी सुब्रह्मण्य हा महाराष्ट्रीय खंडोबा होऊं शकत नाहीं. मीं सदर लेखांत दाखविल्याप्रमाणें 'स्कंद'चा अपभ्रंश खंड एका शिलालेखांतहि आहे. स्कंदपिता या शब्दाचा अपभ्रंश खंडोबा असा झाला असावा. शिवाजीस एका काळींच दोन देवांचा अवतार मानलें नाहीं. प्रथम विष्णूचाच शिवभारतानें मानलें व नंतर शंभर वर्षांनीं बखरकारांनीं नामसादृश्यावरून शिवाचा मानलें. वरील देवतांत व्यक्ति भिन्न आहेत, आणि त्याहि पितापुत्र अशा आहेत. तेव्हां खंडोबा हा सुब्रह्मण्यापासून घेतला, असें म्हणतां येणार नाहीं. महाराष्ट्रांतील खंडोबा तामिळ-कर्नाटकांतील सुब्रह्मण्याचा बाप आहे, हा भेद लक्षांत ठेवलाच पाहिजे.

'पूर्वीं कोणीं तरी केव्हां तरी हलकीं माणसें हातासीं धरून राष्ट्रावरील संकट नाहीसें केलें व त्याची उपासना या रूपानें आजवर चालत आली असावी', असा केव्हां तरी कोणीं तरी गव्दांनीं अनैतिहासिक तर्क करून खंडोबा हा मुळांत एक मनुष्य होता, असें प्रतिपादणें केव्हांहि मान्य होणार नाहीं. खंडोबा हा शिवाचाच अवतार धर्मदृष्टयाच मानिला आहे."

—'विविधज्ञानविस्तार', मार्च १९३३, पृ.८९–९०.

*४. श्री. आबा चांदोरकर*

'सह्याद्रि' मासिकाच्या फेब्रुवारी १९३५ च्या अंकांत श्री. आबा चांदोरकर यांचा 'सह्याद्रींतील मावळ-मावळा' या शीर्षकाचा लेख आलेला आहे. त्या लेखांत मल्लारि-खंडोबाविषयीं श्री. चांदोरकरांनीं पुढील विचार व्यक्त केले आहेत :

"... नगर, पुणें व सातारा या तीन जिल्ह्यांच्या पश्चिमेस सह्याद्रीच्या पायथ्याशीं किंवा कुशींत जो प्रांत आहे, त्यासच मल्लराष्ट किंवा मल्लदेश म्हणतां येतें. सांप्रत यालाच मावळ म्हणतात. . असल्या या महाराष्ट्रांत मल्ललोक राहत होते... असें हें मल्लराष्ट्र आणि मल्ल-लोकसमाज अफाट होता; त्यामुळें त्यांना जिंकून आत्मसात् करण्याचें अवघड कार्य आर्यांना करण्यास अनेक वर्षे लागणें साहजिक आहे. हें कार्य दख्खनमध्यें ज्या वीरपुरुषानें पार पाडलें त्याचें नांव स्कंद होय. त्यामुळें त्याला अपरनाम मल्ला(ल्हा)रि हें मिळालें. सांप्रत जेजुरीस जो खंडोबा आहे, तो या वीरपुरुषाचें प्रतीक होय. स्कंद = खंड + बा (मानार्थी). यानें या महामल्ल (मावळ) देशांतील मणिमल्ल (मल्लश्रेष्ठ) नांवाच्या मुख्य राजाचा नाश जेजुरीजवळ केला आणि मावळ प्रांत, कऱ्हेपठार आणि नीरथडी या दोन प्रांतांसह आर्यांच्या हातीं आणला. जेजुरीस देवळाच्या प्राकारांत या मणिमल्लाची मूर्ति आहे. मणि याचा हा नाश 'मणिमल्ल मर्दुनी' असा श्रीसमर्थ-कृत खंडोबाच्या आरतींत उल्लेखिला आहे. मावळांत मल्लांचीं लहान लहान अशीं राज्यें होतीं, हें त्यांतील रायरी, राजेवाडी (प्रत्येकीं ३।३), राजुरी या ग्रामनामांवरून दिसतें. यावरून या मल्लांची स्वातंत्र्याची आवडहि दृग्गोचर होते. अशा कणखर लोकांना जिंकल्यामुळें आर्यांनीं आपला सेनानी जो स्कंद त्याची देव म्हणून कऱ्हे-पठारावर स्थापना केली. हा पुरुष क्षत्रिय असल्यानें सांप्रतच्या महा-राष्ट्रांतील बहुतेक क्षत्रिय घराण्यांचा कुलदेव आहे. अनेक शतकांपूर्वींचा इतिहास विसरल्यामुळें मल्लांच्या सांप्रतच्या वंशजांपैकीं कांहीं मावळी घराणींहि या देवाचे भक्त बनलीं आहेत. आपल्याकडील पुराणांप्रमाणें स्कंद हा ब्रह्मचारी आहे आणि जेजुरीस तर त्याच्या दोन स्त्रिया दृष्टीस पडतात. तेव्हां याची संगति कशी ? संस्कृत वाङ्मयांत देवसेना ही स्कंद-

पत्नी असल्याचें आढळतें. त्यावरून असें दिसतें कीं, मल्लांचा पाडाव होई-पर्यंत या सेनापतीनें लग्न केलें नाहीं; या कार्याचा शेवट कर्नाटकांत झाला आणि मग त्यानंतर सेनापतीनें लग्न केलें. द्रविड देशांतील सुब्रह्मण्यदेव म्हणजे कार्तिकस्वामी हा स्कंदच होय. आणि नवलाची गोष्ट म्हणजे त्यालाहि दोन स्त्रिया आहेत.... जेजुरीप्रमाणें पाली (जि. सातारा) येथेंहि स्कंदा (खंडोबा)चें प्रसिद्ध ठिकाण आहे. बहुधा त्या ठिकाणीं सातारा जिल्ह्यांतील मल्लांचा त्यानें पराभव केला असावा. मैळारास एक स्थान आहे; मैलारी म्हणजे मल्लारिच. सांप्रत तर महाराष्ट्रांत सहस्रा-वधि गांवांत (किंवा माळांवर) खंडोबाचीं देवळें आहेत. ज्या वीर आर्यानें सबंध मल्लराष्ट्र जिंकून आर्यांच्या हातीं दिलें, त्याच्यासाठीं आर्य इतपत उतराई झाल्यास त्यांत काय आश्चर्य? खंडोबाचें मूळ पीठ जेजुरीच होय. मल्ल फार शूर होते; 'मले' या तामिळ क्रियापदाचा अर्थ – तोंड देणें, अडथळा करणें, शौर्यानें लढणें (शब्दमणिदर्पण आणि कुमारव्यासाचें भारत या ग्रंथांत हा अर्थ आढळतो.) असा असून 'मलिव' या शब्दाचा अर्थ – कटून लढणार असा आहे. मलिव म्हणजे आपला मावळा होय.

जेजुरीचा खंडोबा महादेवाचा अवतार मानतात आणि आपण त्यास स्कंद म्हटलें आहे. तेव्हां या पितापुत्रांचा (खरें म्हटलें तर शंकर आणि कार्तिकेय या पौराणिक देवांचा येथें संबंध नसावा, स्कंद ही एक खरी ऐतिहासिक व्यक्तीच होती.) हा काय घोटाळा आहे? मूळपीठांत महादेवाचें लिंग आहे आणि वर खंडोबाची मूर्तिही आहे. माझ्या मतें हें कोडें पुढीलप्रमाणें सुटतें. शंकर ही देवता मूळ अनार्यांची; त्याप्रमाणें ती या महामल्लांचीहि होती. मावळांत अनेक शिवमंदिरें आहेत. रोहिड-खोऱ्यांतील ज्या रोहिडेश्वरापुढें 'हिंदवी स्वराज्या'ची शपथ झाली तो तेथील मावळ्यांचा आणि पायथ्यापासल्या रायरी राजधानीच्या जुन्या मल्ल राजाचा प्राचीन कुलदेव होता. रोहिडागडावर 'रोहिडमल्ल' याचें एक देऊळ आहे. तामिळ भाषेंत मल्लेश्वर म्हणजे शंकर देव असा अर्थ आहे. बंगळूरास असलें एक देऊळ आहे. संस्कृतांत मल्ल शब्द शंकर-वाचक आढळत नाहीं. बारा ज्योतिर्लिंगांतील मल्लिकार्जुन (श्रीशैला-वरील) हा मल्लांचाच मूळ होय, पुढें आर्यांनीं शिव ही देवता आपल्या

पंचायतनांत स्थापन केल्यानें तो आपल्या पवित्र क्षेत्रांत आला. वर सांगितल्याप्रमाणें अनार्यांना आत्मसात् करावयाच्या अनेक मार्गांपैकीं हा एक मार्ग होता. तेव्हां जेजुरी येथें मल्लांचें जें प्राचीन शंकराचें स्थान होतें तें तसेंच ठेवून, त्याच्या शेजारीं आर्यांनीं आपल्या स्कंदाची स्थापना केली. सारांश, ही गोष्ट लक्षांत घेतल्यास खंडोबाचें (शंकर का स्कंद ?) वरील कोडें आपोआप सुटतें आणि जितांना पूर्णपणें नामशेष करण्याच्या युरोपीय क्रौर्यापासून आर्य हे अलिप्त होते, हेंहि लक्षांत येतें."

—'सह्याद्रि', फेब्रुवारी १९३५, पृ. १४३, १४५-१४६.

अनुक्रम 39८४२ - भू-प्रवास
क्रमांक 30८ नोंद 9२/9२/६

# खंडोबाचीं गाणीं

'लोकसाहित्यांतील खंडोबा' या परिच्छेदांत (पृ. ११९-१२२) खंडोबाविषयक लोकगीतांची चर्चा येऊन गेलीच आहे. अगदीं अलीकडे प्रा. वा. दा. गोखले यांनीं 'श्रीखंडोबाचीं पदें' या नांवाचा खंडोबा-विषयक एकोणपन्नास गीतांचा संग्रह प्रसिद्ध केला आहे. हीं गीतें श्रीभाऊ-महाराज पोवार या खंडोबाभक्तांच्या संग्रहांतील असून, तीं सर्व वाघ्या-मुरळ्यांच्या कार्यक्रमांतील दिसतात. या गीतांत बाणाईचें हरण, म्हाळसा-बाणाईचा सवती-मत्सर, देवाचा दसरा-दिपवाळीच्या सणांतील थाट, खंडेरायाचा विवाह, सोमवती-यात्रेचा सोहळा, इत्यादि विषय आलेले आहेत. हीं गीतें प्राधान्यानें खंडोबाच्या जेजुरी क्षेत्राशीं संबद्ध आहेत.

हीं गीतें सहज चाळलीं तरी त्यांचा असा एक विशेष जाणवतो कीं, त्यांचा अंतर्बाह्य ढंग शाहिरी कवितेचा आहे. या गीतकारांनीं खंडोबाकडे एखाद्या मराठी शिलेदाराची वा सरदाराची भूमिका दिली आहे आणि त्या भूमिकेंतील त्याच्या प्रणयाचे रंगढंग थेट लावणीच्या सुरांत--नव्हे लावण्या लिहूनच चितारले आहेत. खंडोबा आणि बाणाई यांच्या पहिल्या भेटीचा प्रसंग चितारतांना गीतकार म्हणतो :

बाणुनं करूनिया ग थाट
शिरीं ग दुधाचे भरून माठ जी ।
जात होती बाजाराच्या वाटं
पडली देवाची गांठ जी ।
पदर धरला बळकट
बाणु म्हणे सोड माझी वाट जी ।
धनगर आहेत आरबट
तुम्हीं ते करतील खटपट जी ।
बाणु झिडकारी महाराज,
बाणु झिडकारी मल्लारी ।
सोड पदर जाऊं दे घरीं जी ।। १ ।। पद क्र. ३०.

हा ढंग थेट लावणी-वाङमयांतील राधेला अडविणाऱ्या कृष्णाच्या शृंगार-वर्णनासारखा आहे. देव बाणाईच्या नादीं लागल्यावर म्हाळसेची उपेक्षा सुरू झाली. गीतकार म्हाळसेची मनोव्यथा म्हाळसेच्याच शब्दांत व्यक्त करतांना म्हणतो :

सेज केली महालीं जी ।
लाविल्या समया सात, अरे हो,
वाट पाहिली साऱ्या रात्रीं जी ।
देवा, माझीं त्रासलीं नेत्रं । अरे हो ।
कोठें गेली होती स्वारी जी ।।
कोणाच्या मंदिरीं जी ।
खरें सांगा मल्हारी जी ।
मला कळलें अंतरीं जी ।
लुब्ध तुम्ही झाला बाणुला । अरे हो ।
म्हाळसा म्हणे देवाला ।...पद क्र. ४३.

बाहेरख्यालीपणा करणाऱ्या नायकाला छेडतांना गरती नायिकेच्या मुखांतून असेच उद्‌गार शाहिरांनीं काढलेले दिसतात.

खंडोबा आणि बाणाई यांचा एक नाजूक प्रणय-प्रसंग चितारतांना भक्त-शाहीर गातो :

मुख दावुन बानु ग गेली ।
स्वारी देवाची ग वेडी झाली जी ।।
एकदा मध्यानीच्या अमलांत ।
देव मल्हारी निद्रागत ।
बानु नार आली शयनागारांत ।
हिनं उशाला मांडी ग दिली ।
स्वारी देवाची ग वेडी झाली जी ।।
ह्या ग बानु नारीचं आंग ।
जसं चमके ऐनाचं भिंग ।
देव मल्हारी झाले दंग ।

गोष्ट देवाच्या मनीं ग ठसली ।
स्वारी देवाची ग वेडी झाली जी ।। पद क्र. १५.

बाणाईच्या छंदानें वेडा झालेल्या देवाचा अनुरोध करतांना म्हाळसा आवेगानें म्हणते :

अरे देवा, त्वां मसी बोलावं गोड ।
तुला वाणूचं भरलं वेड ।।
मौजा केल्या रे बहु प्रीतीनं ।
कुठं नाहीं रे पडलं उणं ।।
एकाएकीं झालास रे बैमान ।
फार मन केलं रे कठीण ।।
कसं रे वाणूनं लावलं वेड ।
देवा मल्हारी सोडिला गड ।। पद क्र. २६.

–एवढ्या उताऱ्यांवरून या पदांची जडणघडण आणि त्यांतील भाव-भावनांची जात कशी थेट लावणीच्या वळणाची आहे, हें लावणीवाङ्मयाशीं परिचय असणाऱ्यांना मुद्दाम स्पष्ट करून सांगण्याची आवश्यकता उरणार नाहीं. खंडोबाचे भक्त त्याचीं भक्तिगीतें या थाटांत रचतात आणि त्याचे उपासक तीं तत्मयतेनें ऐकतात, हें सत्य माझ्या आतांपर्यंतच्या विवेचनाला पुष्टि देणारें आहे.

या पदसंग्रहांत, 'महाराजा, मल्हारी रे । तुझ्यावीण कोण तारी', 'मल्हारी, किती तुझे गुण गाऊं । तुझ्या चरणीं लंपट होऊं', 'मल्हार नाम बहु गोड', अशीं कांहीं भक्तिगीतेंहि आहेत. 'कानडा देव धनी मैराळ' (पद क्र. ३५) ही देवाच्या कानडेपणाची स्मृति आणखीहि कांहीं गीतांत प्रकटलेली आहे. खंडोबाविषयक अध्ययनांत या संग्रहाचा अभ्यास अनेक दृष्टींनीं उद्‌बोधक आणि रंजक आहे.

या गीतांच्या कर्त्यांचीं नांवें समाप्तिमुद्रांतून गोवलेलीं आहेत. बापू वाघ्या, धोंडू ग्यानू, शंकर वाघ्या, बाबाजी गोकुळ, बाळा कृष्ण, हैबती, विठू वाघ्या, मुकिंदगुरूचा चेला, गंगाराम, मल्लवाघ्या, इत्यादि रचनाकारांचीं नांवें आढळतात. अशींच तुकाराम वाघ्याचीं दोन गीतें श्री. वा. दा. मुंडले यांनीं भा. इ. मं. मंडळाच्या षष्ठ संमेलन-वृत्तांत (पृ.१७७) दिलेलीं आहेत.

# शेख महंमदाच्या संकीर्ण कवितेंतील उल्लेख

शेख महंमद श्रीगोंदेकराच्या 'योगसंग्रामां'तील खंडोबाच्या उपासनेविषयींचे उल्लेख पुस्तकांत जागोजाग त्या त्या संदर्भांत येऊन गेलेच आहेत. शेख महंमदाची उर्वरित कविता 'शेख महंमदबाबा यांचा कवितासंग्रह' (संपादक : वा. सी. बेंद्रे) या नांवानें नुकतीच प्रसिद्ध झाली आहे. त्यांतहि अनेक स्थळीं शेख महंमदाचा वाघ्या-मुरळ्यांच्या प्रथेविषयींचा संताप व्यक्त झाला आहे. वाचकांच्या जिज्ञासापूर्तीसाठीं ते सर्व स्फुट उल्लेख पुढें दिले आहेत.

१. वाघ्ये भुते मुरळ्या, विश्वाच्या वोवळ्या ।
त्यांसी खेळत रळ्या, भक्तें भोगुनी ।। क्र. १०, पृ. ३३.

२. न हो बसव्या मुरळ्या । शुक्रीं खंडोबाच्या वोविळ्या ।।
क्र. ६६, पृ. ५६.

३. श्रीहरि न ये जयाच्या चित्ता । त्यास गांजिती देवता ।
मनुष्यास केलें वाघा भुता । मुंकी श्वानाची भुंकवी ।।
क्र. ७०, पृ. ५७.

४. दासी वेश्या मुरळी । सदा ती वोंवळी ।
ते तुज सोवळी । जाली कैसी ।। क्र. २०२, पृ. ८८.

५. वेश्या आराधे नी मुरळ्या गोसाविणी. . . (त्रुटित) क्र. २२८, पृ. ९३.

६. भक्ताचे लेकीकून मल्हारी, मागवी वारी
वाघा वाजवी घोळ ।
मनुष्याच्या आकारें असती, श्वान म्हणविती
पिवळें करूनि भाळ ।। क्र. २७४, पृ. १०९.

असेंच मैराळ-विडंबन मुक्तेश्वराच्या 'संक्षेप-रामायणां'त (सुंदरकांड ११–१६) आलेलें आहे.

## शुद्धिपत्र

| पृष्ठ | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| १ | ६ | प्रताकस्थानें | प्रतीकस्थानें |
| १७ | २८ | साधानांच्या | साधनांच्या |
| २५ | २३ | अवारत-कथा | अवतार-कथा |
| २८ | १० | द्रविडदेवांत | द्रविडदेशांत |
| २८ | २७ | मुरुगाचीं | मुरुगनचीं |
| ३० | ८ | सर्वत्र | सर्वच |
| ५२ | २२ | अवस्थ | अस्वस्थ |
| ५३ | १८ | गुंतीगुंतीची | गुंतागुंतीची |
| ६७ | २१ | याववकालीन | यादवकालीन |
| ७५ | ३ | म्हाळसा-मर्तीच्या | म्हाळसा-मूर्तीच्या |
| ७५ | ११ | मार्ण्तंड | मार्तण्ड |
| ८४ | १७ | व्यक्न | व्यक्त |
| ८६ | ८ | पिवीसारख्या | पिशवीसारख्या |
| १०५ | ७ | प्रंतकवि | संतकवि |
| ११५ | २४ | नीककंठराव | नीळकंठराव |
| ११९ | २४ | लोकगीतांच | लोकगीतांत |
| १२४ | २५ | गक | गळ |
| १२७ | ११ | प्रेम | प्रेय |

# संदर्भ-साहित्य

१. श्रीमल्लारिमाहात्म्यम् (संस्कृत पोथी)
२. श्रीमल्लारिमाहात्म्य (मराठी ओवीबद्ध) . सिद्धपाल केसरी
३. श्रीक्षेत्र जेजुरीमाहात्म्य . बा. खं. खाडे, पुणें. श. १८४७
४. श्रीमल्लारिसहस्रनामस्तोत्रम्
५. सौरपुराणम् (आनंदाश्रम आवृत्ति), पुणें. श. १८११
६. देवीभागवत
७. ललितासहस्रनामभाष्यम् : निर्णयसागर, मुंबई. १९१९
८. शंकर-विजय : सं. जयनारायण तर्कपंचानन, कलकत्ता. १८५५
९. श्रीतत्त्वनिधि : वेंकटेश्वर प्रेस, मुंबई. १९०१
१० श्रीमांगीशमाहात्म्य . सं. पु. ना. वर्दे, मुंबई. १९३७
११ सह्याद्रि-खंड डी कुन्हा-संपादित आवृत्ति
१२. चतुर्वर्गचिंतामणि हेमाद्रि पंडित, कलकत्ता. १९३४
१३. निर्णयसिंधु : कमलाकरभट्ट. निर्णयसागर, मुंबई. १९०५
१४. पंचदशी : विद्यारण्यस्वामी. निर्णयसागर, मुंबई. १९४९
१५. भारतीय लोककथा . पब्लिकेशन डिव्हिजन, नवी दिल्ली. १९५९
१६. महाराष्ट्र लोकसाहित्य माला, पु. १–४; महाराष्ट्र लोकसाहित्य समिति, पुणें.
१७. श्रीसप्तकोटीश्वर देवस्थानचा इतिहास : ज. वि. सूर्यराव–सरदेसाई, मुंबई. १९३४
१८. गोमंतकीय देवालयें : ना. भा. नायक, मडगांव. १९५९
१९. गाजतीं दैवतें : पं. महादेवशास्त्री जोशी, पुणें. १९५९
२०. श्रीपतिभट्टकृत ज्योतिषरत्नमाला : सं. डॉ. मु. ग. पानसे पुणें. १९५७
२१ लीळाचरित्र : सं. ह. ना. नेने, नागपूर
२२. स्थानपोथी सं. डॉ. वि. भि. कोलते, मलकापूर

२३. ज्ञानेश्वरी (सरकारी आवृत्ति) : मुंबई, १९६०
२४. श्रीज्ञानेश्वरकृत योगवासिष्ठ : सं. गो. का. चांदोरकर, धुळें
२५. एकनाथी भागवत
२६. भावार्थ रामायण
२७. एकनाथ-कृत रुक्मिणीस्वयंवर
२८. योगसंग्राम शेख महंमद श्रीगोंदेकर. सं. वा. सी. बेंद्रे, मुंबई. १९६०
२९. श्रीसमर्थांचा गाथा . सं. अनंतदास रामदासी, वांई. शके १८५०
३० एकनाथ-गाथा चित्रशाळा, पुणें. १९३०
३१. महिकावतीची बखर : सं. वि. का. राजवाडे, पुणें. श. १८४६
३२. श्रीकेशवस्वामींची कविता सं. नरहरशास्त्री खरशीकर
३३. रंगनाथस्वामी निगडीकरकृत कवितासंग्रह : सं. वि. ल. भावे, मुंबई श. १८२७
३४. स्वानुभवदिनकर . सं. शं. श्री. देव, धुळें. श. १८३३
३५. दिनकरांची स्फुट कविता : सं. शं. श्री. देव, धुळें. श. १८३९
३६. मध्वमुनीश्वरांची कविता : सं. प्र. व्यं. गुब्बी, पुणें
३७. अमृतरायकृत कवितासंग्रह : वा. ना. ओक, मुंबई. १८९६
३८. निरंजन रघुनाथांचे ग्रंथ सं. य. व्यं. कोल्हटकर, सांगली. १९३५
३९. निरंजनमाधवांचा कवितासंग्रह, भा. १ ला : सं. ल. रा. पांगारकर, पुणें. १९१९
४० मोरोपंतकृत स्फुट काव्यें, भा. १ ला ; सं. वा. ना. ओक, मुंबई. १८९६
४१. श्रीमौनीचरितामृत : रा. कृ. देशपांडे, मुंबई. श. १८५८
४२ दासोपंत दिगंबर : सं. जस्टिन ई. अॅबट, पुणें
४३ इतिहासप्रसिद्ध पुरुषांचे व स्त्रियांचे पोवाडे : सं. आचार्य, शालिग्राम, पुणें. १९११
४४. होनाजी बाळ यांच्या लावण्या : सं. शं. तु. शालिग्राम, पुणें. १९२४
४५. मऱ्हाटी संस्कृति शं. बा. जोशी, पुणें. १९५२
४६. महाराष्ट्राचीं चार दैवतें ग. ह. खरे, पुणें. १९५८
४७ मुंबई इलाख्यातील जाती . गो. मं. कालेलकर, बडोदें १९२८
४८ प्राचीन द्राविड : ल. गो. घाणेकर, बडोदें. १९३३

... ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अ.क्र. ३९८४१ वि: भू-प्रवास

४९. दे. ऋ. ब्राह्मण-परिचय-ग्रंथ : सिद्धेश्वरशास्त्री चित्राव, पुणें. १९४४
५०. तमिळनाडु : पं. महादेवशास्त्री जोशी, पुणें. १९६०
५१. केरळ : पं. महादेवशास्त्री जोशी, पुणें. १९६०
५२. मराठे आणि त्यांची भाषा भास्करराव जाधव, कोल्हापूर. १९३४
५३. खंडोवाची गोष्ट · मरे मिचेल, मुंबई. १८५५
५४. श्रीरवळनाथ आणि कोंकणांतील देवस्की पु. रा. बेहरे, मुंबई. १९५५
५५. मराठ्यांच्या संबंधानें चार उद्गार · राजारामशास्त्री भागवत.
५६. गुलामगिरी म. ज्योतिबा फुले
५७. चित्पावन : ना. गो. चापेकर, पुणें
५८. मूर्तिविज्ञान ग. ह. खरे, पुणें. १९३९
५९. मल्हारी मार्तण्ड (जेजुरी-वर्णन) : शं. रा. देवळे, पुणें. १९५७
६० हळदीचें सांस्कृतिक स्थान : चिं. ग. कर्वे ('प्रसाद', ऑगस्ट १९५८)
६१. मल्लारि मार्तण्ड भैरव पांडुरंग देसाई, ('नवभारत', नोव्हेंबर १९५७)
६२. खंडोबा-मल्लारि-मैलार : एक लोकदेव · ग. ह. खरे, ('केसरी', २९ डिसेंबर १९५७)
६३. जेजूरीचा खंडोबा ब. मो. पुरंदरे ('तरुण भारत', ६ डिसेंबर १९५९)
६४. ज्ञानेश्वरी व म्हाळसा ग. ह. खरे (चित्राव अभिनंदन ग्रंथ. १९५४)
६५. नेवासें येथील महालसेची पुरातन मूर्ति . ह. ना. नेने (संशोधन–लेख-संग्रह, भा. २ ह. ना. नेने, नागपूर. १९५७)
६६. कांहीं शब्दांची व्युत्पत्ति . वि. का. राजवाडे (भा. इ. मं. म. अहवाल, श. १८३२)
६७. जेजुरी येथील शिलालेख म. म. द. वा. पोतदार (भा. इ. मं. मं. इतिवृत्त, श. १८३५)
६८. निंबगांव येथील खंडोबा श्री. गं. ना. मुजुमदार (भा. इ. मं. मं. इतिवृत्त. श. १८३५)

12391


६९. औरंगजेबाच्या मूर्तिभंजकत्वाविषयीं दंतकथा : का ना. साने (भा. इ. सं. मं. अहवाल, श. १८३२).

७०. मुरली : वि. रा. शिंदे (वि. रा. शिंदे यांचे लेख, व्याख्यानें व उपदेश)

७१ भा. इ. सं. मं. त्रैमासिक, नवभारत, मराठी संशोधन-पत्रिका, विविधज्ञानविस्तार, लोकशिक्षण, सह्याद्रि, इत्यादि नियतकालिकें.

७२. खंडोबाचीं माहात्म्यें व स्तोत्रें--हस्तलिखितें.

73. Elements of Hindu Iconography : T. A. Gopinath Rao, Madras 1914.

74. The Kadamba Kula : G. M. Moraes, Bombay 1931.

75. Hindu Holidays and Ceremonials : B. A. Gupte, Calcutta 1916.

76. Popular Culture in Karnatak : Masti Venkatesa Ayengar, Bangalore 1937.

77. A Hand-book of South Indian Images : T. N. Srinivasan, Tirupati 1954.

78. Chaitanya and His Companions : D. C. Sen, Calcutta 1917.

79. Some Aspects of Kerala and Tamil Literature, Part II : M. R. Aiyangar, Travancore 1950.

80. K. V. Rangaswami Aiyangar Com. Volume, Madras 1940.

81. Kerala Studies : P. K. Narayan Pillai, Trivandrum 1958.

82. Village Gods of South India : H. Whitehead, Calcutta 1921.


ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम 38682 वि: भू-प्रवास
क्रमांक 308 नों दि: 12/12/61

REFBK 0012211

REFBK-0012211